श्रीदासराम महाराजांचा

# वचन संग्रह



* संपादक *

प्रा. डॉ. के. वा. आपटे

श्री दासराम ग्रंथमाला : पुष्प ७

## श्रीदासराम महाराजांचा

# वचन संग्रह

– संपादक –

प्रा. डॉ. के. वा. आपटे

– प्रकाशक –

श्री. न. ना. गोखले

एम्. ए.

आवृत्ति पहिली | सांगली | इ. स. २००८

प्रकाशक : –

**श्री. न. ना. गोखले,**

एम. ए.

गव्हर्मेंट कॉलनी, विश्रामबाग, सांगली.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिन : – गणेश चतुर्थी

इ. स. २००८

मुखपृष्ठ संकल्पना : –

**प्रा. ना. के. आपटे**

प्रसाद मुल्य : – ५० रुपये मात्र.

अक्षर जुळणी व मुद्रण : –

एस्. बी. ऑफसेट, सांगली.

॥ श्रीराम ॥

# आशीर्वाद

शतश: अभिवादन

आमच्या प्रा. डॉ. के. वा. आपटे तथा केशवकाकांनी आमच्या ती. प. पू. श्री. दादांच्या बोलण्यात येणारे ३६६ विषय काढले व त्यामधील रोज एक विषय चिंतनासाठी घेता यावा अशी श्री दादांची ३६६ चिंतने एकत्रित केली आहेत. काढलेले विषय जीवाला निर्विषय करणारे आहेत व त्यांचा एकच विषय होणार आहे. तो म्हणजे

*॥ विषय तो त्यांचा झाला नारायण।*

*॥ नावडे धन जन माता पिता ॥* *श्री तुकाराम महाराज*

नारायण हे नाव आमच्या भगवान श्री सद्गुरु श्री. निंबरगीकर महाराज यांचे आहे.

आमच्या ती. प. पू. श्री दादांचा खरा विषय जर कोणता असेल तर

॥ चैतन्याच्या वाऱ्या तुला माझा नमस्कार

। तुझा नाद प्रकाश हाचि आम्हा साक्षात्कार॥

आपले जीवनच मुळी नाद प्रकाश युक्त जीवन आहे. त्यातला जो नाद आहे तेच ते भगवंताचे नाम आहे व त्यातला जो प्रकाश आहे तेच ते भगवंताचे रूप आहे. याची अनुभूती या ग्रंथाच्या वाचनाने येणार आहे. तशी ती आपणां सर्वांनां यावी अशी भगवान श्री सद्गुरु श्री निंबरगीकर महाराज यांचे चरणी शतश: प्रार्थना आहे.

सदरचा ग्रंथ प्रकाशात आणत आहेत आमचे श्री दादांच्यावर नितांत श्रद्धा नव्हे नव्हे निष्ठा असलेले त्यांच्याच कृपेतील एक साधक श्री न. ना. गोखले, सांगली. सदर ग्रंथ प्रकाशन म्हणजे त्यांच्या श्रेष्ठ गुरु भक्तीचे अमृत फळ आहे. या ग्रंथाचा उपयोग माझ्यासह अनेक परमार्थ प्रेमी चिंतकाना होणार आहे. त्यामुळे आमचे प्रा. डॉ. के. वा. आपटे व श्री न. ना. गोखले यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडे आहेत. अधिक काय लिहू.

शेवटी भगवान श्री सद्‌गुरु श्री तात्यासाहेब महाराज कोटणीस, माझे आजोबा ती. प. पू. श्री मामा महाराज केळकर व माझे पितृदेव ती. प. पू. श्री दासराम महाराज केळकर या त्रैमूर्तींच्या चरणी अनेक प्रणिपात करून येथेच थांबतो.

।। राजाधिराज सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।

श्री दादांचा कृपाभिलाषी

*चंद्रशेखर*

(चंद्रशेखर रामराय केळकर)

॥ श्री ॥

# प्रकाशकीय

श्रीगुरुदेव प. पू. दादांच्या तत्त्वज्ञानाचा सारभूत असा ग्रंथ श्री दासराम महाराजांचा वचन संग्रह हा एक अद्वितीय ग्रंथ आहे. दादांच्या कीर्तनात, प्रवचनात, संभाषणात जी काही प्रपंच व परमार्थ या बाबत उत्स्फुर्त सहज वचने येत त्यांचा संग्रह येथे केला आहे. याच्या वाचनाने भक्ताचे मुमुक्षु, मुमुक्षुचे साधक व साधकाचे सिद्‌ध होतील यात तिळमात्र शंका नाही. ग्रंथसंदर्भात डॉ. के. वा. आपटे यांनी लिहीलेच आहे त्याप्रमाणे श्री आण्णांनीही ग्रंथाचे अद्वितीयत्व त्यांच्या आशिर्वादात दर्शविलेच आहे. यात मी काही लिहावे अशी माझी योग्यता अजिबात नाही.

परंतू या कामात ज्या गुरुबंधूंचे सहाय्य झाले त्यांचे आभार मानणे योग्यच ठरेल त्या सर्वांना हे आवडणार नाही तथापी मी त्यांचा रोष पत्करून हे काम करणार आहे.

ग्रंथाचे आताचे स्वरुप प्राप्त होण्यापर्यंत ज्यांनी परिश्रम घेतले ते डॉ. के. वा. आपटे सरांनी खूप परिश्रम घेतले. प. पू. दादांचे अंतरंगातील हे एक आहेत हे आपणा सर्वांना ठाऊकच आहे. त्यांचे ऋण न फिटणारे आहे. मी त्यातच राहू इच्छितो.

या ग्रंथाच्या पुर्णत्वापर्यंत माझे गुरुबंधु श्री रेगोडकर (बाबा) यांनाही खूप कष्ट पडले अर्थातच त्यांना कष्ट शब्द आवडणार नाही. कारण प. पू. दादांची सेवा याच दृष्टिने त्यांनी हे काम केले. त्यांचे आभार मानायला माझ्याजवळ शब्द नाहीत.

या प्रकाशनाची व्यावहारीक बाजू त्यांच्या आईच्या (सौ. प्रतिभा) आशिर्वादाने माझी दोन्ही मुले चि. रामकृष्ण तथा शैलेश व मुलगी

चि. जान्हवी तथा मंजिरी यांनी सांभाळली. प. पू. दादांच्या सेवेची संधी त्यांना मिळाली हे त्यांचे भाग्यच आहे. आणि अशी त्यांचीही श्रद्धा आहे. या कामात आणखी एक विशेष गोष्ट सांगायची म्हणजे या कामी माझे स्नेही डॉ. सुभाष भिडे यांनी मात्र ही सेवेची संधी मिळावी म्हणून आपली सेवा रुजू केली आहे. ते स्वत: उत्तम साधक असल्यामुळे प. पू. दादांचे त्यांना आशिर्वाद आहेतच.

पुस्तक छपाईचे काम मागच्या परमार्थ प्रश्नोत्तरी पुस्तकाप्रमाणे एस. बी. ऑफसेट प्रेसचे मालक श्री. मुकूंदराव कुलकर्णी व त्यांचे चिरंजीव श्री. अमोल कुलकर्णी यांनी साधकाच्या आत्मीयतेने केलेले आहे. हे ग्रंथ पाहिल्यावर नक्कीच जाणवेल. त्यांचे प्रेमपूर्वक आभार मानणे माझे कर्तव्यच आहे.

या ग्रंथाच्या वाचन, मनन, चिंतनाने सर्वांना परमार्थाचे मर्म समजावे आणि साधन करायची उत्कटता निर्माण व्हावी. प. पू. दादा सर्वांवरच कृपेचा वर्षाव करतील यात तिळमात्र शंका नाही.

श्री. आण्णानी दिलेले आशिर्वाद हे या ग्रंथाचे आधार आहेत. त्याशिवाय हे कार्य संपन्न झालेच नसते.

या ग्रंथ प्रकाशनाच्या निमित्त्याने मी व माझे कुटुंबीय यांना प. पू. दादांची सेवा करण्याची संधी मिळाली हे आम्हा सर्वांचे भाग्यच. अशीच संधी वारंवार मिळावी आणि प. पू. दादाच्या कृपेने त्यांच्या चरणाशी संपूर्ण शरणागती प्राप्त व्हावी अशी सहस्त्रश: प्रार्थना करतो.

न .ना. गोखले.

## १ जानेवारी

नारायणराव भाऊसाहेब तथा गुरुलिंगजंगम म्हणजे निंबरगीकरमहाराज. हे महान् संत कर्नाटकातील देव निंबरगी या गावी होऊन गेले. त्यांनीच चिमड संप्रदायाचे प्रवर्तन केले. निंबरगीकरमहाराज म्हणजे सगुण ब्रह्म होते. त्यांचे 'गुरु लिंगजंगम' हे नुसते नाव घेतले तरी आपला उद्धार झाला पाहिजे. गुरू म्हणजे श्रेष्ठ, लिंग म्हणजे आत्मतत्त्व, आणि जंगम म्हणजे चैतन्ययुक्त. एवं गुरुलिंगजंगम म्हणजे चैतन्यरूप श्रेष्ठ आत्मतत्त्व. 'श्रीगुरुलिंगगीता' म्हणजे निंबरगीकरमहाराजांचे विद्यमान सगुण स्वरूपच आहे.

निंबरगीकरमहाराजांनी जे साधन सांगितले आहे तसे इतर कुणी सांगत नाहीत. महाराज म्हणत नाक, कान, डोळे बंद करून आत काय चालले आहे ते पहावे. आत श्वासोच्छ्वास चालला आहे. या श्वासोच्छ्वासाच्या गतीकडे लक्ष हवे. श्वासोच्छ्वासात परमात्मा आहे. आपण त्याची उपासना करीत रहावयाचे आहे. महाराजांनी दाखवून दिलेल्या चैतन्याकडेच आपले लक्ष हवे. हे लक्ष ठेवणे म्हणजेच साधन. आपण जर या साधनाच्या अभ्यासाने आत्मानुभव घेतला तर महाराजांना खराखुरा आनंद होणार आहे. महाराज सांगत, 'नडी नुडी इदे जन्म कडी.' त्याचा अर्थ असा :– हे साधका, साधनाचा अभ्यास कर. मग आत्मदर्शन घे. तसे झाल्यावर हाच शेवटचा जन्म होतो.

## २ जानेवारी

मानवी जीवनाचे बहिर्मुख, अंतर्मुख, स्थिर आणि ऊर्ध्वगामी असे चार प्रकार आहेत.

१) जीवन बहिर्मुख असले की बाहेरील दूवैत आणि लाथाळी हे एकापाठोपाठ आलेच. जे प्रारब्धात आहे ते भोगावे लागतेच आहे. बाह्य विषयांचे आकर्षण असल्यामुळे, आत दुर्लक्ष असते. हवा, पाणी, अन्न आणि भोग यांमध्ये बहिर्मुख जीवन गुंतून पडलेले असते.

२) अंतर्मुख जीवन :- आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यामिक तापांनी जो तापला आणि मग आत काय आहे हे जाणण्याची आच ज्याला लागली आणि जो आत पाहू लागला, त्याचे जीवन अंतर्मुख होते. बाहेरच्या विषयांकडे धावणारे मन आता आत वळल्याने मनाची खेच आत होते. मग बाकीच्या वृत्तीही आत वळतात.

३) स्थिर जीवन :- जीवन अंतर्मुख झाले की त्याला आपोआप स्थिरता येते. जसे :- नळाच्या तोटीतून पाणी खाली पडत असते. आता जर त्या तोटीला बूच लावले तर पाण्याचा प्रवाह उलटा फिरतो. परंतु वरून येणाऱ्या पाण्याचा प्रवाह चालू असल्यामुळे ते पाणी स्थिर होते.

४) ऊर्ध्वमुख जीवन :- मग अशी एक वेळ येते की काही काळाने स्थिर झालेले जीवन ऊर्ध्वमुख होते. साधनामुळे शरीरातील नवदूवारांचा निरोध होऊन, अंतर्मुख झालेले जीवन ऊर्ध्वगामी होते. ऊर्ध्वगामी झालेले हे जीवन शुद्ध आकाशरूप असते.

# ३ जानेवारी

आमचे साधन कसे चालते? साधनाला बसण्याच्या आधीच आपण त्या साधनातून उठण्याची वेळ ठरवून ठेवतो. त्यामुळे आमचे सारे लक्ष घड्याळाकडे लागते. साधनाकडे आपले लक्ष नसतेच. अशा तऱ्हेने होणारे साधन हे किती उपयोगाचे ठरेल, हे काय सांगावयास पाहिजे?

साधनाचे वेळी नीट लक्ष न लागल्यास, मनात राग, लोभ इत्यादि विकार येतात. हे विकार का आले याचे कारण शोधण्याची सवय जर जीवाला लागली, तर ते विकार दूर होऊन साधक साधनमार्गावर येऊ शकतो.

साधन करताना प्रथम कान तिखट करून जीवनाच्या गतीचा सूक्ष्म ध्वनि ऐकावा. तसे झाल्यास दृष्टि आपोआप त्या गतीवर स्थिर होते.

संतांचा श्वासोच्छ्वास आणि आमचा श्वासोच्छ्वास यातही फार फरक आहे. धान्य न घालता जाते फिरविले असता जशी कोरडी घरघर ऐकू येते, त्याप्रमाणे आमचे श्वसन असते. संताचे श्वासाची गति व नामाची गति एक झाली असल्याने त्यांच्या श्वसनात एक प्रकारची नादलुब्धता येते.

परमात्मा हा दयाळू आहे. जीवाने आपल्याकडे यावे असेच त्याला वाटत असते. त्यासाठी तो क्षणाक्षणाला जीवाला नेण्यास विमान पाठवितो. हे विमान म्हणजे सहस्रदळातून भ्रूमध्यापर्यंत येणारी प्राणगति होय. जीवाचे जीवन ऊर्ध्वमुख होऊन जर ते भ्रूमध्यात गेले, तर जीव त्या विमानात बसून परमात्म्याकडे जाऊ शकतो.

## ४ जानेवारी

डोळे, कान, जीभ इत्यादि इंद्रिये ही खरे म्हणजे आपले नोकर आहेत. पण आपण त्यांना सैल सोडल्याने, त्या नोकरांचा अंमल हा आपल्यावर म्हणजे त्यांच्या मालकावर दिसून येतो. आपण म्हणालो " आज साधनाला बसायचे" तर मनाजीपंत म्हणजे आपले मन लगेच सांगणार "नाही," आज सिनेमाला जायचे, आणि हे मनाजीपंत जसे सांगणार तसे आपण करणार. अशा प्रकारे आपले सर्व काही इंद्रियांच्या मर्जीवर चालले आहे.

असा प्रकार जर परमार्थात घडू लागेल तर ते चालणार नाही. नोकरांच्या ताब्यात मालक गेला की लौकिक व्यवहार घडतो.याउलट जर मालकाच्या ताब्यात नोकर असतील तर परमार्थ घडतो.

प्रारब्ध हे संताना, साधकांना, सिद्धांना, ज्ञानी माणसांना तसेच अज्ञानी मनुष्याला – कुणालाही – चुकलेले नाही. प्रारब्ध हे भोगूनच संपवावे लागते. त्या शिवाय माणसाला काही गत्यंतर नाही.

गुरूंनी दाखवून दिलेल्या गतीवर लक्ष ठेवण्याचा उद्देश काय? शुद्धीकरण. मग एकदा का चित्ताचे चैतन्याशी एकीकरण होऊन त्या चैतन्यावर दृष्टि स्थिर झाली की हळूहळू त्या गतीतील स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण हे जड अंश दूर होतात. जडाचे अंश दूर झाले की, गतीचे शुद्धीकरण झाले असे समजावे. मग शुद्ध झालेली ती गती ऊर्ध्वमुख होते. ही गती ऊर्ध्वमुख झाल्याशिवाय आत्मानुभूति येत नाही. म्हणून गतीचे शुद्धीकरण करण्यास त्या गतीवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

## ५ जानेवारी

स्वप्न म्हणजे काय? स्वप्न हा मनाचा खेळ आहे. त्याप्रमाणे विश्व हा चैतन्याचा खेळ आहे. स्वप्नातून जागे झाल्यावर ज्याप्रमाणे स्वप्नाची किंमत शून्य आहे, त्याप्रमाणे चैतन्याची जाणीव होताच विश्वाची किंमत शून्य आहे.

जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या, आणि उन्मनी या अवस्था आत्म्याच्या अस्तित्वामुळे आहेत. आत्माच त्या अवस्थांचा भोग घेत असतो.

माणसाला चार देह आहेत. परमार्थात त्यांचा निरास व्हावा लागतो. पण तो निरास होतो काय असा प्रश्न येऊ शकतो. त्याचे उत्तर होय असे आहे.

कसे ते पहा :– स्थूल देहाने आपले जागृतीतील व्यवहार चालू असतात. आणि आपल्याला निरनिराळे अनुभव येतात. स्वप्न अवस्थेत स्थूल देहाचा निरास झालेला असतो. आणि सूक्ष्म शरीराने आपणास स्वप्नातील पदार्थांचा अनुभव येतो. या सूक्ष्म, स्थूल देहांचा निरास झाल्यावरच आपणास सुषुप्ति ही अवस्था येते. सुषुप्ति अवस्थेत स्थूल आणि सूक्ष्म देह कार्यप्रवण नसतात. सुषुप्ति अवस्थेत कारण नावाचा देह असतो. कारणदेह अज्ञानरूप आहे. या कारणदेहाचा निरास झाल्यावर तुर्या ही अवस्था येते. तुर्या ही केवळ ज्ञानरूप आहे. तेथे अज्ञान नसते. तुर्यावस्थेत महाकारणदेह असतो. जेव्हा या महाकारण देहाचा निरास होतो तेव्हा उन्मनी ही अवस्था येते. या उन्मनी अवस्थेत कोणताच देह कार्यप्रवण नसतो.या सर्वांचा अर्थ असा की परमार्थात चत्वार देहांचा निरास होऊ शकतो.

## ६ जानेवारी

चैतन्य आणि जड हे जेथे एकत्र आले आहेत असे आपले उपाधिभूत जीवन आहे. हे जीवन चैतन्याच्या अनुभूतीचे माध्यम आहे. उपाधिभूत जीवनात स्थूल , सूक्ष्म, कारण, आणि महाकारण देह हे अनावश्यक जड अंश आहेत. साधनाच्या अभ्यासाने हे चार देह निरस्त होऊन जातात. समजा, एका भांड्यात पाणी आहे. भांड्यातले पाणी भांडे न हलविता, भांडे उपडे न करता, भांडे न फोडता बाहेर काढावयचे आहे. अशा वेळी भांड्याच्या आकाराचा एकादा पदार्थ भांड्यात टाकला की पाणी बाहेर पडते. त्याप्रमाणे उपाधिभूत जीवनावर चित्ताचे तादात्म्य झाले तर त्या उपाधिभूत जीवनाला धक्का न लागता त्यातील अनावश्यक जड अंश आपोआप दूर होतात आणि उपाधिभूत जीवन हे शुद्ध होते. उपाधिभूत जीवनावर लक्ष केंद्रित करण्याने चैतन्याचा अनुभव येणार आहे.

आपल्या जीवनात स्वास्थ्य लाभावे अशीच प्रत्येकाची इच्छा असते. आणि ते प्राप्त करून घेण्यास त्याची गडबड, धांदल, प्रयत्न इत्यादि चाललेले असतात. स्वास्थ्य म्हणजे काय आहे? चित्ताला स्थैर्यता प्राप्त होणे म्हणजेच जीवनात स्वास्थ्य मिळणे आहे. चैतन्याचा अनुभव आल्याशिवाय माणसाच्या चित्ताला स्थैर्यता येत नाही.

हे जेवढे दृश्य आपणांस दिसते आहे आणि त्यात जी हालचाल आपणांस दिसते आहे ती सर्व परमेश्वराच्या सत्तेने चालू आहे. माणसाचा श्वासोच्छ्वास हादेखील परमेश्वराच्या इच्छेनेच चालू आहे.

## ७ जानेवारी

संसारात कोणताही व्यवहार करताना माणसाचे लक्ष पैशाच्या पुंजीवर असते. त्याप्रमाणे परमार्थ करताना आपण काहीही करत असलो तरी आपले लक्ष चैतन्यावर पाहिजे. कोणतीही वस्तु दृष्टीस पडली असता प्रथम चैतन्याचे ज्ञान व्हावयास पाहिजे आणि त्या नंतर ती वस्तु दिसावयास हवी.

आपण आपल्या डोळ्यानी दृश्य पहातो. परंतु ज्याच्यामुळे हे डोळे पाहू शकतात, परंतु ज्याला डोळे पाहू शकत नाहीत, असा आत्मा आहे. अशा या आत्म्याची अनुभूती सद्‌गुरूंनी सांगीतलेल्या साधनाच्या अभ्यासाने होते.

आपल्या मनात सतत संकल्प आणि विकल्प येत असतात. परमार्थाच्या दृष्टीने पाहिल्यास हे संकल्प विकल्प म्हणजे मनातील केरकचरा आहेत. ते निरुपयोगी आहेत. त्यांच्यामुळे मन हे अशुद्‌ध बनते. मनातील संकल्प विकल्प हे साधनाला घातक आहेत. या संकल्प- विकल्पांचा न्यास अथवा निरास झाल्याशिवाय माणसाला आत्म्याचे दर्शन होत नाही.

पाण्याच्या टोपावर संघात झाला, तो उचलून दुसरीकडे ठेवला, तो हलविला, त्यात पाणी घातले, टोपातील पाणी ढवळले असता, पाणी चंचल होते. त्याप्रमाणे बाह्य आघात झाले, नवीन संकल्प आले, संकल्प विकल्प वाढले असता मन हे अस्थिर आणि चंचल होते.

## ८ जानेवारी

संतांच्या संगतीने, संतांच्या उपदेशाने काही लोकांचे मन पालटते. त्यांचा परमेश्वरावर विश्वास बसतो. ते ईश्वरावर प्रेम करू लागतात. ते ईश्वराची भक्ति करू लागतात. अशा भक्तांची काळजी ईश्वर घेतो. तो त्यांचे रक्षण करतो. याचा अर्थ ईश्वराची भक्ति न करणाऱ्या माणसाकडे तो दुर्लक्ष करतो असा होतो. म्हणजेच ईश्वर हा भक्तांचा पक्षपाती आहे असा अर्थ होतो. आता ईश्वराला जर सर्व माणसे अपत्यवत् सारखी / समान असतील तर त्याने भक्ताचे कल्याण करणे हे त्याच्या पक्षपाताचे उदाहरण ठरते. पण तसे नाही. येथे आपण हे लक्षात घ्यावयास हवे की ईश्वर पक्षपाती नाही. या संदर्भात आई व मुले यांचे उदाहरण देताऱ्येते. आईला सर्व मुले सारखी असतात हे खरे. परंतु जे मूल सर्वस्वी आईवर अवलंबून असते,त्याचीच काळजी आई घेते. लहान मूल संपूर्णपणे आईवर अवलंबून असते. ते विस्तवाकडे अगर विहिरीकडे जाऊ लागले तर आई त्याचे पाठोपाठ जाऊन त्याला विस्तवाला हात लावू देत नाही अथवा विहिरीत पडू देत नाही. बरोबर याचप्रमाणे जो भक्त संपूर्णपणे देवावर अवलंबून असतो अशा भक्ताची काळजी परमेश्वर घेतो. यात आश्चर्य करण्यासारखे काय आहे?

## १ आळेपारी

हे खरे की आपापल्या पूर्वकर्मानुसार माणूस या जगात जन्माला येतो. आपापल्या बऱ्यावाईट कर्मानुसार तो सुखदुःखे भोगीत रहातो आणि प्रारब्धकर्माची समाप्ति होताच तो मरून जातो.

जिवंत असेपर्यंत माणूस काम, क्रोध इत्यादि विकारांच्या स्वाधीन होतो. मग त्या त्या विकारांनी त्याचे मन गढूळ होते. देह म्हणजे मी अशी त्याची भूमिका असते. अहंकारामुळे आणि बाह्य विषयांच्या आसक्तीमुळे माणूस बरीवाईट नवीन कर्मे करीत राहतो. "मी-मला-माझे" या त्रिकुटातून तो सुटत नाही. परिणामतः या जगाची उत्पात्ति करणारा, जगाचे नियंत्रण करणारा असा कोणी ईश्वर आहे याची जाणीव त्याला होत नाही. आणि समजा तशी जाणीव त्याला कुणीतरी करून दिली तरी तो तिकडे दुर्लक्ष करतो. "असेना का तो देव! त्याच्याशी माझे काय देणे घेणे?" अशी त्याची वृत्ति बनते. तो ईश्वराकडे लक्षच देत नाही.

साहजिकच जे कोणी देव मानीत नाहीत, जे कोणी देवाला विन्मुख होतात, जे कोणी ईश्वराकडे पाहण्यास तयार नसतात, जे ईश्वराकडे लक्ष देत नाहीत, अशा लोकांच्या बाबतीत देव त्यांना विन्मुख होतो, तो त्यांच्याकडे पहात नाही, तो त्यांच्याकडे लक्ष देत नाही. असे असल्यामुळे ईश्वर हा पक्षपाती आहे असे म्हणता येत नाही.

## १० जानेवारी

या जगात ज्यांची खूप स्तुति होते त्यांची थोडीशी निंदा ही व्हायचीच. तसे पाहिल्यास निंदा ही आवश्यकच आहे. निंदेमुळे स्तुति पचनी पडते. ज्याप्रमाणे पाचक औषधाने जेवलेल्या अन्नाचे पचन होते, त्याप्रमाणे निंदेमुळे स्तुतीचे पचन होते.

गीतेने सहाव्या अध्यायात नासिकाग्र दृष्टि ठेवण्यास सांगितले आहे. ते फार महत्त्वाचे आहे. नासिकाग्री दृष्टि ठेवल्यामुळे विषयांची विस्मृति होते.

सर्वजण अहंकार बाळगतात आणि अहंकाराने कर्म करतात. अहंकाराने केलेले कर्म बहुधा फुकट जाते अथवा पश्चात्तापास कारण होते. आणखी असे :- ज्या वस्तूबद्दल आपणास अहंकार येतो ती वस्तु आपल्याजवळून निघून जाते.

व्यवहारात आपण आपल्या कामासाठी इतर लोकांचे साहाय्य घेतो. 'कामापुरता मामा' अशी आपली वृत्ति असते. काम संपताच आपण त्या माणसाकडे पहावयास तयार नसतो. 'गरज सरो वैद्य मरो' अशी आपली वृत्ति नसावी.

परमार्थात परमात्म्याचे ज्ञान / साक्षात्कार होणे हे महत्त्वाचे आहे. हे जे परमात्म्याचे ज्ञान आहे ते ज्ञान जगातील व्यवहाराच्या पलीकडचे आहे. म्हणून या आत्मज्ञानाचा व्यवहारात उपयोग व्हावा, काहीतरी फ़ायदा व्हावा, अशी इच्छा बाळगणे हे अज्ञानपणाचे लक्षण आहे.

## ११ जानेवारी

इंद्रियांचे मार्फत माणसाचे मन बाह्य विश्वातील दृश्याशी तादात्म्य पावत असते. त्यामुळे मनाच्या वृत्तीत गढूळपणा येतो. जीवन गढूळ होते. आणि अशा गढूळ झालेल्या मनात आत्म्याचे प्रतिबिंब पहाता येत नाही.

काही लोक विशिष्ट व्रते करतात, तसेच ते काही नेमही पाळतात. त्यामुळे इतर लोक त्यांना नावे ठेवतात अथवा त्या 'व्रत नेमापासून' परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात. पण व्रत-नेम पाळणाऱ्याने या लोकांकडे लक्ष देऊ नये. आपण पत्करलेले व्रत आणि नियम निष्ठेने पाळण्यात कोणाचीही भीड न बाळगता कसूर करू नये.

विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि विनाश हा सर्व चैतन्याचा विलास आहे. हा विलास खरे म्हणजे जीवाच्या आनंदासाठीच आहे. पण ते न कळल्याने माणूस दु:खी होतो.

लोक जगातील अनेक गोष्टींवर प्रेम करतात. पण खरे म्हणजे त्या वस्तु प्रेम करण्यास पात्र नसतात. एक आत्मा ही वस्तूच प्रेम करण्यास पात्र आहे.

आपण बाह्य वस्तूपासून आनंद शोधत असतो. बाह्य वस्तु आनंददायक आहेत असे आपणास वाटत असते. खरे म्हणजे आनंद हा आपल्यातच आहे. आणि तो शोधून घ्यावयास आपण शिकले पाहिजे.

## १२ जानेवारी

जगात वावरताना आपण अनेक गोष्टींबद्दल चिंता करीत असतो. जर आपण आत्म्याची चिंता केली तर आत्मा आपली चिंता करतो.

प्रपंच आणि परमार्थ यांची पूर्णता कशात आहे? जो आपल्याला पहातो तो मुक्त होतो. मुक्त होण्यातच प्रपंच-परमार्थाची पूर्णता आहे.

माणसाला स्वत:ची स्तुति केलेली आवडते. ईश्वरालाही स्वत:ची स्तुति केलेली आवडते.

भौतिक शास्त्रात प्रयोग केले जातात. त्या प्रयोगांना नाना प्रकारची बाह्य उपकरणे लागतात. आत्मसाक्षात्कार करून घेण्याच्या प्रयोगात बाह्य उपकरणे उपयोगाला येत नाहीत.

माणसाचे शरीर ही उपाधि आहे. आत्मा हा शरीररहित, निरुपाधिक आहे. म्हणून उपाधियुक्त जगात वा गावात हिंडून आत्मा सापडत नाही.

जसजसा दृश्याचा संकोच आपल्या दृष्टीपुढे होतो तसतसा आत्म्याचा आविर्भाव होतो. याउलट जसजसा आत्म्याचा संकोच होतो तसतसा दृश्याचा विस्तार वाढत जातो.

शरीर ही जीवनाला आलेली उपाधि आहे. म्हणून शरीर म्हणजे जीवन नव्हे. शरीर नष्ट झाले तरी आपले जीवन संपत नाही.

## १३ जानेवारी

इंद्रियांचे द्वारा जग व जगातील वस्तु दिसतात. पण इंद्रियांमुळे आपणास बाहेरील जगाचे ज्ञान होत नाही. इंद्रियांचे द्वारा दुसराच कोणीतरी जगाकडे पहात असतो. ज्याच्या योगाने जग दिसते त्याचा पत्ता मात्र आपणास लागत नाही.

माणसे नाटके करतात. त्या नाटकांत काही माणसे भाग घेतात. काही माणसे तर अत्यंत नाटकी असतात. पण तसे पाहू गेल्यास परमेश्वराइतका नाटकी या जगात दुसरा कोणी नाही.

आपण या जगात जन्माला आलो. आपल्याला बाहेरील जग दिसू लागले. पण हे जग नाहीच आहे. म्हणून संत म्हणतात, 'जे नाही ते दिसत आहे.' या जगात अधिष्ठान या स्वरूपात, अव्यक्त रूपात परमात्म– तत्व आहे. पण ते आपणास दिसत नाही. म्हणून साधु सांगतात की 'जे आहे ते दिसत नाही.' आत्मा या जगात सर्वत्र आहे पण तो आपणास दिसत नाही.

काही माणसे जगमित्र असतात. त्यांची सर्वांशी मैत्री असते. तो जगावर आणि इतरांवर प्रेम करतो. पण जो जगावर प्रेम करतो त्याला परमात्म्यावर प्रेम करता येत नाही. जो जगाकडेच पहात आहे, तो आत्म्याकडे पाहू शकत नाही. याउलट जो आत्म्याला पहातो त्याला जग पहाता येत नाही.

## १४ जानेवारी

पश्चात्ताप झाला असता जीवनात क्रांतीच होते.

ब्रह्मानंद भोगण्यास ब्रह्माइतकेच दुःख भोगावे लागते.

परमार्थात थापा पचत नाहीत. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून वागावे.

स्मरण केल्याने पूर्वीचे संस्कार बळावतात.

व्यवहार असा आहे की ज्ञानापेक्षा अज्ञान बरे असे काही वेळा म्हणावे लागते.

ज्याची प्रवृत्ती बाह्य जगाकडे नाही तोच आत पहातो म्हणजे अंतर्मुख होतो.

मनाच्या आणि चित्ताच्या लहरी कमी झाल्या की बुद्धि ही देहबुद्धि न रहाता आत्मबुद्धि होते. आणि मग जीव त्या आत्मबिंदूत केंद्रित होतो.

दान देणे हे महाकठिण आहे.

या जगात निर्भेळपणे चांगले अगर निर्भेळपणे वाईट असे काही नाही. या जगात बऱ्या- वाईटाचे मिश्रणच असते.

चित्ताला होणारे समाधान हेच खरे समाधान असते.

आपले आईबाप कोण या संदर्भात आपणास आपल्या आईबापावरच विश्वास ठेवावा लागतो.

## १५ जानेवारी

आपल्या आईबापाबद्दल आपणास विश्वासच ठेवावा लागतो.

दृष्टीपुढील दृश्य जसजसे कमी कमी होत जाईल तसतसे आत्म्याचे दर्शन वाढत जाते.

चैतन्य कळले की जीव हा चैतन्यरूपच होऊन जातो. आणि चैतन्य कळल्यावर कोणतीही गोष्ट जीवाला ज्ञात होते.

आपणास आपण पहाणे हाच मोक्ष.

प्रपंच जरी नकोसा झाला तरी प्रपंचावर लाथ मारणे हे सोपे नाही .

आत्मवस्तु प्राप्त झालेला जीव आपली नसलेल्या परक्या वस्तूकडे पहातसुद्धा नाही हे निश्चित समजावे.

आत्म्याचा  प्रकाश पहात कोणतेही काम केले तर यश येतेच.

आपण आत्म्याची प्रार्थना व उपासना करावी. तसे केले असता दुसऱ्याला विनंती अथवा प्रार्थना करण्याचा प्रसंग येत नाही.

निर्विकल्प स्थितीबद्दल काय सांगता येईल? आपणच आपला विषय होणे हीच निर्विकल्प स्थिति.

चित्त शुद्ध झाल्याशिवाय आत्म्याचा अनुभव येत नाही, हे परमार्थाचे वर्म आहे.

## १६ जानेवारी

आत्मा / ब्रह्म सच्चिदानंद आहे. त्यातील चित् म्हणजे चैतन्य. हे जास्त महत्त्वाचे आहे. हे चैतन्य म्हणजे चिद्-वायु आहे. त्यालाच देव /ईश्वर /परमेश्वर असेही म्हणतात.

चैतन्य हे अनादि व अनंत आहे. ते नित्य नवे आहे. ते कधीही शिळे होत नाही. चैतन्य पूर्ण आहे.चैतन्यात फरक / विकार होत नाहीत. त्याला रूपांतर ,स्थित्यंतर व अवस्थांतर नाही.तरी चैतन्याशिवाय काही घडू शकत नाही. चैतन्य एवढी एकच गोष्ट आहे. बाकी सर्व यच्चयावत् खोटे आहे.

चैतन्याचे ठिकाणी विश्वाची स्फूर्ति आहे. म्हणून विश्व दिसते. सत्तारूपाने चैतन्य सर्वत्र आहे. ते सर्वव्यापक आहे.चैतन्य नाही असे स्थानच कुठे नाही. चैतन्य म्हणजे स्पंद आहे. या स्पंदाचा / चैतन्याचा दोरा अनंत विश्वाच्या मध्यातून ओवलेला आहे.किडा मुंगी पासून ते थेट ब्रह्मदेवा पर्यंत स्पंद / चैतन्य आहे. विश्वामध्येही सर्वत्र चैतन्य खेळून राहिलेले आहे. मनुष्य इत्यादि प्राणिमात्रात ते चैतन्य प्रकर्षाने जाणवते. याउलट दगड, धोंडे इत्यादीसारख्या ठिकाणी चैतन्य हे स्पष्टपणे आपणास जाणवत नाही. म्हणून त्या पदार्थांना आपण व्यावहारिक भाषेत जड अथवा अचेतन म्हणतो. याचा अर्थ तेथे चैतन्य नाही असा मात्र नाही.

## १७ जानेवारी

जडाची उपाधि चैतन्याला येते त्यामुळे चैतन्य जाणवत नाही. शेवाळाआड पाणी, ढगाआड सूर्य तसे उपाधीआड चैतन्य आहे. माळेतील मणि बाजूला गेले की आतील दोरा दिसतो, त्याप्रमाणे जडाची उपाधि दूर केली की चैतन्य प्रत्ययाला येते. चैतन्याच्या बैठकीवरच आपणास जडाचेही ज्ञान होते आणि चैतन्याचेही ज्ञान होते.

चैतन्य हे द्रष्टा आहे. हा द्रष्टा इंद्रिये, मन यांचा विषय होत नाही. म्हणून व्यवहारात चैतन्यरूप द्रष्ट्याचे ज्ञान होत नाही.

चैतन्य म्हणजे प्रकाशाची ज्योत आहे. तिलाच आत्मज्योति असे म्हणतात. ही आत्मज्योति आपल्या जड बाह्य डोळ्यांना दिसत नाही. आपल्या बाहेरच्या नजरेला आत्मज्योत पहाता येत नाही. आत्म्याला अथवा चैतन्याला पाहू शकणारी नजर वेगळी आहे. या चैतन्याकडे लक्ष जाण्यास आणि चैतन्य पहाण्याची दृष्टि प्राप्त होण्यास आत्मसाक्षात्कारी सद्‌गुरूच्या कृपेची नितांत आवश्यकता आहे. गुरुकृपेने चैतन्याला पाहण्याचा डोळा प्राप्त होतो. गुरुकृपा झाल्यावर जीव अंतर्मुख होऊन मग तो आत्मज्योति पाहू शकतो. येथे हे लक्षात घ्यावे, जीवचैतन्यानेच आत्मचैतन्याला जाणावयाचे / पहावयाचे आहे. चैतन्याला पहाणे म्हणजे स्वत:चे खरे स्वरूप पहाणे होय. देहाचे रूप हे आपले खरे रूप नव्हे. चैतन्य हे आपले खरे रूप आहे.

गुरूने सांगितलेल्या साधनाच्या अभ्यासाने साधकाच्या जीवनात चैतन्य हे नाद, बिंदु, कला व ज्योति या चार रूपांत प्रगट होते.

## १८ जानेवारी

चैतन्याच्या द्वारा चैतन्याशी तादात्म्य पावणे हा निखळ परमार्थ आहे.

चैतन्यास पहाणे, चैतन्याची अनुभूति घेणे हाच परमार्थ आहे.

परमात्मा हा सच्चिदानंदवायुस्वरूपी आहे. म्हणून परमार्थात वायूचेच साधन आहे.वायूचे साधन हाच निखळ परमार्थ आहे.

जीवनात जीवनाचे होणारे विचरण म्हणजेच परमार्थ.

जीवनात जीवन मिसळणे हाच परमार्थ

वाऱ्यात वारे मिसळणे हाच परमार्थ

साध्य ते साधन आणि साधन ते साध्य हाच परमार्थ.

परमार्थ म्हणजे स्वार्थाची पराकाष्ठा.

नि:स्वार्थी बनणे हाच परमार्थ आहे.

आपल्या ठिकाणावर आपण आरूढ होणे हाच परमार्थ.

केवळ सुखाची अवस्था जन्मभर व मेल्यावर उपभोगणे हाच परमार्थ.

निश्चळ होण्यातच परमार्थ साठवलेला आहे.

आपले आयुष्य परमार्थासाठी खर्ची पडले पाहिजे.

परमार्थात नादानुसंधानात रहाणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

व्यवहाराचा त्रास होणे हे एक परमार्थाचे लक्षण आहे.

## १९ जानेवारी

माणसाने चोवीस तास स्वत:स परमार्थात गुंतवून घेतले पाहिजे.

परमार्थात निष्ठेला फार महत्त्व आहे.

परमार्थी माणसाच्या क्रिया वृत्ति- शून्यतेने होत असल्यामुळे, त्यामध्ये पाप आणि पुण्य चित्रगुप्तास मांडता येत नाही.

परमार्थाची कथा वाचून वा ऐकून कुणाचा उद्धार झाला आहे ?

परमार्थाचे सार एका ओळीत आहे :- निश्चळाच्या अंगावरी । उठती चंचळाच्या लहरी ।। निश्चळ आत्मा. दृश्य चंचळ.

परमार्थात अधिकाराशिवाय अनुग्रह देता येत नाही.

प्रपंच- परमार्थात हसतमुख असावे.

संतांची ओळख हीच परमार्थाची किल्ली.

नारायण नाम हीच परमार्थातील जादू आहे.

जेथे लकाकी नाही व चकाकी नाही तेथेच खरा परमार्थ आहे असे समजावे.

परमार्थातील पहिला अनुभव कोणता असेल तर तो संशयाचा नाश.

बुद्धीचा पालट होणे हाच परमार्थात मोठा चमत्कार आहे.

ज्याचे हातून साधा व्यवहार घडत नाही तो परमार्थ काय करील ?

बाहेरचा उजेड परमार्थमार्गावर उजेड पाडू शकत नाही.

## २० जानेवारी

जग खरे आहे की खोटे आहे असा एक प्रश्न तत्त्वज्ञानात चर्चिला जातो. जग आहे पण ते खोटे आहे. जग खोटे आहे पण ते आहे खोट्या नाण्याप्रमाणे. अनंत ब्रह्मांडांचा नायक आपणास कळणे जरूर आहे.

हल्ली परमार्थसुद्धा बोलघेवडा झाला आहे. अधिकार नसतानासुद्धा काहीजण परमार्थावर सतत बोलत असतात.

संत दयाळू असतात. ते भक्ताच्या इच्छा पूर्ण करतात पण खऱ्या साधकाने संतांकडे जगातील गोष्टी मागू नयेत.त्याची मागणी करण्यास संतांकडे जाऊ नये.

संतांचे पुत्र हे संत असतातच असे नाही. संतांचा वंश दोन प्रकारचा असतो. मांसवंश आणि ज्ञानवंश. मांसवंश म्हणजे त्याची मुलेबाळे.ती अधिकारी असतीलच असे नाही. पण संतांचेकडून ज्ञान प्राप्त करून घेतलेला शिष्य हा अधिकारी असू शकतो.म्हणून संतांचा ज्ञानवंश महत्त्वाचा.

घरात अनेक माणसे रहात असतात. पण त्यातील चार माणसेसुदूधा एका विचाराने रहाणे कठिण आहे असेच दिसून येते.

विश्वास हा महत्त्वाचा आहे. व्यवहारातही विश्वास लागतो. पण व्यवहारात विश्वासावर संपूर्णपणे विसंबून चालत नाही.परमार्थातही विश्वास लागतो. या विश्वासाशिवाय परमार्थ होत नाही.

## २१ जानेवारी

व्यवहारात माणूस अहंकारी असतो. 'मी कोणीतरी आहे', मी 'करीन ती पूर्व' , 'मी पाडेन ती प्रथा' , आणि 'मी करीन ती कथा' आणि 'गाईन ती गाथा' असे तो म्हणत असतो. पण ही अहंकाराची भावना खरी नाही.

सर्व गोष्टी ईश्वराच्या इच्छेने होत असतात. पण हे आपणास पटत नाही. ते पटवून घेण्यासाठी आपण असा विचार करावा :- शंभर गोष्टी माझ्या मनासारख्या झाल्या. अशा स्थितीत एक गोष्ट माझ्या मनाप्रमाणे झाली नाही. का? किंवा शंभर गोष्टी आपल्या मनाविरुद्ध घडल्या पण एक गोष्ट मात्र मनासारखी झाली. असे का व्हावे ? याचा विचार केला तर कळते की सर्व गोष्टी आपल्या हातात नाहीत .

सत्त्व , रज आणि तम हे तीन गुण आणि कफ, वात, पित्त हे तीन दोष यांनी जीव बांधलेले आहेत. या तीन गुणांचा यथोचित उपयोग केला ,तर ते गुण परमार्थात उपयुक्त ठरून परमार्थ घडतो.

परमार्थ करणाऱ्या माणसाचा एकच विषय होतो तो म्हणजे नारायण. आता ज्याचा विषय एक नारायण झाला , त्याला अन्य विषयांत गोडी वाटत नाही,त्यांची चव घ्यावी अशी इच्छा होत नाही.

गतजन्मी ज्यांचे खटके उडतात त्यांचे या जन्मी प्रेम असते आणि पूर्वजन्मी ज्यांचे प्रेम असते त्यांचे या जन्मी खटके उडतात.

## २२ जानेवारी

जीवाशिवाचे ऐक्य होणे हे परमार्थात महत्त्वाचे आहे. हे ऐक्य होण्यास नामस्मरणाशिवाय अन्य साधन नाही. शिवाच्या स्मरणाने जीव शिवरूप होतो. परमार्थात स्मरण हे फार महत्त्वाचे आहे. हजारो साधकांत एकादाच नामस्मरणाचे महत्त्व जाणतो.

काम , क्रोध , इत्यादि विकार मनात असतात. ते माणसाला त्रासदायक असतात. परमार्थ करणाऱ्याचे हे विकार जावे लागतात. हे विकार तसे जात नाहीत ,तर परमार्थात त्यांची चौकट बदलते. याचा अर्थ असा की काम , क्रोध इत्यादींचा यथोचित उपयोग म्हणजेच त्या विकारांचा निरास.

परमार्थ करणाऱ्याजवळ विवेक आणि वैराग्य हवे. विवेक म्हणजे काय? या जगात नित्य काय आहे आणि अनित्य काय आहे याचा विचार. ब्रह्म नित्य आहे बाकी सर्व अनित्य आहे हे ज्ञान म्हणजेच नित्यानित्यविवेक होय . असा नित्यानित्यविवेक बाणला की वैराग्य येऊ शकते. पण हे वैराग्य टिकवून मात्र धरावे लागते.

परमात्म्याचा साक्षात्कार केव्हा होतो? चार देहांचा निरास झाल्यावर त्या परमात्म्याचा अनुभव येतो. माणसाला स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण असे चार देह आहेत . या चार देहांचा निरास झाल्यावर पलीकडे जी स्थिती आहे तिच्यामध्ये परमात्म्याचा साक्षात्कार होतो.

## २३ जानेवारी

'मी ' चा शोध हीच तत्त्वज्ञानाची गुरुकिल्ली आहे. 'मी' वरच जगाचा व्यवहार चालू आहे. या 'मी ' मध्येच ज्ञान,सत्ता, आणि आनंद आहे.

'मीच' जग आहे. कारण जगात 'मीच' आहे. 'मी' म्हणजे सर्व काही असे कळले की, अहंकाराला स्थानच उरत नाही. मला माझे ज्ञान आहे म्हणून 'मी आहे', हे सिद्ध करून दाखविण्याची आवश्यकता नाही. 'मी' हाच साक्षी, चैतन्य आणि ब्रह्म आहे.

शरीरातील श्वासोच्छ्वासात नाम आहे. श्वास आणि उच्छ्वास यांच्या दरम्यानच्या संधिकाळात नाम आहे. त्यात परब्रह्म आहे.त्यातच आत्माराम प्रगट होतो. असे हे नाम परमार्थात साधायचे आहे.

कुणालाही दुःख नको असते, पण आनंद हवा असतो. असे का? कारण आपण मुळात ब्रह्म आहोत आणि ब्रह्म हे आनंदस्वरूप आहे. साहजिकच आपणांस आपले मूळ आनंदस्वरूप पाहिजे असते.

भौतिक शास्त्रे बदलत्या विषयांशी निगडित असल्याने त्यांचे सिद्धांत बदलतात. अध्यात्मशास्त्राचे सिद्धांत खरे असल्याने ते बदलत नाहीत.

प्रेमाची सत्ता ही राजकीय सत्तेपेक्षा श्रेष्ठ आहे.

संसार सुखाचा नाही. संसार हा संपूर्णपणे सुखकारक आहे असा अनुभव आजपर्यंत कुणालाच आलेला नाही.

## २४ जानेवारी

आत्मा, ब्रह्म, चैतन्य हे सर्व व्यापक आहे. साहजिकच ते प्रत्येक माणसाच्या जड, स्थूल, शरीरात आहे. जगात असणारे अथवा देहात असणारे ब्रह्म या मांसरूप डोळ्यांना दिसत नाही. चैतन्य हे ग्राह्य नाही. जगातील आत्मा अगर चैतन्य दिसायचे झाल्यास प्रथम आपल्याला आपल्या देहातील चैतन्य दिसावयास हवे. ते अनुभवास यावयास हवे. तसे होण्यास आपल्या बाह्य चक्षूंत जे बाह्य दृश्य भरले आहे ते दूर व्हावयास हवे. म्हणून गुरुप्रणीत साधन करताना बाहेरील डोळे हे मिटूनच घ्यावे लागतात. त्यानंतर साधक अंतर्मुख व्हावयास हवा.साधकाचे मन हे सुरवातीला संकल्पविकल्पाने भरलेले असते. परमात्मा /चैतन्य हे तर निर्विकल्प आहे. म्हणून मन अथवा बुद्धि हे जर निर्विकल्प झाले तर त्या मनाला किंवा बुद्धीला आत्मा हा ग्राह्य होतो. म्हणजेच आत्म्याला अथवा चैतन्याला पहाण्याचा डोळा प्राप्त होतो.

आपण जिवंत आहोत तोपर्यंत आपला श्वासोच्छ्वास चालू असतो.आपल्या दोन नाकपुड्यांतून श्वास आणि निश्वास हे आत बाहेर ये-जा करीत असतात.म्हणजे आपला श्वास हा अखंडपणे गतिरूप आहे. या श्वासाधिष्ठित साधनाने चैतन्याचा साक्षात्कार होतो.

## २५ जानेवारी

आपल्या डाव्या नाकपुडीत चंद्र ही देवता आहे आणि उजव्या नाकपुडीत सूर्य ही देवता आहे, असे पूर्वीचे ग्रंथ सांगतात.डाव्या नाकपुडीत इडा नावाची नाडी आहे आणि उजव्या नाकपुडीत पिंगला नावाची नाडी आहे. अशा प्रकारे देहातील श्वासोच्छ्‌वासात इडापिंगला अथवा चंद्रसूर्य अशा दोन गति आहेत . या गतींचा मारा जेथे होतो तेथे आत्मसाक्षात्कार होतो. या चंद्रसूर्याचा लोप झाला की अग्निरूप आत्म्याचा लोटच लोट दिसू लागतो.

श्वासाची जी गति आहे त्यातच नामाची गति आहे. ही नामगति सद्गुरु दाखवून देतात. सद्गुरूंनी दाखवून दिलेल्या नामगतीत दृष्टि व कान यांचा लय झाला की ती गति ऊर्ध्वमुख होऊन वाहू लागते. आणि मग हीच गति चैतन्याला /आत्म्याला पहाण्यासाठी डोळ्याचे काम करू लागते.ही ऊर्ध्वमुख झालेली गति ज्या ठिकाणी पडते त्या ठिकाणाला डोळा असे म्हणतात. आणि या डोळ्यानेच /दृष्टीनेच आत्मस्वरूप /चैतन्यस्वरूप पहाता येते. ही गति चिद्वायु- स्वरूपी आहे. आत्मा हाही चिद्वायु स्वरूपी आहे. म्हणूनच या गतिरूप डोळ्याला आत्मरूप दिसते. या डोळ्याचा /दृष्टीचा आत्मा हा एकच विषय बनतो. गुरुकृपेने साधन जमले तर आत्मसाक्षात्कारासाठी आवश्यक अशी दृष्टि अथवा डोळा साधकाला प्राप्त होतो.

## २६ जानेवारी

आपल्या शरीरात जीवनाची गति अखंड चालू आहे. त्या जीवनाच्या गतीवर जर लक्ष असेल तर चैतन्याचे अनुभव माणसाला येतात. इतकेच नव्हे तर जीव आणि आत्मा हे भिन्न नसून एकच आहेत हाही अनुभव येतो.

सद्गुरु केल्यानंतर सतत सद्गुरूंचे स्मरण हवे. सकाळी उठल्यापासून एकही श्वास सद्गुरूंच्या स्मरणाशिवाय घ्यावयाचा नाही. तसेच एकही श्वास सद्गुरूंचे स्मरणाशिवाय सोडावयाचा नाही. हे करणे जमल्यास बारा तासांत अनुभव येतो.

शरीरात भगवंताचे नाम उच्चारले जात आहेच. भगवंताच्या नामोच्चारामध्ये जाणीव आणि नेणीव ज्या स्थितीत विलयाला जातात, त्या स्थितीलाच मोक्ष असे म्हणतात.

आपल्या देहात चैतन्याची हालचाल सतत चालूच आहे. तिच्याकडे लक्ष ठेवण्याची लकब अभ्यासाने साधली पाहिजे.

देह हा जड आहे. तथापि त्या जड देहातच चैतन्याने चैतन्यास मिळावे लागते. असे एकदा मीलन झाले की जड देहाची जरुरी उरत नाही. म्हणजे जडाला सुटून शरीरात चैतन्याचा प्रवाह वाहू लागला की जडाची आवश्यकता उरत नाही.

शरीरात चैतन्य खेळत आहे, हे खरे. परंतु मनाने किंवा मनाला त्या चैतन्याचे ज्ञान नेहमीच्या परिस्थितीत होत नाही.

## २७ जानेवारी

माणसाच्या देहात नामाचा म्हणचे चैतन्याचा नाद आहे. चैतन्याचा हा नाद श्वसनात आहे. परंतु हा चैतन्याचा नाद बाहेरच्या जड कानांना ऐकू येत नाही. स्वस्थ बसले तर मात्र हा चैतन्याचा नाद ऐकू येऊ लागतो.

आपण जीव कोण आहोत? या प्रश्नाचे उत्तर असे :- आपण जीव हे सच्चिदानंद ईश्वराचा एक अंश आहोत.

नेहमीच्या दैनंदिन जीवनात माणूस हा जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थांतून जात असतो. त्या तीन अवस्थांचे पलीकडे तुर्या हे नाव असणारी एक चौथी अवस्था आहे. ती अवस्था व्यावहारिक जीवनात माणसाला येत नाही. ती पारमार्थिक जीवनात माणसाच्या अनुभवाला येते. परमार्थात तुर्या अवस्थेच्या पलीकडे आणखी एक पाचवी अवस्था आहे. ती म्हणजे उन्मनी. उन्मनी अवस्थेत फक्त अनुभव असतो. या अवस्थेत जीव ब्रह्मरूप होतो. तथापि त्या अवस्थेत 'मी ब्रह्मरूप झालो' ही जाणीव मात्र नसते. तेथे जाणीवरहित अनुभव असतो. ती अवस्था संपल्यावर मग त्या अनुभवाची स्मृति येते.

देहाचे सार्थक होणे म्हणजे काय? देहाच्या धारणेवर परमार्थाच्या अभ्यासाची मदार आहे. या अभ्यासाने जीवाला अनुभूति आली की त्याच्या देहाचे सार्थक झाले.

## २८ जानेवारी

सिद्ध हे दोन प्रकारचे असतात. पहिला प्रकार म्हणजे साधनाचा अभ्यास करून सिद्ध पदवीला पोचलेला. दुसरा प्रकार म्हणजे गुरुकृपेने अथवा ईश्वरकृपेने सिद्ध झालेला. या जगात असे आढळते की काहीही न करता काहींच्या जवळ भरपूर पैसा असतो. त्याप्रमाणे कृपासिद्धाचे असते. पण येथे महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की या कृपासिद्धांनी पूर्वजन्मी प्रयत्न केलेला असतो. तेव्हा प्रयत्नाशिवाय साधनाची सिद्धी होत नाही हेच खरे आहे. साधनातील सुख प्राप्त होण्यास प्रयत्न हा नितांत आवश्यक आहे.

माणसाच्या जीवनात सत्त्व, रज आणि तम यांपैकी एकादा गुण प्रभावी असतो. त्या त्या गुणाच्या प्रभावाखाली माणूस जगतो. परमार्थात माणसाने या तीन गुणांच्या पलीकडे जावयाचे असते; त्याने त्रिगुणातीत व्हावयाचे असते. साधनाने जीवन जेव्हा ऊर्ध्वगामी होते, तेव्हा जीव गुणातीत होतो. तीन गुणांच्या पलीकडे आणि एक गुण आहे. तो परमार्थात महत्त्वाचा आहे. त्या गुणाच्या ठिकाणी प्रेम जडले की साधन सुरू होते.

श्वासोच्छ्वास हा परमार्थात मूलभूत व अत्यंत महत्त्वाचा आहे. याचे कारण असे : – श्वासोच्छ्वासात नाम आहे. नामात ब्रह्म आहे. म्हणून ब्रह्मप्राप्तीसाठी श्वासोच्छ्वासाचा फार उपयोग आहे.

## २९ जानेवारी

आपल्या शरीरात श्वासोच्छ्वास आहे. श्वासोच्छ्वासात नाम आहे. म्हणून श्वासोच्छ्वासाचे अनुसंधान रहाणे आवश्यक आहे. श्वासोच्छ्वासावर लक्ष रहाणे हे महत्त्वाचे आहे. त्यासाठी प्रयत्न करावा लागतो. ज्या साधकाला श्वासोच्छ्वासाकडे लक्ष ठेवण्याची अटकळ साधली त्याचे साधन सुरू झाले.ही अटकळ साधली की झोपेतही त्या साधकाचे लक्ष श्वासोच्छ्वासावरच रहाते.

जोपर्यंत माणूस जिवंत आहे तोपर्यंत त्याचा श्वासोच्छ्वास चालू असतो. किंबहुना श्वासोच्छ्वासावरच त्याचे जीवन जगणे अवलंबून आहे. या श्वासोच्छ्वासाशी आत्म्याचा – ब्रह्माचा – संबंध आहे. जोपर्यंत देहात श्वासोच्छ्वास आहे तोपर्यंतच आत्मा या शरीरात असतो. किंबहुना असे म्हणता येते की आत्मा शरीरात आहे म्हणून श्वासोच्छ्वास चालू रहातो.

दुःखाचे चटके बसल्याशिवाय माणूस परमार्थाकडे वळत नाही. अर्थात् दुःखाने गांजलेले, पीडलेले सर्वजणच परमार्थाकडे वळतात असेही दिसून येत नाही. पण दुःखाने संतप्त झालेला जो कोणी परमार्थाकडे वळून परमार्थाचा आचार करतो, त्याचे दुःख संपून जाते. ज्या मनाच्या वृत्तीमुळे सुख-दुःख होत असते, त्या वृत्तीच परमार्थातील साधनाने नाहीशा होतात.

## ३० जानेवारी

ज्या दृश्य जगात आपण नानाप्रकारचे व्यवहार करीत आहोत, ते जग सतत बदलणारे आहे. जग हे उत्पन्न झाले असल्याने, ते कधी ना कधी नष्ट होऊन जाणारच. हे नाशवंत जग देवाने निर्मिलेले आहे. तोच काही काळ ते जग टिकवून धरतो आणि तोच त्याचा नाशही करतो.

चक्रनेमिक्रमाने जगाची उत्पत्ति, स्थिती व लय हे क्रमाने चालूच असतात.

जग निर्माण करणारा कोणी नाही असे म्हणू नये. जगाचा कर्ता देव आहे. साहजिकच तो देव दृश्य विश्वापेक्षा वेगळा आहे. जग दिसते. देव दिसत नाही म्हणून तो नाही असे नाही. कारण देव/ईश्वर म्हणजे अस्तित्व आहे. या अस्तित्वाचे अस्तित्व हे कसे आणि काय सिद्ध करावयाचे? जे प्रत्यक्ष इत्यादि प्रमाणांच्या टप्प्यात येते, ते सिद्ध करता येते.देव मात्र कोणत्याही प्रमाणाच्या टप्प्यात येतच नाही.म्हणून तो सिद्ध करता येत नाही. पण देव सिद्ध करता येत नाही,म्हणून तो नाहीच असे मात्र म्हणू नये. ईश्वर अथवा देव हा स्वत:सिद्ध आहे.

ईश्वर हा सर्वव्यापक आहे. तो अनंत आहे. तो जगात सगळीकडे सूक्ष्म ते स्थूल पदार्थांपर्यंत सर्वत्र भरलेला आहे. देव हा विश्व व्यापून उरला आहे. किंवा तो विश्वरूपाने नटला आहे असे म्हटले तरी चालेल. विश्व व्यापण्याच्या क्रियेत ईश्वर संपून जात नाही. तो विश्वापलीकडे अनंतपणे उरलेला आहे. विश्वात वावरणाऱ्या आपल्या देहात देव आहे. देह ताक आहे तर देव लोणी आहे.

## ३१ जानेवारी

जे विश्व परमेश्वराने उत्पन्न केले आहे ते अपूर्ण आहे. विश्वाला मर्यादा आहेत. याउलट देव हा पूर्ण आणि अमर्याद आहे. विश्व हे नाशवंत, नश्वर, विनाशी आहे तर ईश्वर अविनाशी, चिरंतन, शाश्वत आहे.

ईश्वर हा सच्चिदानंद आहे. देव/ईश्वर म्हणजे चैतन्याचे वारे, चिद्‌वायु आहे. देव हा सुखरूप, आनंदस्वरूप आहे. जग सुखदु:खरूप आहे.

ईश्वर हा जसा सगुण आहे तसाच तो निर्गुणही आहे.

हे दृश्य विश्व व्यापून जरी ईश्वर सर्वत्र भरलेला आहे तरी तो विश्वाप्रमाणे दृश्य नाही. विश्व हे दृश्य आहे; पण दृश्य म्हणजे देव नव्हे. दृश्याचे आत देव दडलेला आहे. आपले सर्व लक्ष दृश्याकडे असते, साहजिकच दृश्याआड लपलेल्या अदृश्य अशा देवाकडे आपले लक्ष प्राय: जात नाही.

आपल्या देहात देव आहे. प्राणरूपाने देव आपल्या ठिकाणी आहे. हा प्राण म्हणजे शरीरात वावरणारा जड/ अचेतन प्राण नव्हे. जो प्राण चैतन्यरूप आहे तो म्हणजेच ईश्वर. देव जरी सतत आपल्याजवळच आहे, तरी आपल्या नेहमीच्या व्यवहारात तो आपल्या प्रत्ययाला येत नाही. परमार्थातील साधनाची विशिष्ट प्रक्रिया आपणास साधली की अदृश्य रूपाने असणारा देव हा आपणापुढे दृश्यरूपाने साक्षात् प्रगट होतो.

## १ फेब्रुवारी

जन्माला आल्यापासून माणसाची हालचाल / क्रिया सुरू होते. बालपणी, तरुणपणी , अथवा म्हातारपणी माणूस अज्ञानाने अथवा जाणूनबुजून अनेक कर्मे करीत असतो. त्याचे हातून घडणारे कर्म निरंकुश असते. ते कर्म बेलगाम आणि बेछूट होऊन, वाममार्गावरून जाऊ नये यासाठी त्याला धर्माचे बंधन असावे लागते.

जीवन व्यतीत करीत असताना माणूस अनेक गोष्टी करीत असतो. त्यातील काही गोष्टी या त्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असतात. तथापि कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यावयाचे याचा निवाडा त्यानेच करावयास हवा.

मानवाला अनेक इंद्रिये आहेत. त्या सर्वांमध्ये जीभ ही फार महत्त्वाची आहे. शरीराचे आरोग्य, जगातील व्यवहार अथवा संसार आणि परमार्थ यांमध्ये जीभ महत्त्वाची आहे. ती त्या त्या गोष्टी दाखविते. म्हणजे असे :- डॉक्टरकडे गेले की डॉक्टर 'जीभ दाखवा' असे म्हणतात. कारण जिभेवरून शरीराचे आरोग्य कळून येते. संसारात /व्यवहारात सांभाळून बोलावे लागते. उणेदुणे बोलण्यामुळे कार्य बिघडते. असे सांभाळून बोलण्याचे काम जिभेला करावे लागते.जिभेने काहीतरी बोलून इतरांना दुखवू नये. परमार्थात देवाचे नाम उच्चारण्याला महत्त्व आहे. जीभ ही नाम उच्चारण्यास उपयोगी आहे.

## २ फेब्रुवारी

रागाने माणूस त्रागा करतो. असा रागराग केल्याने त्यालाच मनस्ताप होतो आणि तसे करण्यात त्याच्या मेंदूची शक्ति वाया जात असते, हे माणसाने लक्षात घ्यावयास हवे. याउलट, साधन केले तर मेंदूची शक्ति वाढते.

या जगात मानवाच्या कल्याणासाठी अनेक शास्त्रे उदयास आली . त्यांमध्ये अर्थशास्त्र आणि अध्यात्मशास्त्र अशी दोन आहेत. अर्थशास्त्र हे द्रव्य इत्यादीशी निगडित आहे. द्रव्य हे माणसाच्या दैनंदिन गरजा भागविण्यास उपयोगी पडते. ते शरीराच्या – अन्नमय कोशाच्या आणि तज्जन्य – अशा गरजा भागविण्यास उपयुक्त आहे. परंतु अन्नमय कोशात्मक ऐंद्रिय जीवनापलीकडे माणसाला मानसिक, बौद्धिक,आणि आध्यात्मिक जीवन आहे.त्यांना अन्न कसे पुरवता येईल, याचा विचार अध्यात्मशास्त्राने केलेला आहे. अध्यात्मशास्त्राच्या अभ्यासाने आणि तदनुसार आचरणाने दुःख, शोक, मोह, यांची निवृत्ति, अखंड सुखाची प्राप्ति , समता,बंधुभाव, शांतता, ऐहिक आणि पारमार्थिक जन्मसाफल्य इतक्या गोष्टी साध्य होऊ शकतात. म्हणून अध्यात्मशास्त्र हे महत्त्वपूर्ण आहे.

चिमड संप्रदायाचे साधन श्वासोच्छ्वासाशी संबंधित आहे. साधनाचा अभ्यास चालू असताना, जसजशी अवस्था बदलत जाते, तसतसा श्वसनाचा सूरदेखील बदलत जातो.

## ३ फेब्रुवारी

खरे शासन कोणते? जे अपराधी माणसाला शासन करते, चुकीला शिक्षा देते. पूर्वी राजा हे काम करी. परमेश्वर हाही राजा आहे. परमेश्वराच्या राज्यात प्रत्येक चुकीला, अपराधाला शिक्षा आहे.

काम, क्रोध, इत्यादि विकार अयोग्य मार्गावर नेणारे आहेत. ते अयोग्य आचरण करावयास लावणारे आहेत; काम, क्रोध, इत्यादि विकार जर मनात वाढत असतील तर त्या माणसाला दुर्गति निश्चितपणे आहे.

काही लोक सोमवार, गुरुवार, शनिवार, एकादशी, इत्यादि दिवशी उपवास करतात. त्यांची कल्पना अशी असते की रोजच्या जेवणात बदल म्हणजे उपवास. पण उपवास शब्दाचा खरा अर्थ असा नाही. उपवास म्हणजे परमेश्वराच्या जवळ, संनिध वास होय.

काळ हा तीन प्रकारांत विभागला जातो. भूतकाळ, वर्तमानकाळ, आणि भविष्यकाळ. यांतील भूतकाळ हा होऊन गेलेला असतो. तो पुनः परत येत नाही. भविष्यकाळ अद्यापि यावयाचा असतो. म्हणून आपल्या दृष्टीने वर्तमानकाळ हाच महत्त्वाचा आहे.

विश्व हे दृश्य आहे. हे दृश्य विश्व आपणांस सत्य वाटते. परंतु ते सत्य नाही. मग प्रश्न असा :- सत्य नसणारे विश्व सत्य/खरे का वाटावे? उत्तर सातत्यामुळे दृश्य सत्य वाटते.

## ४ फेब्रुवारी

माणसापुढे एक महत्त्वाचा प्रश्न येऊ शकतो. या जगात कसे वागावे? उत्तर:- माणसाने जगमित्र असावे ; आपल्या बाजूने सगळ्यांशी मित्रत्वाची भावना ठेवावी. कोणाशीही माणसाने वाईट पद्धतीने वागू नये.

उपनिषदे सांगतात की माणसाच्या ठिकाणी दारेषणा, पुत्रेषणा, वित्तेषणा इत्यादि एषणा म्हणजे इच्छा असतात. त्यांमध्ये लोकेषणा ही माणसाला महत्त्वाची वाटते. आपली चांगली कीर्ति सर्वत्र पसरावी असे माणसाला वाटते. पण नेहमीच तसे होते असे नाही. याचे कारण असे. ज्याची कीर्ती पसरावी असे परमेश्वराच्या मनात असते त्याचीच कीर्ती पसरते आणि लोक त्याचीच कीर्ति गातात.

आपल्या मानवी शरीरात रामनामाचा / हरिनामाचा नाद घुमत आहे, असे संतसाधु सांगतात. आता नाम म्हणजे चैतन्य आहे. म्हणून नामाचा नाद शरीरात सतत उठतो याचा अर्थ शरीरात चोवीस तास चैतन्याचा नाद दुमदुमत आहे. पण नेहमीच्या धडपडीच्या जीवनात तो आपणांस ऐकू येत नाही. स्वस्थ बसले की चैतन्याचा नाद ऐकू येतो.

बाह्य परिस्थिति कशीही असो माणसाच्या मनाचा समतोलपणा राहिला पाहिजे. कशीही परिस्थिति कोसळली तरी मनाचा तोल, बुद्धीचा तोल सुटता कामा नये. एकदा का बुद्धीचा तोल सुटला की सर्व संपलेच.

## ५ फेब्रुवारी

परमार्थ करायचा झाल्यास शरीर हे हवेच. शरीर हे परमार्थ साधण्यासाठी उपयोगी पडणारे माध्यम आहे. शरीराने होणाऱ्या पूजा इत्यादि क्रिया परमार्थाला पूरक आहेत.

धान्य पाखडून त्यातील अनावश्यक भाग बाजूला काढावा लागतो. त्याप्रमाणे परमार्थाला आवश्यक नसणारा भाग दूर सारावा लागतो.

परमार्थ करताना नाना प्रकारच्या अडीअडचणी येतात. त्यांना बाजूला करून परमार्थ करावा लागतो.

परमार्थ करणाऱ्यावर मोहाचे प्रसंग येतात. तो मोह टाळून, त्यात न गुंतता परमार्थाकडेच लक्ष द्यावयास हवे.

परमार्थात कडक बंधने आहेत. परमार्थात अखेरपर्यंत काही पथ्ये पाळावीच लागतात. उदा. परस्त्री , परधन, इत्यादि न घेणे. त्या पथ्यांना सवलती नाहीत.परमार्थात प्रगति व्हायची असेल तर हे नियम /पथ्ये पाळावयास हवी .

परमार्थात आपण जे काही करतो त्याचे मुद्दाम प्रदर्शन करू नये. शक्यता अशी आहे की त्यामुळे लोक आपली स्तुति करू लागतील आणि त्यामुळे आपला अहंकार अथवा मीपणा वाढू लागेल. आणि हा मीपणा परमार्थाला अत्यंत विरोधी आहे. म्हणून इतरांना कळणार नाही अशा बेताने गुप्तपणाने परमार्थ करावा.

## ६ फेब्रुवारी

आपण अंत:करणपूर्वक, मन लावून परमार्थ करावयास हवा. परमार्थात मनाची, अंत:करणाची जरुरी आहे. परमार्थात अंत:करणाची म्हणजेच बुद्धीची निश्चितता पाहिजे. कारण परमार्थातील भूमिकेत जरा जरी फरक पडला तरी फळात फार मोठा फरक पडतो. याला उदाहरण म्हणजे भूमितीतील कोन करणाऱ्या दोन रेषा. प्रथम कोनाच्या दोन रेषांमधील अंतर अगदी जवळ जवळ असते. परंतु ते पुढे वाढत वाढत जाते.

परमार्थ हा केवळ बुद्धीचा अगर तर्काचा विषय नाही. परमार्थातील काही गोष्टी या बुद्धीनेच जाणून घ्यावयाच्या आहेत हे खरे. तथापि परमार्थातील अनुभव येणे हा गुरुकृपेचा आणि आपण साधनाची वाटचाल करण्याचा विषय आहे.

लोकसमूहात रहाण्याची सवय असेल तर नामस्मरण इत्यादि करणे अवघड होते. म्हणून जसे जमेल त्याप्रमाणे एकाकी स्थितीत रहाण्याचा प्रयत्न व्हावा.

खरे बोलणे आणि नम्रपणा हे परमार्थाला आवश्यक गुण आहेत. 'सत्यवचन और लीनता, परस्त्री माते समान' असे तुलसीदासांनी सांगून ठेवले आहे. परमार्थ हा आपला प्रयत्न / साधनाचा अभ्यास यावर अवलंबून आहे याचा कधी विसर पडू देऊ नये.

## ७ फेब्रुवारी

शरीरातील जीवन म्हणजे चैतन्य. चैतन्याशिवाय शरीरात जीवन असू शकत नाही. याचा अर्थ असा की शरीर आणि जीवन हे एकमेकांपासून भिन्न आहेत, स्वतंत्र आहेत. ज्यावर जीव जगला आहे ते चैतन्य आणि ते चैतन्य मानवी शरीरातील सहस्रदल नावाच्या स्थानात असते.

शरीराची नाना प्रकारची हालचाल, शरीराच्या विविध प्रकारच्या क्रिया, शरीराचे भिन्न व्यवहार हे सर्व चैतन्यामुळेच होतात. माणसाची सळसळ ही चैतन्याच्या सळसळीमुळे आहे. चैतन्याशिवाय देहात जीवन असू शकत नाही. लोह-चुंबकामुळे लोखंडाच्या किसात हालचाल निर्माण होते. त्याप्रमाणे चैतन्याच्या कक्षेत शरीराची हालचाल, चळवळ होत असते. आत आहे चैतन्याची सळसळ म्हणून बाहेर दिसते शरीराची वळवळ. म्हणजे चैतन्याच्या अधिष्ठानावर शरीर आपले कार्य करीत असते.

चैतन्यामुळेच जाणीव आहे आणि चैतन्यामुळेच नेणीव आहे. चैतन्य नसेल तर 'शरीर आहे' हे ज्ञानसुध्दा होऊ शकत नाही. चैतन्याच्या अस्तित्वामुळे माणसाला जाणीव होते, ज्ञान होते. चैतन्यामुळेच शरीर, मन, इत्यादींचे ज्ञान होते. नेणीव, विस्मरण हेही चैतन्यामुळेच होते.

## ८ फेब्रुवारी

चैतन्यामुळे प्रेम आहे. पण हे प्रेम शरीराकडे वळले; ते प्रेम देहाकडे खेचले गेले. या प्रेमामुळे आकर्षण आणि खेच निर्माण होतात. माणसाचे आकर्षण आणि खेच देहाकडे लागली. परमार्थ करावयाचा झाल्यास ही शरीराकडची खेच थांबून ती चैतन्याकडे लागली पाहिजे; चैतन्याचे आकर्षण माणसास वाटावयास हवे. चैतन्याचे आकर्षण म्हणजे विशुद्ध प्रेम होय.

शरीराअंती घडणाऱ्या नाना प्रकारच्या कर्मांनी माणसाला सुखदु:ख होते. पण ते तात्कालिक, नाशवंत असते. चैतन्याने फक्त सुख मिळते आणि ते खरे शाश्वत सुख असते. चैतन्याचे सुख प्राप्त करून घेण्यास देहाच्या अनुषंगाने प्रयत्न करून काय उपयोग होणार? कारण शरीर आणि चैतन्य हे एकमेकांपेक्षा भिन्न आहेत. तथापि चैतन्य हे देहाच्या उपाधीत सापडले आहे. म्हणून देह बाजूला करता आला, देहाची उपाधि दूर करता आली तर चैतन्य हे कळून येईल आणि मग चैतन्याचे सुख मिळेल. माळेतील मण्यामुळे आतील सूत दिसत नाही. पण ते मणि बाजूला केले की आतील सूत दिसू लागते. त्याप्रमाणे शरीर बाजूला केले की चैतन्य कळते. देहाची उपाधि दूर झाली की चैतन्याचे दर्शन होते. आणि परमार्थात चैतन्याचे ज्ञान होणे आणि चैतन्याचे सुख प्राप्त होणे हेच महत्त्वाचे आहे.

## ९ फेब्रुवारी

भगवद्‌गीता हा ग्रंथ फार महत्त्वाचा आहे. गीता हा जीवनाचा ग्रंथ आहे. जीवन कसे जगावे हे गीता सांगते.

मनुष्य हा विशिष्ट परिस्थितीत वाढत असतो आणि रहात असतो. अनेकदा माणूस परिस्थितीचा गुलाम बनतो, असे म्हटले जाते. तरी माणसाने प्रयत्न करून परिस्थिति बदलण्याचा प्रयत्न करावयास हवा. मनुष्याने नेहमीच परिस्थितीचा दास बनून राहू नये.

समाजातील काही माणसांना स्वत:चा फुकटचा तोरा, मोठेपणा इतरांना दाखविण्याची हौस असते. जसे:- दरिद्री माणसाला आपण श्रीमंत आहोत असे दाखविण्याची ऊर्मि असते. पण हे योग्य नव्हे. खावयास फुटाणे आणि टांग्यास आठ आणे, असे नसावे.

समाजात काही चांगली माणसे असतात. ती स्वत:ला तोशीस लावून घेऊनही इतरांचे बरे करण्याचा प्रयत्न करतात. पण अनेकदा ते फुकट जाते. लोक त्याचीच निंदा करतात. तेव्हा पदरचे खर्चून लोकांचा बोल का घ्यावा?

अडला नारायण गाढवाचे पाय धरी अशी एक मराठीत म्हण आहे. ती बऱ्याच अंशी खरी आहे. कारण या जगात कुणाला कशासाठी कुणाचे पाय धरावे लागतील हे सांगता येत नाही.

# १० फेब्रुवारी

काही लोक श्रद्धेने काशीस जाऊन गंगास्नान करतात. गंगेत स्नान केल्याने पाप जाते पण पाप करण्याची मनाची वृत्ति गंगा नष्ट करीत नाही.

आध्यात्मिक जीवनातील अनुभवामध्ये 'त्रिकूट' या नावाचे एक स्थान आहे. हे त्रिकूट म्हणजे काय आहे? जेथे सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांवर जीव विजय मिळवितो ते त्रिकूट स्थान आहे.

हिंसा ही तीन प्रकारानी केली जाते:– शरीराने दुसऱ्याला त्रास देणे, वध करणे, इत्यादि शारीरिक हिंसा होय. मनाने दुसऱ्याचे वाईट चिंतणे ही मानसिक हिंसा होय. दुसऱ्याला वाईट बोलणे, इतरांना शिव्या देणे, इतरांची निंदा करणे ही वाचिक हिंसा आहे. हिंसा करू नये असे वेद सांगतो.

माणसाला झोप आवश्यक आहे. झोपेत विश्रांति मिळून माणूस ताजातवाना होतो. पण संतांचे वेगळेच असते. संत हे देवाची प्रार्थना करतात की देवा, मला झोप येऊ नये. कारण झोपेने साधन करण्यास वेळ कमी पडतो. झोपेमुळे साधनात अडथळा येतो.

मोक्षाविषयी अनेकांच्या अनेक कल्पना असतात. मोक्ष म्हणजे सुटका. पण कशातून? बंधनातून. बंधन कसले ? जन्ममरण हे माणसाला बंधन आहे. तेव्हा जन्ममरणाचे बंधन संपले की तेथेच मोक्ष आहे.

## ११ फेब्रुवारी

परमार्थ करणाऱ्याने काही विशिष्ट प्रकारे आपले आचरण ठेवावे लागते. परमार्थ करणाऱ्या माणसाने नेहमी सरळपणाने वागावे. दुसऱ्याचे कधीही वाईट करू नये आणि वाईट चिंतूही नये. तसे चिंतिल्यास आपले स्वत:चेच वाईट होते. दुसऱ्यास वाईट म्हटल्यास आपलेच वाईट होते. इतरांची फजिती करू गेल्यास आपली स्वत:चीच फजिती होते. जो इतर माणसाचे नुकसान करू पहातो त्याचेच नुकसान होते.

जगात अनेकदा आपल्या इच्छेविरुद्ध घडत असते. असे जर काही घडत असेल तर तसे घडावे अशी परमेश्वराची इच्छा आहे, असे खुशाल समजावे. त्या ईश्वरी इच्छेला अनुसरून आपण वागावे. देवाने आपणांस जसे ठेवले आहे त्यामध्येच सुख मानून रहाण्यास शिकावे. अशा प्रकारे परमेश्वराच्या इच्छेपुढे मान तुकविली तर काही त्रास होत नाही.

माणसाची आशा ही वेडी आहे आणि ती कधीही न संपणारी आहे. या आशेला कुठेतरी मुरड घालणे आवश्यक आहे. 'दिसेल तो पदार्थ हवा' अशा प्रकारची आशा सोडली पाहिजे. नाहीतर 'आशा संपेना आणि देव भेटेना' अशी आपली स्थिती होईल.

काम आणि क्रोध हे विकार आपले शत्रु आहेत. ते आपणांकडून वाईट गोष्टी करवून घेतात. म्हणून त्यांचेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करावयास हवा.

## १२ फेब्रुवारी

संसार करताना माणसे प्राय: अहंकाराने वागत असतात. अहंकार हा परमार्थाला संपूर्णपणे घातक आहे. तो कमी कमी करण्याचा प्रयत्न करावयास हवा.परमार्थात माणसाची वृत्ति ही निरहंकारी अशी होणे आवश्यक आहे.

जगात जगत असताना शोकाचे व मोहाचे प्रसंग येतात. या शोकमोहातून कुणीही सुटू शकत नाही. तथापि विवेक करून या शोकाचा व मोहाचा आपल्या मनावर फार परिणाम होऊ देता कामा नये. शोकमोहांनी मनाचा तोल बिघडणार नाही याकडे माणसाने लक्ष पुरवावयास हवे. परमार्थात आरंभशूरपणा उपयोगी पडत नाही. आरंभ धडाडीने केला आणि नंतर सोडून दिला, हे वागणे उपयोगी नाही.

परमार्थात ताबडतोबीने अनुभव येत नाहीत. म्हणून परमार्थात तातडी उपयोगाची नाही.

परमार्थात महत्त्व आहे ते नित्यनेमाला. आपल्या हातून कमीत कमी काय होईल याचा विचार करून धरलेला नियम कायम स्वरूपात पार पाडावयास हवा.

परमार्थात एकेक पाऊल पुढे टाकावयाचे आहे. मग जे पदरात पडेल ते घ्यावयाचे आणि पुन: पाऊल पुढे टाकत राहून शेवट गाठावयाचा आहे.

परमार्थ करणाऱ्याने परस्त्री, परधन आणि परपीडा टाळावयास हवी.

## १३ फेब्रुवारी

या जगात  अनेकानेक धार्मिक आणि तात्त्विक ग्रंथ आहेत. माझे मत असे आहे की जगाचे अंतिम कल्याण 'दासबोध' या एकाच ग्रंथाने होणार आहे.

काही दुर्मिळ, वेचक लोकांना ईश्वराचा साक्षात्कार होतो. त्याबद्दल इतरेजनांना कुतूहल असते. खरे सांगायचे झाले तर साक्षात्कारी  जीवन जगण्याचा  हक्क सर्वच मानवांचा आहे.

माणसाचे ठिकाणी फार अहंकार असतो.  'मीच देह आहे'असा अहंकार बाळगून मानव जिवंतपणी आपल्या छातीवर हात ठेवीत असतो. पुढे तो मेल्यावरसुद्धा इतरेजन त्याचे हात त्याच्या छातीवर ठेवतात.

एकादी वस्तु आहे की नाही हे आपण व्यवहारात कसे ठरवितो? त्यासाठी निकष काय आहे? वस्तूचे अस्तित्व ठरविण्याचा निकष आहे तिचे ज्ञान. म्हणजे ज्या पदार्थाचे ज्ञान होते त्या पदार्थाचे अस्तित्व सिद्‌ध होते.

अनेक लोक प्रयत्नपूर्वक अभ्यास करतात, व परीक्षा उत्तीर्ण होतात. त्यानंतर युनिव्हर्सिटी अथवा योग्य ती संस्था त्यांना डिग्री (पदवी )देते. परंतु, 'संत'   आणि 'आई' या मात्र युनिव्हर्सिटीच्या पदव्या नाहीत.

## १४ फेब्रुवारी

बऱ्यावाईट कर्मांनी माणसाचे पाप-पुण्य जमा होते. पाप-पुण्य भोगण्यास माणसाला इहलोकी जन्म घ्यावा लागतो. हे पाप-पुण्य संपले की माणूस मोक्षाला जातो.

जग हे मूलत: काल्पनिक आहे. साहजिकच या काल्पनिक जगात बंध आणि मोक्ष या दोन्ही गोष्टी काल्पनिकच आहेत.

आत्मा/ब्रह्म निश्चळ आहे. जीव जर निश्चळ झाला तर तो आत्मरूप अथवा ब्रह्मरूप होतो. तोच मोक्ष आहे.

आपण परमार्थ म्हणून काही गोष्टी करतो. परमार्थाचे साध्य मोक्ष हे आहे. जो कोणी परमात्म्याची सतत आठवण ठेवतो तो मोक्षाचा अधिकारी होतो.

बंध आणि मोक्ष या केवळ कल्पना आहेत. काल्पनिक देहाच्या अनुषंगाने मोक्ष व बंध या संकल्पना येतात. त्या दोन्हीही भ्रमरूप आहेत.

माणसातला माणूस जागा होणे म्हणजेच माणुसकी.

भगवद्गीतेने ब्राह्मी स्थितीचा निर्देश केला आहे. ही ब्राह्मी स्थिति काय आहे? आत्मानंदात रंगून जाणे हीच ब्राह्मी स्थिती होय.

सोहं म्हणजे काय आहे? सोहं म्हणजे सद्गुरु, ईश्वर, नाम असणारा नामी, जीवनाचे सारसर्वस्व आहे.

## १५ फेब्रुवारी

जशी संगत असते तशी 'गत' होते. म्हणून लहानपणापासूनच चांगली संगत माणसाने धरावयास हवी.

या जगात अशक्य गोष्टी शक्य होत नाहीत. जसे:- मुसळाचे धनुष्य होत नाही. मुसळाला धनुष्याचा विशिष्ट आकार देता येणे शक्य नाही. त्याप्रमाणे जीव ब्रह्मरूप झाला तरी त्याचे हाडामांसाचे शरीर हे कधीही ब्रह्म होत नाही.

माणसांने इतर माणसाबरोबर माणसाप्रमाणे वागावे. हे कळणे आवश्यक आहे. माणसाने माणुसकीला धरून वागावे, ही गोष्ट महत्त्वाची आहे.

व्यवहार हा मोठा गमतीशीर आहे. या जगातील व्यवहारात आपण नाना प्रकारच्या गोष्टी मिळवून घेण्याचा प्रयत्न, खटाटोप करीत असतो. कधी कधी आपणास काही गोष्टी मिळतातही. गंमत अशी की या व्यवहारात जितके आणि जेवढे मिळेल तितके आणि तेवढे माणसाला हवेच असते. कारण माणसाची हाव दांडगी आहे. ती पुरी होणे अवघडच आहे.

स्वत:च्या पूर्वीच्या कर्मांनुसार माणूस या संसारात जन्माला आलेला आहे. आता त्याचे जे प्रारब्ध आहे त्या प्रारब्धानुसार त्याला संसारात बरेवाईट मिळणारच. या जगातील व्यवहारात चांगले अगर वाईट चुकविणे हे शक्य होत नाही.

## १६ फेब्रुवारी

दोन शरीरांचे आणि जीवांचे मीलन होण्यासाठी विवाहामध्ये 'सप्तपदी' असते. तर परमार्थात जीव आणि शिव यांचे मीलन व्हावयाचे असते. त्यासाठी 'पंचपदी' उपयोगी पडते.

जीवनात कितीही सुखदु:खे आली तरी माणूस जगत रहातो. 'पुढे बरे होईल' या आशेने माणूस जगतो. याचा अर्थ माणूस आशेवर अवलंबून जीवन व्यतीत करीत असतो.

व्यवहारात काय किंवा परमार्थात काय पश्चात्ताप हा महत्त्वाचाच आहे. पश्चात्ताप केल्याने प्राण्याचे मन शुद्ध होते.

या जगातील व्यवहारात विवाहामध्ये स्त्री आणि पुरुष या दोघांच्या शरीराचे 'लग्न' कुंडली वरून ठरवितात. परमार्थात जीव आणि शिव यांचे मीलन व्हावयाचे असते. ते मात्र 'कुंडलिनी' वरून ठरते.

या जगात जगत असताना माणसाला अनेक गोष्टी आवश्यक असतात. तथापि त्याला शरीरात 'पित्त' आवश्यक आहे, व्यवहार करताना वित्त आवश्यक आहे आणि परमार्थात 'चित्त' हे तर अत्यावश्यक आहे.

एकाद्या कारखान्याच्या बाहेर आपण उभे राहिलो तर आत चाललेला आवाज आपणास ऐकू येत नाही. आपण आत शिरलो तर आतला ध्वनि ऐकू येतो. तसे आपण जर अंतर्मुख झालो तर आपणास आतला ध्वनि/नाद ऐकू येतो.

## १७ फेब्रुवारी

ज्यावेळी रेल्वेला वाफेची इंजिने होती त्यावेळी इंजिनात वेळोवेळी पाणी भरण्यास वॉटरिंग स्टेशने होती. व्यवहार हे माणसाचे वॉटरिंग स्टेशन आहे. येथे कायमचा मुक्काम नाही म्हणून व्यवहारात सर्वांशी गोडीगुलाबीने वागावे.

माणूस हा इतर प्राण्यांपेक्षा वेगळा आहे. माणसात माणुसकी असावयास हवी. माणसातील माणूस (माणुसकी) जागा होणे अगत्याचे आहे.

आपल्या पुराणांत चार युगे मानलेली आहेत. कृत,त्रेता आणि द्‌वापर ही पहिली तीन युगे क्रमाक्रमाने निकृष्ट आहेत. शेवटचे जे कलियुग आहे त्या कलियुगात मात्र दोषांचा अथांग सागर पसरलेला आहे.

काही लोक परमार्थाचा एक भाग म्हणून उपासतापास करतात, पोथ्यापुराणे वाचतात. परंतु त्यामुळे देवाचा साक्षात्कार होत नाही.

काही लोक भजन करतात. पण ते भजन भक्तिभावाने व्हावयास हवे. कारण भक्ति हा भजनाचा प्राण आहे.

सुखाचा मूलमंत्र कोणता? सुख कशात आहे? झोपेत आपण स्वत:ला विसरतो म्हणून झोपेत सुख वाटते. याचा अर्थ असा की स्वत:ला विसरण्यात सुख आहे. म्हणून जसतसे आपण स्वत:ला विसरत जाऊ तसतसे आपले सुख वाढत जाते.

## १८ फेब्रुवारी

सुख आणि दु:ख हे सापेक्ष आहेत. सुख आहे कारण दु:खाची बोच आहे. सुखाची जाणीव आपणास होते कारण आपणास दु:ख आहे. दु:ख हलके होणे अथवा दु:ख विसरणे म्हणजे सुखच होय. सुख या नावाचा कोणताही पदार्थ बाजारात मिळणारा नाही. दु:ख कमी झाले अथवा विसरले की सुख होते.

माणसाला सुख मिळावे म्हणून भौतिक शास्त्रे प्रयत्न करतात आणि निरनिराळे शोध लावतात. पण या जगात ही शास्त्रे कितीही प्रगत झाली तरी त्यांच्या प्रगतीमुळे माणसाला स्वस्थता, स्थिरता आणि शांतता मिळत नाही.

कोणत्याही माणसाचे सुखदु:ख हे त्याच्या इच्छांवर अवलंबून आहे; सुख काय अथवा दु:ख काय हे मानवाच्या अपेक्षांवरच अवलंबून आहे. समजा त्याच्या इच्छा अथवा अपेक्षा पुऱ्या झाल्या की त्याला सुख वाटते. तेच इच्छा किंवा अपेक्षा पुऱ्या झाल्या नाहीत तर त्याला दु:ख वाटते. इच्छा व अपेक्षा या नेहमी वाढत जात असतात. आता या इच्छा अथवा अपेक्षा कमी कमी होत गेल्या तर सुखदु:खही – विषेशत: दु:ख – कमी कमी होईल.

चांगले पीक यावे म्हणून शेतकरी आपल्या शेतातले तण मुळासकट काढून टाकीत असतो. त्याप्रमाणे परमार्थात अनुभवाचे भरघोस पीक यावे असे ज्याला वाटत असेल त्याने आशारूपी तण मुळासकट काढून टाकावयास हवे.

## १९ फेब्रुवारी

दुसऱ्याबद्धल आपण जे जे काही बरेवाईट चिंतितो ते ते आपणाप्रत येते.

माणूस प्राय: जबाबदारी टाळीत असतो. तथापि अंगावर जबाबदारी पडली की सर्व काही बिनबोभाट होते.

अनेकदा मनुष्याचे मन अस्वस्थ असते. त्याच्यापुढे जगातील सुखे असतातच. परंतु मनालाच जर स्वस्थता नसेल तर त्या सुखांचा त्याला काय उपयोग होणार?

काम, क्रोध, इत्यादि सहा विकार मनात असतात. दंभ हा असाच एक आहे. परंतु हा दंभ कुठपर्यंत टिकतो? जोपर्यंत हा देह आहे तोपर्यंतच दंभ टिकतो.

काही लोकांना कोणत्यातरी गोष्टीची जबाबदारी घेण्याची हौस असते. परंतु त्याने आपल्याला पेलेल तितकीच जबाबदारी पत्करावी. भरीला पडून अहंकार बाळगून न पेलणारी जबाबदारी मानवाने पत्करू नये.

आपल्या शक्तीप्रमाणे माणसाने पाऊल टाकावे, जबाबदारी पत्करावी, आणि कामाला लागावे .

माणूस हा प्राय: मत्सरी असतो. त्यामुळे दुसऱ्याचे चांगले झाले तर ते त्याला बघवत नाही.

काही माणसे गरीब स्वभावाची असतात. माणसाच्या त्या गरीब स्वभावाचा फायदा धूर्त माणसे घेत असतात.

## २० फेब्रुवारी

काही माणसे मोठमोठ्या बढाया मारतात. 'मी यंव करीन' 'मी त्यंव करीन'. प्रत्यक्षात मात्र त्यांचे हातून फारसे काही होत नाही. शहाणा माणूस मात्र आपण जे करणार आहोत ते बोलून दाखवीत नाही. तो न बोलता जे करावयाचे ते करून दाखवतो.

आपल्या बाबतीत एकादी वाईट गोष्ट घडली की माणूस 'त्या अमक्या अमक्या माणसामुळे असे झाले' असा दुसऱ्याला बोल लावतो. अशा प्रकारे दुसऱ्यावर बोल ठेवण्यापेक्षा आपणच सावधगिरीने वागावे हे बरे.

या जगात पूर्ण असे काहीही नाही. येथे सर्व काही अपूर्णच आहे. साहजिकच जगातील व्यवहार हा 'अपूर्णांकात' असतो.

जन्ममरणाचे चक्र जीवाच्या मागे लागलेले आहे. त्यामुळे प्रत्येक जन्मात तो सुखदु:खाच्या फेऱ्यात गुंतलेला रहतो. परंतु जर ही जन्ममरणाची परंपरा संपली तर मात्र जीवाच्या जीवनाचे खरे सार्थक होईल. देवाचे दर्शन झाले तरच जन्ममरणचक्र थांबणार आहे.

आपण प्रपंच करतो. प्रपंचात आपण यंव केले त्यंव केले अशा बढाया मारतो. वस्तुत: प्रपंच हा आपल्या नशिबानेच, आपल्या प्रारब्धानुसारच घडत असतो. जे आपल्या नशिबात आहे तेच आपल्या जवळ राहते, जे नसते ते दूर निघून जाते. तसे आवडो अगर न आवडो ते घडणारच.

## २१ फेब्रुवारी

आपल्या जीवनात माणसाला सुख आणि दु:ख भोगावे लागतेच. त्यातून कुणाचीही सुटका होत नाही. पण आपले सुख / आनंद जर आपण बाहेर फेकले म्हणजे इतर लोकांना सांगितले तर ते वाढते; याउलट दु:ख जर बाहेर फेकले म्हणजे इतरांना सांगून टाकले तर मात्र ते हलके होते, कमी होते.

माणसाजवळ अनेक गुण असतात. त्या सर्व गुणांमध्ये धीमेपणा / धैर्य यासारखा सर्वश्रेष्ठ गुण नाही.

जीवनात आपण काहीही केले तरी कोठेही विरोधक असायचेच.

या जगात कसे चालते त्याचा एक नमुना असा आहे – तोंडाने अहिंसा म्हणायचे परंतु त्या तथाकथित अहिंसेच्या नावावर शिकार करीत रहायचे, अशीच जगाची रीत आहे.

माणसे एकमेकांवर प्रेम करतात. काही माणसे देवावर प्रेम करतात. पण हे प्रेम कधी कधी कमीजास्त होते. तथापि जे अखंड टिकेल तेच खरे प्रेम.

लोक म्हणतात आम्ही चांगले वागतो. पण त्यामुळे आम्हालाच त्रास होतो. मग अशा स्थितीत चांगले कशाला वागा? या प्रश्नाचे उत्तर आहे की चांगुलपणाने त्रास झालेला परवडला, पण वाईटपणातील सुख नको.

## २२ फेब्रुवारी

आपल्या आजूबाजूला असणारे सर्व लोक जर सुखामध्ये असतील तर आपल्यालाही सुख होते.

माणसाला आधि व्याधि सतावीत असतात. त्या सर्वांत चिंता / काळजी यासारखे वाईट दुखणे नाही.

या जगात नाना प्रकारची भलीबुरी माणसे असतातच. पण दिलदार वृत्ति असणारी माणसे फार कमी आढळतात. याचे कारण असे की मनामध्ये असणारी दिलदार वृत्ति पहावयास मिळणे कठिणच असते.

मनुष्य गुण मिळविण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्याला काही गुण मिळतात. पण ते अनेकदा कालांतराने नष्ट होऊन जातात. जो गुण अंगात मुरला आणि टिकून राहिला तोच आपला खरा गुण होय.

मानमरातबासाठी मनुष्य हपापलेला असतो. पण मान कुणाला मिळतो? जगात पैशालाच मान आहे, माणसाला नाही.

समाजात गुन्हे घडतात. गुन्ह्याला शिक्षा होणार हे अटळ आहे.

माणूस या जगात एकटा येतो आणि एकटाच जातो. पण या गोष्टीची जाणीव त्याला फार क्वचित् होते. ती होते काही विशिष्ट प्रसंग घडल्यावर.असा प्रसंग आल्यावर 'ज्याचा तो रे' हेच खरे आहे हे त्याला पटते.

## २३ फेब्रुवारी

संत – साधु हे नाना प्रकारचे असतात. आत्मसाक्षात्कार होताच काही साधु लोकांचा संपर्क सोडून रानावनात अगर डोंगरकपारीवर निघून जातात. काही संत समाजातच राहतात. पण ते उन्मत्त – बालवत् असतात. म्हणजे एकाद्या वेड्या माणसाप्रमाणे अथवा बालवृत्तीने ते राहतात. इतर संत मात्र समाजात राहून इतर माणसांप्रमाणे व्यवहार करतात. पुढे त्यांचे संतत्व ओळखून कोणी त्यांना मार्गदर्शन मागितले तर ते करतात. काही जण प्रवचन आणि कीर्तन यांचे द्वारा लोकांना सन्मार्ग दाखवितात.

व्यवहार दृष्ट्या त्याज्य परंतु सत्य, ग्राह्य अशा गोष्टीकरता संत– सज्जन किंवा साधु निंदास्तुतीची पर्वा करीत नाहीत. या जगात जे घ्यावयाचे तेच घ्यावयाचे असा संतांचा व्यवहार असतो.

संत हे नामच घेतात आणि इतरांनाही ते नामच घेण्यास सांगतात. संत आपला शेवटचा श्वास नामातच सोडतात.

यथावकाश प्रारब्ध संपताच संत मरणवश होतात. पुढे मरणोत्तर समजा त्यांच्या पिंडाला कावळा शिवला नाही अगर शिवला, या गोष्टीला काहीच महत्त्व नसते. ते दोन्हीही त्यांच्या बाबतीत समानच असते. कारण संतांची कोणतीच वासना/ इच्छा शिल्लक राहिलेली नसते.

## २४ फेब्रुवारी

संतांनी जीवनभर कधीही निराशावाद पत्करलेला नसतो. साहजिकच ते आळशी झालेले नसतात.

प्रारब्धानुसार संतसाधूंना धन - धान्य, मान-सन्मान, सुख-दुख इत्यादि प्राप्त होत असतात. अनेकदा त्यांना अपमानही सहन करावे लागतात. तथापि मान अथवा अपमान या दोन्हींचे संदर्भात त्यांची वृत्ति समान असते. त्यांच्या मनाचा समतोल ढळत नाही.

सामान्य माणसे या जगात गुणांची प्रशंसा करतात आणि अवगुणांची निंदा करतात. पण संत हे गुणांची प्रशंसा करतील पण ज्या दोषांमुळे अवगुण निर्माण झाले त्या दोषांचा विचार संत करीत नाहीत.

संत जरी जगात बाह्य सुखांचा उपभोग घेत असले किंवा घेत नसले तरी ते कधीही आपल्या आत्मानुभवातून दूर होत नाहीत. आत्मानंदात सतत मग्न राहूनच ते वागत असतात.

साधु हे सर्वांबरोबर समानपणे वागतात. त्यांच्या आचारात, उच्चारात आणि विचारात फरक नसतो.

संतांचेवर सुख-दुःखे कोसळली असे इतर लोकांना वाटते. पण ती त्यांना जाणवत नाहीत. चैतन्याचा साक्षात्कार त्यांना झाला असल्यामुळे संत हे सदा तृप्त आणि समाधानी असतात.

## २५ फेब्रुवारी

मानवी शरीरात हाडे, मांस भरलेले आहे. शरीर जड आहे. उलट ब्रह्म हे चैतन्य आहे. म्हणून हे हाडामांसाचे शरीर कधीच ब्रह्म होत नाही.

या जगात काही गोष्टी मिळविण्यास आपण अनेक प्रयत्न /उपाय करीत असतो. पण कित्येकदा उपाय हाच अपायरूप होतो. याउलट कधी तरी अपाय हाच उपायही ठरत असतो.

या जगात अनेक गोष्टी अशा घडतात की त्या माणसास रुचत नाहीत, पसंत पडत नाहीत. त्यांचा विचार जर आपण करीत बसलो तर दुःख होणारच.त्यांचेकडे दुर्लक्ष करणे हाच आपल्या समाधानाचा उत्तम उपाय आहे.

परमार्थ करताना मनाने विषयांचा त्याग व्हावयास हवा आणि हा त्याग जर स्वेच्छेने झाला तर त्यात खेद, दुःख येत नाही.

विश्वात निसर्गतःच भरपूर भेद आहेत.

या जगात कधी दुर्जन आपणांस मोठेपणा देतील. पण दुर्जनांनी दिलेला असला मोठेपणा नको.

हजार वेळा सांगूनही जर एकादा मनुष्य आपले ऐकत नसेल तर त्याच्यावर रागावण्यात काही हशील नाही. कारण कितीही जरी रागावले तरी तो माणूस ते चेष्टेवारी आणि हसण्यावारी नेतो.

## २६ फेब्रुवारी

मानवी शरीरात एकंदर नऊ द्वारे – दरवाजे आहेत. त्यांचा उपयोग जीव करीत असतो. देवाचे दर्शनासाठी दहावा दरवाजा आहे. जेव्हा शरीरातले नऊ दरवाजे बंद होतात तेव्हा दहावा दरवाजा उघडतो.

आपण आपल्या अकलेने चालावे. दुसऱ्याच्या अकलेने चालले की अनेकदा आपलीच फसगत होते.

जीवन व्यतीत करताना आपण अनेक अपेक्षा बाळगतो. या अपेक्षांचा संबंध इतर माणसांशी असतो. अपेक्षा पुऱ्या झाल्या तर सुख होते, अपेक्षाभंग झाला की दु:ख होते. म्हणजे अपेक्षेअंतीच आपणास सुखदु:ख होत असते.

समजा आपल्या जवळ सद्गुण नाहीत. ठीक आहे. परंतु आपल्यात दुर्गुण शिरणार नाहीत इतकी खबरदारी तरी घ्यावयास हवीच.

आपण नवकोट नारायण नाही आणि फारसे श्रीमंतही नाही. ठीक आहे. फक्त भीक मागण्याचा प्रसंग येऊ नये म्हणजे झाले.

आपले वागणे कसे असावे? कुणाला खुपणार नाही, त्रासदायक ठरणार नाही, असे आपले वागणे असावे.

निळ्या रंगात जग दिसावे असे वाटत असल्यास, जगाला निळा रंग देण्याच्या भानगडीत पडू नये; ते जमणार नाही. आपणच निळ्या रंगाचा चष्मा घालावा.

## २७ फेब्रुवारी

जीवाने शिवाला पहावे असे परमार्थात सांगितले जाते. त्या जीवशिवांचे स्वरूप काय आहे हे पहाणे आवश्यक आहे. परमात्म्याला / ब्रह्माला येणाऱ्या उपाधिअंती जीव आणि शिव अशी भाषा येते. म्हणजे असे :-

मूळ परमात्मा हा विज्ञानस्वरूप आहे. विज्ञान म्हणजे ज्ञान आणि अज्ञान यांनी रहित अशी स्थिति. या परमात्म्याला / परब्रह्माला भिन्न भिन्न उपाधि येतात. त्या भिन्न उपाधिअंती जीव आणि शिव हे शब्द वापरले जातात. नहून जीव आणि शिव हे एकाच परमात्मतत्त्वाच्या दोन बाजू आहेत. जर उपाधि नसतील तर जीव-शिव ही भाषा संपून परमात्मा हे एकमेव तत्त्व रहाते.

शरीर इत्यादींच्या जड उपाधीत सापडून अज्ञानाने जीव होतो. तर साक्षी अशा चैतन्यरूपी ज्ञानाच्या उपाधीने शिव होतो. जीव आणि शिव हे दोघेही मानवी शरीरातील सहस्रदलस्थानात असतात.

जीव हा बहिर्मुख बनला आहे. म्हणजे तो जगातील बाह्य पदार्थांकडे लक्ष देतो आणि त्यातच गुंतून पडतो. शिव मात्र तसे करीत नाही. म्हणजे जीवाला ज्याप्रमाणे बाह्य वस्तूंचे आकर्षण असते त्याप्रमाणे शिवाला जगातील बाह्य वस्तूंचे आकर्षण नसते.

## २८ फेब्रुवारी

जीवाचे लक्ष बाह्य दृश्य जगाकडे असते. याउलट शिवाचे लक्ष चैतन्याकडे असते. जीव हा बहिर्मुख आहे तर शिव हा अंतर्मुख आहे. जीव हा क्षर आहे तर शिव अक्षर आहे. जीव हा पिंडाशी – विशिष्ट शरीराशी – संबंधित आहे तर शिव हा ब्रह्मांडाशी संबंधित आहे. जीव हा शिवाचा आभास आहे; अज्ञान या कारणामुळे जीव ही संकल्पना येते. येथे अज्ञान म्हणजे ज्ञानाचा अभाव असा अर्थ नसून, अज्ञान म्हणजे विपरीत ज्ञान असा अर्थ आहे.

जीव आणि शिव हे मानवी शरीरात एकाच महालात आहेत म्हणजे ते दोघेही माणसाच्या मस्तकातील सहस्रदल नावाच्या स्थानात आहेत. परंतु ते समोरासमोर मात्र नाहीत; ते एकमेकांकडे पाठ करून आहेत. तसे पाहू गेल्यास, जीव आणि शिव हे दोघेही एकाच स्थानात असल्याने तसे ते अगदी जवळजवळच आहेत. परंतु जीवाचे लक्ष शिवाकडे जात नाही. जीव हा शिवाकडे न पहाता जगातील बाह्य दृश्याकडे नजर लावून बसला आहे. त्याचे हे बहिर्मुखत्व दूर करून, त्याला शिवाकडे पहावयास लावण्यास त्याला योग्य तो धक्का द्यावा लागतो. गुरूने सांगितलेल्या साधनाचा आचार झाल्यास जीवाला हा धक्का बसतो आणि मग तो शिवाकडे पाहू लागतो. जीवाने शिवाला पाहिले तरच जीवाला त्याचे अंतिम साध्य प्राप्त होणार आहे.

## २१ फेब्रुवारी

माणसाला या जगात अनेक प्रकारांनी भिन्न भिन्न संगत लाभते. परंतु गंमत अशी आहे की सत्संगतीपेक्षा कुसंगतीचा परिणाम जास्त व जलद होतो.

सद्‌गुरु हाच देव आहे. तोच देवांचाही थोर देव आहे. परमार्थात सर्व काही त्याचे अधीन आहे. सद्‌गुरूंच्या ठिकाणी काहीही उणे नाही.

परमार्थात नाम हेच रूप आहे. म्हणून नामाची जी प्रतीति येते तीच रूपाचीही प्रतीति असते हे लक्षात ठेवावे.

नाईलाजाने जर एकाद्या विषयाचा त्याग करावा लागला तर तो दु:खदायक होतो. पण स्वत:च्या इच्छेने केलेल्या त्यागाने दु:ख होत नाही.

ब्रह्म हे निश्चळ आहे. माया चंचळ आहे.चंचळ मायेच्या गुणामुळे या अफाट विश्वाची रचना झाली आहे.

माणसाला तापदायक काय आहे असे विचारले तर सांगावे लागेल की कनक आणि कांता हीच माणसाला कापणारी कात्री आहे.

शरीरात सोहं सोहं ध्वनि उमटत आहे. तेथे प्रयत्नपूर्वक लक्ष लावावयास हवे. तसे केल्याने जीव सोहंरूप ब्रह्माकार होऊन जातो.

ज्याला जन्म, मरण इत्यादि सहा विकार असतात ते नश्वर असते. विश्वाला हे सहा विकार आहेत. म्हणून ते नश्वर आहे.

## १ मार्च

मनुष्य अनेक गोष्टी करू इच्छितो. पण त्याला त्या सर्व जमतीलच असे नाही. माणसाने आपल्या शक्तीचा विचार करून कार्य हाती घ्यावे.

सोहंसूत्र हे सर्व भूतांत आहे. ते तुटत नाही आणि फुटत नाही. हे सोहंसूत्र धरून जप करणाऱ्याला आपोआप देव दिसतो.

कनक आणि कांता यांचा लोभ टाकून, संसारात अनासक्तपणे राहून, नामस्मरण करून जो देवाला जाणतो, त्याचेच जीवन कृतार्थ होते.

प्रारब्धाने प्रपंच होत असतो. अनेक गोष्टी आपल्याला मिळाव्यात आणि पुष्कळ गोष्टी आपणापासून दूर जाव्यात असे माणसाला वाटत असते. पण प्रारब्धात असेल तेच त्याला मिळते आणि प्रारब्धात नसेल तेच दूर जाते.

तापलेली पळी अंगाला लागली की चटका बसतो. तसे परमार्थात कृपेचे आहे. कृपा होताक्षणीच काहीतरी अनुभव येतोच.

या जगात माणसाला काहीतरी छंद असतो. विश्वातील वस्तूंचा छंद असल्यास दु:ख प्राप्त होते. पण जर का माणसाला नामाचा छंद लागला तर त्याचा भवबंध तुटून जातो.

सुखदु:ख ही परस्परविरोधी जोडी आहे. सुखाशिवाय दु:ख नाही आणि दु:खाशिवाय सुख नाही.

## २ मार्च

आपल्याला आवडणाऱ्या गोष्टी घडाव्यात असे माणसाला वाटते. तरी नशिबानुसार माणसाला न आवडणाऱ्या गोष्टी त्याच्या जीवनात घडतातच.

नामाचा महिमा विलक्षण आहे. नामाने चित्ताला शांति व प्रसन्नता येते. नामाने अंत:करणात अभेद वृत्ति प्रगट होते.

शिंपेवर ज्याप्रमाणे रुप्याचा भास होतो, रज्जूवर ज्याप्रमाणे सापाचा भास होतो, त्याप्रमाणे ब्रह्मावर जगाचा भास होतो. आणि मग विश्व हे खरे वाटू लागते. त्यामुळे ब्रह्म हे गुप्त होते.

आयुर्वेदाप्रमाणे आरोग्यासाठी त्रिफळा आवश्यक आहे. परमार्थासाठी राम–कृष्ण–हरी हा त्रिफळा आहे.

माणूस विचारशील प्राणी आहे. विचाराशिवाय माणूस असूच शकत नाही. म्हणून माणूसच ' विवेक' करू शकतो.

ज्या ईश्वराची विश्वावर सत्ता आहे त्याचेवर प्रेम करावयास शिकावयास हवे.ईश्वराच्या नामगानाने जन्म मरणाचा फेरा चुकतो.

परमार्थात मनातले संकल्पविकल्प दूर होणे गरजेचे आहे.मनातील संकल्प विकल्प दूर होणे म्हणजेच मन मरणे होय. पण हे मन मरता मरत नाही.

संतांचे सांगण्यावर विश्वास ठेवून ते सांगतात तसे नाम घ्यावे. नाम घेतल्याने आपले कल्याणच होणार आहे.

# ३ मार्च



व्यवहारात देव-घेव आहे. त्यासाठी कुणाचे पाय कुणाला धरावे लागतील हे सांगता येत नाही. म्हणूनच 'अडला हरी गाढवाचे पाय धरी' ही म्हण प्रचारात आली आहे.

नामाचे ठायीच तीर्थ, व्रत, नेम, योग,याग, त्याग हे सर्व काही आहे. म्हणूनच नामस्मरणाने जन्माचे सार्थक होते.

जेथे जीव असतो तेथे श्वासोच्छ्वास असतो. जेथे श्वासोच्छ्वास असतो तेथे नाम असते. आणि जेथे नाम असते तेथे ब्रह्म असते.

अवगुणी माणूस हा परमार्थासाठी अयोग्य आहे. अवगुणी माणूस नामस्मरण करीत नसल्यास त्याला देवाची प्राप्ति होत नाही.

मानवी शरीरात चैतन्य खेळते आहे हे खरेच आहे.परंतु कायावाचामनाने या चैतन्याचे ज्ञान होत नाही. या चैतन्याचे ज्ञान होण्यास साधनाची विशिष्ट प्रक्रिया ही सद्गुरूकडून समजून घ्यावी लागते.

जेथे द्वंद्व, द्वैत असते तेथे मी- तू - पणा येतो. अज्ञानामुळे द्वैत आहे.अज्ञान संपले की द्वैत उरत नाही. द्वैत सरले की अद्वैत पदरात पडते.

संतसज्जनांनी परोपरीने भगवन्नामाचे महत्त्व सांगितलेले आहे. पण ते सर्वांना पटते असे दिसत नाही. अनेक माणसांमध्ये एकाद्याला ते पटते.आणि मग तो माणूस नामस्मरणाचा अभ्यास सुरू करतो.

## ४ मार्च

ब्रह्म हे सच्चिदानंदस्वरूप आहे. शरीर हे हाडामांसानी बनलेले आहे. ते स्थूल जड शरीर हे कधीच ब्रह्म होणार नाही.

विश्व हे असार आणि लटपटणारे आहे. त्याला काहीतरी आधार लागतो. सत्य परमेश्वर स्थिर आहे; त्याला आधार लागत नाही. कारण सत्य हे खंबीर असते. विश्वाला मात्र सत्य परमेश्वराचा आधार लागतो.

प्रथम शरीरात आत्म्याचे दर्शन व्हावे लागते. मगच जगातील प्रत्येक वस्तु ही परमात्म्याला पाहण्याचा आरसा बनू शकते.

मुळात सोहं होते. त्याचा विसर पडल्याने कोहं झाले. आणि मूळ स्वरूपाचे विस्मरण म्हणजेच हा संसार आहे.

पोहण्यास शिकायचे असल्यास गादीवर हातपाय हलवून पोहणे येणार नाही. पाण्यात उडी टाकून हात पाय हलविण्यास शिकले तर पोहणे येईल.त्याप्रमाणे अन्य काही न करता नामाचा अभ्यास केला तर ब्रह्म साक्षात्कार होईल.

काही माणसे त्राग्याने, उद्वेगाने अथवा अन्य काही कारणाने 'संसारावर लाथ मारून मी निघून जाईन' असे म्हणतात. प्रपंचावर लाथ मारणे हे सोपे नाही.

वैराग्याने युक्त होऊन, देवावर प्रेम करीत नामाचे गायन केले असता त्या नामातच राम प्रगट होतो आणि जीव संसार तरून जातो.

## ५ मार्च

माणूस या जगात अनेक गोष्टींवर प्रेम करीत असतो. पण खरे सांगायचे झाले तर परमात्मा ही एकच वस्तु प्रेम करण्यास योग्य आहे.

साखर आणि तिची गोडी, पाणी आणि त्याचा पातळपणा, सूर्य आणि त्याचा प्रकाश हे दोन भासले तरी ते एकच आहेत.त्याप्रमाणे अज्ञानाने जीव आणी शिव हे वेगळे वाटले तरी ते भिन्न नसून एकच आहेत.

संसारात रामनाम हेच वर्म आहे. रामनामाचे स्मरण केले असता संसाराची चिंता हरपते आणि जीव 'निजधामाला' जातो.

आमचा कशावरच विश्वास नाही असे काहीजण म्हणतात. पण अमुकच आपले आईबाप आहेत यावर त्यांना विश्वास ठेवावा लागतो.

आत्मवस्तु ही निश्चळ आणि अद्वैत आहे. ती न कळल्याने जगात सर्वत्र द्वैत माजले आहे. द्वैत हे भासमान आहे तर अद्वैत हे अविनाशी सत्य आहे.

आत्मा जरी शरीरात आहे तरी तो अशरीरी आहे. आणि हा अशरीरी आत्मा गावात, रानावनात भटकून दिसत नाही.

आपण स्वप्न पहात असतो तोपर्यंत ते खरे वाटते. जागे झाल्यावर स्वप्न खोटे होते हे कळते. आम्हाला सध्या दृश्य विश्व खरे वाटते आहे. पण आत्मदर्शन होताच हे विश्व खोटे आहे हे कळून येते.

# ६ मार्च

खडीसाखर पाण्यात टाकली की ती विरघळून जाऊन पाण्याशी एकरूप होते. त्याप्रमाणे आत्मसाक्षात्कार झाला की जीव आत्मस्वरूपच होऊन जातो.

जन्म आणि मरण ही दोन टोके एकत्र आली की तेथेच परमार्थ आहे; मग परमार्थ म्हणून वेगळा काही रहात नाही.

जे संत भगवंत होतात ते संत सर्वांना आधारभूत होतात. अशा संताना माणूस जर सर्वभावाने शरण गेला तर तो 'नर का नारायण' होऊन जातो.

एकाद्याच्या मनात काय आहे हे सहजासहजी इतरांना कळत नाही. आता जर माणसाच्या मनात काय चालले आहे हे जर पट्दिशी इतरांना कळायला लागेल तर मात्र व्यवहारात अनवस्था ओढवेल.

देहाला जन्म आणि मरण आहे. जन्ममरणाचे पलीकडे आत्मा आहे. नामसाधनाने जीव जर आत्मरूप झाला तर तो विदेही होतो.

काहीजण म्हणतात, 'आम्ही नेहमी योजनापूर्वक काम करतो.' परंतु त्यांना हे माहीत नसते की ती योजना त्यांची नसते, ती योजना ईश्वराचीच असते.

जीव हा मूलत: सुखरूप आहे. पण त्याला स्वत:च्या सत्य स्वरूपाचा विसर पडला आहे. त्यामुळे तो जगातील बाह्य विषयात सुख शोधतो आहे. पण गुरुकृपेने जर त्याला स्वत:चे मूळ रूप प्राप्त झाले तर तो नित्य सुखी होईल.

## ७ मार्च

परमार्थात गुरुकृपा आवश्यक आहे. ती तीन प्रकारांनी होते:- एक, कानात मंत्र सांगून, दोन, दृष्टीचे द्वारा, तीन, मस्तकावर हात ठेवून.

पाण्यावर शेवाळ येते. आकाशात ढग येतात. आरशावर मळ चिकटतो. त्याप्रमाणे ब्रह्मावर जग दिसू लागते.

या जगात नाना प्रकारचे मंत्र आहेत. जो मंत्र नाही असे अक्षर नाही असे म्हटले जाते. परंतु सर्व मंत्रांमध्ये सोहं मंत्र हा श्रेष्ठ असा महामंत्र आहे.

नरदेह हे मोक्षाचे दूवार आहे. दंभ आणि अभिमान टाकून देऊन, रामनामाचे गायन केल्यास रामनाम हे मोक्षाचे साधन बनते.

या जगात माणसाच्या प्रेमाचे अनेक विषय असतात. परमार्थात मात्र फक्त चैतन्यावर प्रेम करावयाचे आहे.

सूर्य, चंद्र, अग्नि, वीज इत्यादि वस्तु प्रकाश देतात. पण त्याने संपूर्ण विश्व प्रकाशित होत नाही. केवळ परमात्मा हाच विश्वाचा प्रकाशक आहे.

परमार्थात कीर्तन शब्दाचा अर्थ असा आहे – नटनाम परमात्म्याचा नाच म्हणजे कीर्तन. कीर्तन व साधन एकच आहेत. आणि साधन म्हणजे नामस्मरण.

आंतर उपासना ही सहजासहजी एकदम होत नाही. म्हणून बाह्य उपासना ही महत्त्वाची आहे. ती आंतर उपासनेला पूरक ठरते.

## ८ मार्च

विश्वाच्या प्रारंभी ब्रह्म आहे. विश्वाच्या अंतीही ब्रह्मच आहे. म्हणूनच जे दिसत आहे ते सर्व ब्रह्म आहे असे म्हटले जाते.

बहुतेक लोक या जगात घटका घटका मजा करीत असतात. त्यांनी ते सोडून द्यावे आणि नामरसाचा घुटका घ्यावा. नामरसाचा घुटका घेतला असता चौऱ्यांशी लक्ष योनीतून म्हणजे प्रपंचातून /संसारातून सुटका होते.

निर्विकार ईश्वराचे अवतार संत असतात.आणि जरी संत संसारात दिसत असले तरी पाण्यात राहून कमळ ज्या प्रमाणे पाण्यापासून अलिप्त रहाते त्याप्रमाणे संत हे प्रपंचातून अलिप्त असतात.

शरीरात चैतन्य आहे. त्या चैतन्याचा अनुभव घेणे हेच परमार्थाचे उद्दिष्ट आहे. हा चैतन्याचा अनुभव येण्यास उपाय तरी काय आहे? शरीर असताना शरीर विसरले गेले तरच चैतन्याची अनुभूति येईल.

व्यवहारात माणसाला नाना प्रकारच्या विषयांचा लोभ असतो. खरा परमार्थी पुरुष हा विषयांचा लोभ धरीत नाही.

प्रपंच हा परमार्थासाठी करावयाचा आहे. परमार्थ हा अहंकाराच्या निरासासाठी करावयाचा आहे. आणि अहंकारनिरास हा आत्मदर्शनासाठी करावयाचा आहे.

मोक्ष मोक्ष म्हणजे काय? मनाच्या निर्विकार आणि निर्विचार स्थितीत जो आनंद प्राप्त होतो तोच मोक्ष आहे.

## ९ मार्च

नाम हे सत्य आहे. नाम हे परमात्म्यापासून वेगळे नाही. नाम म्हणजेच परब्रह्म आहे. हे नाम पैशाने कसे मिळणार?

या जगात सर्वत्र भेदभाव आहे. ज्याला आत्मसाक्षात्कार झाला त्याला जगत् हे आत्मस्वरूपच दिसते. म्हणून जोपर्यंत आत्म्याचा साक्षात्कार झालेला नाही तोपर्यंत भेदभाव रहाणारच.

परमार्थात अहंकाराचा निरास होणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे. परमार्थी माणसाच्या मनात 'मी करतो' असेसुद्धा येता कामा नये.

भौतिक शास्त्रात नाना प्रकारच्या शक्तींचा निर्देश येतो. त्यातील काही शक्ति या विनाशकारी आहेत. नामाची शक्ति ही विधायक आहे.

मन, पवन, जीव आणि शिव या चतुष्कोणात्मक विटेवर विठ्ठलरूपी ब्रह्म उभे ठाकले आहे.

जो माणूस स्वत:ला विसरतो तो देवाला पहातो. आणि जो पुरुष परमेश्वराला पहातो तो स्वत:ला विसरतो.

आपणांस वाटत असते की आपण आपल्या इच्छेने वागतोय. परंतु ते तसे नाही. आपण जे काही करतोय ते देवाच्या इच्छेनेच करतोय.

व्यवहारात आपण जीवनमान उंचावण्याची भाषा बोलतो. परमार्थात पिंडाचा ग्रास होऊन जीव ब्रह्मांडात गेला की त्याचे जीवन उंचावते.

## १० मार्च

रामनाम हे कसे तरी घेणे हेसुद्धा अवघड आहे. ढोंगाने, प्रेमाने, द्वेषाने कसेही रामनाम घ्यावे. रामनाम अजिबात न घेतल्यापेक्षा ते बरे आहे. परंतु खरी गोष्ट अशी आहे की रामनाम हे निष्ठापूर्वक आणि चित्तशुद्धिपूर्वक घ्यावयास हवे. सामान्य माणसाने प्रथम वैखरीने रामनाम घ्यावयास हवे. त्यामुळे चित्ताची शुद्धि होण्यास मदत होते.

साक्षात्कार हा कायमचा आहे. आपण त्याचेजवळ असत नाही म्हणून तो आपणास कळत नाही. परंतु जेव्हा जेव्हा चैतन्याचा प्रकर्ष होतो तेव्हा तेव्हा साक्षात्कार जाणवतो. म्हणजे चैतन्य आहेच, त्याचा प्रकर्ष झाला की साक्षात्काराची जाणीव होते. श्वासांचे घर्षण झाल्याशिवाय चैतन्याचा प्रकर्ष होत नाही. श्वासांचे घर्षण होण्यासाठी आपली दृष्टि त्या श्वासावर केंद्रीभूत व्हावयास हवी.

आपण दरवर्षी शिवरात्र साजरी करतो. शिव म्हणजे कल्याण आणि रात्र म्हणजे अंधार. अंधारात प्रकाश दिसणे ही परमार्थातील शिवरात्र आहे. हा प्रकाश दिसण्यास प्रथम अंधार पाहिजे. बाहेरचे शरीरातील डोळे मिटल्यावर दिसणारा अंधार येथे अभिप्रेत नाही. सद्गुरु हे साधकाला सूर्यचंद्रात्मक डोळे देतात. ते डोळे झाकल्यावर जो अंधार पडतो, त्यात प्रकाश दिसतो. हा प्रकाश शिवरूप आहे. आणि हा शिव दिसल्यावर सगळीकडे शिव दिसू लागतो आणि अशी स्थिति प्राप्त होणे हीच परमार्थातील शिवरात्र आहे.

## ११ मार्च

गुढी पाडवा हा फार महत्त्वाचा आहे. या दिवशी लोक टाळी वाजवून गुढी उभारतात. परमार्थात गुढी उभारायची म्हणजे आपले जीवन ऊर्ध्वगामी करावयाचे. नामाचा उच्चार ही टाळी आहे. या टाळीने अद्वैताची प्रचीति येते.

माणसाला चार देह आहेत; ते म्हणजे स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण. स्थूल देह हा पृथ्वी आणि पाणी या तत्त्वांनी बनलेला आहे. सूक्ष्म शरीर हे तेजाचे आहे. कारणदेह हा वायुरूप आहे. तर महाकारणदेह हा आकाशरूप आहे.

जशी माणसाची अवस्था असते तसा त्याचा अनुभव असतो. साहजिकच अवस्थांनुसार माणसाचे अनुभव बदलतात. जागृति या अवस्थेत स्थूल अशा बाह्य दृश्याचा अनुभव असतो; हा अनुभव स्वप्नात असत नाही. स्वप्नामध्ये स्वप्नसृष्टीचा अनुभव येतो. निद्रा या अवस्थेत जागृतीतील अनुभव तसेच स्वप्नातील अनुभव असत नाहीत.

संत जेव्हा बाह्य जगातील पदार्थांकडे पहातात तेव्हा त्यांना प्रथम आत्मवस्तु दिसते, आणि मग पदार्थ दिसतो. आता आत्मवस्तु दिसते म्हणजे नक्की काय होते? त्यांना वायुतत्त्व दिसते. वायु तर डोळ्यांना अदृश्य आहे. तेव्हा वायुतत्त्व दिसते म्हणजे काय? वायुतत्त्व दिसते याचा अर्थ आत्मवस्तूचा प्रकाश दिसतो.

## १२ मार्च

महालक्ष्मीच्या दिवशी रात्री बायका घागरी फुंकतात. फुंकण्यासाठी कशाने तरी भरलेल्या घागरी निरुपयोगी आहेत. परमार्थात आमचा घट म्हणजे मन; तो कधी रिकामाच नसतो; सारखे विचारांचे काहूर डोक्यात भरलेले असते. परमार्थात निर्विचार स्थिति आवश्यक आहे. निर्विचार स्थितीतला आनंद फार वेगळा असतो.

'नाम श्वासोच्छ्वासी असे परब्रह्म तेथे वसे' हे समर्थ रामदासस्वामींचे वचन परमार्थ करणाऱ्याला अत्यंत महत्त्वाचे आहे. पण ते न समजून आपण तोंडाने नामाचा उच्चार करतो. त्याचा फारसा उपयोग होत नाही.

जन्म आणि मरण या दोन टोकांच्या मध्ये माणूस तीन अवस्थांतून जात असतो. या अवस्था म्हणजे जागृति, स्वप्न, आणि सषुप्ति. या अवस्था माणसाला आलटून पालटून येतात. पण या अवस्था ज्या चैतन्यावर अधिष्ठित आहेत ते चैतन्य मात्र सततचे आहे. सततचे चैतन्य ही तुर्या अवस्था होय. तुर्येमध्ये अखंड स्मरण असते. ही तुर्यावस्था म्हणजेच गणेश चतुर्थी आहे.

परमार्थात साधन करताना देहाची जाणीव सुटली पाहिजे. आता, गांजा, अफू, दारू इत्यादींचा अंमल चढला असेल अथवा झोप असेल, तर काही काळ देहाची जाणीव सुटते. पण त्या अवस्थांत आत्म्याचे स्मरण असत नाही. देहाची जाणीव सुटून आत्म्याचे स्मरण रहाणे हेच साधन आहे.

## १३ मार्च

सुख मिळविण्यासाठी आपली भिस्त शब्द ,स्पर्श इत्यादि पाच विषयांवर असते. हे विषय पाच महाभूतांनी बनलेले आहेत. आपले शरीरही पंचमहाभूतात्मक आहे. आणि सुखासाठी आपली सारी भिस्त या पाच भूतांवर असते. आपण जर या पाच भूतांना सोडले नाही तर आपल्याला खरे सुख मिळणार नाही. खरे सुख रामनामात आहे. रामनामाशी तादात्म्य पावल्याने खरे सुख माणसाच्या पदरात पडते.

या जगात वर फेकलेली वस्तु गुरुत्वाकर्षणामुळे खाली येते, असे आम्हाला शाळेत शिकविले गेले. त्यावेळी वर गेलेला श्वास खाली कसा येतो असा विचार माझ्या मनात आला. मग लक्षात आले:- श्वासाला चैतन्य आणि जड या दोहोंचे आकर्षण आहे. चैतन्याच्या आकर्षणामुळे श्वास वर जातो आणि जडाच्या आकर्षणामुळे श्वास खाली येतो.

व्यवहारातल्याप्रमाणे चैतन्यात वैचित्र्य नाही. चैतन्याचा साक्षात्कार एकाच ठशाचा असतो. एकादा माणूस काल रागावला पण तो आज रागावेल असे नाही. तसे चैतन्याचे नाही. चैतन्यात कधीही फरक पडत नाही. ते कधीही विकृत होत नाही. चैतन्य म्हणजेच परमेश्वर. निसर्गातील मिश्रणे चैतन्यामुळे होतात; पण ती शाश्वत नसतात. जगातल्या वस्तु नुसत्या पाहून सोडण्याच्या लायकीच्या आहेत. चैतन्य मात्र एकरूप आणि शाश्वत आहे.

## १४ मार्च

चैतन्यरूप आत्म्यामुळे दृश्य विश्वाचा विस्तार झाला. या दृश्य विश्वात आत्मा सगळीकडे आहे. या विश्वात प्राण्यांची दृश्य शरीरे आहेत. त्यामध्येही आत्मा आहे. मानवी शरीरातही आत्मा आहे. असे असले तरी शरीर म्हणजे आत्मा नव्हे.आणि आत्मा म्हणजे शरीर नव्हे.त्या दोहोंत फरक आहे.

आत्मा हा शरीरात तेजोरूपाने, प्रवाहरूपाने, उष्णतेच्या रूपाने, वायुरूपाने, भरून राहिला आहे. देह हे आत्म्याचे कव्हर, आवरण आहे.जसे :- तांब्याच्या तारेतून वीज वाहते, पण तांब्याची तार म्हणजे वीज नव्हे. तार हे विजेचे माध्यम आहे. त्याप्रमाणे देहात रहाणारा आत्मा देहापेक्षा निराळा आहे.

आपण देहाला महत्त्व देतो. पण खरा महत्त्वाचा आहे आत्मा. कारण देहातून आत्मा बाहेर गेला की शरीर अचेतन चिपाड होऊन पडते.

शरीरात सातत्याने बदल, फरक होत असतो. देहातील एक पेशी नष्ट होते, तेथे दुसरी येते. असा बदल आत्म्यात होत नाही. आत्मा हा अविकारी आहे.

देह हा अनित्य आहे. तर आत्मा नित्य, शाश्वत आहे.

देह हा अपूर्ण आहे. परमात्मा हा संपूर्णपणे पूर्ण आहे. देह मर्यादित आहे. देहाने आत्म्याला मर्यादा आली असे वाटते; पण तसे नाही. आत्मा हा अमर्याद आहे.

## १५ मार्च

ज्या आत्म्यामुळे देह चालतो, हालचाल करतो, तो आत्मा निश्चळ व अदृश्य आहे. आपण व्यवहारात अनेक अदृश्य गोष्टींवर विश्वास ठेवतो. पण आपण आत्मा आहे या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास तयार होत नाही. उदा. वाफ अदृश्य असते; पण त्या अदृश्य वाफेने वाफेचे इंजिन चालते. प्रकाश हा अदृश्य आहे; परंतु त्या अदृश्य प्रकाशामुळेच आपणांस दिसत असते. मन हे अदृश्य आहे; पण त्याच्याशी संबंधित मानसशास्त्र आहे. परंतु अदृश्य आत्मा शरीर चालवितो असे म्हटले की ते मात्र आपणांस पटत नाही. कशावरून आत्मा आहे, अशी शंका आपल्या मनात येते. खरे म्हणजे आत्मा आहेच आहे. तो देहात आहे तोपर्यंतच या हाडामांसाच्या देहाला किंमत आणि महत्त्व आहे, हे आपणांस ठाऊक आहे. आत्मा ज्यातून गेला आहे अशा मृत शरीराला काय किंमत आहे?

आत्मा देहात आहे तोपर्यंतच माणसाने या आत्म्याचे ज्ञान करून घेणे हे आवश्यक आहे. शरीरात मस्तकातील सहस्रदळस्थानात आत्म्याचे वास्तव्य असते. शरीर जिवंत आहे तोपर्यंतच आत्म्याची प्रचीति, अनुभव, साक्षात्कार करून घ्यावयाचा आहे. तो आत्मसाक्षात्कार सद्गुरूंनी सांगितलेले साधन केले तर होतो.

एकदा का देहात असणाऱ्या आत्म्याचे दर्शन माणसाला झाले की त्याला बाहेरच्या जगातही आत्म्याचे दर्शन होऊ लागते.

## १६ मार्च

आकाश, वायु इत्यादि पाच महाभूते एकत्र येऊन हे आपले स्थूल शरीर बनते. पण 'हे शरीर माझे' आहे ही जाणीव ज्याच्यामुळे होते ते आतले म्हणजे शरीरातले वारे मात्र वेगळे आहे. आपल्या शरीरात हे जे वारे खेळते आहे, ते काय बाहेरच्या वाऱ्यासारखे आहे की पंख्याच्या वाऱ्यासारखे आहे की टायरीत भरलेल्या हवेसारखे आहे? नाही. हे वारे वेगळे आहे. ते चैतन्याचे वारे आहे. फक्त त्या चैतन्याची जाणीव मात्र आपणांस असत नाही. ही जाणीव करून देण्याचे कार्य संत अथवा सद्गुरु करतात.

साधनात अमुकच अनुभव यावा असे आपणांस वाटते, पण ते तसे नाही. सर्व काही चैतन्याच्या हातात आहे. साधन केल्यावर कधी शांति आणि समाधान वाटते, कधी ते वाटत नाही. शाति–अशांति , समाधान – असमाधान यांचा द्रष्टा चैतन्य आहे. शांति– अशांति इत्यादींचा परिणाम चैतन्यावर होत नाही. अंगाला उदबत्ती लावली की शरीराला चटका बसतो. पण तो चटका चैतन्याला बसतो काय? नाही. सुख–दुःख हे शरीराला होत असते. त्याचा चैतन्यावर काहीही परिणाम होत नाही.

अंधारात बॅटरी लावून आपण वस्तु शोधतो पण अंधार असो वा उजेड असो, 'मी आहे' ही जाणीव नष्ट होत नाही. अंधारात 'मी नाही' असे आपण म्हणत नाही. अंधार आणि उजेड यांचे ज्ञान ज्याच्यामुळे होते ते चैतन्य आहे. काही असो अथवा नसो, चैतन्य हे आहेच आहे.

## १७ मार्च

चैतन्य म्हणजे ज्योत आहे. तिलाच आत्मज्योति असेही म्हणतात. ही आत्मज्योत बाहेरच्या मांसाच्या डोळ्यांना दिसत नाही.चैतन्य म्हणजे आत्मा. हा काय माणूस आहे की दगड आहे की जो या डोळयांना दिसेल? बाह्य नजरेने आत्मज्योत दिसत नाही.आत्म्याला पहाण्याची नजर वेगळीच आहे. आत्म्याला पहाण्याची नजर ही 'आंतर' नजर आहे; फक्त त्या नजरेलाच आत्मा दिसू शकतो. साधनाच्या अभ्यासाने ही नजर कमवावी लागते.

साधन करणाऱ्याला चैतन्याचा अनुभव वेगवेगळ्या प्रकारांनी येतो. एकाद्या साधकाला जो अनुभव आला तोच दुसऱ्या साधकाला येईलच असे सांगता येत नाही. म्हणून त्यात काही अर्थ नाही असे म्हणावयाचे नाही. नाद, बिंदु,कला आणि ज्योति हे आत्मसाक्षात्कारातील टप्पे आहेत.

साधनाने साक्षात्कार झाल्यावर जे काही आत दिसते तेच डोळे उघडल्यावर बाहेरच्या जगात साधकाला दिसावयास हवे. बाहेर त्याला जर नुसतेच आकार आणि विकार दिसू लागले, तर साक्षात्कार झालाच नाही असा अर्थ आहे. साधन करताना जे आत दिसते तेच बाह्य जगात दिसावयास हवे.

आपला चेहरा म्हणजे आपले स्वरूप नव्हे. असे कितीतरी चेहरे आले आणि गेले. आत्ताच्या चेहऱ्याचे रूप पूर्वी नव्हते व पुढेही असणार नाही. स्व-रूप म्हणजे चैतन्य. चैतन्य हे आपले खरे स्वरूप आहे. स्वरूप पहाणे म्हणजे चैतन्य पहाणे होय.

## १८ मार्च

जीव हा निसर्गतः बहिर्मुख आहे. म्हणजे तो शरीरामार्फत इंद्रियांच्या दूवारा बाहेर धडपडत असतो. परमार्थात जीव अंतर्मुख व्हावयास हवा.आता, जीवाने अंतर्मुख व्हावयाचे म्हणजे काय? शरीरात देव ज्या रस्त्याने आत बाहेर येतो – जातो, तिकडे जीवाने लक्ष देणे म्हणजे त्याने अंतर्मुख होणे होय. देव म्हणजे प्राण. म्हणून प्राण ज्या मार्गाने येतो – जातो त्या मार्गाकडे जीवाने लक्ष द्यावयास हवे. प्राण्याचा येण्याजाण्याचा संबंध नासिकेशी आहे. नासिकेतील या प्राणाच्या प्रवाहावर जीवाची दृष्टि लागली पाहिजे. म्हणजे तो अंतर्मुख झाला.

चैतन्याला बरोबर घेऊन म्हणजे चैतन्यासह शरीर आले तर जन्म झाला असे म्हणतात. शरीर मृत होऊन पडल्यावर त्यातून काहीतरी बाहेर निघून जाते की नाही? तेव्हा शरीर निष्क्रिय असते. म्हणजे शरीराला चालविणारे काहीतरी शरीरातून निघून गेलेले असले पाहिजे. ते चैतन्य आहे. चैतन्य शरीरातून बाहेर पडले की मरण.

चैतन्य म्हणजे स्पंदन – स्पंद – आहे. स्पंदाचा विस्तार म्हणजे विश्व आहे. स्पंद या केंद्रबिंदूतून विश्वाचे वर्तुळ निघाले आहे. आपण जर विश्वाच्या विस्ताराकडे लक्ष देत बसलो तर पदरात दुखःच पडते. आपण स्पंदाकडे परत जावयास हवे. स्पंदाकडे परत गेले म्हणजे सुखाचा कंद आहे.

ॐ'तत् सत्' मध्ये ॐ म्हणजे तत् आहे. हे 'तत् ' स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या चार देहांच्या पलीकडे आहे. तत् हेच सत् आणि सत् म्हणजे अस्तित्व.

## १९ मार्च

साधनाने सद्गुरूंचे चरण साधकाच्या हृदयात प्रगट होतात, याचा अर्थ नीट समजून घ्यावयास हवा आहे. सोहं हे सद्गुरूचे खरे स्वरूप आहे. आणि सोहं गति म्हणजे सद्गुरूचे चरण आहेत. आपल्या मस्तकात जे हृदय – अंतराकाश – आहे त्यात गुरुचरण प्रगट होतात. खरे म्हणजे गुरुचरण अप्रगट कधी आहेत? ते अखंड असतातच. तेव्हा ते प्रगट होणे म्हणजे आपली दृष्टि त्यांचेकडे जाणे, आपले लक्ष तिकडे जाणे, आपणांस त्यांची जाणीव होणे.

शरीर हे नाशवंत आहे. सर्व दृश्य विश्व हे नाशवंत आहे. असे केवळ आमचे संत सांगतात असे नव्हे तर आधुनिक शास्त्रज्ञही तेच म्हणतात. याउलट चैतन्य हे मात्र अविनाशी आहे. शरीर नष्ट झाले, दृश्य विश्व नष्ट झाले तरी चैतन्य हे कधीच नष्ट होत नाही. चैतन्य हे अमृत असल्याने ते असतच असते.

काहीजण गुरूची काकडारती करतात. खरे म्हणजे गुरु हे नेहमीच जागे असतात. तेव्हा गुरु काय झोपला आहे म्हणून त्याची काकडारती करायची? आणि त्यांना जागे करण्यास कसली काकडआरती? गुरुची काकडारती या म्हणण्याचा अर्थ असा आहे:–गुरूच्या महत्त्वाविषयी पूर्वी आपण जागे नव्हतो; आता गुरूचे महत्त्व कळल्याने आपण जागे झालो आहोत हे लक्षात घेऊन साधकांनी काकडारती करावयाची आहे.

## २० मार्च

सोहं या शब्दातून सकार (= स् हे अक्षर ) आणि हकार (= ह् हे अक्षर ) जर काढले तर ओम् उरतो. ओंकार म्हणजे अकार (= अ ) उकार (= उ )आणि मकार (= म्) आहे. अकार आणि उकार हे एक झाले की मकार म्हणजे नाद उमटतो. ओम्चा अभ्यास झाल्यावर मग 'मी कोण' (कोहं) असा प्रश्न साधकाला पडतो. त्याचे उत्तर आहे सोहं. सोहं हे चैतन्य आहे. मी चैतन्य आहे हे साधकाला कळते.

साधनात आपली प्रगति होत आहे हे कसे ओळखायचे? प्रचीतीवरून. नाद, बिंदु, कला व ज्योति यांपैकी कशाची तरी प्रचीति येत असेल तर प्रगति होत आहे असे समजावे. ही प्रचीति नेहमीच येते असे नाही पण नेहमीही येऊ शकते. साधन चालू असताना ही प्रचीति जशी येते तशी ती साधक साधन करीत नसतानाही येऊ शकते. खरे तर समाधान वाटणे व ते टिकून रहाणे हेच साधनातील प्रगतीचे गमक आहे.

धर्मशास्त्र हे शरीर म्हणजे अन्नमय कोश आणि तज्जन्य गरजा यांच्याशी मुख्यतः संबंधित आहे. अन्नमय कोशाच्या पलीकडे मन आणि बुद्धि आहेत. त्यांची गरज कशी पुरी करता येईल याचा विचार अध्यात्मशास्त्र करते. खरे म्हणजे समाजाला अध्यात्माची खरी गरज आहे. अध्यात्माचा अभ्यास करून, अनुभव घेतल्यास, शोक व मोह यांची निवृत्ति, अखंड आनंदाची प्राप्ति, इत्यादींचा लाभ होऊन पारमार्थिक जन्मसाफल्य होईल.

## २१ मार्च

'मी' चा शोध हीच तत्त्वज्ञानाची गुरुकिल्ली आहे. मला माझे ज्ञान आहे; तेव्हा मी आहे हे सिद्ध करण्याची जरुरी तरी काय आहे? 'मी' चा शोध करताना अहंकाराचा निरास होतो आणि मी साक्षी आणि चैतन्य आहे; मीच जग आहे, कारण जगात मीच आहे; सर्व काही 'मी' आहे असे म्हटले की अहंकाराला जागा तरी कुठे रहाते? 'मी' मध्येच सत्ता/अस्तित्व, ज्ञान आणि आनंद आहे.

आपल्या शरीरात गतिरूपाने रामनाम दुमदुमत आहे. पण ते विना प्रयत्न प्राप्त होत नाही. जसे बाह्य जगात विहीर खणताना खडक फोडल्यावर पाणी लागते, त्याप्रमाणे शरीररूपी खडक फोडल्याशिवाय म्हणजे तो बाजूला केल्याशिवाय रामनामरूपी पाणी मिळत नाही,आणि त्याच्याशी तादात्म्य प्राप्त होत नाही. रामनामाशी तादात्म्य झाले तरच खरे सुख प्राप्त होते.

परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चारही वाणींत नाम आहे. हे नाम नादरूप आहे. या चार वाणींमध्ये नादरूप नामाचे स्फुरण असते.

जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या यापलीकडील उन्मनी अवस्थेत परमात्म्याचा अनुभव असतो. तेथे 'मी परमात्मरूप झालो' ही जाणीव नसते. ती जाणीव नसणारा असा तो अनुभव असतो. उन्मनी अवस्था संपल्यावर मग त्या अनुभवाची स्मृति येते.

## २२ मार्च

संत सांगतात की जीवात्मा आणि परमात्मा एकच आहेत; त्या दोहोंत कोणत्याही प्रकारचा भेद नाही. दोहोंचेही मूळ स्वरूप एकच आहे. तथापि आपण परमात्मा/ब्रह्म आहोत, याची जाणीव जीवाला नाही; कोणत्यातरी कारणाने जीवाला स्वतःच्या सत्य स्वरूपाचा विसर पडला आहे. म्हणून 'आपण परमात्मा आहोत' ही जाणीव निर्माण करण्यासाठी, गुरूंनी सांगितलेले साधन आचरणात आणणे आवश्यक ठरते.

आत्ताच्या घडीला वर्तमानकाळात जीवात्म्याच्या भोवती विविध प्रकारच्या उपाधि जमलेल्या आहेत. आणि त्या उपाधींमध्ये जीव अडकला आहे आणि त्यांमध्ये तो गुंतून पडला आहे. आता या उपाधींमुळेच त्याला स्वतःच्या ब्रह्म – स्वरूपाचे विस्मरण पडले आहे. जर या उपाधि दूर झाल्या आणि जीव त्या उपाधींतून सुटला तर आपोआपच त्याला स्वतःचे आत्मस्वरूप कळून येणार आहे आणि म्हणून या उपाधि दूर सारण्यास म्हणजेच या उपाधींचा निरास करण्यास साधन करणे हे जरूर होते. याला उदाहरण असे :– एकजण मुळात श्रीमंतच आहे. परंतु त्याचे संपत्तीवर एक भला दांडगा भुजंग बसला आहे आणि तो कोणालाही जवळ येऊ देत नाही. अशा परिस्थितीत कोणत्या तरी का उपायाने त्या नागोबाला तेथून हाकलून देणे आवश्यक आहे. त्यासाठी खटपट करावयासच हवी. खटपटीने तो भुजंग दूर पळून गेला की ती संपत्ति त्या माणसाचीच आहे.

## २३ मार्च

जीवाची उपाधि दूर सारण्यास साधनाचा प्रयत्न आवश्यक आहे, याला आणखी एक उदाहरण असे देता येईल :- एक माणूस आहे. त्याची स्वत:ची एक वस्तु हरवली आहे. खरे म्हणजे ती वस्तु त्याच्याजवळच आहे पण ती आपल्या जवळ आहे याची त्याला जाणीव उरलेली नाही. या अवस्थेत त्याने प्रयत्नपूर्वक स्वत:चे जवळच असणारी वस्तु शोधून काढावयाचा प्रयत्न केलाच पाहीजे. तसा प्रयत्न, तशी खटपट जर त्याने केली नाही, तर त्याला ती वस्तु मिळणार नाही आणि त्याची त्याला वस्तु प्राप्त झाली असे म्हणता येणार नाही. तिसरे उदाहरण असे :- एका स्त्रीने आपल्या गळ्यातच सरी अडकवली होती. पण ती ते विसरली होती. त्यामुळे तिला सरी मिळत नाही. तिने आरशाजवळ जाणे हे तिच्या दृष्टीने आवश्यकच आहे. तर तिला सरी दिसेल व मिळेल.

बरोबर याचप्रमाणे जीवाभोवती गोळा झालेली उपाधीची जळमटे दूर झाल्याशिवाय 'आपण ब्रह्म आहोत' हे जीवाला कळणार नाही आणि त्याची खात्री पटणार नाही. जीवाच्या भोवती जमलेल्या उपाधींचा निरास करण्यासाठी साधन हे आवश्यक आहे. आणि असे साधन करण्याकरताच माणसाला आपले आयुष्य प्राप्त झाले आहे. साधनानेच आत्मसाक्षात्कार होतो. जीव हा आत्मस्वरूप होणे हे साधनाशिवाय घडूच शकत नाही. म्हणून जीवाने स्वत:चे आत्मस्वरूप मिळवण्यासाठी साधन करणे नितांत जरूर आहे.

## २४ मार्च

आमची अवस्था अशी आहे :- प्रत्यक्ष परमेश्वर जरी आमच्या समोर प्रत्यक्ष येऊन उभा राहिला तरी आम्ही म्हणणार 'ही भुताटकी तर नसेल ना!'

या जगात शतावधानी, सहस्रावधानी लोक आहेत. असले लोक परमार्थाला निरुपयोगी असतात. कारण परमार्थात माणूस एकावधानी असावा लागतो.

आपण नेहमी म्हणतो 'आजचा दिवस जाऊ दे. उद्यापासून निश्चितपणे साधन करू.' परंतु होते काय 'आज रोख उद्या उधार' या म्हणीप्रमाणे आमचा 'उद्या' कधी उगवतच नाही.

काहींचा भर साधनावर असतो. गुरूचा अनुग्रह घेतल्यापासून त्यांनी साधनच केलेले असते. अशी माणसे मरताना राम राम न म्हणता गेल्यास काय होईल? हे लोक नामसाधनात असल्याने आणि साधन करतानाच मेल्याने, त्यांचा प्राण 'राम राम' म्हणतच गेला, असे जाणावे.

आमचे कसे आहे? करीन ती कथा, बोलीन ती गाथा आणि पाडेन ती प्रथा. आपला हा अहंकार आहे. अहंकार आणि स्वार्थ या शिवाय आपल्याजवळ आहे तरी काय?

ब्रह्म हे सत्य आहे आणि जग हे मिथ्या आहे हे तोंडाने बोलणे, मनाने समजणे, ज्ञानाने उमजणे आणि अनुभवाने कळणे यांत फार मोठा फरक आहे.

मरेपर्यंत शरीराशी आपला घनिष्ठ संबंध असतो. त्यामुळे आमची कल्पना होते की शरीरानेच परमार्थ होणार आहे. पण जो खरा परमार्थ आहे त्याचा शरीराशी काडीमात्र संबंध नाही.

## २५ मार्च

परमात्मा, परमेश्वर हा स्तुतिप्रिय आहे. म्हणजे त्याला स्वत:ची इतरांनी केलेली स्तुति आवडते. त्याप्रमाणे माणूसही स्तुतिप्रियच आहे. परंतु संत हे मात्र परमेश्वर आणि सामान्य पुरुष यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. कारण त्यांना स्तुति काय किंवा निंदा काय, ते दोन्हीही समसमानच असतात.

समजा, एकाद्या घरात सुखदु:खाचे प्रसंग घडत आहेत. घरातील माणसांवर त्यांचा परिणाम होतो. पण त्यांचा कोणताही परिणाम घरातील घड्याळावर होत नाही. घड्याळाचे ठोके वेळच्यावेळी पडत रहातात आणि त्याचे काटेही शिस्तीत फिरत रहातात. संत हेही त्या घड्याळाप्रमाणेच असतात. सुखदु:खांचे कितीही प्रसंग कोसळले तरी संतांच्यावर त्यांचा परिणाम होत नाही.

खरे पाहिले असता, जीव हा कर्मांचा कर्ता नाही. तथापि 'हे मी केले,' 'ते मी केले' असा अभिमान बाळगून, जीव हा कर्माचे कर्तृत्व आपणावर ओढवून घेतो. कर्तृत्व पत्करल्यामुळे त्याचे हातून नानाप्रकारच्या क्रिया घडतात. क्रियांच्या मागोमाग सुख-दु:ख, मान-अपमान, निंदा-स्तुति इत्यादि द्वंद्वे त्याच्या मागे लागतात. 'मी केले' या अहंकाराच्या भूमिकेमुळे जीवाच्या मागे संचित, प्रारब्ध, क्रियमाण ही कर्मे आणि शेवटी जन्ममरणचक्र मागे लागते.

## २६ मार्च

शरीरात चैतन्य आहे म्हणून माणसाला स्मरण आहे. स्मरण आहे म्हणून व्यवहार आहे. स्मरण आहे म्हणून परमार्थही आहे. परमार्थात चैतन्याचे स्मरण आहे. आणि हे जे चैतन्याचे स्मरण आहे त्यातच परमार्थातील सुख साठविलेले आहे.

मेरु म्हणजे पर्वत. ते चार प्रकारचे आहेत :-(१) जड डोंगर हे पृथ्वीवरील मेरु. (२) हिमालय हा पाण्याचा मेरु. (३) वावटळीने वायु गरागरा फिरत वर चढतो तो वायूचा मेरु . (४) प्रत्येक माणसाच्या शरीरात असणारे चैतन्य म्हणजे चैतन्याचा मेरु .

नाव ही परतीराला जाण्याचे एक साधन आहे. तितकेच तिचे महत्त्व आणि उपयोग. नाव ही उपयोगी आहे म्हणून परतीराला गेल्यावर ती नाव डोक्यावर घेऊन कुणी जात नाही. तसे शरीराचे आहे. शरीर हे परमार्थाला उपयोगी आहे इतकेच त्याचे महत्त्व आहे.

आमचा मान इतरांनी केला नाही तर तो आपला अपमान झाला असे आपण मानतो. याउलट 'कुणी आपला अपमान केला नाही ना' म्हणजे तो आपला मानच आहे असे संत समजतात. असा फरक आमच्या आणि संतांच्या वागण्यात असतो.

महाराजांनी ज्याला आपले म्हटले त्याला ते खासच वाटेत वाटेल तेथे भिरभिरत सोडून देणार नाहीत असा केवळ विश्वासच आहे असे नाही तर तशी खात्रीच आहे.

## २७ मार्च

जगातील व्यवहाराचे बाबतीत संतांची फारशी आस्था नसते. याउलट आमची व्यवहारात आस्था असते आणि परमार्थाबद्दल आस्था नसते. याचा अर्थ असा की व्यवहाराचे संबंधात संतांची जेवढी अनास्था असते तेवढीच आमची अनास्था परमार्थाबद्दल असते.

सद्गुरूंनी सांगितले, "अरे शिष्या, तुला वेळ होत नसेल तर दररोज निदान पाच मिनिटे तरी साधनाला बसत जा." त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ आपण लक्षात घेत नाही. आम्ही त्यातील फक्त पाच मिनिटे एवढेच घेतो आणि मग पाच मिनिटांच्या वर एक सेकंदसुद्धा उलटू न देता आम्ही साधनातून उठतो. अशी आहे आमची साधनाच्या अभ्यासाविषयी आस्था ! अशाने परमार्थ कसा साधेल? साधनाला वेळेची मर्यादा नाही.

असे ठरले आहे काय की बालपण संपले की सद्गुरूंची गाठ पडून त्यांचा अनुग्रह मिळणार; तरुणपण संपले की गुरूंची कृपा होणार; म्हातारपण सुरू झाले की चित्त स्थिर होऊन, साधनातील अनुभव येणार, आणि मरायची वेळ आली की पूर्णत्व प्राप्त होऊन आत्म्याची प्रचीति येणार! असे रेघ मारल्यासारखे असते तर माणसाला परमार्थाची काळजी करण्याचे काहीच कारण नव्हते. पण दुर्दैवाने तसे नाही. हे लक्षात घेऊन आपण परमार्थाविषयीची बेफिकिरी सोडावयास हवी.

## २८ मार्च

पाण्यावरील लहरी गोल. मनाच्या लहरी गोल. अणु गोल, रक्तातील पेशी गोल. असे का ? कारण मूळची वस्तु गोल आहे. ती वस्तु परिपूर्ण असल्याने ती गोल आहे.

आमची तऱ्हा अशी आहे :- आम्ही तोंडाने म्हणतो परमार्थ खरा आहे. त्यासाठी काहीतरी करावयास हवे. आपण करतो काय? आपण जीव टाकतो तो परमार्थ न करता लौकिक व्यवहारातील घोळ घालण्यात.

नाम हे नादरुपाने चोवीस तास प्रत्येकाच्या शरीरात स्फुरत आहे. पण आमचे तिकडे लक्ष असेल तर ते ऐकू येणार ना !

लग्नाची वरात निघाली आहे. बँड जोरात वाजत असतो. वधू-वरांच्या गाडीच्या मागे बायकापुरुष चालत असतात. फटाके वाजत असतात.रोषणाई असते. इतके सर्व असूनसुद्धा नवरानवरीचा लक्ष्मीनारायणाचा जोडा आपापसात बोलत असतो आणि त्यांचे त्यांना ऐकू येत असते. तसे परमार्थामध्ये व्हावयास हवे. चैतन्य हा आपला विषय होऊन त्याचा ध्वनि ऐकायला यायला पाहिजे. पण दुर्दैव असे की चैतन्य हा आमचा विषय नसल्याने, चैतन्याचा नाद आपणास ऐकू येत नाही.

कासवीच्या केवळ नजरेने तिच्या पिलांची वाढ होते. धामीण आणि म्हैस यांची दृष्टादृष्ट झाली तर म्हैस मरून पडते.संतांच्या दृष्टीला आपली दृष्टि लागली तर 'नवलच' घडते. दृष्टीचे सामर्थ्य असे आहे.

## २९ मार्च

काळाचा प्रवाह पुढे पुढे चालला आहे. फार मोठे फरक घडत आहेत. 'मातृ – देवो भव, पितृ – देवो भव, आचार्य – देवो भव,अतिथि – देवो भव,' ही श्रुतीच्या वचनातील शिकवण आता कालमानाने मागेच पडत चालली आहे. दिवसेंदिवस इतके विचित्र दिवस येत आहेत की त्यात परमार्थ साधायचा ही गोष्ट खरेच फार कठिण बनत चालली आहे.

आपल्याला जर आत्म्याचा अनुभव घ्यायचा असेल तर बाहेरचे दृश्य, देह, कल्पना, संकल्पविकल्प हे सर्व काही बाजूला व्हावयास हवे.

प्रथम सर्व जीव या संसारात बद्धच असतात. त्रिविध तापाने पोळल्यावर काही माणसांना बंधनातून सुटून मोक्ष मिळविण्याची इच्छा होते. ते मुमुक्षु होतात. त्यातील काही मुमुक्षूंची सद्गुरूशी गाठ पडते आणि त्यांना सद्गुरूंचा अनुग्रह होऊन बंधनातून सुटण्याचे साधन त्यांना कळते. मग साधन करू लागल्यावर ते साधक होतात. अशा साधकांपैकी जे कोणी चिकाटीने साधन पूर्ण करतात ते जीवन्मुक्त होऊन सिद्ध होतात.

नाना प्रकारची साधने या जगात आहेत. त्यांचा उपयोग चांगल्यासाठी करावयाचा की वाईटासाठी हे करणाऱ्याच्या मर्जीवर अवलंबून असते. उदा. आगपेटी आहे. तिच्यातील काडीचा उपयोग करून अग्नि पेटवून स्वयंपाक करावयाचा की घर पेटवून द्यावयाचे हे ज्याचे त्यानेच ठरवावयास हवे.

## ३० मार्च

आपण असे ऐकतो की 'हे हजाराचे बुवा,' हे 'दहा हजाराचे बुवा,' हे 'लाखाचे बुवा'.याचा अर्थ असा की हे बुवा कीर्तनप्रवचन करण्यास पैसे मागतात, आणि त्या प्रमाणात त्या बुवांनी आपली इस्टेट केली आहे.

भाविकांचे एक मंडळ एका कीर्तनकाराकडे कीर्तन करण्याची विनंति करण्यास गेले. बुवांनी पाचशे रुपये बिदागी मागितली. बिदागी थोडी कमी करावी अशी विनंती कार्यकर्त्यांनी केली. कीर्तनकाराने बिदागी कमी करण्यास नकार दिला. तेव्हा एक कार्यकर्ता पुढे झाला आणि त्याने पाचशे रुपये देण्याचे कबूल केले. बुवा खूष झाले. यथावकाश बुवांनी कीर्तन सुरू केले. तो कार्यकर्ता कीर्तनसमयी लोडाला टेकून पाय पसरून धूम्रपान करू लागला. बुवांनी त्याचेवर ताशेरे झाडण्यास सुरुवात केली. तेव्हा तो बुवांना म्हणाला "हे बघा बुवा, तुमच्या कीर्तनासाठी पाचशे रुपयांची बिदागी दिली आहे. तेव्हा आता तुम्ही तीन तास फक्त कीर्तन करायचे आणि पैसे घेऊन निघून जायचे. संपले तुमचे काम.!"

कीर्तनकाराने 'तट्टा वृषभासी दाणा । कदा मागू नये जाणा' असे पथ्य सांगितलेले आहे. आणखीही काही निर्बंध आहेत. पण सध्या कीर्तनकाराला या ओळीतील पथ्य तेवढे पाळता येते. याचे कारण असे की आता तट्टाही नाही आणि वृषभही गेला. आता टॅक्सी, रिक्षा इत्यादि वाहने आली आहेत.

## ३१ मार्च

माणसाचा स्वभाव मोठा गंमतीदार आहे. त्याला कितीही गडगंज असले अथवा मिळाले तरी तो आणखी मिळविण्याच्या मागे लागलेला असतो. त्याची हाव संपत नाही.

आमचे असे आहे :–लोकांनी आम्हाला परमार्थी म्हणावे म्हणजे झाले. आम्हाला पारमार्थिक समाधान आहे की नाही याची पर्वा आम्हाला नाही. आम्ही परमार्थी आहो असे लोकांनी म्हणावे अशी अपेक्षा असेल तर आमचा तो वृथा अभिमान आहे.

अनेकदा असे होते :– माणसाच्या जीवनात वैराग्य प्राप्त होण्यास योग्य अशी परिस्थिति उत्पन्न होते. असे झाले तरी माणूस वैराग्याकडे वळत नाही. उलट वैराग्यापासून परावृत्त होण्यासाठी तो धडपडत रहातो.

साधुसंतांच्या डोळ्यापुढे सतत नामच असते. त्या कारणाने संतांना इतर गोष्टींचा विचारसुद्धा करायला वेळ नसतो. त्यांच्याजवळ नामाशिवाय अन्य गोष्टीला स्थान नसते आणि महत्त्वही नसते. याचे उलट आपली स्थिति असते. आपण आपल्या सवडीनुसार कधीतरी नाम घेतो; बहुधा आपण घेतच नाही. साधुसंत नामस्मरण करतात म्हणून त्यांना परमार्थातले विविध प्रकारचे अनुभव येतात. आम्ही कधीतरी नाम घेतो, आम्हाला काहीही अनुभव येत नाही. याचे कारण नामाचे जोडीने आमच्या पुढे अनेक विषय आहेत आणि नाम हा त्यांतलाच एक विषय आहे. केवळ नाम हा आमचा विषय नसतो. त्यामुळे संतांप्रमाणे आम्हाला अनुभव येत नाहीत.

## १ एप्रिल

भारतात जे अनेक पारमार्थिक संप्रदाय आहेत त्यांमध्ये चिमड संप्रदाय हा एक आहे. तो निंबरगीकरमहाराजांनी प्रवर्तित केला आणि चिमडमहाराज इत्यादींनी वृद्धिंगत केला. या संप्रदायात परमेश्वरप्राप्तीचे जे साधन आहे त्याला सहज साधन असे म्हटले जाते. या संप्रदायात अमुक असा मंत्र नाही अथवा अमुक नामाचे स्मरण असेही नाही. कारण या साधनात नामाचा उच्चार नाही तर नामाचा जो ध्वनि किंवा नाद शरीरात उमटत आहे तो स्वस्थपणे ऐकणे, इतकेच कार्य साधकाने करावयाचे आहे.

शरीरात जी नामाची गति अखंडपणे चालू आहे ती सद्‌गुरु दाखवून देतात. ती गति खाली आणि वर अशी होत असते. तिच्यावर साधकाने आपले सर्व लक्ष केंद्रित करावयाचे असते. म्हणजे असे :– जी गती खाली आणि वर होत आहे तिच्यावर दृष्टि/डोळे आणि कान हे एकवटून लावावयाचे आहेत.त्या गतीत श्रवण आणि दर्शन हे दोन्हीही एकदम व्हावयास हवेत. त्या गतीवर दृष्टीचा मारा व्हावयास हवा. या साधनात स्वतंत्रपणे एकादे नाम उच्चारावयाचे आहे असे नाही. ही गोष्ट बोलताना अगर सांगताना जितके सोपे वाटते तितकेच ते साधणे हे अवघड आहे.

## २ एप्रिल

जी गति खाली आणि वर होत आहे तिच्यामध्ये साधकाने स्वत:च्या प्रयत्नाने अथवा शहाणपणाने कोणताही फेरबदल करावयाचा नाही, हे महत्त्वाचे आहे.

साधन करताना विशिष्ट प्रकारचे आसन साधकाने घालावे असे कोणतेही बंधन नाही. हे साधन बैठक/आसन घालून करता येते तसेच निजल्या निजल्यासुद्धा करता येते. साधन करताना शरीराची विशिष्ट स्थिति हवीच अशी अपेक्षा नाही. देहाची स्थिति कोणतीही असली तरी हे साधन करता येते. समजा, साधन करताना झोप लागली तरी साधन करीतच आपण जागे होतो.

या सहजसाधनात अदृश्य अशा गतीवर दृष्टि ठेवणे हे प्रथम प्रथम अवघड जाते. म्हणून या साधनात सुरुवातीला प्रवेश होणे हेच जरा कठिण जाते. परंतु दृष्टि ठेवण्याच्या प्रयत्नात जसजसा अधिकाधिक काळ जाईल तसतसे ही दृष्टि ठेवणे जमू लागते. आणि एकदा का हे साधन जमू लागले की मग साधनमार्गावर भराभर वाटचाल होते आणि ही वाटचालसुद्धा आपोआप होते.

गतीवर लक्ष ठेवल्याने स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण या जीवाच्या देहांच्या उपाधीचा निरास होतो आणि जीवाला स्वत:चे मूळ स्वरूप म्हणजे आत्मस्वरूप प्राप्त होते. सहजसाधनाने स्व-रूप-सिद्धि/आत्मसाक्षात्कार होतो.

## ३ एप्रिल

कुत्र्यामांजराप्रमाणे आपला जन्म हा केवळ भोग भोगण्यासाठी झालेला नाही तर या जन्मात आपण आत्म्याची अनुभूति प्राप्त करून घ्यावी हा आपल्या जन्माचा उद्देश आहे. आपले आयुष्य हे काय केवळ मजेसाठी आहे? आपल्या आयुष्याचा उद्देश आपण लक्षात घ्यावयास नको काय? या बाबतीत आपण सावध होण्याची नितांत गरज आहे.

व्यवहारात आपण अगदी पिळाने, जिद्दीने वागतो. एकादी गोष्ट करायची म्हणजे करायची या बाण्याने आपण प्रपंचात वागतो. पण हाच पीळ, हीच जिद्द परमार्थ करताना आपल्याजवळ का असू नये?

जन्माला आल्यापासूनच मरणाकडे जाण्याचे घटकापात्र सुरू झाले आहे. क्षणाक्षणाने आपली मरणाकडे वाटचाल चालू झालेली आहे. परंतु हे कुणाच्या लक्षात येते का? वाढदिवस कसले साजरे करायचे?

निवांतपणाने रहाणे यासारखी दुसरी तपश्चर्या नाही. जीव निवांत झाला की त्याला आत्म्याचा साक्षात्कार होतो. आणि आत्मसाक्षात्कार झाल्यावर जीव कायमचा निवांत होतो. आत्मसाक्षात्काराने बुद्धि निवांत होऊन ती स्थिर झाली की सततचा निवांतपणा येतो.

एकादे पुस्तक कागद, छपाई इत्यादीमुळे चांगले दिसते पण त्यात जर नामाची निंदा असेल तर ते पुस्तक कचरापेटीत टाकावे असे आमचे मामा म्हणत.

## ४ एप्रिल

परमार्थाला जे जे पूरक आहे ते ते सर्व माणूस करतो. नामाचे, पठणाचे सप्ते करतो, ग्रंथांची पारायणे करतो, भंडारा करतो; परंतु परमार्थाला आवश्यक असे जे नामस्मरण आहे तिकडे मात्र तो दुर्लक्ष करतो. त्याला नाम नकोसे वाटते.

तीर्थयात्रा करणाऱ्या लोकांनी थोडी लबाडी केली आहे :- तीर्थयात्रा पूर्ण करून आल्यानंतर ते 'मावंद' करतात. पण मावंदचा अर्थ त्यांना माहीत नसतो. मावंदाचा एक अर्थ आहे की तीर्थयात्रेबद्दल 'मा वद' म्हणजे काही बोलू नको. पण हे लोक सभारंभपूर्वक मावंद करतात. मावंदचा दुसरा अर्थ असा आहे की तीर्थयात्रा करून आल्यावर काहीतरी सोडायचे आहे. हे लोक न आवडणारी कारल्याची भाजी सोडतात.

वधूवरांचे लग्न लागल्यानंतर 'वाजंत्रे बहु गलबला न करणे' असे शास्त्र आहे पण आपण मात्र वाजंत्र्यांना 'वाजवा रे वाजवा' असे ओरडून सांगतो. शास्त्र आणि रूढि यात इतका फरक पडला आहे.

कथा शब्दाला अनेक अर्थ आहेत. (१) कथा म्हणजे आत्मवस्तु. (२) कथा म्हणजे कीर्तन. (३) कथा म्हणजे त्रिवेणीसंगम (कथा त्रिवेणीसंगम). (४) कथा म्हणजे देवाचे ध्यान (तुका म्हणे कथा देवाचे ते ध्यान). (५) नाम ही कथाच आहे. (६) कथा म्हणजे जीवन. म्हणून कथा आटपणे म्हणजे मरून जाणे असा अर्थ आहे.

## ५ एप्रिल

परमेश्वर हा प्रत्येक माणसाच्या आयुष्यात केव्हा ना केव्हातरी पुढे येऊन उभा रहातो. त्याला ओळखता आले पाहिजे. नाहीतर आपलेच नुकसान आहे. एक भिक्षेकरी होता. त्याच्या पुढे देव एका भिकाऱ्याच्या रूपात आला आणि मला 'काहीतरी दे' असे म्हणू लागला. तो देव त्या भिक्षेकऱ्याला ओळखता आला नाही. भिक्षेत मिळालेल्या तांदळातला एक तांदूळ त्याने दिला. तो घेऊन परमेश्वर अदृश्य झाला. भिक्षेकरी घरी आला. त्याने झोळी बायकोकडे दिली. तिने झोळीतून तांदूळ बाहेर काढले. तिला आढळले की तांदळात एक तांदूळ सोन्याचा आहे. तिने तसे नवऱ्याला सांगितले. मग भिक्षेकऱ्याच्या लक्षात सर्व प्रकार आला. पण त्यावेळी काय उपयोग होता?

आपल्या देहात देव आहे. परंतु त्या देवाला विसरून, देहाला महत्त्व देऊन व देहाला धरून आमचे आयुष्य चालले आहे. आमचे देवाकडे लक्ष नाही इथेच सारे बिघडले आहे.

आम्हाला प्रपंचात चूकभूल चालत नाही. आम्हाला व्यवहार हा चोख हवा असतो. परंतु परमार्थात मात्र आमची टाळाटाळ चालू असते. उपासना व्यवस्थित झाली नाही म्हणून खिशातले पाच रुपये गेले असते, तर मात्र आमचा परमार्थ चोख झाला असता.

अणूपेक्षा लहान आणि आकाशापेक्षा मोठा असणारा आत्मा हा सगुण आणि निर्गुण या दोन्ही रूपांत प्रचीतीला येतो.

## ६ एप्रिल

मनामध्ये येणारे विचार हे पवनावर म्हणजे श्वासोच्छ्वासावर अवलंबून आहेत. शरीरात आत बाहेर करणारा हा जो पवन आहे त्यात जर मन विरून गेले तर मग आत्म्याचा अनुभव येतो.

आमच्या शरीरात जोपर्यंत चैतन्याचे वारे खेळत आहे तोपर्यंत आपण जिवंत असतो. हे चैतन्याचे वारे देहाबाहेर पडले की बाहेरचे जड वारे शरीरात शिरते. मग त्या अचेतन देहाची विल्हेवाट आपण लावतो नाहीतर निसर्ग लावतो. गुरूचा अनुग्रह घेऊन अनेक वर्षे लोटली तरी काहींना अनुभव येत नाही. याचे कारण त्यांची साधनात दृढ बुद्धि होतच नाही. ध्येय निश्चित झाल्याविना दृढ बुद्धि होत नाही आणि दृढ बुद्धि झाल्याशिवाय अनुभव येत नाही.

निसर्गत: जी झोप येते त्या झोपेत जीव देहापासून बाजूला होतो, त्याला देहाचा विसर पडतो, त्याला जग दिसत नाही; पण झोपेत आनंद असतो. आता साधनाने आणि गुरुकृपेने जीव जर ज्ञानावस्थेत देहापासून बाजूला झाला, तर त्याला किती सुख असेल बरे?

कुणीतरी कशाचेतरी एकादे मॉडेल बनवितो. मॉडेल बनविणारा मॉडेलपेक्षा वेगळा असतो. विश्व हे एक असेच मॉडेल आहे आणि ते बनविणारा परमेश्वर विश्वापेक्षा वेगळा आहे.

## ७ एप्रिल

दृश्य विश्व हे चैतन्याचा खेळ आहे. चैतन्य म्हणजे स्पंदन, आणि या स्पंदनामुळे विश्वाचा पसारा दिसू लागला. चैतन्य म्हणजेच आत्मा अथवा परमात्मा किंवा ब्रह्म. हा आत्मा सर्व दृश्य विश्वात भरून राहिलेला आहे. असे असूनही आपणास दिसते ते फक्त दृश्य; दृश्याचे आड दडलेला आत्मा मात्र आपणांस दिसत नाही अथवा कळत नाही. कारण तो दृश्याखाली लपलेला आहे.

जरी आत्मा विश्वात सगळीकडे भरलेला आहे, जरी आत्म्यामुळेच दृश्य विश्व दिसत असते, तरी आत्मा हा जडापेक्षा, दृश्यापेक्षा, जड शरीराचे पेक्षा वेगळाच आहे. प्रत्येक वस्तूला अस्तित्व आहे, असे आपण म्हणतो. हे अस्तित्व म्हणजेच आत्मा आहे. म्हणूनच आत्मा नाही अशी जागा या जगात कुठेच सापडणार नाही. परमात्मा सर्व वस्तूंमध्ये ओतप्रोत भरलेला आहे, तो सर्व ठिकाणी आहे, परंतु तो कशातही सापडलेला नाही.

दृश्य विश्व हे कधीतरी प्रगट होते, आणि केव्हातरी नष्ट होऊन जाते. आत्मा मात्र 'गुप्त ना प्रगट' असा आहे. सामान्य माणसांच्या दृष्टीने आत्मा गुप्त ,न दिसणारा आहे. तर जे आत्मसाक्षात्कारी पुरुष आहेत त्यांना तो प्रगट आहे. दृश्य विश्वाला स्थळकाळाच्या मर्यादा आहेत. तशा आत्म्याला मर्यादा नाहीत. आत्मा हा दिक्कालातीत आहे.

## ८ एप्रिल

दृश्य विश्वाचे वर्णन शब्दांनी करता येते. आत्मा हा दृश्यापलीकडे, शब्दांनी वर्णन करता न येण्यासारखा असल्याने, तो नि:शब्द आहे.

दृश्याचा अनुभव शब्दांत सांगता येतो. आत्मा नि:शब्द असल्याने त्याचा अनुभव शब्दांनी सांगता येत नाही. सांगितला तरी तो अपुराच रहातो.

दृश्य विश्वात सर्व गुणांनी संपन्न असे काहीही नाही. याउलट आत्मा हा सर्व गुण संपन्न आहे.

आत्मा हा 'रसानां रस:' आहे. तो असताना पदार्थ स-रस वाटतात; तो गेला की ते नीरस होतात. शरीरातून आत्मा बाहेर गेला की शरीराची टवटवी, तजेला नष्ट होऊन तो चिपाड होऊन पडतो.

एकादी दृश्य वस्तु –उदा. हत्ती – पाहिली तर आपण काही ती वस्तु होऊन जात नाही. फक्त परमात्मा हा एकच असा आहे की त्याला पाहणारा परमात्माच होऊन जातो.

पंचमहाभूते चंचल आहेत. पंचमहाभूतांनी बनलेले पदार्थ, शरीर, तसेच मन, बुद्धि इत्यादि सर्व काही चंचल आहे. केवळ आत्मा मात्र निश्चळ आहे.

अशा प्रकारे आत्मा हा जरी या दृश्य विश्वात आहे तरी तो त्याच्यापेक्षा वेगळाच आहे.

## १ एप्रिल

सुषुप्ति अवस्थेत अज्ञान असते. त्यावेळी देहाची जाणीव, देहभाव असतो का? झोपेत अंगावरून साप गेला तरी भीती वाटत नाही. कोणी पैशाची पुंजी जवळ आणून ठेवली तरी आनंद वाटत नाही. जीव हा झोपेत सुखदु:खाच्या पलीकडे जातो की नाही? तेव्हा देह असतो पण जीव त्या देहापासून बाजूला गेलेला असतो. झोपेत देहभाव हा काही प्रमाणात का होईना सुटलेला असतो, तरी झोपेत समाधान असते. आता, झोपेतील अज्ञानावस्थेत देहापासून सुटल्यावर जर इतके सुखसमाधान आहे तर ज्ञानावस्थेत देहापासून दूर झाल्यावर सुख असणार नाही काय? ज्ञानावस्थेत देहाची जाणीव सुटल्यावर मनाचे उन्मन होऊन ब्रह्मानंद होतो.

प्रारब्धाचे भांडवल घेऊन जीव आला आहे. प्रारब्धाप्रमाणे त्याचे भोग ठरलेले असतात. कोणी गृहस्थाश्रमी होतो, कोणी ब्रह्मचारी होतो, कोणी संन्यासी होतो, तर कोणी भिकारी होतो. हे सर्व काही आपापल्या प्रारब्धाला धरून घडत असते. प्रारब्ध कुणालाच चुकलेले नाही.

आत्माराम हा मानवी शरीराचे आतही आहे आणि बाहेरही आहे. आतबाहेर आत्माराम कसा आहे याची प्रचीति ही, वायुरूप आपले जीवन स्थिर होऊन ऊर्ध्वगामी झाले म्हणजे, आपोआप येते.

प्रपंचात काय किंवा परमार्थात काय चित्त हे सहायभूत असेल तरच दोहोंचा कार्यभाग होतो.

मन हे संकल्पविकल्प – रहित झाले की त्यालाच मनाची मोकळी वृत्ति म्हणतात. ही मोकळी वृत्ति रहाण्यासाठी जे शरीरात अखंड निरंतर आहे त्याच्यावर दृष्टि ठेवून तेथे लक्ष केंद्रीभूत व्हावयास हवे.

आमच्या शरीरात जे वारे आतबाहेर करते आहे ते संथ झाले की मन हे संथ होते. हे वारे संथ होत नसेल तर मन कधीही संथ होणार नाही. ज्या प्रमाणात त्या वाऱ्याची स्थिरता अथवा अस्थिरता असेल, त्या प्रमाणात मनाची स्थिरता किंवा चंचलताही अवलंबून असते.

शरीरातील त्रिकूट स्थानात चैतन्याचा जो आविष्कार अनुभवाला येतो ती खरी परमार्थातील गंगा आहे. तिच्यात संतसज्जन स्नान करीत असतात.

जेव्हा देहाचा विसर पडून चैतन्याचा अनुभव येऊ लागतो, तेव्हा जो आनंद होतो तोच ब्रह्मानंद होय. ब्रह्मानंद हा सर्वश्रेष्ठ आनंद आहे.

शरीरातील आधारस्थानापासून ते थेट सहस्रदलापर्यंत जो 'स्व' चा धर्म आहे तो आचरला गेला तर माणसाला आत्मसाक्षात्कार होतो.

साक्षात्कार झालेले सर्व संत हे सारखेच असतात. ते देहाने वेगळे असले तरी ते स्वरूपाने समानच असतात. एक संत श्रेष्ठ दुसरा कनिष्ठ असे म्हणू नये. एम.ए. डिग्रीपर्यंत क्लासची वर्गवारी असते. परंतु पी.एच.डी.ला क्लास नसतो.

## ११ एप्रिल

परमार्थी माणसाला नावे ठेवायला लोक टपलेलेच असतात. समजा परमार्थी माणूस एकादे वेळेस संतापला तर लोक लगेच म्हणतात की याने बारा वर्षे परमार्थ केला पण याचा राग अजून गेला नाही. परमार्थी माणसाने कोणापुढे हात पसरता कामा नये, भीक मागता कामा नये, असे लोकांचे मत असते.

परमार्थात शरीर म्हणजे असून अडचण नसून खोळंबा असे आहे. शरीराशिवाय नुसते चैतन्य राहू शकत नाही. तथापि शरीराद्वारे चैतन्य अनुभवता येत नाही. बरे, शरीर टाकले तर चैतन्य निघून जाते. नागाच्या तोंडातला लाल मणि नागाला मारून मिळवावयाचा नसतो तर पुंगी वाजवून नागाला गुंगवून ठेऊन लाल मणि घ्यावा लागतो. तसे देह असतानाच, त्या देहाला बाजूला सारून, चैतन्याचा अनुभव घ्यावयाचा असतो.

ज्याचा अख्खा जन्म विविधते (Variety) मध्ये गेला व त्यातून सुख घेण्यात गेला, त्याला आत्मसुखाची गोडी वाटणार नाही. कारण आत्मानुभूतीमध्ये जे सुख आहे ते व्यावहारिक सुखात नाही आणि जे सुख व्यवहारात आहे ते आत्मानुभूतीत नाही. व्यावहारिक सुखात 'भेळ' असते. आत्मसुखात भेळ नसल्याने ते निर्भेळ आहे. व्यावहारिक सुखात जे वैचित्र्य आढळते ते आत्मसुखात नाही.

## १२ एप्रिल

परमात्म्याने जीवाला अमोलिक आयुष्य दिले आहे. त्याचा उपयोग करून माणसाने ईश्वराचा साक्षात्कार करून घ्यावयाचा आहे. तसे न झाल्यास, 'खुळ्याच्या हातात दिली कोलती। खुळा फिरवी घरावरती' असा प्रकार व्हावयाचा. मुलगा व्यवस्थित शिकून मोठा व्हावा म्हणून आईबाप मुलाला परगावी पाठवितात व त्याला पैसे पाठवितात पण मुलाने न शिकता जर पैसे चैन करण्यात उधळले तर आईवडिलांचा हेतु सफळ होत नाही.

चैतन्याच्या अधिष्ठानावर जन्म आहे. मूल जन्माला आले पण त्यात चैतन्य नसेल तर मूल जन्मले असे म्हणता येईल का? चैतन्यामुळे जन्माला अर्थ आहे. जन्म झाल्यावर असे होते :- माणसाला शरीराच्या हालचालीची जाणीव होऊ लागते आणि चैतन्याची विस्मृति होते. आणि अशी चैतन्याची विस्मृति झाली की जन्म आणि आयुष्य हे सर्व दु:खमय होतात.

आपण जे जे काही करतो त्याचे मनावर संस्कार होतात आणि मनाची बैठक तयार होते. शरीर नष्ट झाले तरी मन नष्ट होत नाही. मेल्यानंतर मन हे वासना/संस्कार घेऊन बाहेर पडते आणि त्यानंतर मग मनाच्या त्या बैठकीवर माणसाला पुढला जन्म प्राप्त होतो.

ग्रह, नक्षत्रे, प्रकाश, वायु, मन, आकाशगंगा, विश्व हे सारे काही चंचळ आहे. निश्चळ आहे तो फक्त आत्मा. आणि हा निश्चळ आत्मा जाणून घेण्यास आपणास निश्चळ व्हावे लागते.

## १३ एप्रिल

चंचळाचा निरास झाला तर निश्चळता येते. चंचळानेच चंचळाचा निरास करावयाचा आहे. आपण रानात गेलो असता पायात मोडलेला काटा दुसऱ्या काट्याने काढून टाकतो, मग दोन्हीही काटे फेकून देतो. त्याप्रमाणे एका चंचळाने दुसऱ्या चंचळाचा निरास झाला की दोन्ही चंचळे संपतात आणि निश्चळता प्राप्त होते.

आमची इच्छा आणि संतांची इच्छा यात फार फरक आहे. आपली इच्छा ही घर, दार, बायका, मुले, पैसाअडका इत्यादींचे बाबतीत असते. संतांची इच्छा एकच असते ती म्हणजे 'मोक्षो मे भूयात्' मला मोक्ष मिळावा. मोक्षाविषयीची ही संतांची इच्छा आपल्या इच्छेप्रमाणे बंधनात पाडणारी नसते.

सर्व काही वारे आहे. हे वारे म्हणजे चैतन्याचे वारे आहे. देव हा वारे, अहंकार हा वारे, भक्त हा वारे, उपासना वाऱ्याची आणि वाऱ्यानेच चैतन्याच्या वाऱ्याची प्रचीति अथवा साक्षात्कार. वारे हे अनंतरूपाने नटले आहे.

शरीरात चैतन्याचे वारे खेळते आहे तोपर्यंत शरीराला किंमत आहे. ते निघून गेले की त्या शरीराची किंमत शून्य आहे. जेव्हा चैतन्याचे वारे शरीराबाहेर जाते, तेव्हा बाहेरचे जड वारे शरीरात शिरते आणि हे जड वारे शरीरात शिरले की मग शरीराचे विघटन सुरू होते.

लज्जा, चिंता आणि आशा या सर्वांना बाजूला सारून भावबळाने केशवाला – देवाला – आळवायचे आहे.

## १४ एप्रिल

आपल्यासाठी कोण काय करतो हे आपण जसे पहातो, तसे ते देवही पहात असतो. माणूस देवाला नवस करतो. 'पाचशे एकर जमीन वादातून सुटली तर पाच रुपयांची खडीसाखर वाटेन.' असा नवस करणाऱ्याची लबाडी देवाला काय समजत नाही? असला नवस ही देवाची भक्ति नव्हे, कारण ही भक्ति शेत मिळावे म्हणून आहे. देवासाठीच देवाची भक्ति ही महत्त्वाची आहे. संतांनी देवासाठी भक्ति केली म्हणून ते देवरूप झाले.

आपल्या जीवनात शाश्वती, स्थिरता, स्वस्थता, निश्चिति नसेल तर त्या जीवनात काय अर्थ आहे? ज्या चैतन्यामुळे या सर्व गोष्टी मिळणार आहेत त्याची जाणीव सतत व्हायला पाहिजे. चैतन्याकार होणे हे सुख-समाधानाचे खरे स्वरूप आहे.

परमात्म्याची कृपा असेल तरच आपणास संत भेटतात. आणि आपण संतांची कृपा संपादन केली तर आपणास परमात्मा भेटतो.

वासना म्हणजे काय? (१) दुसऱ्याची वस्तु आपल्याला मिळायला पाहिजे ही भावना म्हणजे वासना. (२) आपल्याजवळ नसणारी वस्तु पाहिजे असणे ही वासना. (३) जे घरात मिळत नाही ते पाहिजे असणे म्हणजे वासना. वासना संपली की मन शुद्ध होते.

जे चैतन्य जगाला नको आहे, त्या चैतन्याशी जे एकरूप झाले तेच संत म्हणून या जगात मशहूर झाले.

## १५ एप्रिल

आत्मसाक्षात्कार होण्यासाठी गुरु-कथित साधनाचा आचार व्हावयास हवा. पण साधन होण्यास आपली उत्कट इच्छा हवी. साधन करण्यात धरसोड उपयोगी नाही. नित्याच्या साधनात खंड पडता कामा नये. साधन करण्याची आपल्या मनाची तयारी तसेच ते करण्याचा निश्चय हवा.

नुसते 'मी करीन' या अहंकार वृत्तीने साधन जमत नाही. कारण साधन हे हट्टाने करावयाचे नसते. ज्या गोष्टी हट्टाने करावयाच्या असतात त्या 'मी करीन' म्हणून कदाचित जमतील. परंतु साधनाचे तसे नाही. अहंकार बाजूला सारून साधन हे साधावयाचे असते. त्यामुळे 'मी साधन करतो किंवा करीत आहे' ही जाणीवसुद्धा संपुष्टात यावयास हवी.

खरे म्हणजे साधन हे 'सिद्‌ध'च आहे. तेथे आपण 'सिद्‌ध' झालो की साधन जमू लागते. आपण स्वस्थ बसलो की साधन सुरू होते. 'मेल्यावर साधन सुरू होते' असे म्हटले जाते. या वाक्याचा अर्थ शारीरिक मरण घडल्यावर साधन होते असा मात्र नाही. या वाक्याचा अर्थ असा आहे :- देहापासून दूर होणे, अहंकाररहित होणे म्हणजे तांत्रिक दृष्ट्या किंवा परमार्थदृष्ट्या मरणच आहे. असे मेल्यावर म्हणजे अहंकाररहित झाल्यावर साधन सुरू होते असा अर्थ आहे.

## १६ एप्रिल

आपल्यासमोर देव आहे आणि देवासमोर आपण आहोत, अशी भूमिका बाळगून साधन व्हावयास हवे. आणि म्हणून देवाला/आत्म्याला/चैतन्याला आवाहन करून साधनास बसावे.

साधन हे नित्य दररोज करावयास हवे. साधन करणे नैमित्तिक नाही. या साधनाच्या नियमाला आणि अभ्यासाला सुट्टी नाही. कारण साधनात मध्ये खंड पडला की पूर्वी केलेले साधन वाया जाते. तेव्हा साधनात एकादे दिवशी लक्ष लागले नाही तरी साधनात खंड पाडू नये.एक दिवस साधन राहून गेले तर दुसरे दिवशी होईल अशी खात्री देता येत नाही.

साधन जमण्यास गुरुकृपा आवश्यक आहे. गुरुकृपा ही साधन करवून घेते. आपल्या प्रयत्नाच्या जोडीला गुरुकृपा आपल्यावर असेल तर साधन जमते. केवळ गुरुकृपेने साधन होणे हा अपवाद आहे, तो नियम नाही. नियम असा आहे की जो साधन प्रयत्नपूर्वक करील त्याचेवर कृपा होईल. म्हणून संतसज्जन हे नामस्मरण करा, नामाचे साधन करा असे अट्टाहासाने आपल्या कानीकपाळी ओरडून सांगत असतात.

एक लक्षात घ्यावे. साधन सुरू केले की लगेच परमार्थातील अनुभव येत नाहीत. अनुभव नाही म्हणून साधन करायचे नाही असे होता कामा नये. तर साधन हे चिकाटीने करीत रहावयास हवे.

## १७ एप्रिल

देव उघडा आहे,त्याचा मंत्र उघडा आहे, आणि त्याचेकडे जाण्याचा मार्गही उघडा आहे. उघडा म्हणजे कोणतीही उपाधि नसणारा. साहजिकच साधकही उघडा म्हणजे निरुपाधिक हवा. ज्या साधकाच्या देहबुद्धीचा लय होऊन दृश्याचा निरास झाला आहे, तो साधक उघडा.

आपली माणसे आपली असूनसुद्धा त्याना 'आपलेसे' करून घ्यावे लागते. म्हणून 'मध्ये असणारा दुरावा बाजूस सारून आपली माणसे आपली करून घ्या.'असा सल्ला आपण वेळप्रसंगी एकमेकांना देतो. देवाचे बाबतीत असेच आहे. देव आपलाच आहे. पण त्याला आपण ओळखू शकत नाही. जर देवाची ओळख आपल्याला पटेल, तरच 'देव आपला' झाला असे म्हणता येते.

सूर्याभोवती त्याची ग्रहमाला फिरते. परमाणूभोवती अणु फिरतात. त्याप्रमाणे हे संपूर्ण विश्व एका आत्म्याभोवती फिरत आहे.

मोटारींच्या बॉड्या अनेक प्रकारच्या असतात. पण मोटारीला गति दणारी शक्ति प्रत्येक मोटारीत एकच असते. त्याप्रमाणे ही शरीरे भिन्न भिन्न असली तरी त्यांना चालवणारा आत्मा एकच आहे. माणसाच्या प्रकृति जरी भिन्न असल्या व त्यांचे वैचित्र्य असले आणि त्यांचे गुणधर्म वेगवेगळे असले तरी सर्वांचे ठिकाणी आत्मा हा एकच आहे.

ममतेने स्वार्थ येतो. स्वार्थाने 'माझे- तुझे' येते. 'माझे तुझे' आले की त्यातून काम आणि क्रोध निर्माण होतात.

## १८ एप्रिल

मनाच्या विरुद्ध गोष्टी घडत असून जर मनाचा तोल सुटला नाही तर त्या माणसाने शांति मिळविली आहे असे म्हणता येईल. मनाविरुद्ध होत असताना शांति टिकून रहाणे हीच शांतीची परीक्षा आहे.

गुरु आपल्यासारखाच आहे, अशी काही माणसांची भावना असते. सद्गुरु ध्यानाला, उपासनेला बसले असले तरी ते त्यांच्या मांडीला डिवचून आपले अस्तित्व दाखवितात. कारण त्यांना त्यांचे दर्शन घेऊन जायचे असते. गुरु उठेपर्यंत थांबायला वेळ नसतो ना !

व्यवहारात एकादी गोष्ट करावयाची असेल तर वाटेत येणाऱ्या अडचणी बाजूला सारून आपण ती गोष्ट करतो. त्याप्रमाणे परमार्थात आत्मानुभूतीच्या आड जे जे येईल ते ते बाजूला सारून आपण आत्मानुसंधान ठेवावयास हवे.

संसार हा दुःखमय आहे. त्यात शोधूनदेखील सुख सापडणार नाही. एकादा पर्वत पोखरून उंदीर बाहेर काढणे म्हणजे संसारात सुख शोधणे होय. संसार हा मुळातच कटकटींनीच भरलेला व बनलेला आहे. संसारात सुख आहे असे मानावे लागते. काम,क्रोध,लोभ या विकारांनी तर संसाराची परिस्थिति बिकट केली आहे. संसारात जे तथाकथित सुख आहे ते अणूप्रमाणे सूक्ष्म आहे. ते शोधूनही सापडणे हे कठिणच आहे.

## ११ एप्रिल

आपण बाह्य विषयांतून सुख घेतो. पण त्यांतील कोणतातरी एक विषय निश्चितपणे सुखाचा आहे असे म्हणता येत नाही. उन्हाळ्यात थंड सरबत एकाला आवडले. पुढे तो गृहस्थ हिवाळ्यात आपल्याकडे आला. मागे तो थंड सरबत आवडते असे म्हणाला होता म्हणून त्याला थंड सरबत दिले. तेव्हा तो म्हणाला, "थंड सरबत नको. काहीतरी गरम गरम आणा. थंडीत गार सरबत कसे देता?" याचा अर्थ एके वेळी सुखाचे वाटणारे थंड सरबत दुसऱ्यावेळी सुखाचे वाटत नाही. एकच विषय हा सुख आणि दुःख देणारा होतो. तेव्हा विषय हे सुख देणारे आहेत की दुःख देणारे आहेत? कालानुरूप ते तसे होतात.

संसार जितका टाकाऊ मानला जातो तितका तो टाकाऊ नाही. मुख्य म्हणजे संसारामुळे देहाचे रक्षण होते. आई, वडिल, बहीण, भाऊ, बायको, मुले 'आपली असतील तर' ती आपल्या उपयोगी पडतात. 'आपली असतील तर' असे म्हणायचे कारण एवढेच आहे की प्रत्येकाचा त्या बाबतीतील अनुभव भिन्न असतो.

या जगात अजिबात सुख नाही असे नाही. तथापि जगातील सुख भोगत भोगत शंभर वर्षे मजेत जगावे इतके ते सुख नाही. किंवा विजेच्या तारेला हात लावून मरून जावे इतके दुःखही नाही. भावार्थ इतकाच की सुखाचे प्रमाण दुःखापेक्षा फार कमी आहे.

शरीर-सुखासाठी प्रपंच आहे. परमार्थ हा आत्मसमाधानासाठी आहे. परमार्थ हा व्यवहारात उपयोगी पडावा म्हणून नाही.

## २० एप्रिल

इच्छेच्या निवृत्तीसाठी परमार्थ आहे. मग 'मला मोक्ष हवा' ही इच्छा तरी कशाला धरायची? पायात मोडलेला काटा ठणका देतो. तो दुसऱ्या काट्याने काढल्यावर तो ठणका हलका करतो. हे दोन्ही काटे एकच आहेत काय? नाही. तसेच मोक्षाच्या इच्छेमुळे अन्य सर्व इच्छांची निवृत्ति होते. म्हणून मोक्षेच्छा ही इच्छा या सदरात येत नाही.

शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे विषय विषय वाढविणारेच आहेत. या विषयांचा निरास करणारे जे साधन आहे तेच एक 'विषय' म्हणून साधुसंतांनी आपणास दिले. आमचा विषय बदलून त्यांनी आमचे इष्ट कार्य केले. पुढे साधनात जसजसे आपले नामाशी तादात्म्य होत जाईल तसतसे विषय सुटत जातात.

नामस्मरण केल्याने जीवाचे स्थित्यंतर, रूपांतर आणि अवस्थांतर होते, ही गोष्ट महत्त्वाची आहे. आता तसे जर होत नसेल तर नाम घेण्यात काही अर्थ नाही. खरे सांगायचे तर जीवन हे नाममय व्हावयास हवे आणि तसे झाले तर जीवाला अत्यंत समाधान आहे.

आपली मान भरेल इतक्या पदव्या आणि पदके मिळविली, खोऱ्याने पैसा ओढला. इतके केले म्हणून जीव काही मुक्त होत नाही. व्यवहारात शिक्षण घेण्यास, पैसा मिळविण्यास जिद्द लागते. तशी मोक्ष मिळवायला जिद्द पाहिजे. जिद्दीने जर परमार्थ घडला तर मुक्ति हातात आहे.

## २१ एप्रिल

देहात चैतन्य आहे. त्या चैतन्याचे दर्शन, त्या चैतन्याचे सुख मिळविणे हे परमार्थाचे ध्येय आहे. पण देह म्हणजे चैतन्य नसल्यामुळे, देहामुळे चैतन्याचा अनुभव येत नाही. चैतन्याचा अनुभव येण्यास शरीर तर हवेच. तथापि त्या शरीराचा विसर पडावयास हवा. तसा शरीराचा विसर पडला तर चैतन्याचा अनुभव येतो. शरीराने चैतन्याचा अनुभव घ्यावयाचा नसून शरीराला विसरून चैतन्याचा अनुभव घ्यावयाचा आहे.

गंमत म्हणून माणूस चहा पिऊ लागतो. गंमत म्हणून तपकीर ओढू लागतो. पण तसे करता करता माणसाला चहाचे किंवा तपकीरीचे व्यसन लागते.जीव या देहात आहे. देह हा मूलत: बाह्य दृश्याकडे वळलेला आहे. देहाच्या अनुषंगाने देहाशी तादात्म्य पावल्याने जीव हा सुद्धा बहिर्मुख झाला आहे. म्हणजे तो बाह्य दृश्यांकडे आकृष्ट झाला आहे. शरीराचा हा अनुषंग सुटला, शरीराशी जीवाचे तादात्म्य सुटले तरच जीव चैतन्याकडे वळून त्याला पाहील.

चैतन्याचा एक प्रवाह शरीरात अखंडितपणे आणि अविरतपणे चालला आहे. तिकडे जीवाचे लक्ष जावयास हवे. त्यासाठी जीवाने अंतर्मुख व्हावयास हवे. म्हणजे बाह्य दृश्याचे आकर्षण सोडावयास हवे. त्याला शरीरातील चैतन्याची वहातूक जी चालली आहे तिचे भान यावयास हवे. तसे झाले तर जीवाला चैतन्याचे सुख मिळेल.

## २२ एप्रिल

शरीरातील चैतन्याकडे लक्ष जाऊन जर चैतन्याचा अनुभव माणसास आला तरच त्याच्या चित्ताला स्थैर्यता प्राप्त होते. चित्ताला स्थैर्यता आली की आपोआपच माणसाच्या जीवनात स्वास्थ्य येते.

अंतर्मुख होऊन चैतन्यावर लक्ष ठेवीत असताना जर चैतन्यात मनाची तद्रूपता झाली, जर चैतन्य एवढा एकच विषय मनाचा झाला, तर तेथे ध्यानावस्था निर्माण होते.मग मनाचे मनपण नाहीसे होते. चित्त आणि चैतन्य यांचे एकीकरण होते. हीच गोष्ट परमार्थात साधावयाची आहे.

देहाशी समरस होण्यास माणसाला काहीही प्रयत्न करावे लागत नाहीत. कारण निसर्गत:च देह हा बाह्य पदार्थाशी समरस होतो. मग देहाशी तादात्म्य पावलेला जीव हाही बाह्य दृश्यात रमून जातो. देहाचा विसर होऊन चैतन्याशी समरस होण्यासाठी मात्र प्रयत्न करावा लागतो. चैतन्याचा अनुभव येण्यासाठी चैतन्यावर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करणे हे अतिशय आवश्यक आहे. सद्गुरूंनी सांगितलेल्या साधनाच्या अभ्यासाने जड व जडाचे आकर्षण दूर हाऊन चित्त चैतन्यात एकरूप होते. चैतन्याशी एकरूपता होण्यातच सततचा शाश्वत आनंद आहे. आणि हाच शाश्वत आनंद परमार्थ करून माणसाने प्राप्त करून घ्यावयाचा आहे.

## २३ एप्रिल

अहंकार, काम, क्रोध, लोभ,मोह, मद, मत्सर यांच्या वाऱ्याला सुद्धा उभे राहू नये. कारण ते घातक असल्याने परमार्थात नाश होतो. तथापि आम्हालाच ते हवे असल्यामुळे ते आपणांस सोडून जात नाहीत.

कुंभाराने गाडगी केली; कुंभार व गाडगी वेगळी आहेत. गाडगे बघितले म्हणजे कुंभार बघितला असे होत नाही. सुताराने देव्हारा केला. देव्हारा आणि सुतार वेगळा आहे. देव्हारा बघितला की सुतार पाहिला असे होत नाही. परमेश्वराने जग निर्माण केले. तो जगापेक्षा वेगळा आहे. म्हणून जगाकडे पाहून परमेश्वर दिसत नाही.

संसार हा प्रारब्धानुसारच होतच असतो. प्रपंचामध्ये आपण कितीही जीव टाकला तरी जेवढे मिळावयाचे आहे तेवढेच मिळणार आहे. जीव टाकायचा आहे तो परमार्थासाठी. परमार्थासाठी अट्टाहास अवश्य असावा.

सर्व इंद्रियांचा संबंध बाह्य विषयाशी, दृश्याशी आहे. जोवर आपले लक्ष इंद्रियांवर आहे, तोवर जीवाची चित्तवृत्ति बहिर्मुख रहाणार. परंतु दृश्य विश्वाचे मागे जे काही आहे त्याच्या मागे जो लागेल तो मात्र दृश्याचे मागे लागणार नाही.

आत्मा हा निळा, निळ्या रंगाचा आहे. चैतन्य निळ्या रंगाचे आहे. जीवनाचा रंग निळा आहे. मरणाचा रंग काळा आहे. वैराग्याचा रंग पिवळा, व प्रेमाचा रंग लाल आहे.

# २४ एप्रिल

शरीर हे श्वसनाला आवरण (Cover) आहे. शरीर हे ज्याने कव्हर केले आहे त्याला जर आपण कव्हर करू शकलो नाही तर आपण कधीच रीकव्हर (Recover) होऊ शकणार नाही.

कोणाचे आयुष्य किती आहे हे सांगता येत नाही. म्हणून जे काही साधायचे आहे, जे काही मिळवायचे आहे ,ते मिळविण्यासाठी लगोलग सर्वतोपरी प्रयत्न करावयास पाहिजेत.माणसाला आयुष्य किती लाभले आहे हे महत्त्वाचे नसून त्या माणसाने आयुष्यात काय मिळविले हे महत्त्वाचे आहे. आयुष्यात परमार्थ साधणे हे महत्त्वाचे आहे.

प्राणाचा देहाशी असणारा संबंध हा जन्म मरणाचा आहे. असा घनिष्ठ संबंध बायकामुले, घरदार,आई बाप, इत्यादीशी देहाचा असत नाही. आता साधे भाड्याचे घर सोडताना जीवाची घालमेल होते तर ज्या देहाने प्राणाला जन्मभर साथ दिली तो देह मरतेवेळी सोडताना किती कष्ट पडत असतील!

आपण जिव्हेने रस चाखतो, कानानी शब्द ऐकतो, हातापायानी व्यवहार करतो, हे म्हणणे खरे आहे का? नाही. जिव्हेत चैतन्य आहे म्हणून ती रस चाखू शकते. कानात चैतन्य आहे म्हणून ते शब्द ऐकू शकतात, आणि चैतन्य आहे म्हणून हातपाय हे व्यवहार करू शकतात. याचा अर्थ असा की चैतन्याच्या अधिष्ठानावरच शरीराच्या सर्व क्रिया चालू असतात.

## २५ एप्रिल

परमार्थात ठेवलेला पाय चटकन बाहेर काढावा असे आपणास वाटते. प्रपंचात मात्र घट्ट होऊन जीव मग्न झाला आहे. प्रपंचात काहीही सहन करण्याची त्याची तयारी असते. तसे परमार्थात व्हावयास हवे. जीव हा जर परमार्थात घट्ट झाला तर तो मठ्ठ रहाणार नाही.

आपल्या शरीरात ज्या दोन गति चोवीस तास अनुस्यूतपणे चालल्या आहेत, त्यांचेवर दृष्टि स्थिर झाली म्हणजे त्या गतीचेच डोळे बनतात, आणि मग ती गति ऊर्ध्वगामी होऊन अखंड साक्षात्कार होतो.

सर्व इंद्रियांना चाळवणारा आत्मा हा जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या या चारही अवस्थेत कसा नटला आहे,याची प्रचीती संत सद्गुरू दाखवितात. या कारणाने त्यांनाच शरण जावयास हवे.संतांच्या संगतीत राहिल्यास देवाची भेट होते असे म्हणतात. संतांचा आणि देवाचा संबंध काय? मुळात संताची भेटही सहज सुलभ नाही. भाग्य असेल तर संत भेटतात. आणि जेथे संत असतात तेथेच देव असतो. असा देवाचा आणि संतांचा घनिष्ठ संबंध आहे. म्हणून संतांच्या संगतीत देव भेटतो. किंबहुना संत हेच देव आहेत.

व्यवहारात जो विषय डोक्यात असतो तो तोंडात येतो,तोंडातला विषय कानात येतो, कानातला विषय मनात येतो, मनातला विषय बुद्धीत येतो,आणि बुद्धीतला विषय कार्यवाहीत येतो.

## २६ एप्रिल

आपल्या मनाने नामाला धरावे असा आमचा अट्टाहास आहे. पण मन हे संकल्प विकल्प करेल केव्हा आणि नामाशी समरस होईल केव्हा? नामात मन लागत नाही. न लागू दे. आपण मात्र अट्टाहासाने नाम घेत रहायचे, ते सोडायचे नाही. असे जर नाम घट्ट केले तर मग मन कुठेही जात नाही.

आम्हाला सगळ्यात जवळचा आत्मा आहे. पण त्याला बघायला आम्ही तयार नाही.आत्मा देहात असताना आपण त्याला बाहेर हाक मारतो. मग त्याने आतून "ओ" कशी द्यावी? चैतन्यरूप आत्म्याला जडाने हाक मारून काय उपयोग? चैतन्याच्या अवस्थेत जाऊन, चैतन्यरूप आत्म्याला हाक दिल्याशिवाय आत्म्याची "ओ" आणि अनुभव कधीतरी येईल का ?

देह हा नाशवंत आहे. बाह्य दृश्य नाशवंत आहे. परंतु ज्या चैतन्यामुळे हे दृश्य निर्माण झाले ते चैतन्य मात्र अविनाशी आहे. ज्याप्रमाणे ऊसातला रस गेला की चोयट्यांना किंमत नसते,त्याप्रमाणे चैतन्य आहे तोपर्यंतच देहाला किंमत आहे.आयुष्य हे आत्म्याच्या अधिष्ठानावर आहे आणि म्हणूनच आत्मानुभव घेणे आवश्यक आहे.

देह हा जड आहे. आणि मनसुद्धा जड आहे. देहाच्या पलीकडे गेल्याशिवाय तसेच मनाच्याही पलीकडे गेल्याशिवाय चैतन्याची अनुभूती घेता येत नाही. देहाला धरून आपले आयुष्य चालले आहे. तिथेच सर्व बिघडले आहे.

## २७ एप्रिल

कोणतीही गोष्ट निष्ठेने करण्याला महत्त्व आहे. निष्ठेने साधन केले की मीपणाचा त्याग आपोआप होतो. देहामुळे मीपणा आहे. मीपणाचा त्याग म्हणजे जीवपणाचा त्याग. जीवपणा नाहीसा झाल्यावर अज्ञानसुद्धा आपोआप नाहीसे होते. एक मीपणा जर आपल्यापासून बाजूला गेला तर संसारच ब्रह्मरूप होतो. मीपणाने आपले वाटोळे झाले आहे. म्हणून मीपणा जावयास हवा.

महापुरातून जे तारतात ते सद्गुरू. हा महापूर कोणता? हा महापूर मायेचा आहे. "मा" म्हणजे आहे आणि "या" म्हणजे काही नाही. जे काही नाही परंतु आहे असे वाटते ती माया. या मायेच्या महापुरातून सद्गुरू साधकाला तारून नेतात.

मेल्यावर आपणाजवळ कोण किती रहाणार आहे याच्या मर्यादा आहेत. कोणी घराच्या दारापर्यंत येतो. कोणी "समाधी" पर्यंत, कोणी स्मशाना पर्यंत, तर कोणी चितेपर्यंत येतो. परंतु नाम मात्र सतत आपल्याजवळ आहे. देह गेला तरी नाम राहणार आहे.

जे "नाही" आहे त्याला आपण "आहे" असे समजून चाललो आहे. आणि जे "आहे" त्याला आपण "आहे" असे मानायला तयार नाही. म्हणून सर्व ब्रह्म घोटाळा झाला आहे. जे नाही आहे ते भासमान होते पण जे भासमान होते ते नाहीसे होते. आत्मा मात्र आहेच आहे. जे नाही त्याच्या पाठीमागे आपण लागलो आहोत. म्हणून जीवनात नाही ते होत आहे.

## २८ एप्रिल

व्यवहारात इंद्रियांना दृश्याचे व शरीराचे आकर्षण आहे. ते आकर्षक वाटतात म्हणून त्यांचे आकर्षण आहे. तसे चैतन्य आकर्षक आहे का? चैतन्याकडे इंद्रियांचे आकर्षण आहे काय? नाही. कारण डोळ्यांना, जिभेला, कानांना जे हवे आहे ते चैतन्यात नाही. म्हणून इंद्रियांना चैतन्याचे आकर्षण वाटत नाही.

या जगात जीवाला जर काही नेम नसेल, जर त्याचे आचरण योग्य नसेल, जर तो पाप करण्याचे लायसेन्स म्हणून नामाचा उपयोग करीत असेल – कारण नामाने पाप जाते – तर त्याचा नरकवास अटळ आहे.

जो साधक सत्त्व,रज, आणि तम या तीन गुणांच्या पलीकडे जातो, ज्याचा त्रिगुणांच्या पलीकडे प्रवेश झाला आहे, तो पुन्हा परत जन्माला येत नाही. याचा अर्थ तो देहावर येत नाही असा नाही. कारण जोपर्यंत प्रारब्धानुसार या देहाची धारणा आहे तोपर्यंत त्याला इतर जीवांप्रमाणे देहामार्फत होणारे सर्व क्रियाकर्म असतेच. फरक एवढाच की तो त्या कर्मात असूनही अलिप्त असतो.

'रामराम म्हणता जावा माझा प्राण' या चरणाबद्दल आपली कल्पना वेगळी आहे. आपण त्याचा अर्थही वेगळाच करतो. व त्याबद्दल आपली रूढीसुद्धा वेगळी आहे. प्राण जाताना तोंडातून 'राम' यावा असा अर्थ आपण करतो. पण तसे नाही. 'रामराम' म्हणता प्राण जाणे ही इतकी साधी व सोपी गोष्ट नाही. अंतरात जर राम हा विषय झाला असेल तरच मरताना तोंडात 'रामराम' येईल.

## २१ एप्रिल

सद्गुरूनी सांगितलेले साधन जो करतो त्याला साधक म्हणतात. साधन म्हणजे ब्रह्माचा/आत्म्याचा साक्षात्कार होण्यासाठी आवश्यक असणारी एक विशिष्ट प्रक्रिया आहे. परिस्थिति कशीही असो अथवा येवो, साधकाने साधन करीत रहावयास हवे. जर त्याला साधनाचा कंटाळा येत असेल तर तो दुर्दैवी आहे. साधन करणे हे त्याचे कर्तव्य आहे. तक्रार न करता त्याने साधन करावयास हवे. साधन न करणे हा साधकाचा मोठा अपराध आहे. मनात विचार येतात, साधनाकडे लक्ष लागत नाही या सबबीवर साधकाने साधन सोडावयाचे नाही. जसे :- पाऊस पडो अगर न पडो, शेतकरी शेताची मशागत करतो. त्याप्रमाणे साधकाने साधन करावयास हवे.

या जगात मिळणारे सुख हे क्षणभंगुर, सापेक्ष, मर्यादित आणि अंती दु:ख देणारे आहे. याउलट खरे खुरे नित्य सुख प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर त्यासाठी साधनच करावे लागते. हे लक्षात घेऊन निरपेक्ष, सततच्या, सुखासाठी साधकाने साधन केले पाहिजे.

साधकाने स्वस्थ बसणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. साधक जर स्वस्थ बसला तर त्याने बरेच साधन साधले असाच अर्थ होतो. पण स्वस्थ बसणे सोपे नाही. साधकाने स्वस्थ बसणे शिकावयास हवे.

झोपी जाण्यापूर्वी साधकाने किमान एक घटकाभर तरी साधनात व्यतीत करावयास हवा.

## ३० एप्रिल

साधकाला सतत चैतन्याचे अनुसंधान लागावयास पाहिजे. त्यासाठी त्याने असे करावे :- दर १०-१० मिनिटांनी हातात घेतलेले काम असेल ते काम बाजूला ठेऊन त्याने १-२ मिनिटे चैतन्याकडे लक्ष द्यावे. म्हणजे हळुहळु क्रमाक्रमाने चोवीस तास चैतन्याच्या अनुसंधानात रहाणे जमू लागेल.

सद्गुरूंनी ज्याप्रकारे साधन करण्यास सांगितले आहे त्याच प्रकाराने साधन करावयास हवे. आपली स्वतःची आवड, बुध्दि, अक्कल साधनाच्या प्रक्रियेत न घुसडता साधकाने साधन चालू ठेवले पाहिजे.

साधनाने विश्रांती प्राप्त होते. साधनाने विशिष्ट प्रकारचा आनंद प्राप्त होतो. मग ती विश्रांति आणि तो आनंद सतत टिकवून धरण्यासाठी साधकाने सातत्याने साधनात आपला वेळ घालवावयास हवा.

साधनात नामाचा अभ्यास असतो. साधनात स्वयंसिद्ध नामाच्या उमटणाऱ्या ध्वनीकडे लक्ष देऊन त्यात मनाचा लय करण्याचा प्रयत्न व्हावयास हवा. प्रत्येकाच्या शरीरात हे नाम उमटतेच आहे. या नामाकडे लक्ष देताना काही विरोधी गोष्टी अथवा अडचणी येतातच. त्या दूर सारून किंवा त्यांचेकडे लक्ष न देता साधकाने साधन चालूच ठेवावयास हवे.

## १ मे

गुरू हे मुमुक्षूला अनुग्रह देतात. या अनुग्रहाचे तीन प्रकार आहेत :-(१) कर्णद्‌वारा :- गुरू तोंडाने जे काही सांगतात ते मुमुक्षु ऐकतो व त्याचे ग्रहण करतो. (२) दृष्टीद्‌वारा :- गुरू हा मुमुक्षूच्या दृष्टीला दृष्टी भिडवून आपल्या मनातील त्याच्या मनात बिंबवितात. (३) स्पर्शद्‌वारा :- मुमुक्षूच्या शरीराला स्पर्श करून गुरू अनुग्रह देतो. यातील कर्णद्‌वारा अनुग्रह हा राजरोस नेहमीच्या व्यवहारातील अनुग्रह आहे. दृष्टीद्‌वारा अनुग्रह झाल्यावर, गुरूची व शिष्याची दृष्टादृष्ट होताच शिष्याचे ठिकाणी ज्ञान प्रगट होते. हा अनुग्रह फार प्रभावी असतो. तिसऱ्या प्रकारात गुरूंनी स्पर्श केला की शिष्याला विजेचा झटका बसल्याप्रमाणे झटका बसतो, कारण गुरूंचे हातातून चैतन्याचा प्रवाह शिष्यात शिरतो आणि शिष्याला ज्ञानाची प्राप्ती होते. या तीन प्रकारातील दुसरा व तिसरा प्रकार फार क्वचित् आढळतात. दृष्टीद्‌वारा अनुग्रह हा तर फारच क्वचित्.

शरीरात प्राण आहे म्हणून जीवाला ज्ञान आहे. प्राणामुळे सर्व इंद्रियांमार्फत ज्ञान होत असते. चैतन्याच्या गतीमुळे शरीराची हालचाल होते. ज्यावेळी जीव या शरीरात शिरला आणि नाकरूपी नळकांड्यातून वर खाली होऊ लागला, त्यावेळी तो चैतन्याला विसरला, याला कारण त्याला लागलेले जडाचे आकर्षण. जडाचे आकर्षण जास्त झाल्यामुळे जीव हा बाह्य विषयांत रमू लागला.

## २ मे

फक्त भगवान शंकरांना तीन डोळे आहेत असे नाही. शरीरात रहाणाऱ्या प्रत्येक जीवाला तीन डोळे आहेत. परंतु जीवाला ते माहीत नसते. कारण त्या तिसऱ्या डोळ्याचा उपयोग त्याने बऱ्याच वर्षांत केला नसल्यामुळे त्या डोळ्यांवर धूळ पडली आहे, त्याला गंज चढला आहे. प्रत्येक जीवाला तीन डोळे आहेत हे नाकबूल करता येत नाही, कारण ते आहेतच आणि ते कबूलही करता येत नाही, कारण तो तिसरा डोळा दिसून येत नाही. जेव्हा नामगती आणि प्राणगती ऊर्ध्वगामी होतात, तेव्हा हा तिसरा डोळा उघडतो. हा तिसरा डोळा माणसाच्या भ्रूमध्यात आहे. हा डोळा उघडण्यासाठी परमार्थाचा आटापिटा करावा लागतो आणि एकदा का हा तिसरा डोळा उघडला की त्याचेमुळे आत्म्याचे दर्शन होते.

शरीर हे जड आहे. बाह्य विश्वातील दृश्य हेही जड आहे. जडाला जडाचे आकर्षण असते. म्हणून शरीराचे दृश्याशी व्यवहार घडतात. शरीराचे नादाने जीवाचे बाहेर आकर्षण, बाह्य दृश्याचे आकर्षण असते. या आकर्षणाचा परिणाम एकच. तो म्हणजे जीव चैतन्याला विसरतो.

साधन करणाऱ्याला 'मी साधन करीत आहे' अशी जाणीव उपयोगाची नाही. तसेच केवळ साधनाला बसले म्हणजे साधन होते असे नाही. नामगती व प्राणगती या ज्या अवस्थेत एक होतात त्या अवस्थेत येणे म्हणजे साधन होणे आहे.

## ३ मे

जीव शरीरात येऊन व्यवहारात पडला की देहाच्या संपर्काने त्याला जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्था निसर्गत:च अनुभवाला येतात. या अवस्था केवळ व्यवहाराच्या सोईसाठी पाडल्या आहेत. ही नैसर्गिक जागृति ही खरी जागृति नव्हे, ती परमार्थातील जागृति नाही. जो पारमार्थिक जागृतीत येतो त्याला ओळखण्याची एक खूण आहे. तो स्वत:च्या घरातसुद्धा पाहुण्याप्रमाणे रहातो. त्याचे बोलणे–चालणे, त्याचे इतर व्यवहार हे रेल्वेतील प्रवाशासारखे असतात.

परमार्थात उन्मनी ही मूलभूत अवस्था आहे. जीव जन्माला येण्यापूर्वी तो उन्मनी अवस्थेतच असतो. परंतु जन्माला आल्याबरोबर तो 'मनत्वा' मध्ये येतो म्हणजे तो मनाच्या संकल्प विकल्पांत गुंतून पडतो. संकल्प व विकल्प यांनी रहित मन हीच मनाची पूर्वस्थिती. ती म्हणजेच उन्मनी.

जीव ज्या शरीरात आहे त्या शरीराचे आतच खरे म्हणजे त्याला अखंड सुख प्राप्त होणार आहे, निखळ सत्य गवसणार आहे आणि आत्मारामाची प्रचीति येणार आहे. परंतु या जड शरीराने जीवाला इतके घेरले आहे की वरील वस्तुस्थितीचे ज्ञान त्याला होत नाही. सद्गुरू त्याला ते ज्ञान करून देतात.

चित्ताची धडपड, मनातील गडबड, तडफड, तळमळ, संकल्पविकल्प आहेत याचा अर्थ जीव बहिर्मुख आहे. जीवाचे हे बहिर्मुख जीवन थांबणे म्हणजे जीवाने अंतर्मुख होणे होय.

## ४ मे

मन नसेल तर माणसाचा व्यवहार होत नाही, हे दृश्य दिसत नाही आणि 'माझे तुझे' नाही. मन आहे म्हणून हे सर्व घडत आहे. जर मनच अस्तित्वात नसते तर सृष्टि हा शब्द देखील उरला नसता.

आम्ही साधनाला बसणार पाच मिनिटे आणि अपेक्षा बाळगणार की आम्हाला अनुभव मात्र संतांचे सारखा यावयास हवा. आम्ही पथ्य करणार नाही आणि गुण येत नाही म्हणून डॉक्टरला दोष देणार.

पाठीला रग लागणे, डोळ्यातून पाणी येणे, वगैरे गोष्टी साधनामुळे होतात अशी आमची कल्पना आहे. परंतु तसे नाही. एक चांगले लक्षात ठेवावयास पाहिजे की रात्र रात्रभर साधन केले तरी शरीराला त्रास होणार नाही, डोळ्यांची आग होणार नाही, साधन करणाऱ्याला चक्कर येणार नाही. साधनात साधक जरी रात्रभर जागला तरी त्याची वृत्ती शांत व प्रसन्न असते.

सद्गुरूंना काहीतरी शंका न विचारणारे साधक दोन प्रकारचे असतात. १) ज्या साधकावर पूर्ण कृपा होऊन जो पूर्णत्त्वाला गेला आहे, त्याला सद्गुरूला काही विचारण्याचे कारणच उरत नाही. २) जो साधनाचा अभ्यासच करीत नाही असा साधक. जर एकादा साधक साधनच करीत नसेल तर तो सद्गुरूंना विचारणार तरी काय?

## ५ मे

भारतात चार प्रकारचे संप्रदाय आहेत. १) चैतन्य संप्रदाय:- यामध्ये चैतन्याचा आविष्कार हा मुख्य असतो. या संप्रदायात जड भिंत चालविणे, मेलेल्याला जिवंत करणे अशा प्रकारचे चमत्कार दिसून येतात. मत्स्येंद्रनाथ इत्यादींनी याचा प्रचार केला. २) स्वरूप संप्रदाय :- हा समर्थ रामदास स्वामींनी पुरस्कृत केला. यामध्ये आत्मस्वरूपाचा साक्षात्कार हा मुख्य असतो. ३) श्री संप्रदाय:- या संप्रदायात ऋद्धी सिद्धी इत्यादी सिद्धि दिसून येतील. ४) आनंद संप्रदाय :- कोणत्याही स्थितीत, कोणत्याही अवस्थेत आत्मानंदाची प्राप्ती व आत्मानंदात दंग असणे, हे या संप्रदायाचे लक्षण आहे.

आजपर्यंत सद्गुरू व अधिकारी सत्-शिष्य हे काही प्रमाणात दिसत तरी आहेत. पण आणखी दहा बारा वर्षांत तेही दिसणार नाहीत. ही फक्त काल मर्यादा सांगितली. आजकाल कोणाची अभ्यासू वृत्तिच दिसत नाही. परमार्थ या विषयाची माणसांची आस्थाही कमी कमी होत चालली आहे. तेव्हा यापुढे एक काळ असा येईल की कुणी अनुग्रह देणार नाही व तो कोणी घेणार नाही. कारण जो कोणी अनुग्रह देणार त्याच्याजवळ काहीतरी असल्याशिवाय तो देणार तरी काय?

साधनामुळे शरीरातील आधार स्थानापासून सहस्रदलस्थानापर्यंत गतीचा एक तंतु होतो. हा तंतु होण्यास शरीरातील नवद्वारांचा निरोध व्हावयास हवा. हा निरोध बळजबरीने करू नये. जसजसा साधनात अधिकाधिक काळ जाईल, तसतसा हा निरोध विनासायास होतो.

## ६ मे

योगाचे मुख्यत: तीन प्रकार दिसून येतात :- १) राजयोग :- हा मनाने साधावयाचा आहे. हा साधण्यासाठी काही सोडण्याची जरूरी नाही. ऐषआरामात राहूनसुध्दा हा योग साधता येतो. २) हठयोग:- निरोगी शरीर, शरीराचे नियमित व्यवहार हे या योगात आवश्यक असतात. हा योग शरीराच्या सहाय्याने हट्टाने साधायचा असतो. ३) सहजयोग:- हा सोपा व प्रभावी असून सर्व योगांत श्रेष्ठ आहे. हा योग शरीर व मन यांचे पलीकडे जाऊनच साधावयाचा असतो.

साधनामध्ये चित्ताची एकाग्रता आणि दृष्टीची तादात्म्यता या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्या दोन्ही साधल्यास हृदयात वायूची घर्षणक्रिया आपोआप सुरू होते. या वायूच्या घासणीने ॐ काराचा वन्हि उत्पन्न होतो आणि उपाधिभूत जीवनाची वाफ होऊन ती ऊर्ध्वगामी होते आणि मग जीवशिवांचे ऐक्य होऊन आत्मानुभूति येते.

शरीरातील जीवनाच्या गतीचा सूक्ष्म ध्वनि ऐकू येऊ लागला तर आपोआप दृष्टि स्थिर होईल. हे साधनातील वर्म आहे. हा अभ्यास आहे. झोपतानासुध्दा या अभ्यासातच निद्राधीन व्हावयास हवे. असा अभ्यास ज्या साधकाचा आहे, त्याच्या पदरात अजपाजप पडतो याची खात्री बाळगावयास हरकत नाही.

# ७ मे

सद्गुरूंनी सांगितल्याप्रमाणे श्वासोच्छ्वासावर लक्ष केंद्रित होणे म्हणजे साधन आहे. निखाऱ्याला हात लावला की तात्काळ चटका बसतो, त्याप्रमाणे साधन सुरू झाले की लगेच आत्मानुभव येत नाही. कारण साधनाने साधावयाची निर्विचार स्थिति साध्य होण्यास काही काळ साधन व्हावेच लागते. साधनाच्या अभ्यास करताना जितक्या प्रमाणात देहाचे भान सुटत जाईल, कमी कमी होत जाईल तितकी तितकी प्रगति साधनात होत आहे असे समजावे. आता आपणास साधन जमत आहे हे ओळखण्यास काही खुणा सांगता येतात.

या खुणा पुढील प्रमाणे :-

१) साधनाने श्वासोच्छ्वास अथवा प्राण आणि अपान हे सम होतात.

२) साधनाने मनाच्या वृत्ति निवळतात. मनातील विचार व विकार कमी कमी होतात.

३) साधन करताना चैतन्याचा प्रकर्ष होऊ लागतो. चैतन्य हे गरम म्हणजे उष्ण आहे. त्यामुळे साधनाचे वेळी कधी कधी शरीर गरम होते.

४) साधन करताना कधी शांति व समाधान लाभते.कधी ते लाभत नाही. शांति व अशांती, समाधान – असमाधान,हे चैतन्याचे नसून मनाचे गुणधर्म आहेत.हे लक्षात ठेवून तिकडे लक्ष देऊ नये.

५) पहाटेच्या वेळी सत्पुरुष विषयक स्वप्ने पडतात.

## ८ मे

साधन जमू लागले की मग नाना प्रकारचे अनुभव आणि परिणाम पुढील प्रमाणे होतात. :-

१) साधन करताना बाहेर नाद अथवा सुगंध नसताना, आतूनच नाद ऐकू येतो अथवा सुगंध जाणवतो.

२) साधनात नाद,बिंदु, कला, व ज्योति या स्वरुपात आत्मसाक्षात्कार होतो.

३) साधनाने कर्माचा नाश होतो. साहजिकच प्रारब्धाने आलेला चालू जन्म संपताच तो अखेरचा होऊन, पुन: जन्म –मरण चक्रात माणूस सापडत नाही.

४) साधनात मिळणारे सुख– समाधान हे जगात कुठेही मिळण्यासारखे नसते. हे सुख बसल्या ठिकाणी मिळते.आणि ते संपून जात नाही.किंबहुना प्रपंचात मिळणारे सुखसुद्धा त्यात समाविष्ट होऊन जाते. साधनात बसल्या जागी एकाच ठिकाणी स्वसुखाची म्हणजे आत्मसुखाची अशी स्वसंवेद्य सुखाची प्राप्ती आहे.

५) आत्मवस्तूच्या प्राप्तीमुळे असे स्वसंवेद्य सुख मिळाले की त्यात शोकाचा प्रसंग येत नाही.

६) साधनाने स्वसुख मिळाले की माणसाला 'हवे' आणि 'नको' असे काही उरत नाही.

७) साधनाची सिद्धी झाल्यावर जीव हा आत्मस्वरूपाकार होऊन जातो. म्हणजे त्याला स्वत:चे मूळचे चैतन्यस्वरूप प्राप्त होते. आणि ते प्राप्त करून घेणे हेच मानवी जीवनाचे ध्येय आहे.आत्मस्वरूपाकार झाल्याने मोक्ष मिळतो.

## ९ मे

साधनाच्या अभ्यासाने जेव्हा रामकृष्ण गतींचे एकीकरण होऊन, जीवनाची वाफ होऊन, ती ऊर्ध्वगामी होते आणि सगुण व निर्गुण हा भेदभाव मावळून साधक हा त्रिपुटीपासून निराळा होतो, तेव्हा 'सोहं हंस:' स्वरूपाचा अनुभव येतो.

आकाशाचे मुख्य तीन प्रकार आहेत

१) भूत आकाश :- बाह्य जगातील आकाशालाच भूताकाश असे म्हणतात. २) हृदयाकाश :- मानवी शरीरातील सहस्रदलरूपी हृदयात सापडलेल्या पोकळीला हृदयाकाश म्हणतात. ३) चिदाकाश :- हृदयाकाशातील चैतन्यामधील पोकळीला चिदाकाश म्हणतात.

आत्मा सगळीकडे भरलेला आहे. आत्मा नाही अशी जागाच कुठे नाही. अशी स्थिति असताना देखील आम्हाला आत्मा दिसत नाही. याचे कारण त्याला पाहण्याची दृष्टी आणि लकब आपलेजवळ नाही आणि ती लकब व दृष्टी सद्गुरुकृपेशिवाय प्राप्त होत नाही. म्हणून परमार्थात सद्गुरुकृपा आवश्यक आहे.

परमार्थातील काही गोष्टी 'तीन' या संख्येत आहेत. सद्गुरूच्या अनुग्रहाचे प्रकार तीन आहेत. साधन हे तीन काळी करावयाचे आहे. सद्गुरूचा शोध तीन वेळा घ्यावयाचा आहे. रज, तम आणि सत्त्व असे तीन गुण आहेत. इडा, पिंगला, तसेच सुषुम्ना नावाच्या तीन नाड्या महत्त्वाच्या आहेत. समाधीचे प्रकार तीन आहेत. असे असले तरी साक्षात्कार मात्र एकच आहे.

## १० मे

सद्गुरु हे सोहंस्वरूप आहेत.ज्या दीपाने सद्गुरूंची आरती करावयाची आहे तो दीपही सोहंरूप आहे. या सद्गुरूंचे चरण हेही सोहंरूपच आहेत आणि सदगुरूंची आरती करणारा साधकही सोहंरूपच आहे.

साधनाचा अभ्यास सुरु केल्यावर प्रथम प्रथम दृश्यच दिसते म्हणजे दृश्याचे भान होते. नंतर प्रथम चैतन्य आणि मग दृश्य दिसते. असे होत होत, मनातील केरकचरा दूर होत होत, अभ्यासाने अशी एक स्टेज येऊन पोहचते की चैतन्याशिवाय अन्य प्रचीति येत नाही. साधक पूर्णत्वाला आला असता अशी अवस्था होते.

साधकाने प्रमाणात बोलावे, इंद्रियावर ताबा ठेवावा, जास्त व्यायाम करू नये, जास्त झोप घेऊ नये. कारण जास्त बोलण्याने, इंद्रियावर ताबा नसल्याने, शरीरातील रक्त आटते. अतिझोपण्याने आळस येतो आणि श्वासोच्छ्वास वाया जातात. तेव्हा जितकी शक्ति आपण राखून ठेवू तितकी ती शक्ति आपल्या साधनातील प्रगतीस उपयोगी पडते.

ज्याच्या जवळ बळ नाही, त्याला आत्मा प्राप्त होत नाही, असे श्रुति सांगते. याचा अर्थ असा नव्हे की शारीरिक बळ असणाऱ्या गामा गुंगा सारख्या शक्तिवान पैलवानांना आत्मा मिळतो. ज्या बळाने आत्मा प्राप्त होतो ते बळ भावाचे आहे. भावाचे बळाने आत्मसाक्षात्कार होतो.

## ११ मे

देवाचे दर्शन होण्यास आपल्याला देवाच्या दारात म्हणजे ज्या दारातून देवाची ये जा चालू असते, त्या दारात पोचावयास हवे. देवाचे द्वार हे बाह्य जगात कुठे नसून ते प्रत्येक माणसाच्या शरीरात आहे. आपल्या शरीरामध्ये नऊ दारांच्या जोडीने एक दहावे द्वार आहे. नेहमीच्या जीवनात ते आपणास माहीत नसते. त्या देवाच्या दारात आपण गेलो तर आपणास देव दिसेल.

एक जावई आहे. तो गरीब आहे. परंतु त्याची सासुरवाडी श्रीमंत आहे. आता तो सासुरवाडीला जातो. पण तो जाणता असल्याने, तो आपल्या श्रीमंत सासुरवाडीत भोग, पाहुणचार घेतो पण त्याची इच्छा त्यात गुंतलेली नसते. त्या जावयाप्रमाणे संतांची वृत्ति संसारात असते.

आमचा श्वासोच्छ्वास हाच परमार्थाचे मूलभूत माध्यम आहे. या श्वसनाचे आधारेच आपण परमात्म्याप्रत पोचू शकतो. श्वसनाला धरून झालेल्या नामसाधनेने परमात्म्याचा साक्षात्कार होतो. शरीरातील चैतन्यरूप नामाच्या नादाच्या श्रवणाने, अनुसंधानाने विश्वात्मक देवाची जाणीव झाल्यावाचून रहात नाही.

देहाच्या अनुषंगाने निर्माण होणारी इच्छा म्हणजे काम आहे. आणि ती इच्छा पुरी न झाल्यास क्रोध येतो. काम आणि क्रोध हे दोन मोठे पर्वत आमच्या आणि परमेश्वराच्या मध्ये असल्याने आम्हाला परमेश्वर दिसत नाही.

## १२ मे

दुधात लोणी आहे. दुधात विशिष्ट मंथन झाले तर ते हातात येते. तसे राम आणि कृष्ण किंवा इडा व पिंगला यांच्या मंथनातून ईश्वराचा साक्षात्कार होतो.

नाम या शब्दातच त्याचा अर्थ साठविलेला आहे. नाम म्हणजे 'न' अधिक आम. आम म्हणजे प्राण. ज्यात प्राणाशिवाय अन्य काही नाही ते नाम. प्राण म्हणजे आत्मा असे श्रुति सांगते. तेव्हा नाम म्हणजे चैतन्यरूप आत्मा असा अर्थ आहे.

सध्या अध्यात्माचा महापूर आलेला आहे. सर्व ठिकाणी सत्संग, साधकांचे मेळावे, कीर्तने, प्रवचने इत्यादि कार्यक्रम होताना दिसतात. देवळात तर पाऊल ठेवण्यास जागा असत नाही, इतकी माणसांची गर्दी असते. इतके सर्व असताना, माणसाची पाप करण्याची प्रवृत्ति मात्र कमी झालेली कुठे दिसत नाही.

ज्या प्रमाणे गवत आणि अग्नि यांचा संयोग झाला की गवताचा अग्नि होतो, जळणारे गवत आणि जळणारा अग्नि हे वेगळे राहात नाहीत, त्याप्रमाणे हरिनामाचा जप करणारा हरिरूपच होऊन जातो.

काही लोक हातात माळ घेऊन जप करताना दिसतात. सवय झाली की माळ नुसती हातात फिरत रहाते, जीभ हालत रहाते, परंतु मन मात्र विषयांचे चिंतन करीत रहाते. जर जप करताना असे होत असेल तर असला नामजप काय उपयोगाचा होईल?

## १३ मे

पोस्टमन रोज जरी पुष्कळ फिरत असला तरी त्याची तब्येत सुधारत नाही. या उलट जो तब्येत सुधारण्याच्या दृष्टीने फिरतो त्याची तब्येत सुधारते. त्याप्रमाणे परमार्थात आहे. परमात्म्याच्या प्राप्तीच्या बुद्धीने नामस्मरण व्हावयास हवे.

माणसे म्हणतात की सध्याचे युग हे विज्ञानाचे युग आहे. आता अध्यात्माचा काय उपयोग आहे? यावर आमचे म्हणणे असे आहे. विज्ञानाला जे ज्ञान होते ते आत्म्यामुळेच होते. हे लक्षात घ्यायला नको काय? आत्म्यामुळेच भौतिक विज्ञानाची प्रगति होत आहे. खरे म्हणजे आत्म्याचे ज्ञान नसल्याने भौतिक शास्त्र हे लंगडे आहे. आत्मज्ञान हेच महत्त्वाचे आहे आणि ते अध्यात्मशास्त्रानेच प्राप्त होणारे आहे.

विष्णूचा भक्त तो वैष्णव. तो निरंतर नामसंकीर्तन करतो. त्यामुळे त्या वैष्णवाचे घर हे मंदिर होते. याउलट आम्ही मात्र मंदिरांची लग्न–कार्यालये करतो. एवढा वैष्णवांत आणि आमच्यात फरक आहे.

आमच्या दृष्टीने परमार्थ हा सवडीचा म्हणजे सवडीने करावयाचा विषय आहे. म्हणजे आम्हाला जेव्हा वेळ मोकळा असेल, जेव्हा आमची इच्छा असेल, जेव्हा जमत असेल तेव्हा आम्ही परमार्थ करणार.खरे म्हणजे वेळात वेळ सवड काढून आपण परमार्थ करणे आवश्यक आहे.

## १४ मे

संत महात्म्यांचे चित्त हे सदैव आत्म्याचे ठिकाणी स्थिर झालेले असते आणि त्यांना आत्मसुख प्राप्त झालेले असते. त्यांचे चित्तातील सुखसमाधान कधीच ढळत नाही. त्यामुळे बाह्य संसारदु:खाचा प्रवेश त्यांचे ठिकाणी होत नाही.

सर्व सुख आपणास मिळावे असे आपणास वाटते तसे ते मिळत नाही. कारण सर्वसुख या शब्दाचा अर्थ आम्हास कळलेला नसतो. सर्व म्हणजे ब्रह्म असा अर्थ आहे. आणि तो 'सर्व खल्विदं ब्रह्म' या श्रुतिवचनावरून कळून येतो. तेव्हा सर्वसुख म्हणजे ब्रह्मसुख असा अर्थ आहे.

जीवाचे आणि शिवाचे ऐक्य होण्यासाठी लागणाऱ्या कृतीचा अभाव म्हणजे व्यवहार. शरीराशी मनाचे तादाम्य होऊन जे जे घडेल ते सर्व व्यवहारात मोडते. तेच मनाचे तादाम्य प्राणाशी होऊन जे घडेल तो परमार्थ आहे. असा परमार्थ केल्याने जीवशिवाचे ऐक्य होते.

जो तो आपल्या बुद्धीप्रमाणे देवाजवळ मागणे मागतो. एक भटजी होता. त्याला देव प्रसन्न झाला. 'तुला पाहिजे ते माग' देव त्याला म्हणाला. भटजीने आपल्या व्यवसायाला उपयोगी पडणारे दर्भाचे जंगल मागितले.

वारा फुलबागेवरून वहातो आणि शौचकूपावरूनही जातो. त्यांच्या संगाने तो सुगंध तसेच दुर्गंध वाहून नेतो. तथापि वारा त्यांचा गुण घेत नाही. वारा हा त्या दोहोंतूनही असंग, अलिप्त असतो.

## १५ मे

मानवी शरीरात तत्त्वरूप नाम आहे. ते नाम गतिरूप आहे. ही नामाची गति शरीरातील श्वासोच्छ्वासाच्या गतीमध्ये आहे. श्वासोच्छ्वास म्हणजे नाम नव्हे. नाम हे गतिरूप असल्याने शरीरात त्या नामाचा नाद/ ध्वनि घुमत असतो.

जीवन असेपर्यंत श्वासोच्छ्वासाचा भाता हलत असतो. म्हणजे श्वासाची गति चालू असते. श्वासोच्छ्वासाच्या गतीतच नामाची गति असल्याने तीही चालूच असते आणि नामाचा नाद उमटत असतो. परंतु प्राय: आपले लक्ष हे श्वासोच्छ्वासाकडे असत नाही. काही कारणाने श्वासोच्छ्वासात काही बिघाड झाला अथवा अडथळा आला तर आपले तिकडे लक्ष जाते. एरवी इकडे श्वासोच्छ्वास चालू असतो तर दुसरीकडे आपले जगातील व्यवहार चालू असतात. श्वासोच्छ्वासाकडे आपले लक्ष नसल्याने ते श्वासोच्छ्वास फुकटच जात असतात. साहाजिकच श्वासोच्छ्वासात असणारे नाम हेही फुकटच जात असते. त्या नामाचा आपणास काही उपयोग होत नाही. खरे म्हणजे परमार्थदृष्ट्या एकेक श्वास अमोलिक आहे; त्यातील नाम हेही अमोलिकच आहे. पण श्वासोच्छ्वासात नाम आहे हे माहीत नसल्यास तितके नाम वायाच जात आहे. इतकेच नव्हे तर श्वसनात नाम आहे हे कळल्यावर देखील जर आपण श्वासोच्छ्वासाकडे लक्षच दिले नाही तर त्यातील नाम हे फुकटच जात रहाणार.

## १६ मे

ज्या श्वासोच्छ्‌वासात नाम आहे तो श्वासोच्छ्‌वास मरेपर्यंत चालू असतो. प्रत्येक दिवसाचे चोवीस तास आपण मानतो. या चोवीस तासात २१६०० इतके श्वासोच्छ्‌वास होत असतात. तितकेच नामाचे ध्वनि उमटत असतात. त्या नामाच्या ध्वनीकडे लक्ष देणे, त्या नामाचे अनुसंधान ठेवणे, त्या नामावर दृष्टि व श्रवण जाणीवपूर्वक ठेवणे म्हणजेच नामाचे स्मरण आहे, नामाचे अनुसंधान आहे, नामाचा अभ्यास आहे.

आपल्या डोळ्यांना आणि कानांना जगातील बाह्य पदार्थांचे फार मोठे विलक्षण आकर्षण आहे. त्यामुळे ते दोघेही नामाच्या नादावर केंद्रित करणे अवघड जाते. तसे केंद्रीकरण करण्यास दृढ निश्चय हवा. त्या निश्चयात मुळीसुद्धा हयगय होता कामा नये. तरच त्या नामाच्या नादाचे अनुसंधान साधण्याची हातोटी प्राप्त होते. अशा प्रकारे शरीरात सातत्याने घुमत असणाऱ्या नामाच्या नादाशी तादात्म्यता साधणे म्हणजेच त्या नामाचा अभ्यास करणे होय.

नाम हे चैतन्य आहे, आत्मा आहे, ब्रह्म आहे. साहजिकच या नामाच्या अभ्यासाने, योग्यवेळी नामस्वरूपी असणारा परमात्मा– त्याला काही वेळा 'नामी' म्हणतात– हा साधकापुढे प्रगट होतो. या नामाच्या अभ्यासानेच जीव हा आत्मस्वरूपी होऊन जातो.

## १७ मे

एक माणूस होता. त्याला देव प्रसन्न झाला. देवाने त्याला सांगितले की मी तुला तीनदा दर्शन देईन. त्यावेळी तुला जे काही हवे असेल ते तू मागून घे. त्या माणसाची बायको कुरूप होती. म्हणून प्रथम त्याने देवाला सांगितले, " देवा, माझी बायको सुस्वरूप कर." देवाने तथास्तु म्हटले आणि तो निघून गेला. इकडे त्याची बायको सुस्वरूप झाली. एकदा ती राजाच्या दृष्टीला पडली. राजाला ती आवडली आणि त्याने तिला बळजबरीने पळवून नेले. तेव्हा तो माणूस दु:खी झाला. त्याने देवाला हाक दिली. देव आला. तेव्हा त्याने देवाला म्हटले देवा, "माझ्या बायकोला अस्वल कर." देव "तथास्तु" म्हणाला. तिकडे राजा जेव्हा त्या स्त्रीच्या महालात गेला तेव्हा त्याला तेथे अस्वल दिसले. राजाने सेवकांकरवी त्या अस्वलाला पिटाळून लावले. तेव्हा ते अस्वल आपल्या पूर्वीच्या स्मृतीला अनुसरून आपल्या नवऱ्याजवळ आले. ते पहाताच तो माणूस घाबरला. त्या माणसाने पुन: देवाला साद घातली. देव आला. "देवा, देवा, या अस्वलाला पूर्वीचे रूप दे." देव तथास्तु म्हणाला. अस्वलाची पूर्वीप्रमाणे पुन: कुरूप स्त्री झाली. तेव्हा देव जरी तीनदा प्रसन्न झाला तरी त्या माणसाला नवीन काही मिळाले नाही. भावार्थ हा :- देवाजवळ काय मागावे हे सुद्धा कळावयास हवे.

माणूस गरीब असो वा श्रीमंत असो त्याला काही ना काही तरी हवेच असते. आणखी हवे याचा अर्थ ते त्याच्याजवळ नाही म्हणजे तो दरिद्रीच आहे.

## १८ मे

जड हे कधी कधी चैतन्याला खेचते. पृथ्वी जड आहे. ती गोल आहे आणि ती फिरत असते आणि तिच्या सर्व बाजूवर जिवंत प्राणी रहातात. पण ते पडत नाहीत. अथवा दूर उडूनही जात नाहीत. याचे कारण असे की पृथ्वी जड असली तरी ती चैतन्ययुक्त प्राण्यांना खेचून धरते.

सहस्रदलचक्रस्थानांतून भूमध्यापर्यंत येणारा प्राण हा शरीरात मुख्य आहे. ज्याप्रमाणे कलेक्टरच्या हाताखाली अनेक दुय्यम मदतनीस कार्य करीत असतात, त्याप्रमाणे या प्रधान प्राणाच्या हाताखाली प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान हे पाच प्राण देहात आपापले कार्य करीत असतात. प्राण हे मुख्य चक्र आहे. ते चाक फिरत असताना त्या चाकाच्या गतीवरच प्राण, अपान इत्यादी बारकी चाके गतिमान होत असतात.

आपला एकादा नातेवाईक आपले घरी यावयाचा असेल तर आपण बस स्टँडवर/ रेल्वे स्टेशनवर/ अथवा विमानतळावर जातो. त्याप्रमाणे जीवाला आपल्याकडे नेण्यास परमात्मा हा प्राणरूपी दूताला भ्रुकूटि- मध्यरूपी स्टँडवर, स्टेशनवर, विमानतळावर पाठवीत असतो. तेथे जीव आला नसला तर प्राण परत जातो. परमात्मा प्राणाला सतत पाठवीत असतो. जीव जर भ्रूमध्यात गेला तर प्राण हा त्याला परमात्म्याकडे घेऊन जातो.

## १९ मे

मॅट्रिकच्या परीक्षेत नापास होऊ नये म्हणून पाच सहा तास अभ्यास करावा लागतो. व्यवहारात जर असे करावे लागते तर जन्ममरणाची ठोकर चुकविण्यास किती तास साधन करावे लागेल याची कल्पना करता येईल.

माणसाला अनेक गोष्टी हव्या असतात. पण त्या सर्व वस्तु त्याला मिळू शकत नाहीत; नाही मिळाल्या की तो दु:खी होतो. आणखी असे की मनुष्याला कितीही गोष्टी मिळाल्या तरी त्याचे कधीच समाधान होत नाही. तेव्हा या जगात जर थोडे फार सुख हवे असेल तर माणसाने आपल्या इच्छेला कुठेतरी मुरड घातली पाहिजे. कारण माणसाच्या इच्छा जितक्या कमी तितके त्याला सुख जास्त.

शाळा कॉलेजातून परीक्षा पास झाली की पदवी मिळते. परमार्थात तसे होत नाही. एकादा साधु जिवंत असेपर्यंत त्याला सुद्धा मोहाचे प्रसंग येत असतात. जर तो मोहाला बळी पडला तर तो साधु म्हणून वाया गेला. जो मोहातून बाहेर पडतो तोच खरा साधु. म्हणून साधु मेल्यावरच त्याची साधु ही पदवी कायम होते.

पुष्कळ लोक परमार्थाविषयी अथवा अध्यात्माविषयी फार चांगले विवेचन करतात, व्याख्यान देतात, प्रवचन-कीर्तन करतात. त्याची लोकांना भुरळ पडते. परंतु बोलणाऱ्याला कसलाच पारमार्थिक अनुभव नसल्याने, तो मात्र स्वत: मनात तळमळत असतो.

## २० मे

अनेक लोकांना असे वाटते की आपण जिवंत असतानाच आपली कीर्ति जगात पसरावी. त्यासाठी ते आपला उदो उदो करून घेतात अथवा करवून घेतात, आपली चरित्रे आपणच प्रसिद्ध करतात, आपले पुतळे उभारून घेतात. पण असे करून का कोठे त्यांना कीर्ति मिळते? परमेश्वराच्या मनात ज्याची कीर्ति पसरावयाची असते तोच पुरुष कीर्तिमान होतो.

या जगात प्रत्येक माणसाला शोकमोहाचे प्रसंग येत असतात. त्यातून कोणीही सुटलेला नाही. परमार्थ जर मुरला असेल तर व्यवहारात त्याची खूण अशी की परमार्थी माणूस शोक आणि मोह यांनी खचून जात नाही. त्याची समाधान वृत्ति बदलत नाही. मनाचे सदा समाधान रहाणे हेच परमार्थ साधल्याचे आणि मुरल्याचे लक्षण आहे.

एकादी गोष्ट आपणास मिळत नाही तेव्हा 'मी तिचा त्याग केला आहे' असे म्हणणे निरर्थक आहे. तो काही खरा त्याग नव्हे. हत्ती जवळ नाही आणि ' हत्तीवरील अंबारीत बसण्याचे मी सोडून दिले आहे' असे जर कुणी म्हणाला तर त्याच्या म्हणण्याला काही अर्थ आहे का? हा खरा त्याग नव्हे. जवळ वस्तु असताना स्वेच्छेने ती सोडली तर तो खरा त्याग झाला.

# २१ मे

परमार्थ हा करावयाचा नसून तो व्हावयाचा असतो असे म्हटले जाते. या म्हणण्याचा अर्थ नीटपणे लक्षात घ्यावयास हवा. एकजण राजाचा सेवक आहे. साहजिकच स्वतंत्ररीत्या काही करण्याचे त्याचे हातात नाही. राजाची सेवा करणे, त्याच्याजवळ उपस्थित रहाणे, त्याच्या इच्छेप्रमाणे वागणे, इतकेच त्याचे काम आहे. त्या सेवकाप्रमाणे गुरूंनी आपल्या देहात जे चैतन्य दाखवून दिले आहे त्याचे जवळ सतत उपस्थित रहाणे, त्याचेवर लक्ष ठेवणे हे काम आपणच करावयाचे आहे. त्या चैतन्यात आपल्या इच्छेने काही फेरबदल करणे हे आपले काम नाही आणि तशी सत्ता अथवा सामर्थ्य आपणाजवळ नाही. या अर्थाने आपण परमार्थ करावयाचा नाही, तो आपल्या हातात नाही. तसे जर नसते, तर नामस्मरण करा, साधन करा या म्हणण्याला काही अर्थ रहाणार नाही.

जीव आणि आत्मा हे जरी एकच आहेत तरी साधन करून ते एकत्व साधण्याची आवश्यकता आहे. याचे कारण असे :- समजा, एका माणसाजवळ संपत्ति आहे परंतु तिच्यावर एक भलामोठा भुजंग बसला आहे. आता तो भुजंग दूर करण्याची खटपट केल्याशिवाय ती संपत्ति त्याला मिळणार नाही. किंवा :- एकाद्याची एकादी वस्तु हरवली आहे. ती त्याच्याजवळच कुठेतरी आहे. पण ती हुडकून काढल्याशिवाय ती त्याला मिळत नाही. जीवाच्या भोवती उपाधि जमली आहे. ती उपाधि साधनाने दूर करावयाची आहे. तसे झाले की जीव आत्मरूपच.

## २२ मे

या संसारात तीन गोष्टी आपणास मोहात पाडणाऱ्या आहेत. त्या म्हणजे स्त्री, संपत्ति आणि सन्मान अथवा कीर्ति. या तीन गोष्टींच्या प्राप्तीसाठी माणूस अनेकदा नको ते करतो, जीव टाकतो. या तीन गोष्टींत अडकून आणि गुंतून न पडणे, हे परमार्थ दृष्टीने महत्त्वाचे आहे.

माणूस म्हटला की प्रत्येकाचे ठिकाणी काही गुण आणि काही अवगुण असतातच. त्या गुणांचे आणि अवगुणांचे प्रमाण कमी अधिक असू शकते. गुण जास्त असल्यास तो सज्जन म्हटला जातो, अवगुण अधिक असल्यास तो दुर्जन म्हटला जातो. सज्जनाचे ठिकाणी एकाददुसरा अवगुण असू शकतो आणि दुर्जनाचे ठिकाणी एकाद दुसरा चांगला गुण असू शकतो.

विशिष्ट परिस्थितीत माणसाला मृगजळ दिसते. तेथे खरोखर पाणी असते काय? नाही. तेथे वाळवंटावर पाण्याचा खोटा आभास असतो. तेथे पाणी पहाणे ही जी दृष्टि आहे ती खोटी, चुकीची आहे. त्याप्रमाणे आत्म्यावर जगत् पहाणे ही दृष्टि खोटी व चुकीची आहे. आपली दृष्टि ही आत्म्यालाच जगाच्या रूपाने पहाते. तेव्हा दोष दृष्टीत आहे. म्हणून दृष्टि बदलावयास हवी. आपली दृष्टि बदलली की आत्म्यावर जग न दिसता आत्मरूपच दिसू लागते.

## २३ मे

जीवाने परमात्मरूप होणे हे मानवी जीवनाचे साध्य आहे. त्यासाठी जीव आणि शिव यांची गाठ पडावयास हवी. तसे झाले की दोघे परमात्मरूप होऊन जातात. जीवाची आणि शिवाची भेट होण्यास प्राणाची मदत लागते. ज्या प्राणाच्या साहाय्याने जीवाशिवाचे मीलन घडून येते, तो प्राण म्हणजे शरीरात कार्यप्रवण असणाऱ्या प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान या पाच प्राणांतील कोणताही प्राण नव्हे. जो प्राण सहस्रदल स्थानात आहे, तोच या जीवशिवांची भेट घडवून आणतो. हा प्राण प्रसन्न करून घ्यावा लागतो. हा प्राण प्रसन्न होण्यास साधक जीवाने गुरूने सांगितलेल्या साधनाचा अभ्यास करावयास हवा.

सहस्रदलस्थानात आत्मा/परमात्मा निवास करून असतो. त्याच स्थानी सोहं आहे. या सोहं मध्ये जो चिद्वायु आहे त्याची गति आहे.तेथे प्राण हा गतिरूप आहे. या प्राणाची गति सहस्रदलस्थानापासून थेट भ्रुकुटींच्या मध्यभागापर्यंत येत असते. डाव्या कानाच्या वरील भागात असणाऱ्या दक्षिणशिखा नावाच्या स्थानातून प्राणाची गति ही भ्रूमध्यापर्यंत येत असते.त्याच्या खाली ती येत नाही.पण या प्राणगतीच्या जोरावरच शरीरातील प्राण,अपान इत्यादि पंचप्राण आपापले कार्य करीत असतात.

## २४ मे

शरीराच्या उपाधीत सापडलेले जीवन म्हणजेच उपाधिभूत जीवन.ते गतिरूप आहे.ती गति नेहमी हृदयापर्यंत वहात असते.या उपाधिभूतजीवनातच चार देहांची म्हणजे स्थूल,सूक्ष्म, कारण आणि महाकारण या चार देहांची तत्त्वे आहेत. ही चार तत्त्वे जड आहेत.म्हणून या चार जड तत्त्वांचा निरास झाल्याशिवाय उपाधिभूत जीवन हे हलके होऊन ऊर्ध्वमुख होऊ शकत नाही. साधनाच्या अभ्यासाने उपाधिभूत जीवनातील - चार देहांचा, चार जड तत्त्वांचा-निरास झाला की हलके झालेले शुद्ध जीवन हे ऊर्ध्वमुख होऊन मग ते भ्रूमध्यस्थानात येते.तेथे प्राणाची गति येत असते.त्या स्थळी ऊर्ध्वमुख झालेले शुद्ध जीवन हे प्राणाच्या गतीत मिसळून जाते.एकरूप झालेल्या या दोन गति सहस्रदल स्थानात जातात.सहस्रदलस्थानात ही गति जीवाला धक्का देते आणि ती जीवाला शिवाकडे पहावयास लावते. जीव शिवाकडे वळला आणि त्याने शिवाला पाहिले की जीव शिवरूप होऊन जातो.जीव हा शिवाशी एकरूप झाला की शिवाच्या ज्ञान या उपाधीचा निरास होतो.अशा प्रकारे जीव आणि शिव या दोघांच्या उपाधि नष्ट होऊन ते एकरूप झाले की ते परमात्म्याच्या रूपात मिसळून जातात. ते परमात्म्याशी एकरूप होऊन जातात. अशाप्रकारे परमात्मरूप होणे हे जीवाचे साध्य त्याला प्राप्त होते.

## २५ मे

मानव म्हणजे देह अधिक आत्मा असे आहे. देहासाठी प्रपंच करावा लागतो. आणि आत्म्यासाठी परमार्थ करावा लागतो. या दोहोंची योग्य ती सांगड आवश्यक आहे.जीव कितीही ज्ञानी झाला तरी त्याला दुपारची वेळ चुकत नाही.त्यासाठी आवश्यक तितका प्रपंच करावयास पाहिजेच.पण प्रपंच म्हणजेच सर्वस्व असे न मानता आत्म्याकडे लक्ष देण्यास परमार्थ करणे हे जरूर आहे.याचा अर्थ असा की प्रपंच करतानाच योग्य त्या पद्धतीने परमार्थ केला तर प्रपंच व परमार्थ यांची सांगड जमू शकते,आजच्या काळी माणूस पैसा, सत्ता इत्यादि प्रापंचिक गोष्टींच्या मागे लागलेला दिसतो.मग बहुसंख्य लोकांना मानसिक शांति मिळत नाही.मनाची शांती प्राप्त करून घ्यावयाची असल्यास परमार्थ आवश्यक आहे. त्यासाठी आजचे माणसाचे विचार इकडे तिकडे भरकटत गेले आहेत ते बाजूला होणे आवश्यक आहे.भौतिक साधनांनी मनाला शांति मिळत नाही. मनाच्या शांतीसाठी मन स्थिर होणे आवश्यक आहे.परमार्थाने मनातील नको ते विषय दूर झाले की मन स्थिर होते. मन निर्विषय होणे हेच मनाच्या शांतीचे कारण आहे.

संताच्या अध्यात्मशास्त्रात आत्मा हे एकच मूल तत्त्व आहे.त्या आत्म्याला प्राप्त करून घेण्यास बाह्य गोष्टी लागत नाहीत. आत्मप्राप्तीसाठी उपयोगी पडणारे साधन आपल्या शरीरात आहे.ते साक्षात्कारी संत दाखवून देतात.

## २६ मे

बाह्य विषयातून सुख मिळेल या आशेने माणूस बाह्य विषयांकडे आकृष्ट झाला आणि तो परावलंबी बनला. मुळातच जीव हा बाह्य आकर्षण असणारा असा आहे. विज्ञानाच्या भौतिक प्रगतीने त्याला बाह्य पदार्थांचे अधिकच आकर्षण वाटू लागले.पण भोवतालची परिस्थिती आणि बाह्य सुखे ही तत्कालिक आहेत अशी खात्री पटून गुरूंच्या उपदेशानुसार जर जीव अंतर्मुख झाला तर तो मनात शांत होईल.

आज जगात अनेक धर्म आहेत., त्यांच्या अनुयायांच्या आचार विचारांत फरक आहे. त्या फरकामुळे गैरसमज निर्माण झाले आणि संघर्ष सुरू झाला, कलह निर्माण झाला. खरे म्हणजे खरा धर्म वेगळाच आहे. समर्थ रामदास स्वामीनीं सांगितल्या- प्रमाणे स्वरूपी राहणे हा स्वधर्म आहे. आणि याच स्वधर्माचे पालन जगात माणसांकडून व्हावयास हवे.

अध्यात्मशास्त्रात अगर परमार्थात संतांनी नाम साधनावर भर दिला आहे. नामाने माणसांचा आचार, विचार आणि उच्चार हे सर्व बदलू शकतात.वाल्या कोळी आणि अजामीळ ही प्राचीन उदाहरणे याचे निदर्शक आहेत. मधल्या काळात सज्जन कसाया सारखे लोक बदलल्याची उदाहरणे आहेत. आजच्या काळातही अशी अनेक उदाहरणे सापडू शकतात.सारांश नामाने माणसाचा स्वभाव पालटू शकतो. रामावतारात सेतू बांधताना दगडसुद्धा पाण्यावर तरंगले. मग हा मनुष्यरूपी दगड नामाने संसार-सागर तरून जाणार नाही काय?

## २७ मे

प्रक्षोभक घटना, लेख, साहित्य, विचार, भाषणे यांच्यामुळे वातावरण प्रक्षुब्ध होते. त्यामुळे अशांतता, अस्वस्थता, निर्माण होते. यावर उपाय असा :- नामस्मरणाने मनातील प्रक्षोभक वृत्ति नाहीशी होते, शांती आणि समाधान मिळते.

नाम हे स्वसंवेद्य, स्वत:सिद्ध आणि स्वयंपूर्ण आहे. ते स्व ची ओळख करून देते. स्व हेच सर्व काही आहे. अथवा सर्व काही स्व च आहे.हे स्व म्हणजे आपला आत्मा आहे.

नामाचा आणि ब्रह्माचा सबंध आहे. नाम हेच ब्रह्म आहे.ब्रह्म ब्रह्म असे म्हणून ब्रह्म भेटत नाही तर नामानेच ब्रह्माची अनुभूति येते, नामानेच ब्रह्माचा साक्षात्कार होतो.

या विश्वाच्या बुडाशी एक सोहंतत्त्व आहे.सोहं शिवाय अन्य काही नाही.हे ज्ञान सोहंस्वरूपी सद्गुरूने कृपा केली तर होते. गुरुकृपेने व्यावहारिक ज्ञान होत नाही. परंतु आत्मज्ञान मात्र नक्की होते. आता या सोहंची जर सोहं साधना साधली तर मात्र सोहंचा साक्षात्कार होतो.

ब्रह्म हे शब्दांच्या पलीकडे आहे. ते शब्दांनी अथवा शब्दांमध्ये सांगता येत नाही. ते कोणत्याही लौकिक अथवा व्यावहारिक शब्दांनी व्यक्त करता येत नाही.म्हणून ते नि:शब्द आहे असे म्हटले जाते. तथापि ब्रह्म हेच सत्य आहे हे लोकाना कळावे या उद्धेशाने संतांनी विविध प्रकारांनी शब्द वापरून ब्रह्माचे स्वरूप आपणांपुढे मांडले आहे.

## २८ मे

समर्थ रामदास स्वामी असे सांगतात :- स्मरण देव स्मरण देव स्मरण देव जाणा. त्यांचे मते स्मरण हा देव आहे. येथे स्मरण म्हणजे काय असा प्रश्न आहे. व्यवहारात आपण जे स्मरण आणि विस्मरण असे शब्द वापरतो, त्यातील स्मरण म्हणजे देव नव्हे हे अगदी उघड आहे.तर ज्या स्मरणातून विस्मरण घडते आणि विस्मरणातून स्मरण घडते ते खरे देवस्वरूप स्मरण होऊ शकत नाही.जसे :- ज्या सुखातून दुःख निर्माण होते त्याला खरे सुख म्हणता येणार नाही.समर्थ रामदास स्वामी ज्या स्मरणाला देव म्हणतात, ते स्मरण अगदी वेगळे आहे. अखंड स्मरण म्हणजे स्मरण आणि ते देव आहे.

आत्मा, परमात्मा, ब्रह्म, परब्रह्म या शब्दानीं दाखविले जाणारे जे एकमेव तत्त्व आहे तेच अंतिम सत्य तत्त्व आहे. आत्मा हा अनंत अपरिच्छिन्न, अविभाज्य, निर्विकल्प, नि:शब्द असून तो पूर्ण, सनातन आहे.या आत्म्यात म्हणजे ब्रह्मात कोणत्याही प्रकारचा विकार घडत नाही.म्हणून आत्मा निर्विकार आहे. आत्मा/ ब्रह्म ही वस्तु निश्चळ आहे. ब्रह्म वस्तु ही सत् चिद्घन आहे.अंतिम तत्त्व असणारे ब्रह्म हे निर्गुण आहे. आणि या निर्गुणापासूनच सगुण होते ही वस्तुस्थिति आहे. तूप थिजले आणि तूप पातळ झाले; त्याप्रमाणे सगुण निर्गुणाची कथा आहे.

व्यवहारात आपणास अनेक गोष्टी इतरांकडून शिकून घ्याव्या लागतात. परमार्थ हा तर आपणास नवखा विषय. तो सांगण्यास परमार्थ जाणणारा पुरुष हवा. तोच सद्गुरू किंवा गुरू. मोक्षाची प्राप्ती हे परमार्थाचे साध्य असून ते मिळविण्यासाठी काय करावयास हवे हे गुरू सांगतो. म्हणून परमार्थ करणाऱ्याला गुरूची आवश्यकता आहे.

गुरू हा देहधारी असला तरी देह हे गुरूचे/सद्गुरूचे खरे स्वरूप नव्हे. गुरूचे सत्य स्वरूप आणि कार्य पुढीलप्रमाणे आहे. गु म्हणजे गुप्त आणि रु म्हणजे रूप. आत्म्याचे गुप्त रूप जो दाखवितो तो गुरू. देहातील व दृश्यातील असे आत्मरूप दाखवून देण्याचे कार्य गुरू करतो. सत् असणाऱ्या आत्म्याचे स्वरूप जो दाखवून देतो तो सद्गुरू होय.

गुरुपद म्हणजे तत्पद. तत्पद म्हणजे स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण या चार देहांच्या पलीकडे असणारे आत्मतत्त्व. तत्पद म्हणजेच सत्पद. आणि सत्पद म्हणजेच चित्पद. याचा अर्थ असा की गुरू हे आत्मरूपच असल्याने ते चैतन्यरूप आहेत, आणि त्यांचे पद हे सुद्धा चैतन्यरूप आहे. निखळ चैतन्य हे गुरूचे खरे स्वरूप आहे. गुरू हा सत् म्हणजे सत्तारूप/अस्तित्वरूप आहे. सत् म्हणजेच चित्. म्हणून सद्गुरू म्हणजे शुद्ध चैतन्य होय. सत्, चैतन्य, चित् शक्ति, सद्गुरू हे सर्व शब्द समानार्थक आहेत.

## ३० मे

सद्गुरू हे सोहं-स्वरूप आहेत. सोहं मधील आकाश म्हणजे चिदाकाश. या चिदाकाशात आत्मा तेजोरूपाने तळपत आहे. तेच गुरूचे खरे स्वरूप आहे. सोहंच्या स्वरूपात सद्गुरू नटलेले आहेत. मानवी देहात मस्तकामध्ये सहस्रदल स्थानात जी सोहंगति आहे, ती गति म्हणजेच सद्गुरूचे चरण आहेत. चैतन्यरूप सद्गुरूचे चरण हे चैतन्यरूप आहेत.

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् इत्यादि जो श्लोक आहे तो सद्गुरूंचे सत्य स्वरूप स्पष्ट करून सांगणारा आहे. सद्गुरू हा ब्रह्मानंद देणारा म्हणजे श्रेष्ठ, अक्षय आनंद देणारा, केवळ ज्ञानस्वरूप म्हणजे चैतन्य स्वरूप, सुख-दु:ख, मान-अपमान, शीत-उष्ण इत्यादि द्वंद्वांच्या पलीकडे असणारा, गगनाप्रमाणे सूक्ष्म आणि सर्व व्यापक, तत्त्वमसि इत्यादि उपनिषदातील वाक्यांचा लक्ष्यार्थ म्हणजे ब्रह्मस्वरूप, तेच ब्रह्मस्वरूप असणारा, एकमेव एक, नित्य, शुद्ध, निश्चल आणि बुद्धीचा साक्षी या स्वरूपात प्रत्येक देहात असणारा, सर्व भावांच्या अतीत असणारा, सत्त्व-रज-तम या तीन गुणांनी रहित, असा गुरू असतो. थोडक्यात सांगायचे झाल्यास गुरू हा ब्रह्मस्वरूप असतो. साहजिकच सद्गुरूपेक्षा अन्य काहीही श्रेष्ठ नाही. सद्गुरू हाच सर्वश्रेष्ठ ब्रह्म अथवा आत्माही आहे.

## ३१ मे

सच्चिदानंद अशा ब्रह्मामध्ये चंचल गुण येतो. या चंचल गुणामुळे विश्वाचा खेळ होतो. चंचल मायेमुळे जग निर्माण होते. चंचल मायेमुळे आकारास आलेले हे विश्व मात्र ब्रह्माप्रमाणे सत्य नाही. विश्व म्हणजे पर ब्रह्मावरचा आभास आहे. शिंपेवर जसा रुप्याचा भास होतो त्याप्रमाणे ब्रह्मावर विश्वाचा भास होतो. खरे म्हणजे ते सर्व ब्रह्म आहे. पण ते आपणास ब्रह्म म्हणून कळत नाही. आपणास जगच भासते. परंतु तात्त्विक दृष्टीने पाहिले तर सर्व विश्व ब्रह्मच आहे. साहजिकच या जगात देह इत्यादींच्या उपाधींत सापडलेला जीव हा सुद्धा तत्त्वत: ब्रह्मच आहे. म्हणून 'जीव तो पहाता ब्रह्मरूप जाण' हे वचन सत्य आहे.

जीव जरी तत्त्वत: ब्रह्म असला तरी तो या जगात नानाप्रकारच्या उपाधीमध्ये सापडलेला आहे. आणि अज्ञानाने तो स्वत:ला कर्ता, भोक्ता इत्यादि वेगळे काहीतरी आहोत असे मानीत आहे. आपण आत्मा/ब्रह्म आहोत हे तो विसरून गेला आहे. म्हणून त्याचे लक्ष ब्रह्माकडे/आत्म्याकडे असत नाही. तथापि जीव हा जर संतांकडे गेला, एकाद्या आत्मसाक्षात्कारी गुरूकडे गेला, तर गुरू त्याला सांगतो 'बाबा रे, देह इत्यादि तू नाहीस. तू स्वत:च ब्रह्म/आत्मा आहेस'. उपाधि दूर करून ब्रह्मरूप कसे व्हायचे याचा मार्ग/उपाय गुरू त्या जीवाला सांगतो.

## १ जून

गुरू जीवाला सांगतात की नाम हेच ब्रह्म आहे. सद्गुरू त्याला शरीरात असणारे गतिरूप नाम दाखवून देतात. सद्गुरूंनी सांगितलेले साधन शिष्य करू लागला की त्याला पवनसिद्धि प्राप्त होते. अशी पवनसिद्धि साधकाला प्राप्त झाली की 'पवनसिद्धि झालिया प्रगटे आत्माराम' असा अनुभव शिष्याला येतो.

पवनसिद्धि म्हणजे 'प्राणाचा मनाचा एक लय होता/ तत्त्वे तत्त्व सारीता पवनसिद्धि' असे गुरू सांगतात. प्राणाचा आणि मनाचा एक लय होण्यास जीवाने प्राणावर दृष्टि ठेवणे आवश्यक आहे. असे हे प्राणाचे साधन म्हणजे नामाचे साधन आहे. आत्म्याचा अनुभव येण्यास नाम हेच साधन आहे आणि नाम हे ब्रह्म आहे. याचा अर्थ असा की नाम हे साधनही आहे आणि साध्यही आहे.

हे नामाचे साधन म्हणजेच पवनसिद्धि प्राप्त होत असताना, नाद आणि प्रकाश या स्वरूपात आत्म्याचे अनुभव साधकाला येऊ लागतात. ज्या साधकाचे नामसाधन सिद्ध होऊन त्याला आत्मसाक्षात्कार होतो तो साधक या विद्यमान जीवनातच मुक्त होतो म्हणजे तो जीवनमुक्त होतो. या जीवनमुक्तावर व्यावहारिक जीवनातील सुखदु:खे कोसळत असली तरी त्यामुळे त्याची चलबिचल होत नाही, त्यांचा त्याच्यावर परिणाम होत नाही. तो आत्मानंदातच निमग्न होऊन रहातो.

## २ जून

ब्रह्म हे नि:शब्द असल्याने, शब्दांनी त्याच्याविषयी काही सांगता येत नाही हे खरे असले तरी शब्द वापरल्याशिवाय ब्रह्माविषयी कुणालाच काही सांगता येणार नाही. परंतु असे सांगितल्याशिवाय ब्रह्म आहे हे कळणार कसे? म्हणून शब्द वापरून ब्रह्म हे सत् चित् आनंद आहे असे सांगावे लागते. म्हणजे ते अस्ति, भाति, प्रिय या स्वरूपाचे आहे. सत् ब्रह्म हे सर्वांचे मूळ आहे. सत् म्हणजे तीन काळांतील अस्तित्व. स्वप्न हे ज्याप्रमाणे जीवाचा विलास आहे त्याप्रमाणे चित् हा सत्चा विलास आहे. आणि सत् मध्ये चित् मिसळले की आनंद.

नि:शब्द असणाऱ्या ब्रह्माबद्दल संतांनी शब्दाद्वारे आपल्याला बोध केला. परंतु हे संतांचे बोलणे आणि आपले नेहमीचे बोलणे हे एकाच पातळीवरचे नाही. आपल्याला काही कळावे म्हणून संतांनी शब्द वापरले इतकेच. संतांचे बोलणे हे अद्वैत, अभेद दाखविणारे असल्यामुळे ते 'अबोलणे' ठरते.

ब्रह्माविषयी शब्दांचे द्वारा कितीही सांगितले तरी शब्दांचा ग्रास केल्याशिवाय नि:शब्द ब्रह्मात शिरता येत नाही. यासाठी शब्दानेच शब्दाचा ग्रास करावा लागतो. ज्याप्रमाणे रानामध्ये पायात मोडलेला काटा हा दुसऱ्या काट्याने काढला जातो, तद्वत् शब्दानेच शब्दाचा ग्रास होतो.

# ३ जून

संकल्प विकल्प करणे हा मनाचा स्वभाव आहे. हे संकल्प विकल्प प्राय: बाह्य दृश्य अशा विश्वाशी निगडित असतात. संकल्प विकल्प करणे हाच मनाचा हट्ट, व्रात्यपणा आहे. त्याचा हट्ट दूर करावयाचा म्हणजे त्याचे संकल्प विकल्प दूर करावयाचे. मनातील विचार दूर करण्याचा प्रयत्न करावा लागतो. असा प्रयत्न करताना विचार येतच राहतील पण प्रयत्न न सोडता तो सतत चालू ठेवला तर मन विचार करणे सोडून देते.

एकादा हुषार शिक्षक वर्गातील व्रात्य मुलाची स्तुति करून त्याचे कडून योग्य ते काम करवून घेतो. त्याप्रमाणे व्रात्य मनापासून काम करवून घेण्यास समर्थ रामदास स्वामी मनाला 'सज्जन' म्हणतात आणि मग त्याला सांगतात 'जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे.' आता जे निंद्य सोडावयाचे आहे ते रामदास स्वामींनी याच ओळीत सांगितले आहे. 'जनी सर्व' ते 'निंद्य' आहे. याचा अर्थ असा की या जगात जे जे सर्व दिसते ते ते निंद्य आहे. म्हणजे सर्व दृश्य हेच निंद्य आहे. तेव्हा निंद्य टाकणे म्हणजे दृश्य टाकणे. येथे प्रश्न असा:- बाहेर दृश्य आहे ते आपल्या ताब्यात नाही. ते कसे टाकावयाचे? याचे उत्तर असे:- बाह्य दृश्यात आपली ममता, आसक्ति गुंतली आहे. या दृश्याची आसक्ति टाकली की दृश्य टाकले असा अर्थ होतो.

निश्चल ब्रह्मात उठणारे चंचल म्हणजे माया. या मायेमुळे उपाधि निर्माण होऊन 'जीव' आणि 'शिव' अशी भेदाची भाषा येते.

# ४ जून

नामाचे गायन करून मिळवावयाचे तरी काय, असाही प्रश्न येऊ शकतो. व्यापार वगैरे करताना भांडवल म्हणून पैसा गुंतवून शेवटी पैसाच मिळवायचा असतो. त्याप्रमाणे नामाने नामच मिळवायचे आहे. मिळवायचे नाम म्हणजे ब्रह्म आहे हे मात्र विसरू नये.

नाम हे 'कल्पांतीचे बीज' आहे असे म्हटले जाते.कल्पांत म्हणजे प्रलय. आता हा कल्पांत कुणी पाहिला आहे आणि तेथपर्यंत आपण कुठे जिवंत राहणार आहोत? तेव्हा कल्पांत म्हणजे काहीतरी निराळे असले पाहिजे. कल्प म्हणजे कल्पना आणि कल्पनेचा अंत म्हणजेच कल्पांत. आता कल्पनेचा अंत ज्यामध्ये होतो ते नामच आहे.

शरीरात रामनामाचा ध्वनी उमटतो आहे. हा ध्वनि ऐकावयाचा असेल तर शरीरात होणाऱ्या इतर नादांना बाजूला सारून तो लक्षपूर्वक ऐकावा लागतो.जसे घड्याळाची टिकटिक चोवीस तास चालू असते. ती ऐकण्यास प्रयत्नपूर्वक तिकडे लक्ष द्यावे लागते; त्या प्रमाणे शरीरात होणाऱ्या रामनामाचा ध्वनि ऐकण्यास प्रयत्नपूर्वक तिकडे लक्ष द्यावे लागते.

शरीरात रामनामाचा जो ध्वनि उमटतो आहे त्याला काही संतांनी 'रामनामाचा डंका' असे म्हटले आहे. कधी त्या रामनाम ध्वनीला चौघडा असेही म्हटले गेले आहे.त्याला चौघडा असे म्हणण्याचे कारण स्थूल,सूक्ष्म, कारण आणि महाकारण या चारही देहांमध्ये या रामनामाचे स्फुरण होत आहे. या चारही देहांत रामनामाचा ध्वनि आहे, म्हणून 'नामाचा चौघडा' असे म्हणतात.

## ५ जून

शरीरात जो रामनामाचा ध्वनि स्फुरण पावत आहे त्याला काही संतानी नौबत असेही म्हटले आहे. आता ही नौबत कुणाला ऐकू येते? ज्या माणसाच्या इच्छा कमी झाल्या आहेत त्या माणसाला ही नौबत ऐकू येते.

इच्छा कमी कशा होतात? शरीरात खेळणाऱ्या वाऱ्यानेच इच्छा वाढत जातात. तसेच त्या वाऱ्यानेच इच्छा कमी होत जातात. जसे :- वाऱ्याने पाण्यावर लाट येते आणि ती वाऱ्यानेच नाहीशी होते. किंवा :- वाऱ्यानेच (तेलाचा) दिवा लागतो आणि वाऱ्यानेच दिवा विझतो.

देहामध्ये चोवीस तास रामनामाचा जो चौघडा वाजत आहे तो फक्त संतांनाच ऐकू येतो. आता संत तरी कुणाला म्हणावे? 'करी वृत्ती जो संथ तो संत जाणा' या वचनाला अनुसरून ज्याने आपली वृत्ती संथ केली आहे तो संत म्हणावा.म्हणजे ज्याची मनोवृत्ति संथ झाली आहे त्याला रामनामाचा ध्वनि ऐकू येतो.

जोपर्यंत माणसाच्या शरीरात वारा वहात आहे तोपर्यंतच माणूस जिवंत राहतो.देहात जसा वारा आहे तसाच बाह्य जगातही वारा आहे. तथापि शरीरातील वारा हा बाहेरील वाऱ्यापेक्षा भिन्न आहे. देहातील वारा मरेपर्यंत शरीरातच राहतो. मेल्यावर बाह्य वारा जरी शरीरात भरला तरी माणूस जिवंत होऊ शकत नाही.

## ६ जून

आत्मसाक्षात्कार करून घेणे हा जीवाचा जन्मसिद्ध हक्क आहे, हे सांगण्याचे काम संत करतात.

आत्मसाक्षात्काराचा मार्ग लुप्त झाला असल्यास त्याचे पुनरुज्जीवन करण्यास किंवा एकादा नवीन मार्ग दाववि्ण्यास संत प्रयत्नशील असतात. आत्मसाक्षात्काराचे साधनाची कृती इतरेजनांना सांगणे हेच संतांचे काम आहे.

संताची सर्व माणसांवर सारखी /समान माया असते. संत इतरेजनांना कधीही नाउमेद करत नाहीत.

इतरांच्या अंत:करणातले प्रश्न जाणून घेऊन संत त्यांच्या शंकांचे समाधान करतात, त्यांचे संशय दूर करतात.

संत दुसऱ्याचा काहीतरी फायदाच करून देतील. लोकांचे नुकसान मात्र ते कधीच करणार नाहीत.

संत दयाळू असतात. त्या दयाळूपणामुळे संत हे कधी कधी इतरांची दुखणी आपणांवर घेतात आणि त्यांना रोगमुक्त करतात.

संत ईश्वरीय ज्ञान लोकांना सांगतात, आणि आचरणाचा मार्ग इतरांना दाखवतात. ते मार्गदर्शक असतात.

## ७ जून

व्यावहारिक जीवनात राहूनच परमार्थ कसा करता येतो हे संत स्वत:च्या उदाहरणाने दाखवून देतात.

संतानी मनात आणले तर ते इतरांची मनोवृत्ति बदलू शकतात. संतांच्या संगतीत राहिल्यास माणसाची मनोवृत्ति निवळते. संतांच्या सांनिध्यात आलेला वाईट मनुष्यही निवळू शकतो.

संतांचे संगतीने कोणाचेही अकल्याण होत नाही.

माणसाचे नशीब बदलता येत नाही हे खरे. तथापि संत प्रारब्धाचा प्रभाव कमी करू शकतात. समजा एखादच्या माणसावर गंडांतर येणार असेल तर ते संतांच्या सामर्थ्याने शेपटीवर निभावते,कमी त्रासदायक ठरते.

येन केन प्रकारेण बहिर्मुख असणारा, बाह्य विषयांत रममाण होणारा माणूस अंतर्मुख व्हावा, त्याचे लक्ष परमात्म्याकडे लागावे यासाठी संत हे प्रयत्नशील असतात. तसे करण्यात त्यांचा स्वत:चा असा कोणताच स्वार्थ असत नाही. ते निरपेक्षपणे आपला प्रयत्न करीत राहतात.

संतांच्या अथवा सद्गुरूंच्या उपदेशाप्रमाणे जर माणसाने साधनाचा आचार केला आणि साधन सिदूध केले तर तो माणूस मोक्षाचा अधिकारी होतो.

## ८ जून

जोपर्यंत माणसाला चैतन्याची ओळख नसते तोपर्यंत तो मेल्यासारखाच असतो. परंतु जेव्हा त्याला चैतन्याची ओळख होते तेव्हा तो खरा जिवंत होतो.एक वाघाचे पिल्लू होते. कर्मधर्मसंयोगाने ते लहानपणापासून मेंढरात वाढले. त्यामुळे ते स्वत:ला मेंढरू मानून मेंढराप्रमाणे वागत होते. आपण वाघ आहोत ही जाणीव त्याला नव्हती तोपर्यंत ते पिल्लू वाघ या दृष्टीने मेल्यासारखेच होते. पुढे एका वाघाने त्या पिल्लाला त्या दोघांचे प्रतिबिंब पाण्यात दाखवून ते मेंढरू नसून वाघच आहे अशी त्याची खात्री पटवून दिली. तेव्हा त्या पिल्लाला कळले की आपण मेंढरू नसून वाघ आहोत . त्यावेळी ते पिल्लू वाघ या दृष्टीने खरे जिवंत झाले. तीच तऱ्हा माणसाच्या बाबतीत आहे.

शरीरातील सहस्रदल स्थानात सोहं हंस आहे. या हंसाच्या गतीच्या मदतीने प्राण हा भ्रुकुटी मध्यापर्यंत येत असतो. त्या प्राणामध्ये ऊर्ध्वमुख झालेले उपाधिभूत जीवन जाऊन मिसळले की तेथे अनाहत ध्वनि ऐकू येऊ लागतो.

मानवाच्या देहात ७२००० नाड्या आहेत, असे काही उपनिषदे सांगतात.तथापि या सर्व नाड्यांमध्ये इडा आणि पिंगला या दोन वायुरूप नाड्या महत्त्वाच्या आहेत. इडा व पिंगला या सुषुम्ना नाडीत मिसळून तीन्हींची ऐक्यता म्हणजेच त्रिवेणी गंगा. तीन गुणांच्या पलीकडे त्रिकूट स्थानी ही त्रिवेणी गंगा वहात असते.

## ९ जून

भक्ति म्हणजे ईश्वराचे ठिकाणी प्रेम. पण हे प्रेम निर्माण होण्यास माणसाचे मन हे सर्व प्रकारच्या संगातून, आसक्तीमधून अलिप्त व्हावे लागते.

आत्म्याची केवल म्हणजे निर्हेतुक दृष्टी जेथे पडते त्याला शून्य म्हणतात. या शून्यातून आणि एक शून्य निर्माण होते. व त्यातून आकाश उत्पन्न होते. आकाश म्हणजे नादरहित अशी शबदस्थिती. प्रस्फु ट गगन म्हणजे अशब्द स्थिती. प्रस्फुट गगनातील अनाहत म्हणजे तेथील वायुलहरींचा नाद.

सर्व पापांचे मूळ माया आहे. या मायेचे सूक्ष्म धागेदोरे ब्रह्मरंध्र या स्थानापर्यंत पसरलेले आहेत. ब्रह्मरंध्र स्थानापर्यंत गेलेल्या साधकालासुद्धा माया मोहात पाडून मागे खेचू शकते.

परमात्म्याचे अखंड अनुसंधान साधकास लागावयास हवे. परंतु हे अनुसंधान साधनाचा आरंभ होताच लगेच लागत नाही. प्रथम अनुकंपन, नंतर अनुवृत्ति, मग छंद आणि त्यानंतर अनुसंधान असा क्रम आहे. प्रत्येकाचे ठिकाणी श्वासाचे अनुकंपन चालूच आहे. त्या अनुकंपनात दृष्टी लागली की अनुकंपनाची स्थिती येते. त्या अनुकंपनात वृत्ति तदाकार झाली म्हणजे अनुवृत्ति साधते. मनातील विचारांचे अभावी ही अनुवृत्ति प्राप्त होते. अनुवृत्ति लागली की तिचाच छंद होतो. छंद म्हणजे त्याशिवाय अन्य काही न सुचणे. आणि ज्याला छंद लागतो त्याला परमात्म्याचे अखंड अनुसंधान साध्य होते.

## १० जून

आत्मा सर्वव्यापक असल्यामुळे तो सर्व ठिकाणी आहे हे खरे. तथापि बाह्य जगातील कोणत्याही पदार्थात आत्म्याचा साक्षात्कार प्रथम म्हणजे पहिल्यांदा होत नाही. आत्मसाक्षात्कार हा सर्वप्रथम आपल्या शरीरात होणे आवश्यक आहे. तसा तो झाला तर आत्मा सगळीकडे कसा आहे याचा साक्षात्कार होतो.

मानवी देहात मस्तकाचे ठिकाणी सहस्रदलकमल या नावाचे एक स्थान आहे. शरीरात तेच आत्म्याचे निवासस्थान आहे. साधनाच्या अभ्यासाने जीवचैतन्य हे तेथे गेले की ते आत्मचैतन्याशी मिसळून जाते. त्यालाच आत्मसाक्षात्कार असे म्हणतात. आत्मानुसंधानाने आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो.

आत्मसाक्षात्कार ज्याला झाला आहे त्याचे आंतरिक जीवन हे संपूर्णपणे बदलून जाते. बाह्यदृष्ट्या तो आत्मसाक्षात्कारी पुरुष इतर सामान्य माणसांप्रमाणेच दिसत असतो. पण त्याचे आंतरजीवन वेगळेच होते ते असे :-

डोळे मिटल्यावर साक्षात्कारात जे आत दिसते ते त्या आत्मसाक्षात्कारी पुरुषाला डोळे उघडल्यावर बाहेरही दिसू लागते. बाहेरच्या वस्तूंचे आकार आणि विकार त्याच्या लक्षात येत नाहीत. कारण ज्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे त्याला जगात सर्वत्र आत्माच दिसतो.

## ११ जून

ज्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे त्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची तळमळ अथवा तडफड शिल्लक रहात नाही.

आत्मसाक्षात्कार झाल्याची मुख्य खूण म्हणजे त्या आत्मसाक्षात्कारी पुरुषाचे ठायी अहंकार हा औषधाला सुद्धा शिल्लक रहात नाही. मला अमुक हवे, मला तमुक नको, हे माझ्या मनाप्रमाणे व्हावयास हवे, अशाप्रकारचा कोणताच हट्ट अथवा दुराग्रह त्या माणसाचे ठिकाणी उरत नाही.

आत्मसाक्षात्कारी पुरुषाचे मन हे विकाररहित आणि विचाररहित असे होते. याचा अर्थ इतकाच की तो त्या त्या विकारात अथवा विचारात गुंतून पडत नाही. त्याच्या दृष्टीत विकार हे उमटत नाहीत.

बाह्य जीवनात आत्मसाक्षात्कारी पुरुषावरसुध्दा सुखदु:खाचे प्रसंग कोसळतात, असे इतरांना दिसते. तथापि त्या सुखदु:खांचा परिणाम त्याच्या मनावर होत नाही. त्याच्या मनाचा समतोलपणा ढळत नाही. त्याचे मनातील समाधान मुळीच भंग पावत नाही. आत्मसाक्षात्कारी पुरुष या जगातील व्यवहारात कुठेही आणि कसाही असो, त्याचे आत्मसमाधान संपत नाही, त्याच्या मनाच्या समतेला तडा जात नाही.

## १२ जून

संत संसारात असलेले दिसतात. आपण सामान्य लोकही संसार करीत असतो. पण या दोघांत फार मोठा फरक आहे. जसे:- झोपी गेलेला पुरुष आणि समाधि लावलेला पुरुष हे वरवर सारखेच दिसतात, पण त्या दोघांत फरक आहे. तसा फरक संसारातील संत आणि आपण यांमध्ये आहे. संत हे संसारात असूनसुध्दा ते संसारातून अलिप्त असतात.

भोग भोगून झाल्यावर त्याग करू असे काहीजण म्हणतात. पण ते तसे नाही. कारण मुद्दाम केलेला त्याग टिकत नाही. मन आणि इंद्रिये यांचा संयम जास्तीत जास्त किती काळ करता येईल? मनातल्या इच्छा कितीही दाबल्या तरी त्या केव्हातरी वर उसळून येणारच. याउलट आत्म्याचा भोग झाला की आपोआप त्याग होतो; तेथे संयम किंवा निग्रह करून मुद्दाम त्याग करावा लागत नाही. एकादे दृश्य पहावयास नको म्हणून डोळे मिटून घेणे व दृश्य पहात असतानासुध्दा ते दृष्टीत न शिरणे या दोहोंत जसा फरक आहे तसा फरक मुद्दाम त्याग करणे आणि आपोआप सहजपणे त्याग होणे या दोहोंत आहे.

माणसाला एकदा का आत्मस्वरूपाच्या आनंदाचा भोग प्राप्त झाला की त्याला अन्य कसलीही इच्छा उरत नसल्याने, त्याच्याकडून आपोआपच सहजरीत्या बाह्य विषयांचा त्याग होतो; त्यासाठी त्याला मुद्दाम प्रयत्नपूर्वक त्याग करावा लागत नाही.

## १३ जून

जीवाचे ठिकाणी देहबुध्दि आहे. या देहबुद्धीने तो बंधनात पडला आहे. तो जर चैतन्याचे नादानुसंधानात आला तर तो बंधनातून मुक्त होतो.

आहे म्हणून नाही आणि नाही म्हणून आहे असे जे काहीतरी आहे ते काही नाही असे म्हणणे हे काहीतरी होईल, यात काहीतरी संदेह आहे काय? ज्याच्यामुळे हे सारे आहे आणि ज्याच्या मुळे हे सारे नाही असे जे एक (चैतन्य हे) तत्त्व आहे, तेच खरे महत्त्वाचे आहे.

सारे जग जन्माला येते, गमनागमन करते म्हणून ते गतिमान आहे आणि म्हणून ते अलात –चक्राप्रमाणे आपणास प्रतीत होत आहे; पण हे जग ज्या चैतन्यामुळे प्रतीत होते, ते चैतन्य प्रतीतीला येणे हीच खरी प्रतीति आहे.

सृष्टी ही आत्मतत्वाचे ठिकाणी सहजच प्रतीत होत आहे. आत्मतत्व हेच जगाचे अधिष्ठान आहे.त्यामुळे ही सृष्टि आत्म्याने निर्माण केली अगर केली नाही, या म्हणण्याला तादृश काही अर्थ नाही, कारण सृष्टि हा आत्मशक्तीचा सहज चमत्कार आहे.

जीव आणि आत्मा एकच आहेत. आत्मा हा आनंदपूर्ण आहे; या उलट जीवाच्या मागे सुखदु:खाचे रहाट आहे, याचे कारण काय? आपण आत्मा आहोत हे जीव विसरला आहे आणि तो परिभ्रमणात सापडला आहे, हे त्याचे कारण आहे. परिभ्रमण म्हणजे बुद्धीची अस्थिरता, मनाची चलबिचल आणि चित्ताची धावपळ. जीवाचे हे परिभ्रमण थांबले की त्याला परमार्थातील आत्मानुभव यायलाच पाहिजे.

## १४ जून

ज्या ज्ञानातून सर्व शास्त्रे निर्माण झाली, ज्या ज्ञानामुळे आपणास सर्व ज्ञान होते,ज्या ज्ञानामुळें जागृति,स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थांचा अनुभव आपणांस येतो, जे ज्ञान अज्ञान निर्माण करीत नाही, ज्या ज्ञानामुळे जीव आणि शिव एकच आहेत याची अनुभूति येते, ती एक विशिष्ट ज्ञानावस्था आहे. आणि ही ज्ञानावस्था आपल्या शरीरात जन्माला आल्यापासून मरेपर्यंत जी जीवनाची गति वहात आहे तिच्यावर अखंड लक्ष राहिल्यास प्राप्त होते. या जीवनाच्या गतीचे ज्ञान झाले की ही ज्ञानावस्था प्राप्त होते. साधनाचा सतत अभ्यास घडला तर ही ज्ञानावस्था प्राप्त होते.

जीवाची जी चोवीस तास घालमेल चालली आहे, ती ज्यामुळे चालली आहे त्याचा उलगडा, त्याचे ज्ञान हे आपल्या जीवनाच्या गतीवर अखंड लक्ष राहिल्यास होणार आहे. आपल्या जड शरीराचा परमार्थाशी अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. तथापि शरीर असणे हे परमार्थाला आवश्यक आहे. कारण जर शरीरच नसेल तर परमार्थ साधताच येणार नाही. शरीर नसताना चैतन्याचा अनुभव घेता येणार नाही.

संत हे एकही श्वास फुकट घालवीत नाहीत. याउलट आम्ही किती श्वास फुकट घालवतो याची खिजगणती नाही. श्वासोच्छ्वासावर आपण जिवंत आहोत हे आपणा सर्वांना माहीत आहे. श्वासोच्छ्वास हा परमार्थात महत्त्वाचा आहे. पण त्याविषयी बेदरकार राहून आपण श्वास फुकट घालवीत असतो.

## १५ जून

शरीरातील जीवनाच्या गतीवर क्षणाक्षणाला ज्याचे लक्ष असेल, तर तसे लक्ष असणाऱ्या माणसाला जीव आणि आत्मा एक आहेत, हा अनुभव आल्यावाचून रहाणार नाही. ज्या नामाचा संत सज्जनांनी अट्टाहासाने अभ्यास केला, त्या नामाचा तोंडाने प्रत्यक्ष उच्चार करताच येत नाही. कारण ते नाम चैतन्यरूप असून वायुरूप आहे. हे वायुरूप नाम गतिस्वरूपात प्रत्येक माणसाच्या शरीरात आहे. या नामाच्या गतीशी आपली गति म्हणजे आपल्या मनाची गति मिसळली की नामस्मरण सुरू झाले असा अर्थ आहे. संतांनी या नामस्मरणाचा अट्टाहास धरला. या नामस्मरणाचा जो साधक अखंड अभ्यास करेल त्या साधकाला जीव आणि परमात्मा/ब्रह्म हे एकच आहेत, असा अनुभव येतो.

फक्त पाच मिनिटे साधनाच्या अभ्यासाला बसून परमार्थातले अनुभव येणार नाहीत. पाच मिनिटे साधन झाले की झाले, मग त्या साधनाबद्दल आपली बेपर्वाईची वृत्ति असते. असली बेफिकिरीची वृत्ति परमार्थात उपयोगी पडत नाही. आपण साधनाला बसतो खरे, परंतु आपले लक्ष घड्याळावर असते. असे हे साधन कितीसे प्रभावी ठरेल? हातातोंडाची गाठ पडण्यास व्यवहारात तासंतास राबावे लागते. तर प्राणापानाची गाठ पडायला पाच मिनिटांचे साधन उपयोगी पडेल काय? येथे प्राणापान म्हणजे आम्ही जो श्वास आत घेतो तो प्राण आणि जो बाहेर सोडतो तो अपान, हे मात्र लक्षात ठेवावे.

## १६ जून

आत्म्याचे अस्तित्व शरीरात आहे तोपर्यंतच त्या शरीराला किंमत आहे. आणि हे शरीर आहे म्हणूनच येथे आत्म्याचा अनुभव घेता येतो. शरीरच नसेल तर आपण आत्म्याचा अनुभव कसा बरे घेऊ शकू?

साधनाला बसणे म्हणजे साधन होणे नव्हे. सद्गुरूंनी दाखवून दिलेल्या गतीवर लक्ष जाणे, आपल्या बहिर्मुख वृत्ति अंतर्मुख होऊन, त्या गतीवरच अनुस्यूतपणे लक्ष राहणे, त्या गतीवर चित्त एकाग्र होणे, आणि मनातली वावटळ शांत होणे, हे जितका काळ जमेल तितका काळ साधन झाले असा अर्थ आहे.

नाम घेऊनसुद्धा जर मनाची अस्थिरता नाहीशी होत नसेल तर ते नाम घेऊन काय उपयोग आहे? आणि असे जर होत असेल तर आपल्यात काय दोष आहे हे आपण पहावयास हवे. आणि त्या बाबतीत योग्य ते मार्गदर्शन गुरूकडून घेतले पाहिजे.

पूर्वी शाळेत शिकणाऱ्यांच्यासाठी असे एक काव्य होते की शाळेला जाताना मुलांनी वाटेत तमाशा पहात थांबू नये. तसेच परमार्थात आहे. परमार्थाच्या वाटेवर अमाप आकर्षणे आहेत. परंतु त्यामध्ये गुंतून न रहाणे ही आपणा प्रत्येक पारमार्थिक माणसाची जबाबदारी आहे. आपण वाटेतच जर करमणुकीचे खेळ पहात बसलो तर परमार्थाची वाटचाल कशी व कधी होणार?

## १७ जून

काम, क्रोध इत्यादि सहा विकार जर वाढतच असतील तर परमार्थात आपली धडगत नाही याची खात्री बाळगावयास हरकत नाही.

प्रत्येकाच्या शरीरातील मस्तकामध्ये अंतराकाश आहे. हे अंतराकाश कान, नाक, तोंड, डोळे व टाळू या पाच छिद्रांनी जोडलेले आहे. त्यालाच हृदयाकाश म्हणतात. या हृदयाकाशातच आत्म्याचा साक्षात्कार होतो.

सोहंच्या स्वरूपात सद्गुरू नटलेले आहेत त्यांचे ध्यान लागावयास हवे. तसे ध्यान लागण्यासाठी माणसाने – साधकाने – जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थांचे पलीकडे जावयास हवे.

परमार्थात सोहं रूपाची ओळख होणे हे महत्त्वाचे आहे. साधनाच्या नित्य अभ्यासात राहिल्याशिवाय सोहंरूपाची ओळख होणार नाही. म्हणून सोहं दर्शनासाठी साधनाचा सततचा अभ्यास व्हावयासच हवा.

समजा, एकादा माणूस प्रवास करीत आहे. तो हा प्रवास करताना बोलतो, चालतो, तसेच इतर दुसऱ्या प्रवाशांना कारणपरत्वे मदतही करतो. त्याच्या ह्या सर्व क्रिया चालू असल्या तरी त्याचे लक्ष आपले इच्छित स्टेशन केव्हा येते याकडेच असते. अशा प्रवाशाप्रमाणे साधकाची वागणूक हवी. सर्व व्यवहार चालू असतानासुद्धा साधकाने आपल्या जीवनाच्या गतीवर लक्ष ठेऊन रहावयास हवे. ही गोष्ट अभ्यासाने जमते.

## १८ जून

दृश्य जगातून मिळणारे सुख आणि साधन करून मिळणारे सुख यांत फार मोठा फरक आहे. बाह्य सुख हे इंद्रियद्वारा प्राप्त होते. इंद्रियजन्य सुख हे मर्यादित,नाशवंत, संवेद्य, सापेक्ष आणि पुढे मागे दु:खाचे कारण बनणारे असते. तसेच एका इंद्रियाने मिळणारे सुख हे दुसऱ्या इंद्रियाचे द्वारा मिळू शकत नाही. जसे :- कानाचे सुख हे डोळ्यांनी घेता येत नाही.आणि डोळ्यांनी मिळणारे सुख हे कानांनी घेता येत नाही. बाह्य जड पदार्थातून मिळणारे सुख हे क्षणभंगुर आणि तत्कालिक असते. ते फार काळ टिकत नाही. बाह्य वस्तूतून मिळणारे सुख हे मृगजळाप्रमाणे आहे. मृगजळात वाळवंटावर पाण्याचा आभास होत असतो. त्या पाण्यामागे कितीही धावले तरी वाळवंट संपत नाही, आणि पाणी मिळत नाही. त्याप्रमाणे जगातील सुखाभासामागे कितीही धावले तरी सततचे असे सुख आपणास मिळत नाही. तसेच ज्या वस्तूतून सुख होणार असे वाटते ती वस्तु मिळाली की ते सुख संपते. साधन करून मिळणारे सुख बाह्य सुखाप्रमाणे नाही. साधनजन्य सुख हे मूलत: इंद्रियजन्य नाही. साधनातील सुख हे अमर्याद, शाश्वत, स्वसंवेद्य, निरपेक्ष आहे. साधनातील सुख हे बसल्याजागी कुठेही मिळविता येते. बाह्य सुखाचा कधीतरी वीट येतो. साधनातील सुख हे अवीट आणि कधीही न संपणारे असे असते.

## १९ जून

आत्मसाक्षात्कार म्हणजे काय याबद्दल माणसाच्या काही विशिष्ट कल्पना असतात. उदा. आत्मसाक्षात्कार होताना आत्मा नावाचा कोणीतरी आपणांपुढे उभा राहतो आणि आपणाला त्याचे दर्शन होते. ही आपली कल्पना संपूर्णपणे चुकीची आहे. आत्मसाक्षात्कार होताना आत्म्याची आकृति आपल्यापुढे येते असे नाही. तर आत्मा दिसतो अथवा आत्मसाक्षात्कार होतो याचा अर्थ असा की आत्मा हा नाद, बिंदू, कला आणि ज्योति या चार प्रकारांनी तो अनुभवास येतो. या चारापलीकडे आत्मसाक्षात्कार अथवा आत्मदर्शन म्हणून वेगळे काही नाही.

आत्म्याचे दर्शन कसे होते असा एक प्रश्न नेहमी विचारला जातो. त्या प्रश्नाचे उत्तर असे आहे :- आपण आपली दृष्टी बाह्य जगाकडे टाकली की आपणास जगातील बाह्य पदार्थ दिसतात. म्हणजे व्यवहारात आपल्या दृष्टीचा 'मारा' बाह्य दृश्य पदार्थावर झाला की आपणांस दृश्य दिसते. परमार्थात साधन करताना शरीरातील वाऱ्यावर जर दृष्टीचा 'मारा' केला तर आत्मा दिसतो. देहातील वायूवर दृष्टीचा मारा करण्याने आत्मदर्शन होते. आत्मा हा वायुरूप आहे. शरीरातील वायूवर दृष्टीचा मारा झाला की वायुरूप आत्मा दृग्गोचर होतो.

## २० जून

आपल्या आजूबाजूला आपणांस जग दिसते आणि ते आपणांस खरे आहे असे वाटते. हे जग खरे आहे असे काही तत्त्वज्ञ मानतात. तर ते खोटे आहे असे इतरांचे मत आहे. खरे खोटे ठरविताना आंधळे व हत्ती यांची गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. एका आंधळ्याला हत्ती खांबासारखा वाटला. तर दुसऱ्याला तो सुपासारखा वाटला. तर तिसऱ्याला तो दोरासारखा वाटला. त्या प्रत्येकाच्या दृष्टीने त्याचे म्हणणे खरेच आहे. पण डोळस माणसाच्या मते त्या सर्वांचे म्हणणे खोटे आहे.

आपल्या डोळ्यांना जग दिसते म्हणून ते खरे आहे असे आपण म्हणतो. पण हे म्हणणे तरी खरे आहे काय? नाही. चंद्र, सूर्य उगवताना दिसतात. सूर्य, चंद्र आकाशातून जाताना दिसतात. आगगाडीतून आपण जात असतो तेव्हा आजूबाजूची झाडे, घरे, मागे पळत आहेत असे दिसते. पण यांतील काहीच खरे नाही.

अनेकदा भ्रमणामुळे, गतीमुळे आपणांस काही गोष्टी दिसतात पण त्या खऱ्या असतातच असे आढळत नाही. उदाहरणार्थ आपण पेटते कोलीत गरागरा फिरविले की प्रकाशाचे कडे किंवा वर्तुळ दिसते. पण तेथे वर्तुळ म्हणून काही नसते हे अगदी स्पष्ट आहे.

## २१ जून

रेल्वेचे रूळ समांतर आहेत हे आपणांस माहीत आहे. ते समांतर रूळ एकमेकांस कधी भेटत नाहीत हेही आपणांस ठाऊक असते. तथापि रूळामध्ये उभे राहून जर खूप दूरवर दृष्टी टाकली तर ते रूळ एकमेकाजवळ आले आहेत एकमेकाना भिडले आहेत असे दिसते. पण ते तसे नसते.

वरील गोष्टीचा मथितार्थ असा की विश्व दिसते म्हणून ते सत्य आहे हा सिद्धांत अबाधित ठरत नाही. म्हणून खरे काय आणि खोटे काय हे तात्त्विक दृष्टीने ठरवावयास हवे. तात्त्विक दृष्टीने पाहता:- जे बदलते ते खरे नव्हे, ते खोटे आहे. आपण या जगात जन्मास येण्यापूर्वी जग जसे होते तसे जन्मानंतर नव्हते. आपल्या संपूर्ण आयुष्यात तरी जग जसेच्या तसे राहिले आहे काय? मुळीच नाही. जग सारखे बदलतच जात आहे. विश्वात सातत्याने बदल होत आहेत, फरक पडत जात आहेत. आणि ज्याची अवस्था बदलते, ज्याचे रूप बदलते ते खोटे. या उलट ज्याला अवस्थांतर,रूपांतर आणि स्थित्यंतर असत नाही ते खरे असे म्हणावे लागते.या दृष्टीने पाहिल्यास जगात सतत अवस्थांतर होत आहे, रूपांतर होत आहे, आणि स्थित्यंतर होत आहे, म्हणून जग हे खोटेच असे म्हणावयास हवे. विश्व हे सतत एकाच स्वरूपात टिकून राहात नाही, ते सतत बदलत असे., म्हणून ते खोटे असे मानले जाते.

## २२ जून

परमार्थ म्हणजे परम, मोठा, श्रेष्ठ असा अर्थ. साधुसंतांनी ज्या श्रेष्ठ अर्थाची म्हणजे वस्तूची प्राप्ति करून घेतली तो परमार्थ होय. या अर्थाने परमार्थ म्हणजे परमात्मा, आत्मा किंवा ब्रह्म असा अर्थ होतो. आता या परमात्म्याच्या प्राप्तीसाठी जे जे काही करावे लागते ते ते सुद्धा परमार्थ या शब्दाने सूचित होते. परमार्थरूप परमात्मा प्राप्त व्हावा म्हणून जे भजन, कीर्तन, नामस्मरण इत्यदि केले जाते ते ते सर्व परमार्थ या शब्दाने दाखविले जाते.

परमात्मा हा चैतन्य – वायु – स्वरूपी आहे. म्हणून परमार्थात वायूचे साधन आहे. या वायूच्या साधनाने चैतन्य वायूचा अनुभव घ्यावयाचा आहे. चैतन्याचा अनुभव घेणे येथेच परमार्थाचा शेवट होतो. म्हणजे जीवचैतन्याने चैतन्यवायूच्या द्वारा चैतन्यवायुरूप परमात्म्याशी तादात्म्य होणे हाच परमार्थ आहे. चैतन्याला पहाणे याचाच अर्थ चैतन्यरूप होणे असा आहे.

परमार्थ करण्याला कुणालाच मज्जाव नाही. काही लोक करमणूक म्हणून परमार्थाकडे वळतात. तर काही लोक आपला प्रपंच सुखाचा व्हावा, प्रपंचातील अडचणी दूर व्हाव्यात म्हणून परमार्थ करू इच्छितात. परंतु या दोन्हीही गोष्टी योग्य नाहीत. कारण ते काही परमार्थाचे साध्य नाही. परमात्म्याच्या प्राप्तीने सततचे समाधान, आनंद, मोक्ष मिळविणे हा परमार्थाचा उद्देश आहे.

## २३ जून

हा संसार, हा प्रपंच दुःखाने भरलेला आहे. प्रपंचात आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक असे त्रिविध ताप म्हणजे दुःखे आहेत. त्यामुळे माणूस प्रायः दुःखी असतो. या त्रिविध दुःखांतून सुटका करून घेऊन, सततचे सुख व समाधान प्राप्त करून घ्यावे असे ज्याला वाटत असेल तोच परमार्थाकडे वळेल आणि तोच परमार्थ करण्याला खराखुरा पात्र होईल. म्हणजे संसारातील तीन प्रकारच्या दुःखातून मोकळे होऊन अखंड आनंद प्राप्त करून घेण्याची ज्याला खरीखुरी इच्छा झाली असेल तोच परमार्थाला खराखुरा अधिकारी होतो. गंमत म्हणून परमार्थाकडे वळणे याला फारसे महत्त्व नाही आणि किंमतही नाही. परमात्मप्राप्तीची खरीखुरी तळमळ ही परमार्थ करणाऱ्याजवळ आवश्यक आहे. कारण तोच गुरूने सांगितलेले साधन करण्यात तत्पर होईल.

परमार्थ करणाऱ्याला नाद, बिंदु, कला आणि ज्योति या चार प्रकारांनी परमात्म्याचा अनुभव येतो. हे अनुभव सार्वजनिक असत नाहीत. तर ते वैयक्तिक असतात. जो परमार्थाचे साधन निष्ठेने करतो त्यालाच हे अनुभव येतात. परमार्थ हा ज्याच्या त्याच्या पुरताच असतो आणि त्यालाच परमार्थातील अनुभव येत असतात.

## २४ जून

परमेश्वर हा प्रेमस्वरूप आहे. परमेश्वरावर प्रेम करणे म्हणजे भक्ति करणे होय. ईश्वरावर जो कोणी निर्हेतुकपणे, निरपेक्षपणे प्रेम करतो म्हणजे भक्ति करतो तो भक्त होय. भगवंताचे चिंतन करणे, ईश्वराचे नाम उच्चारणे, इत्यादि नाना प्रकारांनी भक्ति व्यक्त होत असते. ही भक्ति जो कोणी निरिच्छपणाने, निष्कामपणाने करतो तो भक्त होय. ईश्वर हा चिद्–वायुस्वरूपी आहे. त्यामुळे भक्ताची वृत्ति ही चित्‌कडे/ चैतन्याकडे वळलेली असते. भक्ताला चैतन्याचे आकर्षण निर्माण होते आणि तो चैतन्याचेच स्मरण करीत रहातो.

काही कारणांनी माणसाचे ईश्वरावरील प्रेम उडून जाण्याची शक्यता असते. त्याची भक्ति कमी जास्त होण्याची शक्यता निर्माण होते. परंतु ज्याची भक्ति ही कमी अगर जास्त न होता स्थिर, अढळ असते तोच खरा भक्त. हा भक्त परिस्थिति कशीही आली तरी भक्तीचा त्याग करीत नाही. खऱ्या भक्ताचे देवावरील प्रेम–भक्ति–ही समुद्राप्रमाणे सदा भरलेली असते.

हा भक्त स्वत:ला देवाला वाहून घेतो. तो भक्त देवाचे चिंतनाखेरीज अन्य काही करीत नाही. देवाचे चिंतन हेच त्या भक्ताचे जीवन बनते. हा भक्त सर्व काही विसरेल पण तो ईश्वराला कधी विसरणार नाही.

## २५ जून

भक्त हा स्वतःला विसरून जातो. भक्ताने स्वतःला विसरणे म्हणजेच देवाने त्याचे हृदय चोरणे होय. जो कोणी भक्त स्वतःला विसरतो, तो भक्त देवाला ओळखतो आणि तोच भक्त देवाला पहातो, त्यालाच देवाचे दर्शन होते आणि ज्या भक्ताला देवाचे दर्शन होते, तो सतत देवालाच पहात रहातो. भक्तालाच परमेश्वराची प्राप्ति होते.

ज्याचे हृदयात देव बसला आणि वसला, तोच देवाचा खरा भक्त होय. देव हृदयात बसणे अथवा वसणे म्हणजे भक्ताचे हृदय हे देवाचे होणे होय. परमेश्वराखेरीज अन्य कोणीही आपले नाही अशी भक्ताची वृत्ति बनते. त्याचे अंतःकरणात–हृदयात–देवाखेरीज अन्य काही येत नसल्याने, त्याचे अंतःकरण मोकळे झालेले असते. अशा मोकळ्या झालेल्या अंतःकरणात देव वास करतो. अशा एकविध, एकनिष्ठ, अव्यभिचारी भक्ताला देवाची प्राप्ति होते.

भक्ताला भगवंताची प्राप्ति झाली की तो भक्त भगवंताशी एकरूप होऊन जातो आणि भक्त जेव्हा भगवंताशी एकरूप होऊन जातो, तेव्हा त्याचे द्वैत संपते आणि तो अद्वैत होतो. परमेश्वर भक्ताला आपलेसे करून टाकतो.

## २६ जून

ज्या परमात्म्याची प्राप्ति करून घ्यावयाची आहे, तो आहे तरी कसा? या परमात्म्याला कधी आत्मा असेही म्हटले जाते. परमात्मा हा चिद्-वायु-स्वरूपी आहे. आत्मा हा सुख स्वरूप,आनंदस्वरूप आहे. आत्मा हा पूर्ण, अनंत, स्वयंप्रकाशी, स्वसंवेद्य आहे. तो सदा असतच असतो. तो सर्वत्र भरलेला आहे. तो दिक्कालातीत आहे. आत्मा हा निश्चळ, सर्वव्यापक आहे. आत्मा हा निश्चळ आहे म्हणजे तो सर्वस्वी निश्चळ नसून त्यात चंचलत्व आहे पण ते फार फार सूक्ष्म आहे. निश्चळ आत्म्यात असे किंचित चंचल असल्याने, आत्म्यावर चंचळाच्या लहरी उठतात. आत्मा हा सर्वव्यापी असून तो नादरूपाने सर्वत्र घुमत आहे.

आत्मा जरी सर्वव्यापक आहे तरी नेहमीच्या बाह्य व्यवहारात आत्मा माणसाला जाणवत नाही किंवा 'अमुक म्हणजे आत्मा' असे दाखविताही येत नाही. मग 'आत्मा आहे' हे कशावरून असे कुणीही विचारू शकतो. म्हणजे जो आत्मा मानवाच्या नेहमीच्या प्रत्ययाला येत नाही, त्या आत्म्याचे अस्तित्व कसे सिध्द होते? या प्रश्नाचे उत्तर असे आहे:- 'मी जिवंत आहे' हे सिद्ध करून दाखवा, या म्हणण्यासारखेच 'आत्म्याचे अस्तित्व सिद्ध करा' हे म्हणणे आहे. आत्म्याचे अस्तित्व हे काही प्रत्यक्ष या प्रमाणाने सिध्द करता येणारे नाही. आत्मा हा प्रयोग करून सिद्ध करता येत नाही. कारण आत्मा हा स्वत:च प्रयोगी आहे म्हणजे प्रयोग करणारा आहे. तेव्हा प्रयोगी असणाऱ्या आत्म्यावर प्रयोगशाळेत कसा प्रयोग करता येणार?

## २७ जून

आत्म्यानेच अनंत विश्वाचा प्रयोग केला आहे. विश्व हीच त्याची प्रयोगशाळा आहे. प्रयोगशाळेत दृश्य पदार्थांवर प्रयोग करता येतात. पण प्रयोग करणारा प्रयोगी आत्मा हा अदृश्य आहे. म्हणून त्याच्यावर प्रयोग करता येणार नाही हे स्पष्ट आहे.

आणखी असे :- ज्या पदार्थाचे ज्ञान होते, त्याचे अस्तित्व सिद्‌ध होते, असे म्हटले जाते.परंतु परमात्मा हा लौकिक ज्ञानाचा विषय होत नाही. उलट ज्ञान हा आत्म्याचा विषय आहे. शरीर हे ज्ञानाचा विषय असल्याने त्याचे ज्ञान होते. आत्मा हा ज्ञानाचा विषय नसल्यामुळे त्याचे ज्ञान होत नाही. आत्मा हा द्रष्टा आहे. म्हणून तो कधी दृश्य होत नाही. म्हणजेच द्रष्टा असणारा परमात्मा हा ज्ञानाचा विषय होत नाही. म्हणून लौकिक ज्ञानाने आत्म्याचे अस्तित्व सिद्‌ध करता येत नाही.परमात्मा हा विज्ञान – स्वरूप आहे. आता विज्ञान म्हणजे काय? विज्ञान म्हणजे ज्ञान आणि अज्ञान हे दोन्हीही जेथे नाहीत अशी विशिष्ट स्थिति आहे. आणि या परमात्म्यामुळेच ज्ञान आणि अज्ञान हे आहेत. साहजिकच आत्म्याचे अस्तित्व ज्ञानाने सिद्ध होणारे नाही.

मग आत्मा आहे हे कसे कळते ? आत्म्याचे अस्तित्व कसे सिद्ध होते ? याचे उत्तर आहे. आत्म्याचा अनुभव आला की आत्मा सिद्‌ध होतो. म्हणजे आत्म्याच्या अनुभवानेच आत्म्याची सिद्धि होते.

## २८ जून

भक्त आणि भगवंत यांचा संबंध आणि व्यवहार हा कार्य कारणांवर अवलंबून नसल्याने तो अखंड असतो.

देव आणि भक्त यांचा जमाखर्च हा बिनहिशोबीच असतो. कारण भक्तीचा हिशेब करता येत नाही. भक्त विन्मुख झाला तरी भगवंत त्याला सन्मुख होतो.

भक्ताचे सुख दुःख, पाप पुण्य,मान अपमान,कीर्ति अपकीर्ति, यश अपयश हे सर्व देवाला आपलेच वाटते.

भक्ताने शिव्या दिल्यातरी देवाला आनंद होतो.

प्रसंगोपात जीवाच्या / भक्ताच्या नको त्या वृत्ति उसळी मारून येण्याची शक्यता असते. ईश्वर त्यांना पूर्ववत करतो.

परमेश्वराचे काही नियम कडक असतात. तथापि ते त्याच्या भक्तांना त्रास देत नाहीत. परमेश्वर हा आपल्या भक्तांना त्रास होणार नाही याची काळजी घेतो.

ईश्वर आपले भक्तांचे संबंधात दयाळू असतो. परंतु परमेश्वर जरी दयाळु असला तरी तो आपल्या भक्ताचे खरे हित कशात आहे हे तो जाणत असतो. म्हणून ते हित साधण्यासाठी तो प्रसंगी भक्ताचे बाबतीत निष्ठुरही होतो.

## २९ जून

ईश्वर–भक्ताच्या देहावर प्रारब्धाचा अंमल असतोच. भक्ताला प्रारब्ध चुकविता येत नाही. तथापि ईश्वराच्या दयाळूपणामुळे आणि कृपेमुळे भक्ताचे प्रारब्ध हे भक्ताला जाचक ठरत नाही.

शोक मोह निर्माण करणारे प्रसंग आपल्या घरात निर्माण झाले तरी ते प्रसंग म्हणजे देवाने घेतलेली आपली परीक्षा आहे असा विचार करून भक्त स्वस्थ रहातो. भगवंत जसे ठेवील तसाच भक्त रहातो.

देवाचे चरणी सर्व काही अर्पण केल्यावर प्रारब्धानुसार जे काही होईल ते भोगून संपविण्याची भक्ताची तयारी असते.

भक्त देवाचे चिंतन सतत करीत असतो. परिणामतः भगवंताला आपल्या भक्ताची चिंता असते.

देवाची आणि भक्ताची गाठभेट पडण्याचा क्षण देवच ठरवितो. तो क्षण भक्ताच्या मर्जीवर असत नाही. भक्ताचा व्यवहार देवच करीत असतो आणि भक्तासाठी चमत्कारही देवच करतो.

ईश्वर भक्ताला निरिच्छ करतो.

परमेश्वर हा स्वतःपूर्ण आहे. तो आपल्या भक्ताला आपल्या सारखाच पूर्ण करतो.

## ३० जून

मनुष्य आशेने बांधला गेला आहे. माणूस मरायला टेकला तरी सुद्धा त्याची आशा सुटत नाही. अशी आशेची जबरदस्त पकड आहे.

मनाचे स्वरूप संकल्पविकल्पात्मक आहे. जीवनभर माणसाचे मनात नानाप्रकारचे बरेवाईट विचार विकार येत असतात. परमार्थात मात्र मनाचे विचार संपावयास हवेत. म्हणजे मन हे मरावयास हवे. पण नेहमीच्या परिस्थितीत मन मरत नाही.

शंका काढणे हा माणसाचा स्वभाव आहे. ज्ञानाच्या प्राप्तीसाठी शंका आणि त्यांचे समाधान हे उपयोगी आहेत, यांत शंका नाही. परंतु माणूस जर प्रत्येक गोष्टीत संशय ठेवू लागला तर ते उपयोगी ठरत नाही.

क्रोध हा विकार अत्यंत वाईट आहे. क्रोधाने माणूस अविचारी बनतो आणि नको ते करावयास प्रवृत्त होतो. क्रोधाअंती तो पाप करण्यासही कचरत नाही. म्हणून क्रोध हे पापच आहे.

ईश्वराने विश्व निर्माण केले आणि त्याची घडी/ व्यवस्था लावून दिली. तथापि अनेकदा असे वाटते की ईश्वराखेरीजच्या अन्य कोणत्यातरी सत्ता या जगात कार्यप्रवण आहेत. पण तसे वाटणे बरोबर नाही, हे लक्षात घ्यावयास हवे. जगातील सर्व काही ईश्वरी सत्तेने चालले आहे, हे लक्षात असो द्यावे.

## १ जुलै

आपल्या आजूबाजूला अफाट विश्व पसरले आहे. ते सतत बदलत आहे. बदलत जाणे याचे नावच दृश्य विश्व आहे.या बदलत्या दृश्य विश्वाचे काही सिद्धांत भौतिक शास्त्रज्ञ मांडत असतात.

आपण पाप आणि पुण्य असे शब्द वापरतो आणि ते दोघे वेगळे आहेत असे म्हणतो. पण ते संपूर्णपणे खरे नाही. अनेकदा पापातून पुण्य उद्भवते आणि पुण्यातून पाप निर्माण होते. कधी कधी तर असे दिसून येते की पाप पचविण्यासाठी पुण्य केले जाते.

लोक सांगतील त्याप्रमाणे किंवा आपल्या मनाप्रमाणे आपण जगत असतो. पण कसे जगावे हे मात्र अध्यात्म शिकवते.

आपल्या विश्वासाची मोठी गंमत आहे. सराफ, डॉक्टर, वकिल यांचेवर आपला विश्वास बसतो. परंतु संत, साधु, सद्गुरू यांचेवर मात्र आपला विश्वास बसत नाही.

विश्व हे सर्वांच्या बाबतीत समान आहे. परंतु प्रत्येकाचे विश्व स्वतंत्र आहे. त्यामुळे आपल्या विचार-भावनानुसार माणूस विशिष्ट परिस्थितीत वावरत असतो. माणसाचे विश्व त्याच्यापुरतेच मर्यादित आणि स्वतंत्र आहे.

कलियुग हे विचित्र आहे. या कलियुगात खऱ्याची पायमल्ली होते आणि खोटे उरावर बसते.

# २ जुलै

परमार्थ हा आवश्यक असला तरी काही कारणांनी माणूस परमार्थाकडे वळत नाही. माणसाची इंद्रिये बहिर्मुख आहेत. ती बाह्य दृश्य विश्वाशी संबंधित होतात. दृश्य विश्वामध्ये शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असे पाच विषय आहेत. ते विषय पहाणे, स्पर्शणे, ऐकणे, भोगणे इत्यादि बाबतीत माणसाचे मन लागते. माणसाला वाटते की या विषयांच्या भोगाद्वारे आपणास सुख मिळत राहील. म्हणून या दृश्य विश्वाकडे माणूस आशाळभूतपणे पहात रहातो. दृश्य विश्वाची असली आशा सुटत नसल्यामुळे माणूस परमार्थाकडे वळत नाही.

पोट भरण्यास आणि अन्य गोष्टी करण्यास परमार्थ आवश्यक नाही. परमार्थ केला नाही म्हणून पोट भरता येत नाही अथवा अन्य काही करता येत नाही असे होत नाही. मग कशाला परमार्थ करा, असे साहजिकच माणसाला वाटते.

आणखी असे:– जगातील बाह्य विश्वात जे नानाप्रकारचे पदार्थ आहेत, त्यांचा उपभोग घेण्याने माणसाला तत्कालिक का होईना पण लगेच सुख मिळते. व्यवहारात दिव्याच्या विजेचे बटण दाबले की दिवा लागून प्रकाश पडतो. त्याप्रमाणे परमार्थात घडत नाही. परमार्थ करण्यास प्रारंभ झाला रे झाला की सुखाचा ओघ सुरू झाला असे घडत नाही. व्यवहारात ज्याप्रमाणे काही गोष्टींच्या प्राप्तीसाठी बराच प्रयत्न करावा लागतो त्याप्रमाणेच परमार्थातील सुखाचा–समाधानाचा–अनुभव येण्यास साधनाचा प्रयत्न हा काही काळ करावाच लागतो.

## ३ जुलै

काही लोकांना असे वाटते की परमार्थ हा भाविक लोकांचा गोंधळ आहे. परंतु ही कल्पना चुकीची आहे. कारण परमार्थ हे अनुभवाचे शास्त्र आहे. परमार्थात अनुभव येणे हीच परमार्थाची खात्री आहे.

साक्षात्कारी संतांच्या-गुरूंच्या-उपदेशानुग्रहाने परमार्थाचा प्रारंभ होतो. मग सद्‌गरूंनी सांगितलेल्या साधनाचा अभ्यास व्हावा लागतो. तो अभ्यास झाला तर गुरूची कृपा होते आणि सद्‌गुरूच्या कृपेने अनुभव येतो.म्हणून सद्‌गुरूंनी कथन केलेल्या साधनाचा अभ्यास आवश्यक ठरतो. समजा, तो अभ्यास झालाच नाही, तर परमार्थातील अनुभव येणार तरी कसे? जसे :- सिनेमागृहाकडे जाऊन तिकीट काढून आत गेल्याशिवाय सिनेमा दिसणार कसा?

परमार्थातील साधन साधण्याचा प्रयत्न करावा लागतो ही वस्तुस्थिति जे लोक डोळे उघडे ठेवून स्वीकारतात ते परमार्थाची टाळाटाळ करण्यास उद्युक्त होत नाहीत. पण हे सर्व ज्यांना नकोच असते, ते मात्र परमार्थाकडे दुर्लक्ष करतात. आणि परमार्थ करण्याची टाळाटाळ करतात.

" आमच्या नशीबात / प्रारब्धात परमार्थ नाही" असे काहीजण म्हणतात. पण तेही बरोबर नाही. कारण प्रारब्धाचा संबंध फक्त देहाशी आहे. प्रारब्ध हे परमार्थ करणाऱ्यावर अंमल गाजवू शकत नाही.

हा सर्व भाग लक्षात घेऊन परमार्थाची टाळाटाळ करू नये.

## ४ जुलै

माणसाच्या मनात काम, क्रोध, लोभ, मोह, मद, आणि मत्सर हे सहा विकार घर करून बसलेले असतात. परमार्थ करणाऱ्याला हे विकार त्रासदायक असतात. हे सहा विकार दूर होणे हे महत्त्वाचे आहे.

काही माणसे आस्तिक असतात. त्यांना देव आहे असे वाटत असते. त्यांची देवावर श्रद्धाही असते. परंतु संपन्न परिस्थितीत माणसाला देवाची आठवण बहुधा येत नाही. संकटकाळी, अडीअडचणीच्या प्रसंगी माणसाला देव आठवतो.

धर्म ही अफूची गोळी आहे, असे काहीजण म्हणतात. पण ते योग्य नाही. धर्माने कर्मावर नियंत्रण येते. धर्म नसेल तर जग बेताल होईल.

शाळेत भूमिति शिकवतात. भूमितीत बिंदूची व्याख्या अशी आहे:- ज्याला लांबी, रुंदी, खोली, उंची इत्यादी काही नाही, तो बिंदू. असे बिंदू एकापुढे एक ठेवत गेले की रेषा होते. असे ही भूमिति सांगते. भूमितीतील बिंदू म्हणजे ब्रह्म आणि रेषा म्हणजे माया.

जगात माणसे काय करतात.? मीटिंग घेतात. तेथे चांगले चुंगले खाणे पिणे होते. आणि तेवढ्यावर माणूस खूष होतो. तथापि देवासाठी बैठक मांडून बसणे मात्र त्याला जमत नाही. प्रश्न असा आहे.:- मीटिंग आहे, ईटिंग आहे मग सिटिंग ( देवासाठी आसन घालून बसणे) करायला काय हरकत आहे.?

## ५ जुलै

मानव फार मोठा स्वार्थी आहे. तो देवाची उपासना करतो. पण कशासाठी? प्रपंचात देवाने मदत करून आपले भले करावे यासाठी. म्हणजे माणसाला प्रपंचात राबवायला देव हवा आहे. परंतु देवासाठी देव मात्र नको आहे.

व्यवहारात काय घडत असते ? माणूस विचार करतो, प्रपंचातील चिंतानी त्रस्त होतो. देवाचा विचार सुद्धा मनुष्याच्या मनात येत नाही. आपण देवाचे चिंतन करीत नाही. तर आपण चिंतेमध्ये मग्न राहतो.

परमात्म्याने विश्व निर्माण केले आणि त्या विश्वाला काल चक्रात बसवून टाकले. परमात्म्याचे हे कालचक्र जरासुद्धा मागे पुढे होत नाही.

आपण देवाचे सन्मुख न होता देवाकडे पाठ फिरवतो. हरि हा "पाठीशी" असणे आणि आपण हरीकडे "पाठ करणे" यांत फार फरक आहे .

काही लोक "निर्वात" स्थानाबद्दल बोलतात. परंतु त्या माणसांच्या हे लक्षात येत नाही की निर्वात स्थानीसुद्धा सूक्ष्मतम "वात" असतो. ब्रह्म अथवा आत्मा निश्चळ आहे, असे परमार्थात सांगीतले जाते. तसेच त्या निश्चळात चंचळ निर्माण होते, असेही सांगीतले जाते. ते कसे काय? याचे कारण असे :- निश्चळातसुद्धा सूक्ष्मतम चंचळ असतेच.

## ६ जुलै

जगातील व्यवहारांतून मिळणाऱ्या सुख दुःखाचे पलीकडे जाऊन शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठी परमार्थ करावयाचा आहे. परंतु व्यवहार हा तर देह आणि इंद्रिये आहेत तोपर्यंत सुटत नाही. म्हणून जगातील व्यवहारात वावरत असतानाच परमार्थ हा साधावयाचा आहे. तसे करताना व्यवहार आणि परमार्थ यामध्ये जो फरक आहे तो लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

शरीरच्या गरजा भागविण्यासाठी प्रपंचातील व्यवहार आहे. तर जीवाला सततचे सुखसमाधान प्राप्त व्हावे यासाठी परमार्थ आहे. शरीर सुखी झाले वा असले म्हणजे जीव सुखी होतोच असे नाही. "सुख बोचतंय" ही म्हण याचीच निदर्शक आहे. जीवाला सुख प्राप्त होण्यास परमार्थ हे एक रसायन आहे.

व्यवहारात पैसा आवश्यक आहे. पैशाशिवाय व्यवहारात चालत नाही. पण परमार्थात पैसा उपयोगाला येत नाही. व्यवहारात पैशाने अनेक सुखकारक गोष्टी विकत घेता येतात. परमार्थात द्रव्याचे योगे आत्म्याचे सुख मिळत नाही. व्यवहारात वित्त महत्त्वाचे असते, तर परमार्थात चित्त हे महत्त्वाचे असते, व्यवहार करताना मनात एक, बोलण्यात दुसरे आणि आचरण्यात तिसरेच काहीतरी असे चालते. परमार्थात तसे चालत नाही. मन, वचन व आचरण यातील एकवाक्यता परमार्थात हवी.

## ७ जुलै

व्यवहारात माणूस संपत्ति मिळवितो. पण ती संपत्ति टिकून राहीलच अशी शाश्वती नाही. ती कधी राहील, तर कधी राहणार नाही. याउलट पारमार्थिक संपत्ति ही कधीही संपणारी नाही. ती कायमची टिकून राहणारी आहे.

व्यवहारात फसवेगिरी, भोंदूगिरी चालते. परमार्थात या दोहोंनाही स्थान नाही. हे दुर्गुण आहेत. ते परमार्थाला विरोधी आहेत. तथापि परमार्थात काहीजण भोंदूगिरी करताना दिसतात. परंतु ती फार काळ टिकत नाही. केव्हातरी फसवेगिरी ही उघडकीला येतेच. भोंदू अथवा फसविणारा माणूस हा खरा परमार्थ करणारा नाही हे लक्षात असावे.

व्यवहारात संशयाला स्थान आहे. अनेक गोष्टीबद्दल आपणांस संशय येत असतात. संशयामुळे आपण व्यवहारात सावधगिरीने वागतो. परमार्थात मात्र संशय अजिबात उपयोगी नाही.देव आहे,संत सांगतात ते खरे आहे,देवाची प्राप्ती होऊ शकते, इत्यादीबद्दल जर आपल्या मनात संशय असेल तर आपले हातून परमार्थ होईलच कसा ? संशयरहित विश्वास परमार्थात उपयोगी पडतो. व्यवहारात वार्धक्य आल्यावर माणसे निवृत्त होतात, अथवा व्यवहारातले लक्ष कमी करतात. परमार्थात अशी निवृत्ति नाही. वय कोणतेही असो परमार्थ चालूच रहावयास हवा. संपूर्ण जन्मभर परमार्थ करावयाचा असतो.

## ८ जुलै

व्यवहारात माणसे एकमेकांना चांगले म्हणत असतात. कधी कधी तर वाईट माणसालाही चांगले म्हटले जाते. असे का बरे घडते? कारण स्वार्थ, आपल्या स्वार्थापोटी माणसे एकमेकाला चांगले असे म्हणतात.

जीवन म्हणजे आशा निराशेचा खेळ आहे. निराशेमुळे मनुष्य अनेकदा हतबल होतो. परंतु माणसाने नेहमी आशावादीच राहीले पाहिजे.

आपल्या जवळ काही विशेष नसताना मोठ्या गोष्टीची अपेक्षा करणे योग्य ठरत नाही. उदा. पथिकाश्रमात द्रव्य देऊन रहाणे शक्य नसल्यामुळे समजा आपला मुक्काम एखाद्या धर्मशाळेत आहे. आता धर्मशाळेत रहात असताना आपण जर मिरपूड मागू लागलो तर त्याला काही अर्थ आहे का ?

सर्व धर्मांची मूलतत्त्वे समानच आहेत. उदा. खरे बोलावे, खोटे बोलावे असे कोणत्याही धर्मात सांगीतले नाही.

मनुष्य जन्माला आला की, तो केव्हा ना केव्हा मरणारच आहे हे उघड आहे. तेव्हा आपण केव्हातरी या जगातून जाणार या हिशोबाने माणसाने वागावे.

असे म्हणतात की मानव हा मायाजाळात अडकला आहे.आणि त्यातून त्याने बाहेर पडावयास हवे.माया कळली की ती नाहीशी होते आणि माया कळून येण्यास गुरुकृपा ही आवश्यक आहे.

## ९ जुलै

मारुति हा चिरंजीव आहे असे मानले जाते. साहजिकच आजही मारुतीचे अस्तित्व आहे. जेथे राम नामाचा घोष असतो तेथे मारुतिराय हजर असतात.

जगात नाना प्रकारची समाधाने आहेत. शरीराचे समाधान, इंद्रियाचे समाधान तसेच मनाचे समाधान. या सर्व समाधानांमध्ये गुणदृष्ट्या फरक आहे. मनाचे समाधान म्हणजे आत्मसमाधान नव्हे.

अनेक गोष्टी साध्य करण्यास माणसे या जगात प्रयत्न करतात.पण मानवाने महामानव होण्याचा प्रयत्न करावयास हवा.

या जगात बरेही आहे आणि वाईटही आहे. नुसते बरे अथवा नुसते वाईट नाही. आणि बऱ्या वाईटाचा नेहमीच झगडा चालू असतो. कधी बऱ्याचा विजय होतो तर कधी वाईटाचा विजय होतो. जगाच्या आरंभापासून ते अंतापर्यंत हा बऱ्या वाईटाचा, सत् व असत् यांचा संघर्ष चालूच राहणार आहे.

माणूस अहंकारापोटी मी अमुक करीन, मी तमुक करणार नाही, अशा वल्गना करीत असतो. पण खरे सांगायचे म्हणजे माणसाच्या हातात काहीच असत नाही.

## १० जुलै

सध्या सगळीकडे सर्वधर्मसमभाव हा शब्द ऐकण्यात येतो. सर्वधर्मसमभाव म्हणजे एकाद्या धर्माचा अभाव नव्हे.

जगातील व्यवहारात होणारा नफातोटा आपणास समजतो. पण नाम घेतल्याने कोणता नफातोटा होतो हे आपणास या व्यवहारात कळून येत नाही.

सिद्‌ध कोणाला म्हणावे ? अखंड नामस्मरण करतो तो सिद्‌ध.

अनेकांची तक्रार असते की आम्हाला झोप येत नाही. म्हणून झोपेच्या गोळ्या इत्यादी घेतात. पण नामस्मरणासारखे झोपेचे औषध नाही.

आपली माणसे सोडावी, हे जग सोडून जावे, असे सर्वसामान्यपणे माणसाला वाटत नाही. पण माणसाच्या मनात असो अगर नसो त्याला एक दिवस सर्व काही सोडून मरावे लागते. मरण अटळ आहे.

या विश्वातील प्रत्येक वस्तू ही चंचळ म्हणजे बदलणारी आहे. एका रूपात, एका स्थितीत आणि एका अवस्थेत रहाणारे असे काहीही या जगात नाही. प्रत्येक वस्तूला /प्राण्याला रुपांतर, स्थित्यंतर आणि अवस्थांतर असतेच. अशा प्रकारे हे विश्व चंचल आहे आणि नश्वरही आहे.

## ११ जुलै

विवेक हे माणसाचे वैशिष्ट्य आहे.मग तो विचार चांगला असो अगर वाईट असो. विचाराशिवाय माणूस नाही. माणसातच विवेक हा जागृत, कार्यप्रवण असतो.

माणसे जीव तोडून पैसे मिळविण्याच्या मागे लागतात. कारण पैशाने सर्व काही मिळेल असे त्यांना वाटत असते. परंतु पैशाने सर्व गोष्टी मिळतात अगर प्राप्त होतात ही समजूत भ्रामक आहे.

जीवन जगताना माणसांना अनेक आकर्षक गोष्टी आढळतात. लहानपणी खेळाचे आकर्षण, तरुणपणी स्त्रीचे आकर्षण, नंतर पैसा मिळविण्याचे आकर्षण. काहींना प्रसिद्धीचे म्हणजे लोकांनी आपणांस चांगले म्हणावे, आपली स्तुती करावी या गोष्टीचे आकर्षण वाटते. या आकर्षणांपैकी इतर सर्व आकर्षणे एक वेळ सुटतील परंतु प्रसिद्धीचे आकर्षण मात्र सुटत नाही.

आपणांस विश्व दिसते. म्हणून ते दृश्य आहे. पण हे दृश्य म्हणजे माया आहे. जे दिसते ते टिकत नाही. परंतु या जगाच्या बुडाशी सतत टिकून राहणारे चैतन्य तत्त्व आहे. ते मात्र आपणास नेहमीच्या व्यवहारात दिसून येत नाही.

वर्तमानकालीन विद्यमान जीवन एवढेच जीवन नाही. मोक्ष मिळेपर्यंत जीवन चालू रहाते.जन्ममरण हे जीवनाच्या प्रवासातील टप्पे आहेत.

## १२ जुलै

आपण जीव या जगात जन्माला आलेले आहोत. त्या जगाच्या बुडाशी परमात्मा अथवा परब्रह्म आहे.हे जग दृश्य आहे. जग हे नामरूपात्मक आहे. म्हणजे जगातील प्रत्येक पदार्थाला कोणते तरी रूप आहे आणि काहीतरी नाम आहे. विश्व हे नाशवंत आहे. विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि नाश या मागे चैतन्यरूप ब्रह्म आहे. या विश्वाच्या मागे चैतन्याची प्रेरणा शक्ति आहे. विश्वाच्या बुडाशी असणाऱ्या चैतन्याच्या / ईश्वराच्या प्रेरणेवर जग चालले आहे. सर्व जग हे परमेश्वराच्या सत्तेने चालले आहे.

जग /विश्व हे चित्रविचित्र आहे. किंबहुना ते एक चित्र आहे असेही म्हणता येते. पण हे चित्र सारखे बदलत असते. परंतु सातत्यामुळे दृश्य विश्व हे अखंड वाटते. जगाचे आणि जगातील काय बदलत नाही असा प्रश्न आहे. जग हे बदलत असल्याने ते एका स्वरूपात अथवा स्थितीत किंवा अवस्थेत टिकून रहात नाही. हे दृश्य जगात एकाच स्वरूपात रहात नसल्यामुळे ते लटके आहे, मिथ्या आहे, असे म्हटले जाते.

विश्व हा एक भला मोठा फुगा आहे.परंतु ते न समजल्याने माणूस मात्र अहंकाराने फुगून बसतो.

जग हे आंधळ्या कोशिंबीरीचा खेळ आहे. जग हे एक सावल्यांचा खेळ आहे.

## १३ जुलै

परब्रह्माप्रमाणे जग हे स्वत:सिद्ध, स्वयंपूर्ण नाही. विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि विनाश होत असतो. जगाचा उद्‌भव, स्थिती आणि नाश हा सर्व सच्चिदानंद वायुस्वरुप परमात्म्याचा खेळ आहे.

आपल्या दृष्टीने अनंत असणारे विश्व हे परमेश्वराच्या घरातील रांगोळी आहे. वाळवंटी प्रदेशात ज्याप्रमाणे सोसाट्याचा वारा हाच वाळूचे मनोरे निर्माण करतो आणि ते नष्टही करून टाकतो. त्याप्रमाणे चिद्‌वायू जग निर्माण करतो आणि ते नाहीसेही करून टाकतो.

घर बांधणारा घरापेक्षा वेगळा असतो. गाडगी आणि मडकी बनविणारा कुंभार हा गाडग्यापेक्षा भिन्नच असतो. त्याप्रमाणे विश्व निर्माण करणारा परमेश्वर हा विश्वापेक्षा वेगळा आहे.

परमेश्वर आपण निर्मिलेले विश्व व्यापून असतो. पण त्याचे रूप आपणास दिसत नाही. कारण तो अव्यक्त रुपाने असतो. तथापि जग व्यापण्यात त्या चैतन्यरूप परमात्म्याचे स्वरूप संपून जात नाही. हे संपूर्ण विश्व व्यापून टाकून विश्वाच्या पलीकडेही परमात्मा उरलेला असतोच.

या जगात जी मानवी शरीरे वावरतात त्यांच्यामध्येही परमात्मा आहेच. जो माणूस देहातील परमात्मा पाहतो त्याला विश्वातील परमात्मा प्रचीतीला येतो.

## १४ जुलै

माणूस काम करतो हे आपणांस कळते. म्हणजे त्याची कृती दृश्य असते. पण माणसाच्या मनात काय आहे हे मात्र बहुधा कळत नाही. म्हणजे मनातील भाव, भावना, विचार हे अदृश्य असतात.

या विश्वात नाना प्रकारचे रंग आहेत. त्या सर्व रंगांत निळा रंग हा सर्वात महत्त्वाचा आहे. परमात्म्याचा आणि जीवनाचा रंग निळा आहे.

या जगात कसे वागावे हे अनेकदा आपणास कळत नाही. अशावेळी संतांचा आदर्श दृष्टीपुढे ठेवून माणसाने पदयात्रा करावी.

संन्यास म्हणजे काहीतरी फार मोठे अवडंबर आहे असे आपणास वाटते. परंतु ते तसे नाही. फळाची अपेक्षा न बाळगता स्वत:चे कर्तव्य करीत रहाणे हाच संन्यास आहे.

प्रत्यक्ष मरणात भिण्यासारखे काही नाही; पण मरणापूर्वी ज्या यातना होतात त्या मात्र भीती निर्माण करतात.

ज्याच्या पोटात खऱ्या कळा येतात त्यालाच ओव्याचा उपयोग होतो.ज्या विशिष्ट भूमिकेतून आपण सद्गुरूला शरण जातो, ती भूमिका जर सात दिवस टिकेल तर मोक्ष मिळेल.

## १५ जुलै

लोकांना परमार्थात घडणाऱ्या चमत्कारांचे कौतुक वाटते. खरे म्हणजे हे विश्व आपणांस दिसते हाच मोठा चमत्कार आहे.

विश्व चंचळ आहे, स्थिर नाही, असे तत्त्वज्ञानी लोक सांगतात. पण आपणांस ते पटत नाही. आपल्याला विश्व स्थिर वाटते. याचे कारण असे :- विजेत जितक्या झटपट क्रिया चालते त्यापेक्षाही अधिक वेगाने विश्वात बदल होत असतो. विश्वातील हे चांचल्य सतत चालू असल्याने ते विश्व स्थिर आहे असे आपणांस वाटते.

चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजे पाडव्याला आपण गुढी उभा करतो.पण आपण तेथेच थांबतो.खरे म्हणजे गुढी उभी करायची म्हणजे आपण आपले जीवन ऊर्ध्वगामी करावयाचे आहे.

आपल्या शरीरातील इडा,पिंगला,व सुषुम्ना या तीन नाड्या परमार्थ दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. आपले जीवन जर सुखकर झाले तर जीवनाचे सार्थक होते.

आपल्या मनाची जर निर्विकार स्थिती झाली तर त्या स्थितीत होणारा आनंद फार वेगळा असतो हे कळून येते.

इडा,पिंगला व सुषुम्ना या तीन नाड्या राम, कृष्ण, हरि या शब्दांनी सूचित केल्या जातात. राम,कृष्ण, हरि हा परमार्थातील त्रिफळा आहे.

## १६ जुलै

परमात्म्यालाच ब्रह्म किंवा परब्रह्म असे म्हणतात. ब्रह्म हे सच्चिदानंद आहे. सच्चिदानंद शब्दात सत्, चित्, आणि आनंद असे तीन शब्द आहेत. सच्चिदानंद या शब्दाऐवजी कधी कधी अस्ति, भाति आणि प्रिय असेही शब्द वापरले जातात. सत् याचा अर्थ त्रिकालात बाधित न होणारे अस्तित्व. सत् चा विलास किंवा हालचाल म्हणजे चैतन्य, जेथे अस्तित्व आणि चैतन्य असते तेथे आनंदाचा अनुभव येतो. अस्ति शब्दाने सत्. भाति शब्दाने चित् आणि प्रिय या शब्दाने आनंद सूचित होतात.

ब्रह्म हे सत् म्हणजे सत्य, नित्य, आणि शाश्वत आहे.जे सत्य असते, त्यामध्ये रूपांतर, स्थित्यंतर आणि अवस्थांतर होत नाहीत. सत्/अस्तित्व हे सूक्ष्म व अदृश्य असते.सत् ब्रह्म हे शब्दाच्या पलीकडचे असल्याने लौकिक शब्दांनी त्याचे वर्णन करता येत नाही. म्हणून ते नि:शब्द आहे. आता नि:शब्द असणारे ब्रह्म जरी शब्दाद्वारे सांगता येत नसले तरी शब्दांनी काहीतरी सांगितल्याशिवाय त्याची कल्पना तरी कशी येणार?

म्हणून ब्रह्माचा साक्षात्कार झालेल्या साधुसंतांनी ब्रह्माविषयी सांगण्यासाठी शब्दांचा वापर केला. आपल्यासारख्या माणसांना जगाच्या मागे असणाऱ्या ब्रह्माविषयी काहीतरी माहिती व्हावी या उद्देशाने तत्त्वज्ञानी पुरुषांनी नानाप्रकारांनी ब्रह्माचे वर्णन केले आहे.

## १७ जुलै

सत् / अस्तित्व हे प्रवाही झाले की त्याला चैतन्य म्हणतात. अस्तित्व हे लहरींनी युक्त असते, तर चैतन्य प्रवाही असते. गति आणि प्रवाह यात जो फरक आहे तोच फरक अस्तित्व आणि चैतन्य यामध्ये आहे. गतीमुळे प्रवाह असतो, प्रवाहाला स्वतंत्र अस्तित्व नाही. प्रवाही अस्तित्व म्हणजेच चित्/ चैतन्य. अस्तित्त्व हे चैतन्यात भरलेले आहे. अस्तित्व आणि चैतन्य एकत्र आले की तेथे आनंद असतोच. ब्रह्माचा आनंद हा अखंड आहे. या जगातील कोणताही लौकिक आनंद ब्रह्मानंदाच्या तोडीला येऊ शकत नाही. ज्याला ब्रह्माचा साक्षात्कार होतो तो पुरुष ब्रह्मानंदरूप होऊन जातो. असे हे सच्चिदानंद ब्रह्माचे शब्दातील स्पष्टीकरण आहे.

आता ब्रह्म म्हटले की तेथे माया आलीच; पण ब्रह्म हे मायेच्या तडाख्यात सापडत नाही. ब्रह्म हे मायातीत आहे.

एका दृष्टीने पाहिल्यास ब्रह्म आणि माया हे दोन्ही एकच आहेत.भूमितीतील बिंदूप्रमाणे ब्रह्म आहे. भूमितीतील बिंदू एकापुढे एक ठेवित गेल्यास रेषा तयार होते. या रेषेप्रमाणे माया आहे. माया कळली की ब्रह्म कळते. ब्रह्म आणि माया यांची व्याप्ती सारखी आहे. परमात्म्याप्रमाणे ब्रह्म हे चिद्वायुस्वरूपी आहे. त्या वायूचा विलास म्हणजे विश्व आहे. आणि विश्व हे चिद्वायूचा विलास असल्याने विश्व हे मायेमुळे भासते असे म्हटले जाते.

# १८ जुलै

परमात्मा हा सगुण रूप आहे. याचा अर्थ तो आमच्यासारखा आहे असे आपण समजतो. परंतु ते बरोबर नाही. अदृश्य परमात्मा दृश्य होणे हे परमात्म्याचे सगुण रूप आहे.

सत् म्हणजे अस्तित्व, हे चैतन्याने नटलेले असल्याने तेथे आनंद असतो. अस्तित्व हे सूक्ष्म आणि अदृश्य आहे. चैतन्य चंचळ आहे. गति आणि प्रवाह यात जो फरक आहे तोच फरक अस्तित्व आणि चैतन्य यात आहे. गतीमुळे प्रवाह असतो. प्रवाहाला स्व:ताचे अस्तित्व नाही.

साधनात ज्याचा अभ्यास करावयाचा तो विषय अदृश्य. ज्या मार्गावरून वाटचाल करावयाची तो मार्ग अदृश्य. ज्या गतीवर लक्ष ठेवायचे ती गती अदृश्य, आणि साधन करणार तोही अदृश्य. अशा परिस्थीतीत साधनाची अटकळ जमून ते साध्य होण्यासाठी किती काळ लागेल हे सांगता येत नाही.तथापि साधनाचा प्रयत्न चालूच ठेवावयास हवा.

अनुसंधानात्मक साधन हेच खरे साधन आहे. बैठक आसन घालून,दृष्टि स्थिर करून, गतीवर कान व दृष्टि ठेवून हे अनुसंधान साधावयाचे आहे.

उपाधिभूत जीवनातील अनावश्यक भाग बाजूला होऊन आवश्यक भाग पदरात पडण्यासाठी काही विशिष्ट तितका काळ जावाच लागतो.

## १९ जुलै

अनुग्रह होणे म्हणजे काय? ग्रह अनुकूल होणे. अर्थात ते ग्रह म्हणजे बाहेरचे शुक्र इत्यादी ग्रह नव्हेत. शरीर, मन, चित्त,बुद्धि,प्राणाची गती यांची परस्पर असणारी प्रतिकूलता दूर होऊन ते अनुकूल होणे म्हणजे अनुग्रह.

नामस्मरणाला काळवेळ नाही. याचा अर्थ आम्ही असा घेतो की सवड होईल त्याप्रमाणे नामस्मरण करावे, पण असे समजणे ही भूल आहे. व्यवहारात कोणत्याही कार्यास योग्य काळवेळ लागतो हे आपणांस माहीत आहे.काळ आला होता पण वेळ आली नव्हती हा वाक्य प्रचारही आपण वापरतो. काळवेळेवरून व्यवहारात माणसाची जन्मकुंडली तयार केली जाते.मग परमार्थात मात्र काळवेळेला काही अर्थ नाही असे असेल काय ? रात्रंदिवस नामस्मरण करण्याचा प्रयत्न करावयाचा ही गोष्ट नामस्मरणाला काळवेळ नाही या शब्दांनी सांगितली आहे.

परमार्थात गुरुशिष्यांचे ऐक्य होते म्हणजे काय? त्या लोकांचे देह तर भिन्न असतातच. हे ऐक्य म्हणजे उपाधिभूत जीवनाचे आणि प्राणगतीचे ऐक्य होणे होय. गुरुशिष्यांच्या जीवनगतीचे ऐक्य झाले असल्यामुळे दोघांच्या अंत:करणात आत्मप्रकाश असल्याने कोण गुरु व कोण शिष्य हे सांगता येत नाही.

एकदा या चैतन्याचा अभ्यास पूर्णत्वाने साधला की माणसाच्या इच्छा आणि अभिलाषा यांचा गंधसुद्धा शिल्लक रहात नाही.

## २० जुलै

गुरुभक्तांचे चार प्रकार आहेत. १) निस्सीम गुरुभक्त:- जे कोणी सद्गुरूंच्या मनातील ओळखून त्यांचे इच्छे प्रमाणे, त्यानी काहीही सांगितले नसता करतात ते निस्सीम गुरुभक्त. २) उत्तम गुरुभक्त :- कोणत्याही परिस्थितीत सद्गुरूच्या आज्ञेचे पालन जे तंतोतंत करतात ते उत्तम भक्त.

३) मध्यम गुरुभक्त :- गुरूंच्या अर्ध्या वचनात रहाणारे म्हणजे गुरु जे सांगतात त्यातील आपल्याला जे काही रुचेल आणि पटेल तेवढेच करणारे ते मध्यम गुरुभक्त.

४) निकृष्ट गुरुभक्त :- हे गुरु करतात, गुरुकडे जातात. गुरुचे म्हणणे ऐकून घेतात पण गुरूच्या सांगण्याकडे काणाडोळा करतात.

व्यवहारात पदार्थाला नाम व रूप असते. नामावरून पदार्थाचा बोध होतो आणि पदार्थाच्या रूपावरून त्याचे नाव कळते परंतु परमार्थात जे नाम आहे, ज्या नामाचा संतांनी अट्टाहास धरला ते नाम चैतन्यरूप, वायुरूप आहे. ते नाम आणि रूप हे भिन्न नाहीत. नाम तेच रूप आहे.

परमार्थातील नाम हे गतिरूप आहे. त्या नामाच्या गतीशी आपली गति मिळविली की नामस्मरण सुरू होते.तेच परमार्थातील साधन आहे. संतांनी या नामस्मरणाचा अट्टाहास धरला. या नामस्मरणाच्या अखंड अभ्यासाने जीव आणि आत्मा हे दोघे एकच आहेत असा अनुभव येतो.

## २१ जुलै

आपली वृत्ती अंतर्मुख होऊन, ज्यावेळी सद्‌गुरूंनी दाखवून दिलेल्या गतीवरच आपले लक्ष अनुस्यूतपणे रहाते आणि चित्ताची एकाग्रता होते, तेव्हा आपले साधन होत आहे असे समजावयाचे.

आम्ही काय म्हणतो की, सद्‌गरूंच्या मनात असेल तर ते कृपा करतील आणि मगच आम्हाला अनुभव येईल. परंतु सद्‌गुरूंची कृपा ही सहजासहजी होत नाही. ती होण्यास खडतर साधनाची आवश्यकता आहे.

शरीराला, मनाला काही काळ विश्रांती लागते. मग प्राणाला विश्रांती नको काय ? प्राण म्हणजे काय भाड्याचे घोडे आहे की जे सतत राबवून घ्यावे ? प्राणालाही विश्रांती आवश्यक असते. प्राणाला विश्रांती देण्याचे सामर्थ्य सद्‌गुरूंच्या जवळ आहे. म्हणूनच सद्‌गरूला प्राणेश्वर म्हणतात.

जीवन उर्ध्वगामी झाल्यावर प्रारंभी जीवाची अशी काही गडबड आणि धांदल उडते की, साधन आता पुरे म्हणण्याची वेळ त्याला येते. पण ही धांदल पुढे येणाऱ्या आत्मानुभूतीची पहिली पायरी आहे, हे लक्षात आल्यास चित्तविक्षेप होत नाही.

रात्रंदिवस उपासना म्हणजे काय ? दिवस व रात्र हे सूर्य आणि चंद्र यांचे प्रतीक आहेत. त्या दोन गतींच्या पलीकडे जाऊन उपासना सुरू झाली की रात्रंदिवस उपासना झाली.

## २२ जुलै

आम्ही जे कर्म करतो त्याचे अनेक प्रकार आहेत. १) शरीर कर्म :- बध्द माणसा पासुन सिदूध पुरुषांपर्यंत जोपर्यंत देह आहे तोपर्यंत शरीराचे कर्म अटळ आहे.
२) प्रारब्ध कर्म :- ज्या प्रारब्धामुळे आपले सध्याचे जीवन आहे ते प्रारब्ध भोगूनच संपावावे लागते. काही केले तरी प्रारब्ध चुकत नाही. ३) कर्तव्य कर्म :- जे स्वत:चे कर्तव्य आहे ते करीत रहाणे हे कर्तव्य कर्म सर्वांना माहीत असते. ४) हौसेचे कर्म :- आपण जे जपण्याचे, व्रते, निरनिराळ्या देवतांच्या पूजा वगैरे करतो ते हौसेचे कर्म आहे. यातील पहिली तीन कर्मे अटळ आहेत. तथापि आमची टाळाटाळ दिसून येते की पारमार्थिक कर्मात म्हणजे ते साधन करण्यात. याचे कारण एकच की परमार्थातील अनुभव ताबडतोबीने येत नाहीत. एक दिवस साधन झाले नाही तर खिशातला एक रुपया कमी झाला असे होऊ दे म्हणजे बघू आमची साधनात कशी टाळाटाळ होते ते.

परमार्थाविषयी आस्था असल्याशिवाय कुणी परमार्थाकडे वळत नाही. परमार्थातील साधनाविषयी आस्था असल्याशिवाय कोणीही साधन करणार नाही. आता जरी साधनाला बसले तरी चित्ताची बैठक स्थिर होण्यासाठी आस्थेचीच जरुरी आहे. ज्या विषयाचे बाबतीत आपणाला आस्था नाही त्या विषयाचे बाबतीत आपण टंगळमंगळ करतो. म्हणून परमार्थातील अनुभवासाठी आस्था महत्त्वाची आहे.

साधनाच्या अभ्यासात राहिल्याशिवाय सोहंरूपाची ओळख होणार नाही. सोहंरूप दिसण्यास साधन केलेच पाहिजे.

## २३ जुलै

सद्गुरूवरील अनुराग आणि प्रेम यांच्यामुळे ज्या शिष्याला सद्गुरूचा वेध लागला आहे, ज्याचे अंत:करण सारखे सद्गरूकडे ओढ घेत आहे, ज्याला दुसरी उपासना रुचत नाही, त्या शिष्याची इच्छा असो अगर नसो त्याच्यावर सद्गुरूच्या कृपेचा वर्षाव होतो. हे म्हणणे काव्य नसून अनुभव आहे.

फक्त पाच मिनिटे साधनाला बसून परमार्थातील अनुभव येणार नाहीत. आमचे कसे असते ? पाच मिनिटे साधन झाले की बस्स झाले. मग त्या साधनाबद्दल बेपर्वाईची वृत्ती असते. साधनाची अशी टाळाटाळ परमार्थात उपयोगाची नाही.

अवतार हे तीन प्रकारचे आहेत :-

१) पाण्याचे बर्फ होते, त्याप्रमाणे निर्गुण, निश्चल, निराकार असे चैतन्य साकार रूपात प्रगट होते. हा पहिल्या प्रकारचा अवतार.

२) अवतार हा शब्द अव धातू पासून साधला असल्याने अवतार म्हणजे वरून खाली येणे. या जगाचा उद्धार करणेसाठी भूतलावर येणारे पुरुष हे म्हणजे दुसऱ्या प्रकारचा अवतार. हे अवतार म्हणजे संतसाधु. हे संतसाधु स्वत:सिद्ध असतात.

३) साधनाच्या अभ्यासाने आणि सद्गरूच्या कृपाप्रसादाने जे ब्रह्मरूप झाले असे जीवनमुक्त साधु हे म्हणजे अवताराचा तिसरा प्रकार होय. असे प्रकार जरी सांगितले तरी हे तिघेही ब्रह्मरूपच असतात हे विसरु नये.

## २४ जुलै

चैतन्यापासून अफाट विश्वाची उत्पत्ती झाली. चैतन्याने सर्व व्यापून टाकले आहे. साहजिकच या जगात वावरणाऱ्या आपल्या मानवी शरीरात चैतन्य आहे. देह आणि चैतन्य हे वेगवेगळे आहेत. त्या दोहोत फरक आहे.

शरीर हे कधीतरी उत्पन्न झाले असल्याने त्याचा विनाश होतो. शरीर हे नाशवंत आहे. या उलट चैतन्य हे अमृत आहे. त्याचा कधीच विनाश होत नाही. शरीर संपले ,नष्ट झाले तरी चैतन्य संपत नाही. चैतन्याला नाश नसून ते असतच असते.

शरीर हे हाड, मांस, रक्त इत्यादि वस्तूंनी बनलेले आहे. ते सर्व खरे म्हणजे टाकाऊ पदार्थ आहेत आणि त्या टाकाऊ पदार्थांनी देह बनला आहे. या शरीरात चैतन्य कार्यप्रवण असल्यावर ते टवटवीत दिसते. आत जर चैतन्य नसेल तर नुसत्या अचेतन देहाचा काय उपयोग आहे ?जर देहाने अथवा देहाला देहाचे ज्ञान होत असते तर दोन मढ्याना परस्परांचे ज्ञान झाले असते. पण तसे होत नाही. देहात चैतन्य आहे तोपर्यंतच माणसाला स्वत:चा देह व इतर पदार्थ यांचे ज्ञान होत असते. शरीर हे चैतन्यासाठी आहे. चैतन्य हे शरीरासाठी नाही. जसे घर हे आपणा माणसासाठी असते, माणूस घरासाठी नसतो.

## २५ जुलै

शरीरात चैतन्य आहे. तरी शरीर म्हणजे चैतन्य नव्हे. शरीरातून चैतन्य बाहेर गेले की उरते ते निर्जीव मढे. देहात सारखे बदल होत असतात. शरीरातील एक पेशी जाते तेथे दुसरी पेशी येते. या उलट चैतन्य न बदलणारे आहे. शरीर क्षीण हाते. चैतन्य क्षीण होत नाही. शरीर अनित्य आहे. चैतन्य नित्य आहे. चैतन्याशिवाय शरीराला काय किंमत आहे ? चैतन्य शरीरातून बाहेर पडले की शरीर हे लाकडासारखे ताठ होऊन पडते.

जर शरीरात चैतन्य आहे तर ते आपणास का कळत नाही, असे कुणी विचारील याचे उत्तर असे :- देह हा बाह्य विश्वातील दृश्याकडे आकृष्ट होतो, व त्यामुळे आपणास चैतन्याची ओळख होऊ शकत नाही. देहाशी तादात्म्य झाले की साहजिकच माणसाला दृश्याचे आकर्षण वाटू लागते. आता जर चैतन्य कळावे, चैतन्याचे आकर्षण लागावे असे वाटत असेल तर माणसाचे बाह्य दृश्याचे आकर्षण सुटावयास हवे.

जेव्हा जीव या शरीरात शिरला आणि त्या शरीराशी तादात्म्य पावला तेव्हाच तो चैतन्याला विसरला. शरीराला बाह्य दृश्याचे आकर्षण असल्याने, जीवाचे चैतन्याकडे दुर्लक्ष झाले. म्हणून देहतादात्म्य नष्ट व्हावयास हवे. देहाचे विस्मरण झाले तर चैतन्याचे स्मरण होईल.

## २६ जुले

या जगात बरे वाईट प्रसंग प्रत्येक माणसावर ओढवत असतात. आणि जोपर्यंत या जगात रहावयाचे आहे तोपर्यंत ते प्रसंग टाळता येणार नाहीत. प्रत्येकाच्या प्रारब्धानुसार हे प्रसंग येतातच. प्रारब्धाचा तडाका हा रावापासून रंकापर्यंत सर्वांनाच बसत असतो; त्यातून कोणी सुटत नाही. ब्रह्मरूप झालेल्या संतानासुद्धा जेथे प्रारब्ध चुकविता आले नाही, तेथे आपली काय कथा?

सद्गुरु हेच आपल्या जीवनाचे सारसर्वस्व व्हावयास हवे. सद्गुरु हे सोहंस्वरूप असल्यामुळे त्यांचे चरण आपल्या देहातच आहेत. त्या चरणांकडे जर आपले लक्ष असेल तरच आपणास समाधान प्राप्त होईल. आपल्या शरीरात गुरुचरणांकडे लक्ष ठेवणे हेच साधन आहे.

एकच उपदेश सर्व माणसांना फलदायी होत नाही, हे चांगले लक्षात ठेवावयास हवे. म्हणून संत हे आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक माणसाच्या प्रकृतिमानाप्रमाणे त्याला उपासना सांगतात. कोणाला साधनाचा अभ्यास सांगतात, कुणाला नामजप करण्यास सांगतात, कुणास कीर्तनास जाण्यास सांगतात, तर इतरांना काही करू नका असेही सांगतात. अर्थात संत आपणास जे करावयास सांगतात त्याप्रमाणे निष्ठेने वागून आपण आपली उपासना चालू ठेवली पाहिजे.

# २७ जुलै

सत्य आणि विपर्यस्त असे ज्ञानाचे दोन प्रकार आहेत. सोहंरूपाची अखंडत्वाने प्रतीती येणे हे सत्य ज्ञान आहे. या व्यतिरिक्त जे जे ज्ञान आहे ते ते विपर्यस्त ज्ञान आहे. विपर्यस्त ज्ञानाने चित्ताची स्थिरता नाहीशी होते. चित्ताची स्थिरता ही सत्य ज्ञानाच्या अस्तित्वाची खूण आहे.

आजकाल कालमान परिस्थितीने कर्ममार्गाची, ज्ञानमार्गाची आणि योगमार्गाची "समाधीच" झाली आहे. भक्तिमार्गाचे नाव तूर्तास फक्त अस्तित्वात आहे. भक्तिमार्गाच्या खऱ्या स्वरूपावर केव्हाच पडदा पडला आहे.

सद्गुरूनी साधन करावयास सांगीतले, तेव्हा ते आता केले पाहिजे, अशी जी ओझे वहाण्यासारखी आपली वृत्ति असते ती योग्य नाही. खरे म्हणजे परमात्म्याच्या अनुभूतीसाठी ध्यास लागून साधनाचा अभ्यास व्हावयास हवा.

खरा परमार्थ ज्या ठिकाणी नाही तेथे भपका, डामडौल करावा लागतो. जेथे खरा परमार्थ आहे तेथे प्रारब्धानुसार त्या संताजवळ मानसन्मान, संपत्ति वगैरे असेल. परंतु ज्याला भपका म्हणतात तो मात्र दिसणार नाही.

देह म्हणजे सर्वस्व, देह म्हणजे मी, अशी दृढ भावना बाळगून आपण देहाला महत्त्व आणि किंमत देतो, आणि त्याची काळजी घेतो. पण देहाचे महत्त्व, किंमत, काळजी संतांना नसते.

## २८ जुलै

जीवाच्या मागे पापपुण्यात्मक कर्म आणि त्या अंती जन्ममरण लागलेले आहे. जीव जर कर्मरहित, पुण्यपापरहित झाला तर तो जन्ममरणरहित होतो. आणि तो देहातीत होतो आणि तो देहातीत झाला की त्याचे जीवन चैतन्यरूप होऊन जाते.

परमात्म्याच्या प्राप्तीच्या दृष्टीने पाहिल्यास प्रारंभापासून आपले मन मोकळे असावयास हवे. आमच्या मनात –हृदयात – जर सर्वांना प्रवेश असेल तर ते चालणार नाही. आमचे मन हे जोपर्यंत पुणेरी भेळेप्रमाणे आहे तोपर्यंत परमार्थाचे कोष्टक आम्हास जमणार नाही. परमार्थ होण्यास मन मोकळे हवे.

जो आपल्या कृतीने अथवा बोलण्याने दुसऱ्याला न दुखविता त्याला आनंदी आणि सद्‌गुणी बनवितो, त्याची चित्तशुद्‌धि झाली आहे असे समजावे. चित्ताचा विक्षेपन होणे म्हणजेच चित्ताची शुद्‌धि.

आपण आपले डोळे झाकले की अंधार दिसतो. या अंधाराचे ज्ञान ज्या प्रकाशाने होते तोच आत्म्याचा प्रकाश आहे. बाह्य जगातील नाना प्रकारच्या प्रकाशांना उदय आणि अस्त म्हणजे प्रारंभ आणि शेवट असू शकतात. आत्मप्रकाशाचा मात्र सदा उदयच आहे. जगाच्या उत्पत्तीपासून ते थेट जगाच्या अंतापर्यंत आत्म्याचा प्रकाश हा सतत उदितच आहे.

काशीतील गंगानदीत स्नान केले असता पाप नष्ट होईल, पण पाप करण्याची माणसाची प्रवृत्ति ही मात्र नष्ट होत नाही.

## २९ जुलै

संतानी गंगेत स्नान केले. पण ते काशीतील गंगेत नव्हे. त्यांची गंगा त्यांच्या देहाच्या बाहेर कुठेही नाही. त्यांची गंगा त्यांच्याच शरीरात असते. ही गंगा देहातील त्रिकूट या स्थानी आहे. संत महात्मे हे त्रिकूट स्थानातील गंगेत स्नान करतात. संतांप्रमाणे जीव जर त्रिकूट स्थानात गेला तर त्यालाही तेथे गंगास्नान घडेल.हे गंगास्नान ज्यास घडते त्याची पाप करण्याची प्रवृत्ति नाहीशी होते.

आपण अशी कल्पना करतो की संत हे काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादि सहा रिपूंच्या पलीकडे गेलेले असतात. परंतु तसे नाही. संत त्या सहा विकारांचे विषय बदलतात. त्यामुळे ते विकार त्यांना बाधक अथवा घातक होत नाहीत.

हे दृश्य जगत्, हे दृश्यशरीर हे सर्व काही जड अशा आकाश, वायु, तेज, पाणी, आणि पृथ्वी अशा पाच महाभूतांच्या परस्पर मिश्रणाने बनलेले आहे. त्यांतील प्रत्येक महाभूतात इतर चार महाभूतांचे अंश असतातच. ज्या भूताच्या अंशाचे प्रमाण जास्त असते त्या जास्तीच्या प्रमाणावरुन त्या त्या भूताला ते ते नाव दिले आहे.

संतवचनांतील आपणास पाहिजे ते, रुचेल ते घेतो, आणि बाकीचे सोडून देतो. आपण फक्त "रामनाम जपे वाणी" इतकेच घेतो, परंतु "काहीच न करोनी प्राणी" हे वचन मात्र सोडून देतो.

## ३० जुलै

माळेचे महत्त्व फार मोठे आहे. माळेने नामस्मरणाची माळ सुरू होते. माळेने स्मरण होते म्हणून तिला स्मरणी असे म्हणतात. वारकरी संप्रदायात तुळशीची माळ आहे. गोंदवलेकर महाराजांचे संप्रदायात माळ आहे. पूर्वीचे ऋषिमुनि हे देखील अक्षरांच्या माळेने जप करीत असत. तुकाराम महाराजांनी तेरा मण्यांच्या माळेचा उल्लेख केला आहे. काही माळांना दोन मणी असतात. तेथे मेरु मणि ओलांडण्याचा प्रश्न येत नाही. रामपाठ या आपल्या ग्रंथात मामामहाराज केळकरांनी मनोमाळ सांगितली आहे ती अशी :– मन म्हणजे संकल्प आणि विकल्प. आता जर या संकल्पात तसेच विकल्पात नाम घेतले तर ती मनोमाळ होते. या मनोमाळेने नाम घेताना मनाचे संकल्प आणि विकल्प हे नाममयच होतात. याचा अर्थ मनाचे संकल्प विकल्प नाहीसे होतात, मनाचे मनत्व शिल्लक रहात नाही. आणि मनाचे मनत्व संपले की आत्म्याचा साक्षात्कार होतो.

समजा, माणसाला या जगात सारे काही इष्ट मिळाले पण आत्मसमाधान मात्र मिळाले नाही तर त्याने मिळविले तरी काय असा प्रश्न आहे. चैतन्याने प्राप्त होणारी उत्साहवर्धक शक्ति माणूस नको ते व्यवहार करुन गमावीत असतो. तीच शक्ति जर माणसाने स्वस्थ राहून प्राप्त करुन घेतली तर त्याला आत्मसमाधान मिळते. आत्मसमाधान हे असे आहे की त्याच्यासारखे अन्य काही या जगात कुठेही सापडतच नाही.

## ३१ जुलै

काही लोकांना रोजचे भविष्य, आठवड्याचे भविष्य, महिन्याचे भविष्य, फार काय वार्षिक भविष्यसुद्धा बघण्याचा मोठा छंद असतो. आता माणसाची रास कुठलीही असली तरी त्यात काही ग्रह अनुकूल तर काही ग्रह प्रतिकूल असे प्रत्येकाच्या कुंडलीत असतातच. त्यामुळे काही उलट सुलट गोष्टी त्या भविष्यात सांगितल्या असल्या तरी शेवटी एक वाक्य अगदी ठरलेले असते आणि ते म्हणजे "जपून रहा". मग आमचे म्हणणे असे की भविष्य जाणून घेण्याची जरुरीच काय? आयुष्यभर आपण जर जपून राहिलो तर आपले काय होईल?

व्यवहारात "जप" हा शब्द अगदी व्यापक आहे. जप म्हणजे प्रकृति जप, पैशाचे पाकीट जप, सामानसुमान जप, एकना दोन. परमार्थात मात्र "जप" चा अर्थ असा आहे :- आपल्या जीवनात सहजतेने स्वयंसिद्ध, स्वयंपूर्ण, स्वयंस्फूर्त, स्वयंचलित, स्वसंवेद्य, स्वयंध्वनिरुप अशा चैतन्याचा सर्वत्र घुमणारा नाद हा जपून तेथे समरस होणे, यालाच संत महात्मे खऱ्या अर्थाने "जप" असे म्हणतात. जे चैतन्य लक्ष नसल्याने आपल्या शरीरात फुकट चालले आहे ते "जपायचे" आहे.

नाम हे असे आहे की त्यामुळे अनंत पेशीनी बनलेले आपले शरीर आरपार बदलून जाते. मग पाप करण्याची वृत्ति आणि देहासक्ति यांना तेथे थाराच रहात नाही.

## १ ऑगस्ट

चैतन्याचा विलास म्हणजे विश्व आहे. विश्व हे दृश्य आहे. चैतन्य मात्र दृश्य नसून ते अदृश्य आहे.

जगातील पदार्थांना आकार आहेत आणि विकार आहेत. चैतन्याला कोणताही आकार नाही आणि विकार नाही. ज्यामध्ये कोणताही आणि केव्हाही फरक होत नाही ते चैतन्य. चैतन्य हे कधीही विकृत होत नाही.

विश्वातील दृश्य वस्तूंना काहीतरी नाम आहे आणि विशिष्ट रूप आहे. तथापि त्या पदार्थाचे नाम आणि रूप हे मात्र एकच असत नाहीत. याउलट चैतन्याचे रूप तेच त्याचे नाम आहे. आणि चैतन्याचे नाम हेच त्याचे रूप आहे. चैतन्याचे नाम व रूप भिन्न नाहीत. चैतन्याच्या रूपाने जे स्फुरण पावते तेच त्याचे नाम आहे.

निसर्गात पदार्थांची नाना प्रकारची मिश्रणे होत असतात. ती सर्व चैतन्यामुळे होतात; पण ती मिश्रणे मात्र शाश्वत नसतात. याउलट चैतन्य हे एकरूप आहे आणि ते चिरंतन शाश्वत आहे.

दृश्य विश्व हे चंचळ आहे म्हणजे ते सातत्याने बदलणारे आहे. याउलट चैतन्य हे निश्चळ आहे. ते चैतन्य चंचळ विश्वाच्या बुडाशी आहे. दृश्य विश्व म्हणजे चैतन्यावर उठणारी लहर आहे. जशी संथ पाण्यात लाट उठते तद्वत.

## २ ऑगस्ट

जगाचा उद्‌भव आणि विनाश हा सर्व चैतन्याचा खेळ आहे. जगाच्या प्रारंभापासून ते नाशापर्यंत चैतन्यच आहे. जगाच्या आरंभी चैतन्य होते; जगाच्या अंतानंतरही चैतन्यच असते. हे विश्व असो अथवा नसो, चैतन्य हे आहेच आहे; ते असतच असते.

ज्याप्रमाणे जगाचा प्रारंभ होण्यापूर्वी आणि जगाच्या शेवटानंतरही चैतन्यच असते, त्याप्रमाणे जगाच्या स्थितिकाळातही चैतन्यच असते. चैतन्य हे सर्व विश्वात भरून राहिलेले आहे.मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत, दगडापासून ते थेट अनंत विश्वापर्यंत सर्वत्र स्पंदन आहे आणि स्पंदन हेच चैतन्य आहे.

या जगात अनेक पदार्थ आहेत. त्यातील काहींना आपण खरे म्हणतो काहींना खोटे म्हणतो. या जगात चैतन्य हे एकमेव सत्य आहे. चैतन्याशिवाय जे काही आहे असे वाटते अथवा जे काही आहे असे भासते, ते सर्व असत्य आहे. एका चैतन्याखेरीज इतर कोणतीही वस्तु एका स्थितीत, एका अवस्थेत आणि एका रूपात टिकून रहात नाही. चैतन्य मात्र बदलत नाही. ते आहे तसेच रहाते. चैतन्याला रूपांतर, स्थित्यंतर आणि अवस्थांतर नाही.

तसे पाहू गेल्यास या जगात जड असे काही नाही. सर्व ठिकाणी चैतन्य आहे. म्हणजे असे :- विश्वातील प्रत्येक पदार्थात स्पंद आहे. स्पंद म्हणजे चैतन्य आहे. साहजिकच सर्व जग चैतन्यमय आहे.

## ३ ऑगस्ट

समजा, एकाद्या शेतकऱ्याची जमीन नदीबुड आहे. तेथे शेतकऱ्याने नुसते पाटातून पाणी फिरविले की भरघोस पीक येणार आहे. त्याला आकाशातील ढगाकडे पहाण्याचे कारणच नाही. पण हे घडले नाही तर तो शेतकरी कमनशिबीच म्हणावयास हवा. असेच परमार्थात आहे. जीवनचैतन्याचा पाट वहात आहे आणि त्याचा ध्वनि सतत घुमत आहे. या ध्वनीचा उपयोग करून घेतला तर माणसाचे जीवन आत्मसाक्षात्काराने उजळून निघेल. मग सुखाला काय कमी आहे ?

झाडाच्या मुळाशी पाणी घातले तर ते शेंड्यापर्यंत जाते. परंतु शेंड्यावर जरी सतत पाणी मारत राहिले तरी ते मात्र मुळाकडे जात नाही. तसे नुसत्या देहाच्या सुखाने सुखी होण्याचा प्रयत्न करणे हे शेंड्यावर पाणी मारण्यासारखेच आहे. याउलट मूलभूत असणाऱ्या चैतन्याच्या अनुसंधानात राहिले तर सर्व सुख प्राप्त होते.

राम कृष्ण हरि म्हणजेच अकार उकार मकार किंवा सकार हकार मकार किंवा रकार आकार मकार आहेत. इडा पिंगला सुषुम्ना या त्रिवेणीत प्रकर्षाला येणारा तो चैतन्याचा ध्वनि आहे. या ध्वनीमध्ये जेव्हा मनाचा लय होतो, तेव्हा जीवनाची गति उर्ध्वगामी होते.

नामाची आवड ही पूर्व सुकृतामुळे निर्माण होते. म्हणून जर पूर्व सुकृत नसेल तर नामाची आवड उत्पन्न होतच नाही.

## ४ ऑगस्ट

परमार्थात नामाची आवड ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. हे नाम काय आहे? नाम म्हणजे शब्द नव्हे, अक्षरे नव्हे, मंत्र नव्हे, तंत्र नव्हे, शरीराचा आणि मनाचा खेळ नव्हे, आणि कपोल कल्पित तर नव्हेच नव्हे. नाम हे देण्यासारखे नाही आणि घेण्यासारखे नाही. नाम हे माणसाच्या जीवनाशी निगडित आहे. या नामातच आत्माराम प्रगट होतो, असा त्या नामाचा प्रभाव आहे. नामामुळे "नामी (ईश्वर ) प्रगट होतो. आणि मग ना" "मी" अशी अवस्था प्राप्त होते. नामाने ना मी होते म्हणजे माणसाचा "मी" हा शिल्लकच रहात नाही. आता हा "मी" म्हणजे अहंकार जर संपल तर "माझा, माझी, माझे" असे ममत्व कुठून शिल्लक रहाणार? असे हे जे अत्यंत सामर्थ्यसंपन्न नाम आहे. ते गुरु कडून जाणून घेणे आवश्यक आहे.

राम आणि कृष्ण ही जीवनाची गति आहे. आणि या गतीवरुनच शरीराचे अस्तित्व कळून येत असते.

जीव हा निसर्गत: बहिर्मुख आहे. त्यामुळे अंतर्मुख होणे हे त्याला कठिण जाते. अंतरी "ये" आणि "जा" असे त्याने केले तर तो अंतर्मुख होऊ शकतो. जसे नवीन लग्न झालेली मुलगी ही माहेरी, सासरी, सासरी माहेरी अशी ये जा करता करता ती सासरी स्थिर होते, तद्वत.

## ५ ऑगस्ट

संत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, प्रतिभासंपन्न कवि हे सारे प्राय: एकांत प्रिय दिसून येतात. त्यांचे खरे विश्व वेगळे असते. त्या विश्वाचे ते सम्राट असतात. त्यांचे विश्वच वेगळे आहे म्हटल्यावर त्यांची तेथील अनुभूति ही वेगळीच असते हे सांगावयास नकोच. परमार्थी माणसाला एकान्त मानवावा लागतो.

पुस्तकावरुन काही गोष्टींचे ज्ञान होते, हे खरे . परंतु पुस्तकातील सर्वच गोष्टींचा उलघडा होतो असे नाही. आत्म्याचे ज्ञान झाले असता पुस्तकामधील न कळणाऱ्या गोष्टींचा उकल होतो.

वर्तमानकाळी जीवाला एक देह आहे. हा देह म्हणजे जगातील मंचावर त्याने घेतलेला एक वेष आहे. परंतु त्या देहापेक्षा आपण जीव कोणीतरी वेगळे आहोत, हे जीवाने लक्षात घ्यावयास हवे.

या जगात आपल्याला 'श्रेयस" काय आहे आणि "प्रेयस" काय आहे. हे माणसाने जाणून घेणे जरुर आहे. माणसाला आपले श्रेयस कशात आहे हे जर कळून आले तर ते "श्रेयस्कर" आहे.

"सूर्यआत्माजगतूस्तस्थुषश्च" या श्रुतीच्या वचनाप्रमाणे सूर्य हा जगाचा आत्मा आहे. आत्मा हाच सूर्य आहे.

देहात जो आत्मा पहातो तो जगात आत्मा पहातो. नुसते देहाकडे अगर दृश्याकडे पाहून मात्र देहातील आत्मा दिसत नाही.

## ६ ऑगस्ट

चैतन्यापासून उत्पन्न होणाऱ्या जडात चैतन्य असते. ज्याप्रमाणे जड हे चैतन्यामुळे चलन – वलन करते त्याप्रमाणे कधी कधी जडाचा परिणाम चैतन्यावरही होतो. म्हणजे त्या दोघांच्या प्रमाणावर ते अवलंबून असते. ज्याचे जसे प्रमाण तसा त्याचा प्रभाव. उदा. विस्तवावर पाणी ओतले तर विस्तव विझून जातो. पण तेच अग्नीच्या डोंबावर पाणी शिंपडले तर तेच पाणी जळून जाते.

शरीर जड आहे. शरीरात चैतन्य आहे. तथापि शरीरात जडाचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे समजा कुणी गळा दाबला तर माणूस ओरडणारच.

चैतन्यामुळेच माणसाला सुख होत असते. कारण शरीरात चैतन्यच नसेल तर सुख कोणाला होईल व कळेल ?

आंब्याची फोड खाल्यावर सुख होते. त्या आंब्याच्या फोडीतही चैतन्य आहे. त्या परिस्थितीत चैतन्याचा अनुभव चैतन्यालाच येत असतो. चैतन्य नाहीच असे जर म्हटले तर सुख तरी कुणाला होईल ?

पण एक खरे आहे की जड वस्तूतून माणसाला मिळणारे सुख हे शाश्वत नसते. ते तत्कालिक असते. याउलट चैतन्याचे सुख हे मात्र शाश्वत असते.

## ७ ऑगस्ट

परमार्थात तीन भूमिका आहेत :- १) सगळ्यात एक २) सगळं एक आणि ३) एकात सगळं. "सगळ्यात एक असे म्हटले की शक्ति विभागून जाते. आणि मग आध्यात्मिक दृष्ट्या फारसे पदरात पडत नाही. "सगळं एक" म्हणजे "कवठा क्या कुवढा क्या" "सब घोडे बारा टक्के" या भूमिकेला खरा अर्थ नाही. "एकात सगळं" एकातच सर्व काही आहे, ही श्रेष्ठ भूमिका आहे. असा एक दगड पाहिजे - दगड हा शब्द येथे मुद्दाम वापरतो आहे. - की ज्या ठिकाणी आपण कोणत्याही परिस्थितीत नतमस्तक झाले पाहिजे. असा एक जिवंत प्राणी हवा की ज्याची आज्ञा आपल्याला शिरसावंद्य असेल. या भूमिकेत फरक होता उपयोगी नाही. एकातच सर्व काही आहे या धारणेमुळे एक अद्विवतीय शक्ति प्रगट होते.

आपली भक्ति जर बदलत असेल तर ती एकविध भक्ति कशी होईल ? आषाढ महिना आला की "युगे अठ्ठावीस विठेवरी उभा" ही आरती तोंडात घोळवायची, श्रावण महिन्यात "ओवाळू आरती मदन गोपाळा" म्हणावयाची, भाद्रपद महिन्यामध्ये "सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची" ही आरती उच्चारायची, आणि अश्विन या महिन्यात "दुर्गे दुर्घट भारी तुजवीण संसारी" अशी आरती म्हणायची. आपल्या भक्तीचे विषय जर बदलत असतील, तर आपली भक्ति एकविध होणार कशी ?

## ८ ऑगस्ट

केवळ चैतन्याकडे लक्ष असेल तर तेथे सुख आहे. मग तो प्राणी कुठे का असेना - तो स्वर्गात असो अथवा नरकात असो. नरकात तरी त्याला दु:ख होण्याचे कारण काय? कारण तेथेही चैतन्य आहे. आणि चैतन्याकडे प्राण्याचे लक्ष असेल तर त्या प्राण्याला दु:ख कसे होणार ?

खरे म्हणजे माणसाच्या जवळच चैतन्य आहे. चैतन्याइतके जवळ माणसाला या जगात अन्य काही नाही. तथापि आपण मात्र चैतन्याचे जवळ नसतो. आपले लक्ष चैतन्याकडे नसतें. म्हणून आपणांस सतत सुख होत नाही.

आपल्या अगदी जवळ असणारे, आपल्याच शरीरात असणारे चैतन्य हे तसे कळत नाही; ते संत सद्‌गुरूंनी आपणास दाखवून द्यावे लागते. त्यांनी दाखवून दिलेल्या चैतन्याकडे आपण लक्ष द्यावयास हवे. पण तसे होण्यास जड बाजूला सारावे लागते. चैतन्य पाहिजे असेल, चैतन्याचा अनुभव जर घ्यावयाचा असेल तर जड हे बाजूला होणे अत्यावश्यक आहे. जड बाजूला कसे करावे हे संत सज्जन आपणांस दाखवून देतात. सद्‌गुरूंनी सांगितलेली साधनाची कृति करून, जड बाजूला सारून, चैतन्य पाहावयाचे आहे, त्याचा अनुभव घ्यावयाचा आहे. चैतन्याच्या जाणीवेत सुख - समाधान आहे.

## १ ऑगस्ट

एक मनुष्य महापुरात बुडत होता. आपल्याला देवाने वाचवावे म्हणून तो म्हणाला "शंकरा धाव". नंदीवर बसून शंकर निघाले तितक्यात त्या माणसाने "गजानना धाव" म्हणून हाक दिली. शंकर थांबले. त्यांना वाटले आपला गजानन जाईल. उंदरावर बसून गजानन निघाले तोच त्या माणसाने "पांडुरंगा ये रे" असे आवाहन केले. पांडुरंग जाईल म्हणून गजानन गेला नाही. कमरेवरचे हात बाजूला करून पांडुरंग निघाला. तेवढ्यात त्या माणसाने दुसऱ्या एका देवाला पाचारण केले. या परिस्थितीत कोणताच देव तेथे गेला नाही. त्या माणसाने एकविधता सांभाळली नाही हे स्पष्ट आहे.

लहान मूल आईशी एकविध असते. आई त्याचा सांभाळ करते. समजा ते मूल चुलीकडे निघाले आहे. त्यावेळी "आई, मी चुलीकडे निघालो आहे. तू मला सांभाळ" असे ते मूल काही आईला सांगत नाही. पण आईचे लक्ष त्या लहान मुलाकडे असतेच. आई लगोलग मागोमाग जाते आणि त्याला उचलून बाजूला नेते. एकविध भक्ताच्या बाबतीत ईश्वर आईसारखेच करत असतो.

आकाशापासून हे दृश्य विश्व निर्माण होते. आकाशाचा "शब्द" हा गुण आहे. म्हणून दृश्य विश्वाचे वर्णन शब्दांनी करणे शक्य होते. आत्मा आकाशापलीकडे आहे; तेथे शब्द नाही; आत्मा निःशब्द आहे. म्हणून त्या निःशब्द आत्म्याचे वर्णन शब्दांनी करता येत नाही.

## १० ऑगस्ट

आत्मा सर्व व्यापक असल्याने तो सर्व विश्वात भरून राहिलेला आहे हे खरे. तो आपल्या देहातही आहे. प्रथम आपण जर आपल्या देहातील आत्मा जाणून घेतला तरच जगात आत्मा कसा आहे हे कळते.

चैतन्यामुळे आपली जाणीव आपल्याला होते. जाणीव विरहित अस्तित्व आणि अस्तित्व विरहित जाणीव, हे आपल्या जाणीवेत येऊ शकत नाही, याची जाणीव आपल्याला पाहिजे.

माणूस कितीही चांगला असला तरी तो नामाशिवाय फुकट जातो असा संतसज्जनांचा सिद्धांत आहे.

आत्मा हा दिक्, काल आणि आकाश यांचे पलीकडे आहे. आत्म्यापासून आकाश होते. आकाश म्हणजे काही नाही. या आकाशातून जे जग निर्माण होते ते सुद्धा काही नाहीसे होते; कारण त्याचे मूळ काही नाही हे आहे. गुरूच्या कृपेने एक तत्त्वाशी समरस झालेला जीव हा एकविध झाला की तो एक कायापालटच आहे. त्याचे सारे जीवन उजळून निघते.

एकविध भक्ताकडे परमात्म्याचे लक्ष असते. त्या एकविध भक्ताचा सांभाळ परमेश्वरच करीत असतो.

## ११ ऑगस्ट

धावत्या आयुष्याच्या गाडीला कोठेतरी आवर बसणे किंवा घालणे आवश्यक आहे. आयुष्याची गाडी आहे त्या वेगाने जर ती अशी धावत राहिली तर आयुष्यात सारासार विचार निर्माण होण्याचा कुठेच संभव नाही. जरा का होईना क्षणभर स्थिर झाल्याशिवाय आपल्याला या जगातील सार आणि असार कळणे हे खरे कठीणच आहे. एक भगवंत आणि त्याचे नाम हे सार आहे आणि बाकी सर्व असार आहे हे जर समजून आले तर त्या सारभूत नामाचे ठिकाणी आपण आपला संपर्क सतत ठेवला पाहिजे.तरच आपले हित होईल. अशा प्रकारे सार आणि असार यांचा विचार करून माणसाने आत्महित साधून घ्यावयाचे आहे.

सारासार विचार न करता जर साऱ्याकरिता सारे केले मग सारे केलेले कोठे गेले याचा पत्ताच जर लागला नाही तर सारे केलेले सारे व्यर्थ आहे; पण हे सारे जाणतात का? नाही.

नाम हेच खरे जीवन आहे. नामाशिवाय जीवन असू शकत नाही. परंतु ही गोष्ट जर माहीत नसेल तर आयुष्य आहे म्हणून देहाच्या आधाराने लोक हे जीवन कंठीत असतात आणि पुढे आयुष्याला मुकतात. अशा लोकांना खऱ्या जीवनाचा आनंद घेता येत नाही. हे लोक जीवनाचे बैठकीवरच देहाच्या भोगात गर्क होऊन आयुष्यात येणाऱ्या सुखदुःख इत्यादि द्वंद्वाशी झगडत रहातात.

## १२ ऑगस्ट

श्वासोच्छ्वास हा आयुष्याचा दर्शक आहे. या श्वासोच्छ्वासात नाम आहे. याचा अर्थ असा की श्वास आणि उच्छ्वास यांचे दरम्यान असणाऱ्या सूक्ष्मतर कालावधीत नाम आहे. त्या कालावधीत साधकाचा जितका काळ जाईल तितका अनुभव वा प्रचीती त्या साधकाला येते.

या जगात जगण्यासाठीच साऱ्या माणसांची धडपड चालू असते.परंतु जगणं म्हणजे काय याचा जगणारा माणूस कधी विचारच करीत नाही. मग त्या जगण्याचा उपयोग तरी काय ? जन्म आणि मरण या दोन टोकांमध्ये जगणे आहे. आता जगणारा कोण आहे हे जर कळले तरच त्या जगण्याचा उपयोग आहे.

या जगात सार काय आहे आणि असार काय आहे याचा विचार मनुष्याने केला तर त्याला आत्महित साधता येते. आत्महित म्हणजे आत्म्याचे हित म्हणजे आपण जे कोणी आहोत त्या आपले हित साधता येते.

सत्त्व,रज, आणि तम हे तीन गुण आहेत. माणसांत त्या गुणांचे कमीजास्त प्रमाण असते. या तीन गुणांच्या पलीकडे जर माणूस गेला म्हणजे तो त्रिगुणातीत झाला की त्याला देवाची भेट होते.

कल्पक आहे म्हणून कल्पना आहे. कल्पक कळला तरच कल्पना उरणार नाही. तेव्हा कल्पना करीतच जर जन्म गेला तर कल्पक कळेल काय ?

## १३ ऑगस्ट

जेथे चैतन्य असते तेथे ज्ञान आणि क्रिया असतात. जेथे ज्ञान व क्रिया नसतात तेथे चैतन्य नाही; ते जड आहे, असे आपण म्हणतो. या जगात जड आणि चैतन्य या दोन्हीही गोष्टी आढळून येतात. साहजिकच त्यांचा परस्पर संबंध काय, असा एक प्रश्न उद्‌भवतो.

चैतन्यापासून जड उत्पन्न होते की जडापासून चैतन्य उद्‌भूत होते ?काही लोकमानतात की जडापासून चैतन्य होते. पण हे मत मान्य करता येण्यासारखे नाही. जडातून चैतन्य निर्माण होत नसून, चैतन्यापासूनच जड निर्माण होते.

चैतन्य आणि जड हे दोन्हीही जवळ जवळ आहेत. परंतु ते वेगळे आहेत. म्हणून चैतन्याचा स्पर्श जडाला होत नाही आणि जडाचा स्पर्श चैतन्याला होत नाही.चैतन्य हे जडात मिसळून जात नाही आणि जड हेसुद्‌धा चैतन्यात मिसळत नाही. चैतन्याचा कक्षेत जडाचे चलन – वलन होते. तथापि जड आणि चैतन्य यांचा परस्पर संपर्क होत नाही. चैतन्यामुळे जड हे दृश्य होते; परंतु जडामुळे याच चैतन्याचे दर्शन / ज्ञान शक्य नाही.

चैतन्यात जड आहे का? नाही. जडात चैतन्य आहे का? आहे. चैतन्य आणि जड एकच आहेत काय? नाहीत. जडाशिवाय चैतन्याला अस्तित्व आहे काय? आहे. मात्र चैतन्याशिवाय जड असत नाही.

## १४ ऑगस्ट

चैतन्यापासून जडाची उत्पत्ती होते परंतु जड चैतन्यात मिसळत नाही आणि चैतन्य हेहि जडात मिसळत नाही. असे जरी असले तरी जडाशिवाय चैतन्याचा आविर्भाव दिसत नाही. म्हणजे जडाशिवाय चैतन्याचे अस्तित्व दाखविता येत नाही. जडाशिवाय चैतन्याचा अनुभव घ्यावयाचा आहे. परंतु जडाचे अस्तित्व असल्याशिवाय चैतन्याचा अनुभव घेता येत नाही. पण त्यामुळे जड हे महत्त्वाचे आहे असे मात्र समजू नये. कारण चैतन्य नसताना जड हे आपणहून काही करू शकत नाही. असे असल्यामुळे चैतन्य हेच जडापेक्षा महत्त्वाचे आहे असे ठरते. नाम, रूप, आणि गुण यांची उपाधि आली असता चैतन्यच जड होते. चैतन्याशिवाय कोणतेही जड अगदी दगडसुद्धा असू शकत नाही. जड हे फक्त नास्तिभाव दाखवून देते.

हे खरे आहे की या जगात जडाचा अनुभव आपणास लगेच येत असतो. उदा. - हात आपटला की दुखतो. आंबा खाल्ला की आनंद होतो. इतक्या सहजपणे चैतन्याचा अनुभव माणसाला येत नाही. चैतन्य या स्वरूपात चैतन्याचा अनुभव येण्यास वेगळा प्रयत्न करावा लागतो. सद्गुरूंनी सांगितलेले साधन केल्याशिवाय स्वतंत्रपणे चैतन्याचा अनुभव येत नाही.

## १५ ऑगस्ट

पाण्यात पोहताना नाकातोंडात पाणी जाणार नाही या गोष्टीची खबरदारी घ्यावी लागते. म्हणजे पोहताना पोहणाऱ्या माणसाची मान पाण्यावरच रहावयास हवी. तसे अमृताच्या सागराचे नाही. अमृताचा एक थेंब जरी जीभेला लागला तरी अमर होणारा प्राणी अमृताच्या सागरात गटांगळ्या खात मरेल कसा? पण अमृतसागरात मात्र ज्याची मान वर आहे तो खलास होतो. भावार्थ हा की माणसाने नामरूपी अमृताच्या समुद्रात पोहावयाचे आहे.

शरीरात चैतन्य आहे. त्या चैतन्याचे अखंड ज्ञान असणे ही तुरीय/तुर्या अवस्था आहे. आणि मग मनाचे मनत्व न रहाणे ही उन्मनी अवस्था आहे. उन्मनी अवस्थेतच साधकाला ईश्वराचा साक्षात्कार होतो.

जीवनात नाम घेणे हे मनुष्याचे मुख्य कार्य आहे. ते मुख्य कार्य करीत राहिले की काम म्हणजे इच्छा रहात नाही.

एकादा ईश्वर दर्शनाची इच्छा बाळगतो. त्यासाठी तो निश्चल, नि:स्वार्थी व्हावा लागतो.

दृष्टीचे अनेक प्रकार आहेत. उदा. ज्ञानदृष्टी, दिव्यदृष्टी, व्यवहारदृष्टी, दूरदृष्टी इत्यादी. सद्गुरूंनी जर पारमार्थिक दृष्टी दिली तर त्यांचे कृपेने ही सृष्टी चिन्मय दिसते.कारण ती दृष्टी चैतन्यावरच केंद्रीभूत झालेली असते.

## १६ ऑगस्ट

एकादा साधन करीत आहे. तो चैतन्याच्या खालीवर होणाऱ्या गतीवर लक्ष ठेवीत आहे. त्यावेळी चैन्याच्या खालीवर होणाऱ्या गतीबरोबर अणुपरमाणूंनी युक्त असणारी शरीराची माती ही वर उचलली जाऊन, ती एका अणूमध्ये समाविष्ट होऊन, तेथे आपले जीवन हे आकाशापेक्षाही सूक्ष्म होऊन तेथे तादात्म्य पावते.

नामाच्या साधनाने चालू जन्मीच जीव हा परब्रह्म होतो. तथापि अद्यापि त्याचा देह आहेच. लौकिक दृष्टीने तेथेही सुख- दु:ख अटळच आहे. साधकाच्या देहावर सुखदु:खाचा परिणाम होतो असे मानून तो साधक सुखी दु:खी झाला असे इतर लोकांना वाटते. पण साधनेच्या द्‌वारा साधक हा देहापासून सुटलेला असल्याने, ते सुखदु:ख त्याला जाणवत नाही. साधक संसारात येण्याऱ्या सुख दु:खानी सुखी दु:खी होत नाही.

चैतन्याच्या साक्षात्काराने चित्ताची तळमळ नाहीशी होते.

द्रष्टा आहे म्हणून दृश्य आहे. आता द्रष्टाच जर दृश्यरूप झाला तर दृश्य हे अदृश्य होते, आणि दृश्य हे अदृश्य झाले की द्रष्टा हा दृश्य होतो.

अहंकार हा व्यवहारात देखील चांगला नाही. तो परमार्थातही चांगला नाही.

शाब्दिक ज्ञानाने जर कोणी स्वत:ला ज्ञानी म्हणवून घेत असेल तर तो अहंकाराने खलास झाला असेच समजावे.

ॐकार :- ॐ म्हणजे कूटस्थ परमात्म्याची एकाक्षरी भाषा आहे. ॐ हा चैतन्याचा ध्वनि आहे. ॐ कारात सर्व काही आहे. ॐकार हा अत्यंत प्रभावी आहे. या ॐ कारातूनच वेद निर्माण झाले आहेत. ॐ हे एकाक्षरी ब्रह्मच आहे.

ॐकार हा शब्द देवनागरी लिपीतील अ, उ, आणि म् या तीन अक्षरांनी बनलेला आहे. तसेच त्याच्यावर ˘ अशी अर्धमात्रा आणि अनुस्वार आहे. ॐ हा ॐकाराचा खालचा भाग अकार आणि उकार यांनी बनलेला आहे. त्यावर जी अर्धमात्रा आहे ती म्हणजे चितृशक्ति आहे. आणि त्या अर्धमात्रे वर जो अनुस्वार दर्शक बिंदु आहे, तो बिंदुस्वरूप परमात्मा – परमात्म्याचा बिंदु – आहे.

तसे पाहू गेल्यास ॐ या एकाच अक्षरात परमार्थाचा मार्ग सामावलेला आहे. म्हणजे असे:- ॐकारामध्ये ˘जी अर्धमात्रा आहे, ती दोन मात्रांनी बनलेली आहे. त्यातील एक मात्रा म्हणजे परमार्थाच्या वाटेवरील श्रीहाट हे स्थान आहे आणि दुसरी मात्रा म्हणजे गोल्हाट हे स्थान आहे. ॐ कारामध्ये जो अर्धमात्रेवर अनुस्वारसूचक बिंदु आहे, त्याला औटपीठ म्हणतात. त्याच्या वरील बाजूला ब्रह्मरंध्र हे स्थान आहे. या ब्रह्मरंध्रातूनच जीवाला शिवस्वरूप दिसते तसेच ब्रह्मस्वरूपही दिसते.

## १८ ऑगस्ट

अनाहत ध्वनी :- कोणताही ध्वनी अथवा नाद होण्याला संघात / आघात हा आवश्यक असतो. उदा. घंटेवर टोल्याचा संघात झाला की घंटेचा ध्वनी होतो. अशा संघाताशिवाय अथवा आधाताशिवाय जो ध्वनी होतो त्याला अनाहत (अन  आहत) असे नाव देण्यात आले आहे.

अनाहत या शब्दाची अन + आहत अशी फोड आहे. आहत म्हणजे संघात, अन म्हणजे नाही. म्हणजे जेथे संघात / आघात नाही, जो संघाताशिवाय होतो, त्यालाच अनाहत ध्वनी असे म्हणतात.

अनाहत ध्वनी हा परमार्थात नानाप्रकारचा आहे. त्यातील काहींचा निर्देश पुढीलप्रमाणे करता येतो. - श्वासोच्छवासाचा म्हणजेच स्पंदाचा अनाहत हा प्रत्येक अणुरेणूत आहे. साधन केल्याने देहातील नऊ द्वारे बंद होऊन दशमद्वार उघडते आणि तेथून ईश्वराचे दर्शन होते. दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, तोंड, गुदद्वार आणि शिश्न अशी ही देहातील नवद्वारे आहेत. साधनाच्या प्रक्रियेने जीव जेव्हा दशमद्वारात जातो तेथे एक अनाहत आहे. स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण हे चार देह आणि जागृती स्वप्न, सुषुप्ति आणि तुर्या या चार अवस्था ओलांडल्यावरही एक अनाहत नाद आहे आणि ज्या सहस्रदलस्थानांत आत्मा रहातो तेथे तर सतत अनाहत नाद आहे.

## १९ ऑगस्ट

अहंकार हा केवळ वृत्तिभाव नसून तो आपल्या जीवनातच असल्याने अहंकार गेला असे शब्द उच्चारून तो जात नाही. आपले अधोगामी जीवन जेव्हा ऊर्ध्वगामी होते तेव्हा अहंकार नष्ट होतो.

व्यवहारात आपण मी व तू हे शब्द वापरतो. भूगोलातील अक्षांश व रेखांश हे प्रत्यक्ष पृथ्वीवर नाहीत. ते व्यवहाराच्या सोईसाठी मानलेले आहेत. त्याचप्रमाणे मी आणि तू या शब्दांच्या वापराने व्यवहाराची सोय झाली आहे. मी मानला की तू आला आणि तू मानला की मी आला. या मी तू मुळेच जगात दुजाभाव आहे. मी आणि तू हे जर नसते तर दुजाभाव निर्माण होण्यास जागाच नव्हती.

अहंकाराने जीव नाडला जातो. एक अहंकार तरी किंवा साक्षात्कार तरी हेच खरे. देहाला देवाचा शेजार आहे. म्हणूनच देहाची जाणीव आहे. परंतू या देहाचे जाणीवेने देवाचा विसर पडल्यामुळे जीवनाचे परिभ्रमणात अहंकाराची लाट उठत रहाते. आणि अहंकारामुळे जीव हा एकदेशी होऊन त्याला जीवनातील द्वंद्वाशी झगडत रहाण्याचा प्रसंग येतो.

खरे म्हणजे हे विश्व परमात्म्यामुळेच चालत आहे. सर्व काही त्या परमेश्वराच्या हातात आहे. विश्वाची सारी सूत्रे त्याचे हातात असून तो मोठा लाघवी सूत्रधार आहे.

## २० ऑगस्ट



प्रत्येक शरीरात चैतन्याचा नाद उमटत आहे. त्या नादाकडे आपले अनुसंधान लागले पाहिजे. चैतन्याच्या नादाचे अनुसंधान म्हणजेच नामानुसंधान, आत्मानुसंधान, स्वरूपानुसंधान आहे. हे सारे शब्द एकवाची म्हणजे एकच अर्थ सांगणारे आहेत. चैतन्याचा नाद म्हणजेच नाम आणि नाम म्हणजेच चैतन्याचा नाद आहे. नाद = नाम असे सूत्र आहे. या नादानुसंधानामुळे म्हणजेच नामानुसंधानामुळे नादाचाच प्रकाश - बिंदू होतो आणि तो प्रकाशाचा बिंदू प्रगटपणे साधकास दृष्टीसमोर दिसू लागतो. गारगोटीवर गारगोटी घासली असता ठिणगी पडावी त्याप्रमाणे वायुरूप नामाची घासणी झाली असता प्रकाशाचा बिंदू प्रगट होतो.

वेद, शास्त्रे आणि पुराणे यांनी नामाचे महत्त्व गाईले आहे. नामामुळे आत्म्याचा साक्षात्कार होतो असे त्या नामाचे महत्त्व आहे. नामाचे हे महत्त्व साधुसंतांनीही सांगितले आहे. नाम घेणारा माणूस नाम घेत असतो. पण ते घेत असताना त्याच्या मनात दुसरेच काही वृत्तीभाव डोकावत असतात. त्यामुळे नाम घेऊनही त्या माणसाचा तादृश फायदा होत नाही. मग शेवटी नाम घेऊन तरी काय झाले? असे त्यास वाटू लागते. खरे म्हणजे नाम घेण्याची एक विशिष्ट प्रक्रिया आहे. ती प्रक्रिया आपण संतांकडूनच जाणून घ्यावयास हवी. तरच त्या नामाच्या प्रक्रियेने आत्मसाक्षात्कार होईल.

## २१ ऑगस्ट

नाम घेताना काही पथ्ये पाळावीच लागतात. पथ्य म्हणजे इंद्रियांचा संयम. इंद्रियावर नियंत्रण नसेल आणि जर इंद्रिये स्वैर वर्तन करणारी असतील तर नाम घेऊन इंद्रियातीत असणारे आत्म - सुख प्राप्त होऊ शकत नाही. इंद्रियांचे चोचले पुरवीत राहिल्यास आणि त्याच वेळी नाम घेत राहिल्यास, ते नाम काय अनुभव देईल असा प्रश्नच आहे. म्हणून नाम घेताना इंद्रिये ही नियंत्रित, संयमित अशीच ठेवली पाहिजेत. विषयांतील आसक्ति सोडून देऊन जर नामस्मरण होईल तर ते उपयोगी होईल.

विष्णु आणि शिव या दोन देवांत खरा भेद नाही. पण त्यांचे अनुयायी जे वैष्णव आणि शैव ते मात्र भेद मानतात. शिवून द्या असे न म्हणता दोरा घालून द्या असे म्हटले जाई. 'शंकरपाळे' न म्हणता 'विष्णुपाळे' म्हणावयाचे. कुणाचे उभे गंध तर कुणाचे आडवे गंध. फार काय पोतेरे घालतानाही उभे आणि आडवे असे केले जात असे. शिव-विष्णूचे/ हरिहरांचे ऐक्य जाणून घेणे आवश्यक आहे.

जगातील व्यवहारात आपण अमाप, अफाट संपत्ति मिळविली, ती नाण्यांच्या रूपात सांगता येते. आता आपले हे नाणे व्यवहारदृष्टीने उपयोगी आहे. पण एका देशातील नाणे दुसऱ्या देशात चालत नाही. मग हे नाणे परलोकात कसे चालेल? परलोकात त्या नाण्याची किंमत शून्य आहे.

## २२ ऑगस्ट

भूगोलात पृथ्वीवरील अक्षांश रेखांश सांगितलेले असतात. पण ते काल्पनिक आहेत. खडूच्या कांडीने कुठेही पृथ्वीवर त्यांच्या उभ्या आडव्या रेषा कुणीही ओढलेल्या नाहीत. फक्त कुठले ठिकाण कुठे आणि किती अंतरावर आहे हे समजावे इतकाच त्याचा खरा उपयोग आहे. त्याप्रमाणे व्यवहारात आपण जे 'मी' आणि 'तू' हे शब्द वापरतो त्यांनी फक्त व्यवहाराची सोय केलेली आहे. त्यामुळे देवाण घेवाण इत्यादि करताना सोय झाली आहे, असेच म्हणावे लागते. समजा कोणीतरी अ (माणूस) स्वतःला 'मी' म्हणतो आणि तो 'ब' (माणसाला) 'तू' म्हणतो. असाच प्रकार 'ब' च्या बाबतीत होतो. मग खरा 'मी' आणि 'तू' कोण असा प्रश्न येतो. याचे उत्तर असे आहे :- जे आहे ते सर्व चैतन्य आहे. त्याला मी आणि तू अशी उपाधि जोडून व्यवहार चालतो आणि व्यवहाराची सोय होते.

आपल्या शरीरातील चैतन्य ज्याला जाणून घ्यावयाचे असेल त्याला त्याची खूण अशी सापडेल :- कानात बोटे घातल्यावर जो आवाज ऐकू येतो त्या आवाजाच्या आधारे आत्म्याचे / चैतन्याचे अस्तित्व कळते.

तोंडाने नाम घेतल्याने काळाचा अपव्यय टळतो. दुसऱ्याची चेष्टा-मस्करी होत नाही. आणि लोकांचे उणेदुणे काढून होणारे नुकसान टळते. असे नाम तोंडाने घेण्याचे व्यवहारिक उपयोग आहेत.

## २३ ऑगस्ट

जीवन हे श्वासोच्छवासात आहे. श्वासोच्छवासाच्या उपाधीत सापडलेले जीवन म्हणजेच उपाधिभूत जीवन होय. या जीवनात जड आणि चैतन्य हे सांधले गेले आहेत. जड आणि चैतन्य यांना शरीरात सांधणारा दुवा म्हणजे उपाधिभूत जीवन आहे. उपाधिभूत जीवनात चैतन्य आणि जड ही दोन्हीही तत्त्वे असतात. असे हे उपाधिभूत जीवन हे चैतन्याच्या अनुभूतीचे माध्यम आहे.

उपाधिभूत जीवनात पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश ही जडतत्त्वे असतात. त्यांतील पृथ्वी आणि आप तत्त्वे म्हणजे स्थूल देह. सूक्ष्म देह हा तेजोरूप आहे. कारण देह हा वायुरूप आहे आणि महाकारण देह हा आकाशरूप आहे. म्हणजे उपाधिभूत जीवनातच स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण हे देह आहेत. या चार देहांचा निरास झाल्याशिवाय आत्मसाक्षात्कार होत नाही. या चत्वार देहांचा निरास म्हणजे साधनाच्या अभ्यासाने या चार देहांचे उपाधिभूत जीवनापासून वेगळे होणे होय.

साधनाच्या योगाने उपाधिभूत जीवनावर चित्ताची एकाग्रता आणि दृष्टीची तादात्म्यता झाली की हृदयात वायूची घर्षणक्रिया आपोआप होते.हृदयामध्ये वायूची घासणी झाली की ॐकाराचा वन्हि प्रगट होतो.

## २४ ऑगस्ट

हृदयामध्ये वायूची घर्षणप्रक्रिया होऊन ॐकार वन्हि प्रगट झाला की त्या वन्हीच्या आचेने / उष्णतेने उपाधिभूत जीवनातील पृथ्वी, आप, तेज आणि वायू ही तत्त्वे बाजूला होतात. ॐकाररुप वन्हीने जीवनाची वाफ होऊन शुद्ध आकाशरूप जीवन शिल्लक रहाते. हे शुद्ध झालेले जीवन ऊर्ध्वगामी होते. ऊर्ध्वगामी झालेले हे जीवन भ्रूमध्यात येते. या भ्रूमध्यात ऊर्ध्वमुख झालेली जीवनाची गति ही तेथे येणाऱ्या प्राणगतीशी एकरूप होते. ही प्राणगति जेथे आत्मा असतो त्या सहस्रदलस्थानातून भ्रूमध्यापर्यंत येत असते.

पुढे ऊर्ध्वमुख झालेल्या जीवनगतीशी एकरूप झालेली प्राणगती ही ऊर्ध्वमुख होते आणि ती परत सहस्रदलस्थानाकडे वाहू लागते. ही एकरूप झालेली गती वाटेतील त्रिकूट इत्यादी स्थानांतून वर वर जात रहाते. मार्गावर येणाऱ्या महाशून्यात्मक औटपीठातून ती सोहं तत्त्वात्मक भ्रमरगुंफा या स्थानी येते. नंतर येणाऱ्या ब्रह्मरंध्र स्थानातून सहस्रदलस्थानात आलेली ही एकरूप गती वाटेवर नाद, बिंदु, कला व ज्योति यांचा अनुभव घेत, जीवाला शिवरूप पहावयास लावते. पुढे शिवरूप झालेला जीव हा आत्मरूपात मिळून जातो. अशा प्रकारे सहस्रदलस्थानात परमात्म्याचा साक्षात्कार होऊन जीव हा कृतकृत्य होतो.

## २५ ऑगस्ट

सदगुरु हे सहज साधन सांगतात. या सहज साधनाच्या योगाने शुद्ध झालेला वायु हा सहस्रदळस्थानात जातो. या सहस्रदळस्थानामध्येच वाऱ्याचा साक्षात्कार होऊन जीव जीवन्मुक्त होतो. हा वारा आत्मानंद देतो. या वायूच्या साधनाने सहस्रदळात आत्म्याचा साक्षात्कार झाल्यावर, जेथे तेथे परमेश्वर आहे ही खूण जीवाला येते.

वायु हेच साध्य, साधन किंबहुना सर्व काही आहे. हा वायू म्हणजे भौतिक जगातील जड, अचेतन वायु नव्हे. हा वायु म्हणजे चिदवायु, चैतन्यरूप वायु आहे.

चिदवायु हाच सर्वोच्च देव, परमेश्वर आहे. हा चैतन्याचा वायू हा निरंजन आहे. तो हलत नाही, चालत नाही, बोलत नाही, खेळत नाही, भासत नाही आणि नासत नाही. तो घन, निश्चल, पूर्ण, अव्यक्त आहे. निश्चल चैतन्यरूप वायु म्हणजेच आत्मा आहे. निश्चल आत्म्यात जे चंचळ उठते ते ही वायुरूपच असते. चैतन्यरूप वायु हा सगुणही आहे आणि निर्गुणही आहे.

फार पूर्वी म्हणजे जगाच्या उत्पत्तीपूर्वी चिद्वायूचा एकच एक गोळा होता. त्यापासूनच या दृश्य विश्वाची उत्पत्ती झाली. या वायूमुळेच विश्व प्रगटपणे दिसू लागले. जगाच्या आदि, मध्ये आणि अंती वायुच आहे. चिद्रूप वायु हाच जगातील नामरूपाने नटला आहे. हा चैतन्याचा वारा सर्व विश्व व्यापून आहे. या जगात जे जे काही आहे ते ते चिदवायुच आहे.

## २६ ऑगस्ट



जग हे नामरूपात्मक आहे. या जगाचा आत्मा चैतन्याचा वाराच आहे. या जगात नानाप्रकारचे जीव आहेत. वारा हाच जीवांना थारा, आधार आहे. किंबहुना या वाऱ्याच्या हातातच सर्व जीव आहेत. चिदवायु हाच जीवाचे जीवन आहे. जीवन टिकून राहण्यासाठी जी चित्कला आवश्यक आहे ती चित्कला म्हणजे वायुच आहे.

प्राप, अपान, व्यान, उदान आणि समान या पाच प्राणांच्या द्वारा चिदवायु हा शरीरात कार्यप्रवण असतो. या चैतन्याच्या वाऱ्यावरच मनाचे आणि बुद्धीचे भान असते.

सर्व जीव चिदवायुरूपच आहेत. पण त्या गोष्टीचे भान जीवाला असत नाही. म्हणून त्याला एकत्व न दिसता सर्वत्र द्वैतच भासत रहाते.

द्वैत दूर होऊन आपण चिद्वायुस्वरूप आहोत ही प्रचीती जीवाला यावयाची झाल्यास त्याने विशिष्ट वायु साधन करणे आवश्यक आहे. या वायूचे साधन हेच सहज साधन आहे. हे वायु साधन म्हणजे सहजसाधन म्हणजे श्वासोच्छ्वासावर मनाचे केंद्रीकरण होय. आपल्या नाकातून वारा आत बाहेर होत असतो. त्यालाच प्राण आणि अपान असे म्हणतात. या प्राणापानामध्ये मनाचे पूर्ण मीलन झाले की तेथे परमार्थ पूर्ण होतो. कारण या सहज साधनाने चिदवायुरूप आत्म्याचा साक्षात्कार घडून येतो.

# २७ ऑगस्ट

भगवंताचे नाम हे नादरूप आहे आणि हा नाद श्वासोच्छ्वासात घुमत असतो. श्वासात नाम आहे. श्वासात नाम घेणे हेच खरे साधन आहे. या नामाने काम क्रोधांची राखुंडी होऊन अभिमान देशोधडीला जातो. असे या नामाचे सामर्थ्य आहे.

नासिकाग्री लक्ष ठेवावे असे जे भगवद्‌गीतेत सांगितले आहे त्याचा अर्थ सांकेतिक आहे. नासिका हा जड शरीराचा एक भाग आहे. तेथे लक्ष ठेवून साक्षात्कार कसा होणार? असा प्रश्न आहे. या ठिकाणी शाखाचंद्र न्याय लागू पडतो. त्यानुसार नासिक म्हणजे नासिकेतून वहाणारा जो प्राण तो अभिप्रेत आहे. त्या प्राणावर लक्ष पाहिजे असा अर्थ आहे. नासिकेतून वाहणाऱ्या प्राणापानावर लक्ष ठेवून नामामध्ये काल साधला तर पवनविजय होतो. श्वासच नाममय होतो.

आत्मा हा पूर्णपणे नि:शब्द आहे. त्या निश्चळ नि:शब्दामध्ये चंचळपणा उत्पन्न होतो; आणि मग त्या चंचळपणामुळे सर्व गुणतत्त्वात्मक शब्दरूप उत्पन्न झाले आहे. जगातील सर्व तत्त्वे ही शब्दरूप आहेत. याचा अर्थ ती शब्दांनी सांगता येतात आणि त्यांचा अनुभव हासुध्दा शब्दाद्वारे व्यक्त करतो येतो. जगातील सर्व तत्त्वांचा उगम हा शब्दस्थितीत होत असल्याने ही तत्त्वे अस्तिस्वरूप नि:शब्द आत्म्यापर्यंत पोचू शकत नाहीत.

## २८ ऑगस्ट

नि:शब्द आणि घन अशा आत्मरूपाच्या ठिकाणी चिद्रूपाने चंचळ अगर चैतन्य उत्पन्न होते. चिद्रूप म्हणजे चंचळत्व. म्हणून आत्मा हा नादरूपाने आणि प्रकाशरूपाने प्रत्ययाला येतो. कारण चंचळत्वामुळे नाद उत्पन्न होतो आणि घर्षणाने तेज म्हणजे प्रकाश निर्माण होतो.

योगमार्गात मानवी शरीरात काही चक्रे सांगितली आहेत. ती शरीरात तशी सापडणारी नाहीत. चैतन्याचा वायु हा शरीरात संघात करीत, संचार करीत असतो आणि तेथे नाद उसळतो. चैतन्याचा वारा ज्या ज्या ठिकाणी संघात करतो त्या त्या ठिकाणी नाद व प्रकाश यांचा अनुभव येतो. त्या त्या स्थानांनाच चक्र अशी संज्ञा दिली गेली आहे. चक्र हा एक संकेत, अनुभवाची खूण आहे.

पृथ्वीवर विमान हे वर वर जाताना अगर खाली उतरताना फेरे घेते. तशीच वायूची गती शरीरात आधारचक्रापासून सहस्रदळचक्रापर्यंत खेळती आहे. त्या वायूचा संघात जेथे होतो त्याला संतांनी चक्र असे नाव दिले आहे.

ज्याप्रमाणे फुलाचा धर्म सुवास, चंद्राचा धर्म शीतलपणा आणि पाण्याचा धर्म पातळपणा आहे, सूर्याचा धर्म प्रकाश आहे, त्याप्रमाणे आत्म्याचा धर्म आनंद आहे.

आत्मा हा सर्वव्यापी आहे. परंतू आत्म्यापर्यंत कोणतेही तत्त्व पोचू शकत नाही आणि कोणतेही तत्त्व आत्म्याला जाणू शकत नाही.

## २९ ऑगस्ट

परमेश्वर हा चिद्‌वायु आहे. त्याचा अनुभव आपणास प्रथम आपल्या देहात घ्यावा लागतो. त्यासाठी आपले मन स्थिर व्हावे लागते. मनाच्या स्थिरतेसाठी श्वसन स्थिर व्हावे लागते. मन आणि श्वासोच्छ्वास यांचा संबंध फारच घनिष्ठ आहे. मन स्थिर झाले तर श्वसन स्थिर होते. आणि श्वसन स्थिर झाले तर मन स्थिर होते. अशा प्रकारे परमार्थात परमात्म्याच्या प्राप्तीसाठी श्वासोच्छ्वास हा फारच महत्वाचा आहे हे स्पष्ट होते.

आपल्या शरीरात श्वसन हे चैतन्याचे माध्यम आहे. श्वासामध्ये जड व चैतन्य या दोहींचेही आकर्षण आहे. जडाची खेच लागली की श्वास खाली येतो, तर चैतन्याच्या आकर्षणाने श्वास वर जातो.

वारा हाच देव आहे. या देवाचे नाम आपल्या श्वासोच्छ्वासात आहे आणि जिथे नाम तिथे ब्रह्म अशी स्थिती आहे. 'नाम श्वासोच्छ्वासी असे' याचा अर्थ 'फांदी वर चंद्र आहे', या शाखाचंद्र न्यायाने घ्यावयाचा आहे. श्वासोच्छ्वासात नाम आहे म्हणजे ते श्वासात आहे की उच्छ्वासात आहे? श्वास आणि उच्छ्वास यांचे दरम्यान जो संधिकाळ असतो, त्यात नामाची धारणा आहे. आणि श्वसनातील हे नाम काही झाले तरी मुखाने उच्चारता येत नाही हे अगदी स्पष्ट आहे.

## ३० ऑगस्ट

श्वसनातील नामाचा आणि ब्रह्माचा निकटचा संबंध आहे. या नामातच ब्रह्म आहे. म्हणून 'परब्रह्म तेथे वसे' असे रामदासस्वामी सांगतात. म्हणून ब्रह्माचा / परमात्म्याचा साक्षात्कार हा श्वासोच्छ्‌वासातील नामामुळे होणारा आहे. म्हणून तुलसीदास सांगतात 'तुलसी कहे रामभजनबिन वृथा श्वास मत खोल'. असे असल्यामुळे परमेश्वराच्या दर्शनासाठी बाह्य विश्व, त्यातील व्यवहार, शरीर यांच्याकडे लक्ष न देता, श्वासोच्छ्‌वासाकडे लक्ष द्यावयास हवे. श्वासोच्छ्‌वासावर लक्ष ठेवण्याची अटकळ साधावी लागते. श्वासोच्छ्‌वासावर लक्ष ठेवण्याचा अभ्यास म्हणजेच साधनाचा अभ्यास आहे.

श्वसनावर लक्ष ठेवण्याच्या साधनाचा अभ्यास झाला की शरीराला कोणताही धक्का किंवा कोणतीही इजा न पोचता, श्वसनाचा योग्य प्रमाणात निरोध होतो. त्यानंतर चित्ताची एकाग्रता आणि दृष्टीची स्थिरता यामुळे श्वसनाची गती आपल्या शरीरातील आधारस्थानापर्यंत जाते, आणि मग त्या आधारस्थानापासून ते थेट मस्तकातील सहस्रदलस्थानापर्यंत - जेथे आत्म्याचा / ब्रह्माचा वास असतो - श्वसनाच्या गतीचा एक तंतु होतो. त्यालाच काही संत 'सूत्र' असे म्हणतात. नंतर नाद, बिंदू, कला आणि ज्योति या चार रूपांनी परमात्म्याचा साक्षात्कार होतो. या चारांपेक्षा निराळा असा काही आत्मानुभव नाही.

## ३१ ऑगस्ट

जीव हा बहिर्मुख असल्यामुळे शरीराच्या उपाधीत सापडला. त्याच्या त्या उपाधीने आणखी उपाधि निर्माण होऊन, उपाधि वाढत गेली आणि पुढे अहंकाराच्या भरीला पडून तो जीव आत्मसुख गमावून बसला. तो देहाकार झाला म्हणजे तो देहाला मी म्हणजे आत्मा असे मानू लागला. त्यामुळे त्याला स्वत:च्या मूळ रूपाची म्हणजे स्वत:च्या साक्षात्कारी जीवनाची ओळख दुरापास्त झाली.

एकत्वातून जो दुजेपणात येतो त्याला भ्रांति होते. भ्रांति म्हणजे जे आहे त्याला नाही म्हणणे आणि जे नाही त्याला आहे असे म्हणणे होय.

आपली व इतरांची मते एकमेकांशी जुळत नाहीत इतकेच आपण म्हणू शकतो. पण दुसऱ्याच्या मताची टवाळकी अगर कुचाळी आपण करू नये. एक वेळ इतरांनी आपल्या मतांची हेटाळणी केली तरी चालेल, कारण इतर लोकांनी आपल्याशी कसे वागावे हे आपण ठरवू शकत नाही. उलट आपण दुसऱ्याशी कसे वागावे आणि बोलावे हाच केवळ आपला प्रश्न आहे.

सोहं ही अक्षरे उलटया क्रमाने वाचली अथवा उच्चारली असता हंस हा शब्द तयार होतो.म्हणून सोहं या शब्दाऐवजी हंस असा शब्द संतांनी कधी कधी वापरलेला आहे. या हंस रूपाने परमात्मा आपल्या शरीरात आहे. त्या हंसाकडे आपली दृष्टी प्राय: जात नाही. परमार्थात या सोहंकडे आपली दृष्टी जावयास हवी.

## १ सप्टेंबर

सर्व जीवमात्राच्या ठिकाणी हंसरूप हे अखंड गोचर होत आहे. अनाहत रूपाने ते नादब्रह्म सतत आपल्या देहात उसळत राहिले आहे. त्या हंसाचे अनुसंधान हेच नादानुसंधान अथवा नामानुसंधान आहे. हा जो हंस आहे त्यावर आत्म्याचा साक्षात्कार होत असतो. या हंसाकडे नेहमीच्या जीवनात आपले लक्ष जात नाही हीच खरी आपली मोठी चूक आहे. त्यामुळे जीवाला आत्मसाक्षात्कार होत नाही.

सोहं रूप हेच आत्मरूप आहे. सोहं म्हणजेच स्वानंदघन, अजन्मा म्हणजे जन्मरहित असा आत्मा आहे.

सदगुरु हेसुध्दा सोहंस्वरूप आहेत. हे सोहंरूप सदगुरु प्रसन्न झाले तर जीवाचे ठिकाणी सोहं भाव जागृत होतो आणि मग त्यास सोहं ब्रह्माचा - सोहं आत्म्याचा - साक्षात्कार होतो.

सदगुरु सोहं साधना सांगतात. सोहं साधनेने जीवाच्या चारही वाचा कुंठित होऊन सोहं ज्योति प्रगट होते.

ज्याप्रमाणे शरीर विज्ञान इत्यादी शोधपूर्णरीत्या अभ्यासिलेली शास्त्रे आहेत त्याप्रमाणे आत्मविज्ञान हे साधुसंतांनी अभ्यासपूर्ण संशोधन करून परिपूर्णपणे विकसित केलेले सखोल शास्त्र आहे.

## २ सप्टेंबर

शरीर विज्ञानशास्त्र हे शरीराचे ज्ञान करून देते. पदार्थ विज्ञान हे पदार्थांचे ज्ञान करून देते. आत्मविज्ञान शास्त्र हे आत्म्याचे ज्ञान करून देते. आत्मविज्ञानशास्त्र हे ज्या आत्म्याचे ज्ञान करून देते तो आत्मा पुढीलप्रमाणे आहे. - आत्मा हा द्रष्टा आहे. तो दृश्याला पहाणारा, दृश्यातील सर्व नाद श्रवण करणारा, दृश्यातील सर्व परिमळांचा सुगंध घेणारा, मुखाने सर्व शब्दजात प्रगट करून, अन्नग्रहण करून शरीरातील सर्व घाण बाहेर टाकणारा, मन - चित्त, बुद्धी यांना जाणणारा, प्रेरक रूपाने प्रेरणा उत्पन्न करून अंत:प्रेरणा आणि बहि:प्रेरणा यांना जपणारा, त्वचारूपाने स्पर्श जाणणारा, असा साक्षिरूप आहे. आत्मा हा दृश्यादृश्यापासून वेगळा असून तो दृश्यादृश्यास जाणणारा आहे.

आत्मज्ञान हेच खरे तत्त्वज्ञान आहे. आत्मा हाच सोहं देव आहे. सोहं आत्मा हाच सर्व ज्ञानाचा आत्मा आहे. म्हणून आत्म्यामुळे ज्ञान आहे.

सोहंमध्येच ब्रह्म-माया, शिव-शक्ती, पुरुष-प्रकृती, जड-चैतन्य आणि अध्यात्म - आधिभौतिक दडलेले आहे. आणि या सोहंवरच प्राचीन संतांनी प्रकाशाचा झोत टाकला आहे. सोहं हा स्वयंसिद्ध, स्वयंपूर्ण, स्वयंचलित, स्वयंवेद्य, स्वयंतंत्र आहे. विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय हे सर्वच या सोहंस्वरूपात होत असतात.

## ३ सप्टेंबर

सोहंभावाने सद्‌गुरु सर्वत्र व्याप्त आहे. सोहं सद्‌गुरूंनी कृपा केली तर सोहंस्वरूप कळते. सोहंस्वरूप हे सद्‌गुरूशिवाय कळत नाही.

सोहं हा सिद्‌धमंत्र आहे. ज्या साधनेने सोहं स्वरूप प्रत्ययाला येते ती सोहंसाधना आहे. सोहंचे ध्यान हीच सोहं साधना आहे. सोहं साधनेने सोहं ब्रह्म अनुभवास येते म्हणजे सोहंज्योतीचे दर्शन होते.

सोहंस्मरणाचा एक तंतु आहे. हा तंतु नाभीचे मूळ चक्र जे आधारस्थान तेथून निघून तो सहस्रदलस्थानापर्यंत जाऊन पोचला आहे. सहस्रदलस्थानामध्ये हा तंतु स्थिर आणि निवांत होतो.

सोहंमुळेच हे विचित्र जग आपणास दिसते. चित्रविचित्र असे हे चित्रमय जगत् हे चिन्मय, चैतन्यमय आहे. यात चैतन्याशिवाय दुसरे काही नाहीच. आपणास चैतन्याची ओळख नाही म्हणून केवळ जड बुद्‌धीने आपण या जगाला जड म्हणतो. हा जो जड शब्द आपण वापरतो तो सुद्‌धा चैतन्याचे अभावी वापरता येणार नाही. म्हणून जड काही नाहीच आहे. ते सारे चैतन्यच आहे.

बाह्यतः दिसणारे दृश्य हे आज आहे आणि उद्या नाही. ते खरे वाटते. हा मायेचा जो एक वैचारिक पाश आहे तोच मायाजाळ आहे. हे शरीर माझे आहे असे म्हणून शरीराला चिकटलेले ते माझे असे होत एक जाळेच होते. आणि त्या मायेच्या जाळात जीव अडकून बसतो.

## ४ सप्टेंबर

देवाचे दर्शन करून घेण्यास या जगात नामासारखे दुसरे साधन नाही. नामाचा विचार, नामाचे चिंतन हे महत्त्वाचे आहे. नाम हाच विचार व्हावयास हवा. नाम घेण्याचा विचार करणे आणि नाम हाच विचार होणे यात फार मोठी तफावत आहे. नाम हेच विचार झाले म्हणजे मनातील संकल्प आणि विकल्प हे जर नाममय झाले तर निश्चितपणे देवाचे दर्शन होते.

सुखाचे वर्म हे वेगळेच आहे ते असे :- चित्ताची एकाग्रता म्हणजेच सुख अथवा समाधान होय.

मानवात सत्त्व, रज, तम हे तीन गुण आहेत. त्यापेक्षा वेगळा असा शुद्ध सत्त्वगुण आहे. या शुद्ध सत्त्वगुणाचा प्रकर्ष जर आपले जीवनात झाला तर परमार्थ हा सेकंद इत्यादि काळावर न रहाता तो अहर्निश होईल.

परमार्थात जीवाला जे प्राप्त होते ते या वैचित्र्यपूर्ण जगात माणूस मिळवू शकत नाही. उलटपक्षी व्यवहारात जे वैचित्र्य आहे त्यातील काहीही परमार्थात नाही. जे परमार्थात आहे ते व्यवहारात नाही आणि जे व्यवहारात आहे ते परमार्थात नाही.

जे संतमहात्मे आत्म्याच्या स्वरूपात स्थित होऊन आत्मसुखाने सुखरूप संतुष्ट झाले, ज्यामुळे त्यांचे जीवन हे खऱ्या अर्थाने सुखी समाधानी झाले, त्यांची बरोबरी या जगात कोण करू शकेल?

## ५ सप्टेंबर

मनातील ममत्व नाहीसे होऊन 'नमन' व्हावयास हवे. नमन म्हणजे न मन म्हणजे मन शिल्लक न रहाणे असे 'न मन' झाले तर परमात्मवस्तू भेटते.

ब्रह्म निश्चळ आहे. माया चंचळ आहे. आत्मा निश्चळ आहे. देह चंचळ आहे. परमार्थ निश्चळ आहे. प्रपंच चंचळ आहे. हे आपण जाणून घ्यावयास हवे.

कल्पना ही उपाधि आहे. कल्पनेने कल्पना वाढत जातात आणि त्या कल्पांतापर्यंत संपत नाहीत. जीव हा कल्पनेलाच चिकटून बसतो. मनुष्य जर सदैव कल्पनाच कवटाळीत बसला, तर देव दूरच रहातो.

वासना म्हणजे परमात्म्याचे स्वरूपाचे ठायी 'वास ना' म्हणजे परमात्म्याच्या रूपात जीवाची वसती नाही असा अर्थ आहे.

वासना म्हणजे इच्छा उरली नाही तर मन शुद्‌ध होते. शुद्‌ध मन झाले तर माणूस देहातीत होतो. त्यालाच देहातील परमात्म्याची प्राप्ती होते.

सहस्रदलस्थानात जी एक पोकळी आहे ती ज्याच्या त्याच्या अंगठ्या एवढीच आहे. तिलाच मूर्ध्नि आकाश म्हणतात. तेथेच आत्मस्वरूपाची अनुभूति येते.

चैतन्य हे ध्वनी-प्रकाश-युक्त आहे. आपले खरे जीवनही ध्वनी-प्रकाश-युक्त आहे. येथे ध्वनी म्हणजे नाम आणि प्रकाश म्हणजे रूप असा अर्थ आहे. परमार्थात परमात्म्याचे नाम आणि रूप हे एकच आहेत.

## ६ सप्टेंबर

जोपर्यंत आपल्या शरीरात अंतरात्मा आहे तोपर्यंत आपले आयुष्य चालू रहाते. आणि जोपर्यंत देहात आत्मा आहे तोपर्यंत श्वासोच्छ्वास चालू असतो. श्वासोच्छ्वास हे जिवंतपणाचे गमक आहे आणि श्वसन चालू आहे म्हणून आत्मा शरीरात आहे हेही कळते. याचा अर्थ असा की आत्मा आणि श्वासोच्छ्वास यांचा घनिष्ठ संबंध आहे आणि म्हणून ज्याप्रमाणे धुरावरून अग्नीचा मागोसा ठावठिकाणा घ्यावयाचा असतो त्याप्रमाणे श्वासोच्छ्वासावरून आत्म्याचा मागोसा घ्यावयाचा आहे आणि आत्म्याचा शोध करावयाचा आहे.

श्वासोच्छ्वास हा चोवीसही तास या आपल्या शरीरात चालू असतो. देहात आत येऊन बाहेर जाणारा हा वारा बाह्य वायूपेक्षा भिन्न आहे. बाह्य वायू हा त्याला उपकारक आहे. हे म्हणण्यास दोन कारणे आहेत. देहाला इतकी छिद्रे आहेत तरी त्या छिद्रांच्या द्वारे आत घेतलेला वारा कायमचा बाहेर निघून जात नाही. माणूस मरेपर्यंत शरीरातील वारा शरीरातच रहात असतो. माणूस मेल्यावर समजा पंपाने मृत शरीरात बाहेरचा वायु भरला तरी माणूस जिवंत होऊ शकत नाही. असा हा जो श्वासोच्छ्वासातील वायु त्यावरच आपण जगत असतो. त्यावरच आयुष्याचे मापन केलेले असते.

## ७ सप्टेंबर

आपल्या भारतीय अध्यात्मशास्त्राप्रमाणे प्रत्येक शरीरात वायुरूप प्राण हा कार्य करीत असतो. तथापि हा प्राण आणि श्वासोच्छ्वास एक नव्हेत. त्या दोहोंत फार मोठा फरक आहे. शरीराच्या मस्तकाचे स्थानी सहस्रदल कमल या नावाचे ठिकाण आहे. त्या स्थानातून प्राणाची गती शरीरातील भ्रू-मध्य स्थानापर्यंत येत असते. या प्राणाच्या गतीवर नाकातील श्वसनाची गती चालू असते. वाफेच्या इंजिनात वाफेच्या धक्याने इंजिनाच्या चाकाचा दांडा हलत असतो आणि इंजिनाचे काम चालते. त्याप्रमाणे प्राणगतीच्या धक्यावर श्वसनाचा दांडा हलत रहातो आणि शरीराचे कार्य चालू रहाते.

माणसाच्या श्वासोच्छ्वास हा मुळाक्षरातील वेलांटी सारखा ि असा वहात असतो. कधी श्वास हा डाव्या नाकपुडीतून वाहतो. तर कधी तो उजव्या नाकपुडीतून वाहतो. सर्वसाधारणपणे १८-२० अंगुळे श्वास हा बाहेरच्या बाजूला जात असतो.

हे श्वसन म्हणजेच माणसाचा संसार. हा संसार कुठल्याही माणसाला चुकला नाही. या श्वसनरूपी संसारात राहून, त्याचा उपयोग करून घेऊन श्वसनात नामाचा अभ्यास करावयाचा आहे असे साधुसंतांनी सांगून ठेवले आहे.

## ८ सप्टेंबर

समजा सुताराने एक टेबल तयार केले. तेथे टेबलापेक्षा ते तयार करणारा सुतार वेगळा आहे. कुंभाराने मडकी केली येथे सुद्धा त्या मडक्यापेक्षा ती तयार करणारा कुंभार निराळा आहे. याचप्रमाणे परमेश्वराने हे संपूर्ण विश्व निर्माण केले आणि तो संपूर्ण विश्वापेक्षा निराळाच राहिला.

विज्ञानाचा सिद्धांत असा आहे की, ज्ञानामुळे दृश्य पदार्थांची सिद्धी होते. म्हणजे त्या पदार्थांचे अस्तित्व आपणास कळते. जे काही आपल्या ज्ञानाच्या टप्प्यात येत नाही त्याला अस्तित्व नाही. जसे - सशाचे शिंग, गंधर्वनगर, आकाशकुसुम यांचे ज्ञान आपणास कधीच होत नसल्याने ते पदार्थ अस्तित्वात नाहीत. याचा अर्थ असा की, देह, दृश्य विश्व इत्यादींचे अस्तित्त्व ज्ञानाने सिद्ध होते. आता चैतन्याशिवाय ज्ञान तरी स्वतंत्र कोठे आहे? चैतन्यरूप असा आत्मा आहे. याचा अर्थ असा होतो की चैतन्यरूप/ ज्ञानरूप आत्म्यामुळेच सर्व दृश्य पदार्थांची सिद्धी होते.

बाह्य पदार्थांची आपणास कधी जाणीव होते तर कधी अशी जाणीव होत नाही. ही जाणीव आणि नेणीव सापेक्ष आहेत आणि ज्याच्यामुळे ही जाणीव होते तसेच नेणीव होते तो आत्मा आहे.

आत्माराम हा सर्वव्यापक आहे. सर्व ब्रह्मांडात तो अनुस्यूतपणाने भरून राहिला आहे. सर्व ठिकाणी आत्मा नादरूपाने घुमत आहे.

## १ सप्टेंबर

शरीरशास्त्रदृष्ट्या श्वसन ही अनैच्छिक क्रिया म्हणजे आपल्या इच्छेवर अवलंबून नसणारी एक क्रिया आहे. या श्वसनावर शरीराची यंत्रणा चालते. आता नळीत वायु फुंकला तर तो लगेच निघून जातो. कारण नळीला छिद्र आहे. फुगलेल्या फुग्याला अगर टायरला भोक पाडले अगर पडले तर आतली हवा बाहेर पडते. पण श्वसनाचे तसे होत नाही. श्वसन हे वायूचेच आहे. आता शरीराला इतकी छिद्रे आहेत. तथापि श्वसनाचा वायु माणूस मरेपर्यंत शरीराचे बाहेर निसटून जात नाही. याचे कारण शरीरात प्राण आहे. या प्राणाला श्वसनाचा बाहेरचा वायु पूरक आहे. म्हणून देहातून प्राण निघून गेला की श्वासोच्छवास बंद पडतो. एकदा का प्राण शरीराबाहेर निघून गेला की त्या शरीरात बाहेरचा वायू कितीही भरला तरी माणूस पुनः जिवंत होत नाही. प्राण बाहेर पडला की शरीराचा व्यवहार बंद पडतो. म्हणून शरीरात प्राण महत्वाचा आहे.

जीव हा अस्वस्थ आहे. कारण तो स्वस्थ नाही. स्वस्थ याचा अर्थ 'स्व' मध्ये स्थ म्हणजे स्वमध्ये रहाणारा. हा 'स्व' काय आहे हे कळावयाला हवे. हा 'स्व' म्हणजे आत्मा आहे. या 'स्व' चे म्हणजे आत्म्याचे ज्ञान झाल्यावर तेथे देहाचा अहंकार शिल्लक रहात नाही. 'स्व' ला जाणणारा जीव देह, दृश्य, विषय यांचा द्रष्टा होतो. द्रष्टा झाल्याने जीवाला एक वेगळा आनंद होतो.

## १० सप्टेंबर

जीवनात मुक्ती मिळणे ही एक अवस्था आहे. या अवस्थेला जीवन्मुक्ती असे म्हणतात. माणसाच्या दृष्टीतील दृश्य ओसरून गेले आणि दृष्टीला देव दिसला की ही जीवन्मुक्त अवस्था प्राप्त होते.

दोऱ्यावर/सूत्रावर मणि इत्यादी गुंफून माळ तयार होते. त्या मण्यामुळे आतील सूत्र दिसत नाही. तथापि मणी जर बाजूला झाले किंवा केले तर आतील सूत्र दिसते. तसेच आत्म्याचे बाबतीत आहे. दृश्य बाजूला गेले किंवा केले की दृश्याखाली आत्मा दिसतो. कारण दृश्याचे आवरणाखाली आत्माच आहे.

आत्म्यामुळेच आपणास आपल्या देहाचे ज्ञान होते. त्या देहाचे आवरण आत्म्यावर आहे. त्यामुळे आपणास आत्म्याची विस्मृती होते. परिणामतः आपला देह हाच महत्त्वाचा आहे असे भासू लागते. परिणामी देहाला होणारे सुख हेच मग माणसाला जीवनाचे सारसर्वस्व वाटू लागते. तथापि या देहसुखाचे मागे लागल्याने माणूस मात्र आत्म्यामुळे मिळणारे सुख गमावून बसला आहे. देह आहे तोपर्यंत माणसाला तत्कालिक सुख तसेच दुःख होते. एक मात्र खरे की जो माणूस देहसुखाला आसावला आहे तो खऱ्या अर्थाने कधीही सुखी समाधानी होत नाही. आत्म्याचे दर्शन होऊन आत्मसुख मिळाले तरच माणूस सदाचा सुखीसमाधानी होतो.

# ११ सप्टेंबर

माणसाचे व्यवहारातील हित आणि अहित आणि माणसाचे परमार्थातील हित आणि अहित हे वेगळे आहेत. परमार्थात देवाचे नाम घेणे हे हितकारक आहे. या उलट दंभाने वागणे हे अहितकारक आहे. दंभ हा देहाला चिकटलेला आहे. दंभाचारामुळे परमार्थातील हित साध्य होत नाही. निर्दंभ होणे हे परमार्थात महत्त्वाचे आहे. देहबुद्धि दूर होऊन निर्दंभ झाल्याशिवाय परमार्थातले हित होत नाही.

देहबुद्धी आणि देहासक्ती मनुष्यात असते. या देहाच्या आसक्तीमुळे माणूस हा सुखदु:खाच्या जंजाळात गुरफटून जातो. पण देवाचे नाम घेतल्यास सुखदु:खाचे जंजाळ दूर होऊन माणसाला खरे सुख प्राप्त होते.

देह ही चैतन्याची उपाधि आहे. देहाच्या उपाधीशिवाय चैतन्य नाही. समजा, चैतन्याला तहान लागली तर तोंड उघडल्याखेरीज पाणी पिता येत नाही. आणि तोंड उघडावे असे वाटले तर शरीरात चैतन्य असावेच लागते. याचा अर्थ असा की चैतन्याच्या कक्षेत जड देहाचे चलन वलन होते. परंतू ज्या चैतन्यामुळे या शरीराची हालचाल होते त्या चैतन्याची स्मृती माणसाला नसते. विषयलंपट देहासक्त मानव बाह्य दृश्याशी तादात्म्य पावतो. बाह्य दृश्य हे अस्थिर आहे. त्यामुळे जीवही अस्थिर होतो. देहामुळे त्याला सुखदु:ख जाणवते. पण चैतन्याच्या संपर्कामुळे प्राप्त होणारे खरे सुखसमाधान त्याला मिळत नाही.

## १२ सप्टेंबर

सहस्रदलस्थान :- मानवी शरीरातील मस्तकामध्ये सहस्रदल नावाचे स्थान आहे. मस्तकातील मेंदूलाच सहस्रदलस्थान म्हटले जाते. कारण मेंदूला हजारो वळ्या आहेत. या मेंदूच्या ठिकाणी एक अंगठ्याच्या आकाराची पोकळी आहे. या पोकळीलाच हृदयाकाश असे म्हणतात. शरीरातील नाक, कान, डोळे, तोंड व टाळू या पाच छिद्रांनी जोडलेले अंतराकाश म्हणजे हृदयाकाश.

या अंगुष्ठप्रमाण हृदयाकाशातच चिदाकाश, प्राण, आत्मा, चैतन्य, सोहं, हंस, जीव आणि शिव आहेत. चिदाकाशात ज्या लहरी उत्पन्न होतात त्यांना चैतन्य म्हणतात. चैतन्याच्या लहरी वाढत जाऊन त्यांना जे वायूचे स्वरूप प्राप्त होते त्यालाच प्राण म्हणतात. त्यात जी वायूची गती आहे तिला सोहं-हंस असे म्हणतात. सोहं-हंस हे ईश्वरनिर्मित संगीत आहे. त्यातच एका बाजूला शिव आहे तर दुसऱ्या बाजूला जीव आहे.

सहस्रदलस्थानात नादब्रह्म सतत गर्जत असते. तेथे अनेक प्रकारच्या प्रकाशांचा लखलखाट असतो. या स्थानीच जीव हा शिवाशी एकरूप होतो. आणि ते दोघे मग आत्म्याशी एकरूप होऊन जातात. सहस्रदलस्थानातच परमात्मा हा नाद आणि प्रकाश या स्वरूपाने प्रत्ययाला येत असतो.

## १३ सप्टेंबर

प्राण :- परमार्थात ज्या प्राणाला महत्त्व आहे तो प्राण सहस्रदलस्थानात असतो. या मुख्य/प्रधान प्राणाच्या हाताखाली प्राण, अपान, उदान, व्यान आणि समान हे देहातील पाच प्राण आपापले कार्य करीत असतात. असे म्हणता येईल की प्राण हे मुरव्य चक्र आहे आणि या चक्राच्या आधारावर प्राण, अपान, व्यान, उदान व समान ही पाच चक्रे गरागरा फिरत असतात.

सोहं हंसाच्या गतीच्या साहाय्याने प्राण हा सहस्रदलस्थानातून निघून माणसाच्या भ्रूमध्य स्थानापर्यंत येत असतो. सहस्रदलस्थानापासून भ्रूमध्यापर्यंत वहात येणारी चैतन्याची गति म्हणजेच प्राणगति आहे. ही प्राणगति डाव्या कानाच्या वरच्या भागात असणाऱ्या दक्षिणशिखा नावाच्या स्थानातून जात ती भ्रूमध्यापर्यंत येते. प्राणाच्या गतीवरच नाकातून वहाणाऱ्या प्राणापानाची म्हणजे श्वासोच्छ्वासाची गती चालू असते.

उपाधिभूत जीवन हे ऊर्ध्वमुख होऊन जेव्हा ते भ्रूमध्यस्थानी प्राणाच्या गतीशी एकरूप होते, तेव्हा त्या दोघांची एकरूप झालेली गति ही ऊर्ध्वमुख होऊन सहस्रदळस्थानात येते. ती जीवाला धक्का देऊन शिवाकडे पहावयास लावते. मग जीव आणि शिव हे एकरूप होऊन ते परमात्म्याशी एकरूप होऊन जातात.

## १४ सप्टेंबर

आगीतून ठिणग्या बाहेत पडतात. त्याप्रमाणे चैतन्यातून जीव फेकले गेले. हे बाहेर फेकले गेलेले जीव बाहेरच म्हणजे बाहेरच्या विश्वाच्या दृश्य पसाऱ्यात रमले. इतके की आपण चैतन्याचे अंश आहोत, आपणच खरे म्हणजे चैतन्य आहोत ही गोष्ट ते विसरून गेले. त्यामुळे दृश्याअंती येणाऱ्या सुखदु:खाच्या चक्रात जीव घोटाळत राहिले. चैतन्य हे सुखस्वरूप आहे. म्हणून आपल्या मूळ चैतन्यरूपाकडे जर जीव परत गेले नाहीत तर ते सततचे सुखी होणार नाहीत.

'मी पंढरपूरला जाणार आहे' या केवळ विचाराने माणसाला ते पंढरपूर गाठता येत नाही. पंढरपूर गाठण्यास त्याला पंढरीची वाट जाणून घेऊन त्या वाटेवरून पायी अथवा वहानाने मार्गक्रमण करावे लागते. तसे जर त्याने केले नाही तर तो पंढरपूरला कसा पोहोचणार? असाच प्रकार परमार्थात आहे. आपणास देव भेटावा असे आपणास वाटते. त्यासाठी त्याने 'नामी' अशा देवाकडे जाणारी वाट गुरूकडून जाणून घ्यावयास हवी. पण तेवढ्याने भागत नाही. त्या वाटेवर माणसाने चाल सुरू करावयास हवी. म्हणजे त्याने 'नामी' देवाचे नाम घेण्यास सुरवात केली पाहिजे. तर त्याला देव भेटेल.

भावाचा आणि देवाचा अति निकटचा संबंध आहे. एकभावाने जर रामनामाचे स्मरण घडले तर देव त्या नामस्मरण करणाऱ्याचा अंकित होतो.

## १५ सप्टेंबर

या जगात अनेक मंगल गोष्टी तसेच मंगलकारक गोष्टी आहेत असे आपण म्हणतो. पण पारमार्थिकदृष्ट्या ते म्हणणे बरोबर असेलच असे नाही. पारमार्थिकदृष्ट्या या जगात एकच मंगल आणि मंगलकारक आहे आणि ते म्हणजे रामनाम.

रामनाम हे प्रत्येकाच्या शरीरात सदा स्फुरद्रूपाने आहे. देव सदाचा आहे. साहजिकच त्याचे हे स्फुरणारे नाम सदा आहे. पण ते सदा असणारे नाम आपण कदा म्हणजे कधीतरी घेतो याला काय अर्थ आहे.

ईश्वराने हे विश्व निर्माण केले आणि त्यामध्ये माणसाला उपयोगी पडणाऱ्या अनेक गोष्टी त्याने उपलब्ध करून ठेवल्या. असे असले तरी त्या गोष्टी प्राप्त करून घेण्यास आपणास प्रयत्न हे करावेच लागतात. कोथिंबिरीची काडीसुद्धा बसल्या जागी आपणास मिळत नाही. आता आपणास जर देव हवा असेल तर तो प्रयत्न केल्याशिवाय कसा बरे प्राप्त होईल? रामनामाच्या स्मरणाचा प्रयत्न जर आपणाकडून झाला तरच देव आपणास मिळणार आहे हे नक्की.

मानवी शरीरात इडा आणि पिंगळा अशा दोन नाड्या आहेत व त्या नाकातून वाहतात. त्या एक होऊन जर सुषुम्ना जागृत झाली की खरा नेम साधतो आणि अशाप्रकारे जर नामाचा नित्य नेम होत राहिला तर राम तेथे जवळच आहे.

श्री दासगणू महाराज आंतरराष्ट्रीय संस्था

## १६ सप्टेंबर

मानवी देहात आणि जीवनात श्वासोच्छ्वास हा अत्यंत महत्त्वाचा आहे. परंतु त्याच्याकडे प्रायः आपले दुर्लक्षच असते. श्वास अडला, त्यात कांही बिघाड झाला की श्वासाचे महत्त्व कळून येते. हा श्वास दैनंदिन व्यावहारिक जीवनात तसेच परमार्थात अत्यंत उपयोगी आहे. किंबहुना श्वासोच्छ्वास हा परमेश्वराकडे पोचण्याचा उपाय आहे.

श्वासोच्छ्वास ही परमेश्वराने आपणा मानवास दिलेली एक अमोलिक देणगी आहे. श्वासोच्छ्वास होत नसेल तर माणूस काहीच करू शकत नाही. श्वासोच्छ्वासावरच मानवी आयुष्याचे मोजमाप होते. अनेकदा असे दिसते की माणूस हा सहा सहा महिने बेशुद्ध अवस्थेत पडून असतो. त्या काळात तो अन्न आणि पाणी घेऊ शकत नाही तरी सुद्धा तो जगत असतो. येथे प्रश्न असा :- हा माणूस कशावर जगत आहे? उत्तर आहे की तो माणूस श्वासोच्छ्वासावर जिवंत आहे.

जो काळ होऊन गेला तो परत येत नाही. तो आपणास परत मिळू शकत नाही. तो पकडूनही ठेवता येत नाही. त्याप्रमाणे जो श्वास गेला तो गेलाच. तो परतही येत नाही आणि धरूनही ठेवता येत नाही.

जगात आपण अनेक वस्तूंची खरेदी आणि विक्री करू शकतो. परंतू श्वासोच्छ्वासाची मात्र खरेदी विक्री करता येत नाही.

## १७ सप्टेंबर

श्वासोच्छ्वास म्हणजे परमेश्वराने माणसाला दिलेली एक प्रकारची पुंजी आहे. 'तीन भुवन और चौदा लोक एक श्वासका मोल' असे जे गोस्वामी तुलसीदासजींनी म्हटले आहे ते अक्षरश: खरे आहे. पण तिकडे दुर्लक्ष करून श्वासाचा सदुपयोग न करता आपण माणसे ही श्वासाची पुंजी फुकट घालवत असतो. त्रैलोक्याचे राज्य दिले गेले तरी गेलेला एकही श्वास परत मिळू शकत नाही.

श्वासोच्छ्वासाकडे आपले लक्ष असो वा नसो, तो चालूच असतो. रात्रंदिवस आपले श्वसन चालू असते. श्वसन करणे हे काही प्रमाणात आपल्या मर्जीवर आहे. काही काळ आपण श्वासाचा निरोध करू शकतो. पण संपूर्णपणे श्वास थांबविणे अथवा बंद करणे हे आपणास जमत नाही. जमल्यास आपण जगणार नाही.

जोपर्यंत आपल्या शरीरात अंतरात्मरूपाने परमात्मा आहे तोपर्यंत श्वसन चालू असते. म्हणून परमेश्वराच्या इच्छेनुसार श्वासोच्छ्वास चालत रहातो असे म्हटले जाते. म्हणून श्वासोच्छ्वास हा करावयाचा नसून तो व्हावयाचा असतो असे म्हटले जाते.

जोपर्यंत आत्मा या देहात असल्याने माणूस जिवंत आहे तोपर्यंत श्वासोच्छ्वास सतत चालू रहातो.

## १८ सप्टेंबर

'राम' हे नाम सर्वश्रेष्ठ आहे. या रामनामाचे महत्व हंसराजस्वामींनी पुढीलप्रमाणे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. :- राम या शब्दात 'र' आणि 'म' ही दोन अक्षरे आहेत आणि ही दोन अक्षरे नेहमी इतर अक्षरांच्या डोक्यावर जाऊन बसतात. उदा. - 'र' हे अक्षर गर्व. शर्व, धर्म, पर्व, कर्म इत्यादी शब्दातल्याप्रमाणे दुसऱ्या अक्षराच्या डोक्यावर जाते. 'म' हे अक्षर अनुस्वाराच्या स्वरूपात इतर अक्षरांच्या डोक्यावर बसते. उदा. - अंक, अंगण, रांजण, गंगा, गंमत इत्यादी शब्दांत तसे दिसून येते. तेव्हा 'र' आणि 'म' अक्षरे असणारे रामनाम हे सर्वश्रेष्ठ आहे.

आपल्या देहात कमी जास्त न होता अखंडपणाने आणि अनुस्यूत रीतीने रामनाम हे स्फुरण पावत आहे.

नाम हे पवित्रातले पवित्र आहे. नाम हे पतिताला पावन करणारे आहे. नाम हे जीवाला संसाराच्या बंधनातून मुक्त करणारे आहे.

प्रत्येक जीवाला या संसारात / प्रपंचात एक प्रकारची हळहळ आहे. त्यामुळे माणसाचा अस्वस्थपणा, अस्थिरपणा जाता जात नाही. मनुष्याला कितीही सुखे मिळाली आणि सुखाची साधने प्राप्त झाली तरी ही हळहळ दूर होत नाही. आणि ही हळहळ दूर न झाल्यामुळे तो सदैव बेचैनच रहातो. संसारातील ही हळहळ नामाने दूर होते.

## १९ सप्टेंबर

जीवमात्राचे उद्दिष्ट देवदर्शन घेणे हे आहे. हे कसे साध्य होऊ शकते? संतांचे संगतीने माणसाच्या जीवनाची समगती साधून, तीमध्ये हरीचा आठव झाला की जीव हा देहभानातीत होतो. त्याला उन्मनी अवस्था प्राप्त होते. आणि त्या उन्मनी अवस्थेत त्याला देवाचे दर्शन घडते.

आपण पृथ्वीवर आहोत म्हणून आपणांसाठी दिवस आणि रात्र, प्रकाश आणि अंधार आहेत. परंतु जर आपण सूर्यलोकी गेलो तर तेथे अखंड प्रकाश असतो. आता हा प्रकाश आहे आणि हा अंधार आहे हे आपणास ज्या प्रकाशाच्या योगाने कळते तो आत्म्याचा प्रकाश आहे. आत्मप्रकाश हा चंद्र, सूर्य इत्यादींच्या प्रकाशापेक्षा वेगळा आहे. आत्म्याचा प्रकाश हा मात्र सतत असणारा अखंड असा प्रकाश आहे.

मानवी शरीरातील इडा आणि पिंगळा या नाड्या जर सषुम्नाकार झाल्या तर सत्रावी जीवन कळा प्रगट होते आणि अमृताचा स्राव होऊ लागतो. नामाच्या साधनाने जीवाला ही नामामृताची गोडी चाखावयास मिळते.

नाम हेच परब्रह्म आहे. परब्रह्माची बरोबरी करू शकेल असे काहीही कुठेही नाही. साहजिकच परब्रह्मस्वरूप नामाची बरोबरी या जगात कोण करू शकेल बरे? म्हणून नाम हेच सर्वश्रेष्ठ आहे हे आपोआपच सिद्ध होते.

## २० सप्टेंबर

माणसाचे आयुष्य हे गमतीसाठी नाही. मानवी आयुष्य हे दुर्मिळ आहे. आणि या दुर्मिळ संधीचा वापर करून माणसाने आपल्या आत्म्याचा साक्षात्कार करून घेऊन जीवन कृतार्थ करावयास हवे.

इडा आणि पिंगळा या दोन नाड्या आपल्या शरीरात वहात असतात. पण त्यांच्याकडे लक्षच नसल्याने जीव हा बहिर्मुख होऊन बाह्य विषयांकडेच पहात रहातो. खरे म्हणजे इडा आणि पिंगळा वहात असल्याने आपण जिवंत रहातो. परंतू या गोष्टीचे भान / ज्ञान जीवाला नसल्यामुळे आणि पाच ज्ञानेंद्रियांची खेच बाहेरच्या जगातील आकाश, वायू, तेज, जल आणि पृथ्वी ही पंचमहाभूते आणि तज्जन्य पदार्थ यांच्याकडे असल्याने जीव हा शरीराचे आत काय चालले आहे हे पहाण्यास उत्सुक होत नाही. आपल्या जीवनाचा उपयोग देहसुखाकडे करण्यास जीव प्रवृत्त होतो. म्हणून जीवाचे ठिकाणी आत्म्याविषयीचा विचार जागृत होत नाही.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे सहा विकार माणसाचे शत्रु आहेत. या सहांचा जो वध करतो तो खरा 'सावध' होतो आणि जो कोणी असा सावध होऊन, आपल्या काळाचे सार्थक करतो त्याला परमानंदाला काय तोटा पडणार आहे?

## २१ सप्टेंबर

उंबऱ्यावरचा दिवा आत आणि बाहेर प्रकाश पाडतो. पण आपण आत पहायचे की बाहेर पहावयाचे हे माणसानेच ठरवावे लागते. जीव हा नेहमीच्या व्यवहारात बाहेरच पहात रहातो त्यामुळे अंतरात काय आहे हे पहावे, अंतरात काय आहे याचा विचार करावा ही भूमिका त्याची होतच नाही. असे असले तरी बाहेरच्या विषयामुळे मिळणारे सुख हे सापेक्ष आहे, तत्कालीन आहे, मर्यादित आहे; त्या सुखाबरोबर दुःखही पदरात पडते. जसे तांदळाबरोबर खडे पदरात येतात त्याप्रमाणे. आता दुःख नको असा जर जीवाचा निश्चय झाला आणि त्याचवेळी जर त्याची कोणा संताशी गाठ पडली तर त्या संताच्या उपदेशामुळे जीवाचे ठिकाणी आत पहाण्याची प्रवृत्ती निर्माण होते. आणि जर तसे घडले तर त्या जीवाच्या परमार्थाचा प्रारंभ झाला असे म्हणता येते.

जगात अनेक धर्म आहेत. देश, काल, परिस्थिती यानुसार भिन्न झाले आहेत परंतु सर्व प्राणिमात्रांचे अस्तित्व ज्या एका धर्माने सिद्ध होते, त्याचे अस्तित्व दाखविणारा जो धर्म आहे, जो नाही असे म्हणावयास आपण शिल्लक रहाणार नाही, तोच आपला एकमेव एक असा स्वधर्म आहे. स्वधर्म म्हणजे 'स्व' चा धर्म. स्व म्हणजे स्वरूप, स्वरूप म्हणजे सर्वांना अधिष्ठानभूत असणारे परमात्मस्वरूप. या परमात्मस्वरूपाच्या अनुसंधानात रहाणे म्हणजे स्वधर्म पाळणे होय.

## २२ सप्टेंबर

फुलांत सुगंध असतो. त्या सुगंधामुळेच त्या फुलाला किंमत / महत्त्व आले आहे. सुगंध हाच त्या फुलाचा आत्मा आहे. आता फुलातील सुगंध जर संपला तर त्या फुलाला काय किंमत आहे? त्याप्रमाणे मानवी देहात श्वासोच्छ्वास हा महत्वाचा आहे. तो जेव्हा संपून जातो तेव्हा देह हा ओस होऊन पडतो.

माणसाचे आयुष्य श्वासांनी मोजले जाते. गेलेला श्वास पुन्हा कधीही परत येत नाही. नाम हे श्वासात आहे असे संत सांगतात. आता जर आयुष्याचे सार्थक व्हावे असे वाटत असेल तर श्वासातील नाम घेऊन आयुष्य हे सत्कारणी लावणे हेच योग्य आहे.

ब्रह्म जाणून घेणे हे अध्यात्मशास्त्रात महत्वाचे आहे. 'ब्रह्म म्हणजे मी आहे' असे श्रुती सांगते. पण त्या श्रुतीला अनुसरून 'मी ब्रह्म आहे' असे नुसते म्हणण्यात काही अर्थ नाही. मी ब्रह्म हा साक्षात्कार होण्यास अहंकार, अभिमान घालवावा लागतो. त्या अहंकाराच्या निवृत्तीसाठी जो प्रयत्न करावा लागतो त्याला तप म्हणतात. आता नामस्मरणाने अहंकार जातो. म्हणून नाम हेच खरेखुरे तप आहे.

इडा आणि पिंगळा जेव्हा सुषुम्नाकार होतात, तेव्हा तेंथें नामाचा ध्वनी होऊ लागतो. हे नाम सर्वात आहे.

## २३ सप्टेंबर



आजच्या वर्तमानकालीन जगात विज्ञानाच्या प्रगतीमुळे माणसाला अनेक गोष्टी प्राप्त होऊ शकतात. माणसे त्याच वस्तूंचा उपभोग घेतात. पण त्यामुळे माणसाला स्वस्थता, स्थिरता, शाश्वती, निश्चिती लाभली आहे का? नाही. स्वस्थता इत्यादींची उणीवच आहे. असली उणीव आत्मसाक्षात्कारी संतांना कधीच जाणवली नाही. कोणत्याही परिस्थितीत संतांच्या चित्ताची स्थिरता, स्वस्थता, समाधान हे कधीच ढळले नाही.

खरे म्हणजे परमात्मा आपल्याजवळ आहे, त्याचे शिवाय आपले अस्तित्व असूच शकत नाही. किंबहुना आपण म्हणजेच परमात्मा आहोत. परंतू अहंकारामुळे ते कळत नाही. अहंकारामुळेच आपले खरे परमात्मस्वरूप आपणास कळत नाही.

अग्नीतून ठिणग्या बाहेर पडतात तसा जीव चैतन्यातून बाहेर पडला. तो बाहेरच राहिला. त्याला आपल्या मूळ रूपाची शुद्धच राहिली नाही. दगडाबरोबर गोफणही लांब जावून पडावी तशी जीवाची अवस्था झाली. ही त्याची अवस्था संतांच्या बोधाने पालटू शकते.

ज्या माणसाजवळ मुबलक द्रव्य,अफाट कीर्ती इत्यादी अनेक गोष्टी आहेत त्याला आपण व्यवहारात भाग्यवान म्हणतो. पण असले भाग्य परमार्थात भाग्य मानले जात नाही. परमार्थातील भाग्य म्हणजे नाम घेणे. जो कोणी नामाचे स्मरण करतो तो परमार्थात भाग्यवंत ठरतो.

## २४ सप्टेंबर

लहान मुलापासून म्हणजे पोरापासून ते थेट थोरापर्यंत प्रत्येक माणसाजवळ अहंकार असतोच. हा अहंकार व्यवहारात सुद्‌धा त्रासदायक ठरतो. परमार्थात तर अहंकार हा घातकच आहे. मग प्रश्न असा :- हा अहंकार कमी करणे अथवा त्याचा निरास करणे यासाठी काही उपाय आहेत की नाहीत? अहंकार दूर करण्यासाठी खालील उपाय आहेत.

१) अहंकार अत्यंत कमी करणे किंवा तो अमर्याद करणे. अहंकाराची व्याप्ती कमी करून अथवा त्याची व्याप्ती वाढवून तो दूर करता येतो. (२) निंबरगीकर महाराज सांगत :- अहंकार आल्यास त्याची छी थू करुन त्याला घालवून द्यावे. एकाद्याची वारंवार छीथू केल्यास तो पुन: आपणाकडे येत नाही. त्याप्रमाणे सातत्याने अहंकाराची छीथू केल्यास तो पुन: आपल्याकडे येणार नाही. (३) विचाराने काही काल अहंकार जातो. (४) अहंकार घालविण्यास बोधाचे रसायन आहे. संत सदगुरु सांगत असतात की नम्रतेने वागा, अहंकाराने वागू नका. हा बोध जर पचनी पडला तर अहंकार कमी होतो. (५) उपाधिभूत जीवन हे नेहमीच्या व्यवहारात शरीराशी तादात्म्य पावलेले असते ते तादात्म्य दूर होऊन ते जीवन जर स्वत:शीच तादात्म्य पावले तर अहंकाराचा निरास होतो. (६) अधोगामी असणारे जीवन हे जेव्हा ऊर्ध्वगामी होते, तेव्हा अहंकार दूर होतो.

## २५ सप्टेंबर

अहंकार दूर करण्याचे आणखी काही मार्ग पुढीलप्रमाणे आहेत. (१) जो माणूस जगातील आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक या त्रिविध तापांनी / दु:खांनी अतिशय तप्त होतो त्याचा अहंकार कमी होतो. (२) द्रष्टेपणाने अहंकार जातो. आपण द्रष्टा होऊन रहावयाचे. आपले ठिकाणी अहंकार आहे की नाही हे ज्याला कळते तो द्रष्टा. (३) द्रष्टा हा साक्षी असतो. हा साक्षी जर साक्षीरूपानेच राहील तर अहंकाराची गति आणि त्याचा प्रभाव नाहीसा होतो. (४) सदगुरूंना जर संपूर्ण शरणागती दिली तर माणसाजवळ निरहंकार वृत्ती येते. (५) मनात जे संकल्प आणि विकल्प उठतात, जे विचार येतात, त्यांचा द्रष्टा होऊन अहंकाररहित स्थिती गाठता येते. (६) सदगुरूंनी साधन सांगितले आहे. ते साधन करताना जर साधनातील गतीवर दृष्टी स्थिर झाली तर अहंकार दूर होतो. (७) सदगुरूंनी साधनात ज्यावर लक्ष ठेवण्यास सांगितले आहे त्या गतीमध्ये जर मनाचा लय आला तर अहंकार लोप पावतो. (८) माणसांची श्वासोच्छ्वासाची क्रिया मंद झाली तर अहंकार रहात नाही. (९) जर माणसाला शाब्दिक का होईना आत्म्याचे / ब्रह्माचे यथार्थ ज्ञान झाले असेल तर त्या ज्ञानाने माणसाचा अहंकार दूर होतो.

## २६ सप्टेंबर

माणसाजवळ या जगात कितीही चांगल्या गोष्टी असोत की ज्यांच्यामुळे तो भाग्यवंत गणला जातो, त्या चांगल्या गोष्टींच्या द्वारा त्याला ईश्वराचा साक्षात्कार होऊ शकत नाही. ज्याला ईश्वराचे दर्शन होते तोच खरा भाग्यवान आहे. साधुसंतांनी कुठे लढाया जिंकल्या होत्या? संतांनी कुठे राज्ये स्थापन केली होती? तरी ते कीर्तीवान होऊन भाग्यवंत ठरले. कारण त्यांना परमेश्वराचे दर्शन झाले होते.

या जगात असे दिसते की, बहुतांश लोक पैसा मिळविण्याच्या मागे लागलेले असतात. पण गंमत अशी आहे की माणसाला कितीही पैसा मिळाला तरी त्या पैशांनी त्याचे समाधान होत नाही. त्याची पैशाची हाव न सुटता वाढतच जाते. आणखी असे :- मिळविलेला पैसा मात्र माणसाजवळ कायम राहील याची शाश्वती नाही. तसेच हे धन त्याला सदा सर्वकाळ उपयोगी पडेल असेही नाही. जसे :- मरताना आणि मेल्यावर त्या मिळविलेल्या पैशातील एक फुटकी कवडीसुद्धा त्याला स्वत:चे बरोबर नेता येत नाही. या उलट हे लक्षात घ्यावे की ईश्वराचे नाम हे शाश्वत धन आहे. ज्याप्रमाणे माणसाने काही अल्पबचत केली तर ती वृद्धापकाळी त्याला उपयोगी पडते, त्याप्रमाणे नामरूपी धन हे माणसाला वृद्धापकाळी तसेच इतर काळी आणि मरणोत्तर सुद्धा उपयोगी पडणारे आहे.

## २७ सप्टेंबर

परमेश्वराप्रत पोचवणारा नाम हाच पंथ आहे. हा पंथ जुनाट म्हणजे फार पूर्वीपासून चालत आलेला आहे. भगवान शंकरानी हाच मार्ग अवलंबिलेला होता. हा नामपंथ या बाह्य जगात मात्र कुठेही दिसून येत नाही. हा रस्ता माणसाच्या देहात आहे. हा मार्ग सहजासहजी कळणारा नाही. तो गुरूकडून जाणून घ्यावा लागतो. हा पंथ जाणून घेऊन ज्या कोणी या मार्गावरून निष्ठेने पाऊले टाकली ते ईश्वराचा साक्षात्कार करून घेणारे संत झाले.

आत्माराम अखंड आहे. माया खंडरूप आहे. आत्मा सतत असतो. माया भासते तोवरच ती असते. मायिक पदार्थांपासून प्राप्त होणारे सुख हे नेहमी नसणारे आणि मर्यादित असते. या उलट सतत असणाऱ्या आत्म्यापासून प्राप्त होणारे सुख हे सतत टिकणारे असते.

सर्व जीवमात्राचे ठिकाणी परमात्मा हा 'हंस' रूपाने विराजमान आहे. परंतु घडते ते असे की अज्ञानी जीव शरीराशी तादात्म्य पावतात आणि त्यामुळे त्यांना हंस स्वरूप परमात्मा कळत नाही.

जीव शरीराशी तादात्म्य पावला की त्याला डोळ्यासमोर आहे तेवढेच दिसते. डोळ्याआड असणारे त्याच्या बाबतीत डोळ्याआडच रहाते. खरे म्हणजे चैतन्याचे अधिष्ठानावर शरीर कर्म करते. पण मायेच्या प्रभावामुळे माणसाचे लक्ष चैतन्याकडे जात नाही.

# २८ सप्टेंबर

एका विशिष्ट गतीने हे सारे विश्व गतिमान झालेले आहे आणि माणसांचे आयुष्यही गतिमान झाले आहे. सर्व काही या गतीमुळेच आहे. गतिरूप भगवंताचे चरण आपल्या देहात आहेत. ते परमार्थात उपयोगी आहेत. ते चरण गुरुकृपा झाली तरच कळून येतात.

आपला सध्या जीवपणाशी योग आहे. आपण जीव जगातील व्यवहारात गुंतून गेलेले आहोत. पण हे लक्षात ठेवावे की, जीवपणाचा वियोग झाल्याशिवाय आत्मस्वरूपाच्या साक्षात्काराचा योग येत नाही.

परमार्थातील समाधीविषयी आपली कल्पना अशी असते की बंदुकीचे बार जरी जवळ काढले तरी जर एखादा मनुष्य हलला नाही तर त्याला समाधि लागली आहे. पण साधुसंतांनी सांगितलेली समाधि वेगळीच आहे. ज्या नामाने संतांनी आत्मसाक्षात्कार संपादन केला त्या नामाने प्राप्त होणारी नाम - तन्मयता हीच समाधि आहे आणि ती सर्वश्रेष्ठ आहे.

नामाच्या जपाने प्रपंचातील सायास नाहीसे होतात. असा नामजप करणारा जीव हा अलिप्तपणाने प्रपंचात राहू शकतो. प्रपंचाची बाधा अथवा त्रास त्याला होत नाही. इतकेच नव्हे तर नाम - जपाच्या योगाने समाधि साधून तो संसार - सागरातून परपार होतो.

## २९ सप्टेंबर

आत्म्याच्या स्वरूपामुळे विश्वातील सर्व काही सिद्ध झाले आहे आणि ते आपणा जीवांना उपलब्ध होते आहे. पण हे जे काही उपलब्ध झाले आहे त्यामुळे आत्मस्वरूप मात्र समजून येत नाही. आत्मा हा सतत असणारा सिद्ध आणि उपलब्ध आहे. आता हा जो आत्मा सिद्ध आहे तेथे जर आपण जीव 'सिध्द' झालो तर आत्म्याच्या स्वरूपाची सिद्धी आपणास प्राप्त होईल. 'तुम्ही केव्हाही आमच्याकडे या. तुमच्या स्वागताला आम्ही सिद्ध आहोत' या बोलण्यात जो भाव आहे तोच भाव आपण आत्म्याजवळ सिद्ध असणे या वचनात आहे.

चित्ताला प्राप्त होणारे समाधान हीच खरी समाधी आहे. आणि ही समाधी सर्वकाळ केलेल्या नाम - चिंतनाने प्राप्त होते.

चैतन्याशिवाय जे जे काही इतर भासते ते ते उपाधि आहे. आणि ही उपाधि बाजूस सारून संत चैतन्याचा स्वीकार करतात.

नाम हे नादरूप चैतन्य आहे. नादाचे अनुसंधान म्हणजेच नामाचे अनुसंधान आणि तेच आत्म्याचे अनुसंधान आहे.

जपरूपी तराजूला सकार आणि हकार अशी दोन पारडी आहेत. पण ती पारडी आता सम नाहीत. पण जर त्या पारड्यातून 'अहंबुद्धि' आणि 'अहंकार' निघून गेले की ती पारडी सम होतात. मग समत्वाने जप साधतो.

## ३० सप्टेंबर

सर्वसामान्यपणे माणूस या जगात मीपणाने, अहंकाराने भारलेला असतो. 'मी, मला, माझे' या त्रिसूत्री स्वरूपात हा अहंकार व्यक्त असतो. अहंकार हा वायुरूप आहे. वायुरूपात जाणीव असणे म्हणजेच अहंकार. देह, मन इत्यादींशी संलग्न होऊन 'मी उंच आहे, मी हुषार आहे' अशा प्रकारचा आविष्कार या अहंकारामुळे होतो. अहंकाराअंती माणसाचा हात आपल्या छातीवर येतो आणि मेल्यावरसुध्दा माणसाचा हात छातीवर असतो.

अहंकारामुळे मनुष्य फळाची आशा बाळगून नाना प्रकारची कर्मे करतो. त्या कर्मांची फळे सुख आणि दु:ख या स्वरूपात माणसाला भोगावी लागतात आणि काही कर्मांची फळे या जन्मात न मिळाल्यामुळे ती फळे भोगण्यासाठी माणसाला पुनर्जन्म प्राप्त होतो. मनुष्याला अहंकार असल्यामुळे त्याचे हातून फलेच्छारहित अशी निष्काम कर्मे घडत नाहीत.

आणखी असे :- जेथे अहंकार येतो तेथे बिघाड होतो. आमच्या निंबरगीकर महाराजांचे एक वचन असे आहे :- जेथे अहंकार तेथे नाश. ज्या गोष्टीबद्दल माणसाला अहंकार येतो ती गोष्ट नष्ट होते.

## १ ऑक्टोबर

खरे म्हणजे अहंकाराला काही अर्थ नाही. कारण माणूस काही करत नसून सर्व काही परमेश्वरच करीत असतो. परंतु अहंकाराच्या ऊर्मिमुळे 'मी करतो मी करतो' असे माणूस फुशारकीने बडबडतो. असे पहा परमेश्वर नसता आणि परमेश्वराची सत्ता नसती तर मानव काय करू शकला असता? तसे पाहू गेल्यास असे दिसून येते की, 'मी करतो' म्हणून कोणतीही गोष्ट होत नाही. सर्व गोष्टी आपण करू शकत नाही. यातच मी करू शकत नाही याचे वर्म आहे.

परमार्थात अहंकार चालत नाही. कारण परमेश्वराला प्राण्यांचा अहंकार मुळीच खपत नाही. म्हणून अहंकाररहित होणे हे परमार्थात महत्त्वाचे आहे. सर्व कर्तृत्व परमेश्वराचे आहे अशी भावना हवी. अहंकार गेला की ईश्वराचा साक्षात्कार होतो. एक अहंकार तरी नाहीतर एक साक्षात्कार तरी. अहंकार व साक्षात्कार हे दोघे एकत्र नांदू शकत नाहीत. अहंकार गेला की भेद नष्ट होतो. संसारच ब्रह्मस्वरूप होतो. अहंकार गेल्याशिवाय आत्म्याचे दर्शन होऊच शकत नाही.

अनेक लोकांना परमार्थातील साधना जमत नाही. कारण ते लोक 'मी' ची जाणीव ठेवून, अहंकार बाळगून साधना करतात.

परमार्थात माणसाच्या / अहंकाराच्या निरासानेच आत्मसाक्षात्कार होतो. अहंकाराचा अभाव म्हणजे देवाचा अनुभव.

## २ ऑक्टोबर

नामस्मरण, चैतन्याच्या नादाचे अनुसंधान, आत्मानुसंधान, स्वरूपानुसंधान आणि आत्मसाक्षात्कार हे सारे शब्द एकच अर्थ सांगतात. जसे :- कोणी ईश म्हणतात. कोणी सत्यदेव म्हणतात, तर कोणी सत्यनारायण, हे जे सत्यनारायणाच्या कथेत सांगितले आहे तसेच.

संसार हा मोह आहे. तो माणसाला मोहातच पाडतो. त्या मोहातून / संसारातून निवृत्त झाले तर आत्मसाक्षात्कार आहे.

अखंड नामस्मरणाकार होणे हाच स्वयंसिद्ध, स्वयंवेद्य, स्वयंपूर्ण, स्वत:सिद्ध असा परमात्म्याचा साक्षात्कार आहे.

कान आणि डोळा यामध्ये फक्त चार बोटाचे अंतर आहे. हे अंतर तुटले की स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण या चत्वार देहांचे निरसन होते.

पूर्णातून जे काही निर्माण होते ते पूर्णच असते. पूर्णामध्ये काही मिळविले, पूर्णातून काहीतरी वजा केले, किंवा पूर्णाला कशाने तरी गुणले अथवा भागले तरी पूर्ण हे पूर्णच रहाते.

आशा ही परमार्थमार्गावरील मोठी धोंड आहे. आशेनेच जीव या संसारात बद्ध झाला आहे. आशा हीच खरी माणसाच्या सुखदु:खाला कारणीभूत आहे. किंबहुना आशेसारखे दु:ख नाही. तरुणपणी आशा तरुण असते आणि म्हातारपणीही आशा ही तरुण रहाते. आशेमुळे जन्म - मरणाची परंपरा खंडित होत नाही.

## ३ ऑक्टोबर

दुर्बुद्धी आणि विकल्प ही एक जोडगोळी आहे. व्यावहारिक जीवनात आपण म्हणतो की, 'कुठला विकल्प आमचे मनात शिरला की ज्यामुळे आम्हाला दुर्बुद्धी झाली आणि आमचे वाटोळे झाले'. अथवा आपण म्हणतो :- 'काय दुर्बुद्धी झाली कळत नाही आमचे मनात विकल्प घर करून राहिला आणि त्या योगाने आमचे नुकसान झाले आणि ते नुकसान कधीही भरून निघणारे नाही'. विकल्प आणि दुर्बुद्धी या जोडीमुळे माणसाचा नाश, तोटा, नुकसान आहे.

जे हसत जन्माला येतात ते हसतच इहलोक सोडून जातात. पण त्यांच्या जाण्याने जग मात्र ढसाढसा रडते. या गोष्टीतच त्या माणसांचे श्रेष्ठपण असते.

जन्माला येऊन मरेपर्यंत आपण कसेही वागलो तरी आयुष्याचा शेवट हा कधीना कधी होणारच आहे. आता मनुष्य मरून गेला यापेक्षा तो मरून जाईपर्यंत कसा वागला यालाच अधिक महत्त्व आहे. प्रत्येक माणसाला केव्हातरी या जगाचा शेवटचा निरोप घ्यावयाचा आहेच. म्हणून माणसाने आपली वागणूक चांगली ठेवणे हे इष्ट आणि अगत्याचे आहे. या जगात जर कायमच रहावयाचे असते तर कसेही वागले तरी प्रश्न नव्हता.

जगाचे वास्तव रूप काय आहे हे माणसाने जाणून घ्यावयास हवे. दृश्य जग हे लटिके आहे, ते स्वप्नाप्रमाणे आहे.

## ४ ऑक्टोबर

प्रत्येक माणसाला मन आहे. काही लोक मन म्हणजे आत्मा असे मानतात. पण ते योग्य नाही. ते दोन्ही एक नाहीत. मनापेक्षा आत्मा वेगळा आहे.

मन हे वायुस्वरूपी आहे. संकल्प आणि विकल्प करणे हे मनाचे स्वरूप आहे. या मनामुळेच माणसाचा व्यवहार घडत असतो.

मन हे जड आणि चैतन्य यांनी बनलेले आहे. त्यामुळे मनामध्ये जसे जडाचे गुणधर्म आहेत तसेच चैतन्याचेही गुणधर्म आहेत. सामान्यपणे पाहिल्यास असे दिसून येते की, मनाला जडाचे आकर्षण आहे आणि त्यामुळे मन हे इंद्रियांचे द्वारा बाह्य जगातील जड पदार्थांकडे धावत असते. त्यामुळे मन हे चंचळ असते.

अतिशय चपळ, चंचळ असणारे मन आवरणे, मनावर नियंत्रण ठेवणे, मनाचा संयम करणे ही गोष्ट परमार्थात अत्यावश्यक आहे. मनावर नियंत्रण प्राप्त झाल्याशिवाय परमार्थ होऊ शकत नाही.

परमार्थात मनामध्ये चैतन्याचे आकर्षण निर्माण व्हावे लागते. त्यासाठी मनात असणारे जडाचे गुणधर्म बाजूला व्हावे लागतात. मनाचे असे परिवर्तन परमार्थात आवश्यक आहे. पण ते साध्य होणे कठीण आहे. त्यासाठी बराच प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

## ५ ऑक्टोबर

परमार्थ करताना जर मनातील संकल्प आणि विकल्प नाममय झाले तर ते मन भगवंताचे नामाशी एकरूप होते. नंतर मन हे मन या स्वरूपात उरत नाही. मनाचे मनपण नाहीसे होणे हे परमार्थात महत्वाचे आहे. कारण मन नाहीसे झाले म्हणजे मन उन्मन झाले की आत्मसाक्षात्कार घडतो.

प्राय: आपण मन आणि चित्त हे शब्द समानार्थी या स्वरूपात वापरतो. पण मन आणि चित्त हे एक नाहीत. चिंतन करणे हे चित्ताचे स्वरूप आहे. चित्त हे चैतन्याचा एक अंश आहे.

चित्ताचे केंद्रीकरण होणे हे परमार्थात अतिशय महत्त्वाचे आहे. व्यवहारातसुध्दा चित्त हे एकाग्र झाल्याशिवाय समाधान होत नाही. समाधानाचे वर्म आणि मर्म हे चित्ताच्या एकाग्रतेत आहे. समाधान आणि चित्ताची एकाग्रता यांचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. चित्ताची एकाग्रता झाल्याशिवाय समाधान प्राप्त होत नाही. चित्ताच्या एकाग्रतेने मिळणारे समाधान हे आगळे वेगळे आहे. परमार्थात एकाग्र झालेले चित्त चैतन्यात मिसळून जाते. कारण मूलत: चित्त हे चैतन्यच आहे. चित्ताची एकाग्रता हीच समाधान देणारी समाधि आहे. चित्ताच्या एकाग्रतेमुळेच ईश्वराचा साक्षात्कार होतो.

## ६ ऑक्टोबर

जन्माला येऊन कृतकृत्य होण्यालाच काही अर्थ आहे. आता मनुष्य कृतकृत्य केव्हा होतो? त्याने जे करावयास पाहिजे तेच जर त्याने केले तर. याउलट माणूस जर काहीतरीच करीत राहिला तर ते काहीतरीच होते म्हणून काहीतरी करणे हे अगदीच काहीतरी आहे असे आपण काहीतरी जाणून घेणे आवश्यक आहे. जे काही 'कृत' आहे ते जर आपले ध्येय, साध्य होऊन, ध्येयनिष्ठेने जर ते आपले 'कृत्य' बनले, तर आपण 'कृतकृत्य' होतो. जे केले गेलेले आहे तेच आपण करावयाचे आहे. शरीरात रामनामाचा ध्वनी उमटत आहे, तेथे लक्ष देणे हे आपले 'कृत्य' व्हावयास हवे. अशाप्रकारे जर कोणी 'कृतकृत्य' झाला तर खऱ्या अर्थाने त्याच्या जन्माचे सार्थक होते. विवेक करून आपण नामचिंतनामध्ये रममाण होऊन रहावयास हवे. त्या नामचिंतनामुळेच जीवनात सार्थकता येते, कृतकृत्यता येते.

आशेने माणूस संसारात बद्‌ध आहे. आशा ही सुटता सुटत नाही. आशा सुटणे हे जर अवघड आहे तर दुराशेबद्दल काय सांगावे? आरंभी गोड परंतु परिणामी कडू असा दुराशेचा मधु-बिंदू आहे. जी आशा माणसाला ईश्वरापासून दूर दूर अतिदूर नेते आणि परमेश्वराला दाखवू शकत नाही तीच दुराशा आहे. परस्त्री आणि परधन यांच्या आशेने जीवाची दुर्दशा करणारी अशी दुराशा आहे. ही दुराशा दूर झाली तर अध्यात्माचा शकुन.

## ७ ऑक्टोबर

आत्म्याचे सुख मिळाले की सारी ऐहिक आणि पारलौकिक सुखे साधकाला तुच्छ वाटू लागतात. त्याला त्या सुखांचा वीट येतो. मग त्या साधकाच्या संबंधात इंद्रियांचे चोचले पुरविणे हे शिल्लकच रहात नाही. साहजिकच तो साधक भोगांमध्ये आसक्त होत नाही.

नाम घेतल्याने पाप जाते असे संतसज्जन सांगतात. या म्हणण्याचा फायदा घेऊन जर 'पाप करून नाम घ्यावे, तसे करण्यास काय हरकत आहे', अशा प्रकारची वृत्ती जर नाम घेणाऱ्याचे ठिकाणी होत असेल, तर त्याचे योगे नाम हे मुळीच फायदेशीर ठरत नाही.

माणसाने पुण्याईचे कितीही गठ्ठे जमविले तरी ते नामाने प्राप्त होणाऱ्या पुण्याईच्या पासंगालाही लागत नाहीत.

सत्संगाची टाळाटाळ, आपल्या चुका कळल्या तरी त्याच करीत रहाणेचा छंद या गोष्टी वर्ज्य करून साधकाने अचूक साधन हे अखंड साधले पाहिजे. संतांच्या संगाने नाम घेण्याची हातोटी कळून येते.

प्रेमरूप परमेश्वरावर विशिष्ट पध्दतीनेच प्रीति केली पाहिजे. परमेश्वराला ज्या गोष्टीची प्रीति आहे तिच्यावरची प्रीति ही आपले अंत:करणामध्ये उचंबळून यावयास हवी.

## ८ ऑक्टोबर

आशीर्वादात एक प्रकारची सुप्त शक्ती, एक प्रकारचे सामर्थ्य आहे. ही शक्ती अथवा सामर्थ्य दाखविता येत नाही परंतु परिणामी आशीर्वादाचे महत्त्व कळू शकते. जीवनाच्या वाटेवर माणसाला पुढे ढकलण्याची, त्याला प्रगतिशील करण्याची शक्ती आशीर्वादात आहे. म्हणून आई, वडील, गुरुजन इत्यादींना नमस्कार करुन त्यांचे आशीर्वाद घ्यावेत.

भगवंताच्या चिंतनात ज्यांनी आपली हयात घालविली आणि ज्यांचा परमात्मा सखा झाला, त्यांच्याकडे कोणीही वक्र दृष्टीने पहात नाही.

जगाच्या आरंभापासून तो जगाचा अंत होईपर्यंत सत् आणि असत्, चांगले आणि वाईट यांचा झगडा चालूच रहातो. संसारात सत् आणि असत् यांचा सतत संघर्ष होतो. हा संघर्ष म्हणजेच जीवन - कलह आहे.

'दाता भवति वा न वा' असे एक सुभाषित आहे. दाता ही एक जगातील असामान्य पदवी आहे. या जगात 'दाता' सापडणे कठीणच आहे.

देव अथवा साधुसंत यांचे संदर्भातच 'दर्शन' हा शब्द वापरतात. बाकीचे लोक व्यवहारदृष्ट्या कीतीही मोठे असोत, त्यांचे बाबतील गाठी-भेटी असे शब्दप्रयोग होतात.

## १ ऑक्टोबर



परमेश्वर हा प्रेमरूप आहे,. पण हे प्रेम म्हणजे शिसारी, किळस यावी अशाप्रकारचे घाणेरडे प्रेम नाही. हे प्रेम दिव्य, भव्य, उदात्त आणि विशुद्ध आहे. हे प्रेम निरपेक्ष, निर्व्याज, अमर्याद आणि अनंत आहे. प्रेमरूप परमेश्वरावर आपणही निरपेक्ष प्रेम करण्यास शिकावयास हवे आणि असे प्रेम कसे करावयाचे हे संतांचे शिवाय आपणास कोणी शिकवणार नाही. हेही ध्यानी घेणे जरुरीचे आहे.

आत्मारामाचा साक्षात्कार, आत्मारामाचे दर्शन हे ज्या देवळात होते ते देऊळ आपल्या या मानवी देहातच आहे. माणूस अंतर्मुख झाला तरच त्याला त्या देवळाचे आकलन होते.

मनाचे मनत्व नाहीसे होणे म्हणजे मनातील संकल्प विकल्प संपून जाणे. यापरता परमार्थात दुसरा श्रेष्ठ अनुभव नाही.

आपल्याकडे जगरहाटीत दसरा हा मोठा सण आहे. पण पारमार्थिक दसरा असा आहे :- एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाणे म्हणजे दसरा असल्यामुळे मनाच्या वृत्तींचे खंडन होऊन म्हणजे बाह्य वृत्ती बदलून त्या वृत्ती अंतर्मुख होऊन त्या चैतन्यमय होणे हा पारमार्थिक दसरा आहे.

कल्पना, अहंकार, तृष्णा इत्यादीपासून जीव परावृत्त झाला म्हणजेच त्याने त्याचे खंडन केले की त्याच्या जीवनात अखंडत्व येते.

## १० ऑक्टोबर

सोंगट्याचा खेळ हा खेळ आहे अशी ज्याची भूमिका असते तो तोडी झाली अगर न झाली तरी वर्दळीवर येणार नाही. वादी आणि प्रतिवादी यांच्यातर्फे वकिल कोर्टात एकमेकांशी भांडतात. पण हे भांडण पक्षकारासाठी आहे हे त्यांना माहीत असते. म्हणून ते चेंबरमध्ये आल्यावर सलोख्याने चहा पीत बसतात. नाटकांमध्ये राजा व राणी यांची सोंगे घेऊन नट लोक प्रेमाचे नाटक करतात, पण आपण राजाही नाही आणि राणीही नाही हे त्यांना माहीत असते. त्याप्रमाणे आपण खरे कोण आहोत हे ज्ञान जर जीवाला झाले तर तो केवळ द्रष्टेपणाने विश्वाचा खेळ आनंदाने पहात राहील.

पंच महाभूतामुळे शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे पाच विषय निर्माण झाले आहेत. ही पाच महाभूते सतत गरगर फिरत असतात. या पाच महाभूतापासून उत्पन्न झालेल्या पांच विषयांमध्ये जे मन गुंतून रहाते ते अस्थिर बनते आणि तसे विषयात अडकून पडलेले मन हे माणसाच्या बंधनाला कारणीभूत होते. परंतु तेच मन जर विषयांच्या मोहातून सुटले तर तेच मन मोक्षाला कारणीभूत होते.

शरीरशास्त्रानुसार डोळा म्हणजे डोळा अधिक पहाण्याची शक्ती, कान म्हणजे कान अधिक ऐकण्याची शक्ती असे आहे. तेच अन्य इंद्रियांबाबतीत. या सर्व ठिकाणी त्या शक्तीलाच खरे महत्व आहे.

## ११ ऑक्टोबर

खरे सांगायचे झाले तर या जगात जे शब्द, स्पर्श, इत्यादी पाच विषय आहेत त्यांचे मालक आपणच आहोत. पण दुर्दैवाने आपण त्यांचे दास, गुलाम बनलो आहोत. त्यामुळे हे पाच विषय कसे वापरावेत हे आपण विसरून गेलो आहोत. त्यामुळे हे पाच विषयच आपला वापर करतात. म्हणजे ते आपणास नाचवतात. आता हे विषय अस्थिर आहेत. त्यामुळे त्या विषयांवर अवलंबून असणारे आपण हे सुद्धा अस्थिर होतो. आणि आपण अस्थिर, चंचल झालो की आपली अस्वस्थता, अशांतता ही ओघानेच येतात.

चैतन्याचा स्रोत शरीरात वहातो आहे. जोपर्यंत तो चैतन्याचा प्रवाह देहात वहातो तोपर्यंतच हे शरीर टिकून रहाते. या चैतन्याचे ज्ञान झाल्यावर, हे शरीर जरी टिकत असले तरी देहबुद्धी मात्र मुळी शिल्लक रहातच नाही.

देहबुद्धि देहबुद्धि म्हणजे काय हो? जी बुद्धि देहालाच आत्मा मानते, ती बुद्धी ही देहबुद्धि होय. देहबुद्धि ही खरी म्हणजे दुर्बुद्धी आहे. आणि ही दुर्बुद्धी जीवाला परमात्म्यापासून दूर दूर नेते.

माणूस संसारात मोहाने युक्त असतो. आता, तो जर मोहातून पलीकडे गेला आणि संसाराच्या पार झाला, तर मग त्याला हवे अथवा अपेक्षित असे काय राहील, असा प्रश्न आहे.

## १२ ऑक्टोबर

ब्रह्मसाक्षात्कार झाल्यानंतर रानावनात निघून न जाता किंवा समाजामध्ये एकलकोंडेपणाने न रहाता, काही संत इतर सामान्य माणसासारखेच या जगात व्यवहार करीत रहातात. त्या संतांच्या कपाळावर संत म्हणून काही शिक्का असत नाही. ते दिसतात इतर माणसांप्रमाणेच; तथापि संत आणि सामान्य माणूस यांमध्ये फार फरक दिसून येतो.

हे काही संत संसार/प्रपंच करताना दिसतात. आपण सामान्य माणसेही प्रपंच करीत असतो. परंतू संतांचा संसार/प्रपंच इतर माणसांप्रमाणे असत नाही. आपण इंटरेस्ट घेऊन संसार करीत असतो. या उलट संत मात्र इंटरेस्ट न घेता संसार करतात. संसारात काही कमी पडले तर ते मिळविण्याची खटपट सामान्य लोक साहजिकपणेच करतात. परंतु साधुसंत मात्र असली खटपट मुळीच करणार नाहीत. संसारात असूनसुध्दा संत संसारात नसल्याप्रमाणेच असतात.

संत जो प्रपंच करतात तो निरिच्छपणाने म्हणजे काही आशा न बाळगता करतात. याउलट आपणासारख्या सामान्य माणसांचे व्यवहार हे काहीतरी इच्छा धरून केले जातात.

## १३ ऑक्टोबर



जुन्या काळी स्त्रिया डोकीवर घागर/ घागरी घेऊन पाणी आणीत असत. वाटेत चालताना इतर स्त्रियांशी बोलणे इत्यादी त्यांच्या क्रिया चालू असत. तथापि त्यांचे सर्व व्यवधान डोकीवरील घागरीकडे असे. त्याप्रमाणे संत संसारात असले तरी त्यांचे सर्व लक्ष चैतन्याच्या खेळाकडे लागलेले असते.

संतांचा प्रपंच हा परमार्थाला उपयोगी अथवा पूरक या स्वरुपात असतो तर सामान्य माणसांचा परमार्थ हा प्रपंचात उपयोगी पडावा म्हणून असतो. संतांचा भोग हा त्यागासाठी असतो. तर आपला त्यागही भोगासाठीच असतो. शोक आणि मोह झाले असता सामान्य जन त्यात बुडून जातात. याउलट संतांचे असते. शोकाच्या प्रसंगी हसणे योग्य नाही म्हणून ते बाह्यदृष्टया शोकात दिसतील अथवा आनंदाच्या प्रसंगी रडणे योग्य नव्हे म्हणून संत आनंदात दिसतील. खरे म्हणजे संत हे शोक आणि मोह यांचे पलीकडे गेलेले असतात. संत हे अनासक्तपणे संसार करतात. आपण आसक्ती बाळगून संसार करतो.

व्यवहारात आपणास जो आनंद मिळतो तो खरा आनंद नसून आनंदाचा आभास असतो. या आनंदाभासाच्या पलीकडे जाऊन संतांनी सतत टिकणारा असा आनंद प्राप्त करून घेतलेला असतो.

## १४ ऑक्टोबर

वाफ ही अदृश्य आहे. परंतु ती हवेच्या संपर्कात आली की ती धुकट धुकट अशी दिसू लागून ती दृश्य होते. त्या वाफेप्रमाणे मन हे अदृश्य आहे आणि ते संकल्प आणि विकल्प करणारे आहे. त्या मनाचे जेव्हा दृश्य पदार्थाशी तादात्म्य होते, तेव्हा त्यातून विचारांचे स्फुरण सुरू होते. पुढे विचार जर फारच वाढत गेले तर त्यांचे पर्यावसान हे अविचारात होते. या उलट तेच विचार जर कमी कमी होत गेले आणि मन जर विचाररहित झाले म्हणजे मन जर निर्विचार स्थितीत आले तर ते चांगले; कारण त्यामुळे आत्मसाक्षात्कार होतो.

आपल्या मनात असो अगर नसो, आपली इच्छा अपेक्षा असो अगर नसो, आपणास प्रारब्धानुसार जावेच लागते. प्रारब्धातून कुणीही सुटलेला नाही.

मन ही एक कल्पना आहे. कल्पनेतूनच अनेक कल्पना उदभूत होतात. पण ज्यातून हातात, पदरात मात्र काही येत नाही, ज्यातून हातामध्ये काही येत नाही तिलाच कल्पना म्हणतात.

भक्ति ही नऊ प्रकारची आहे असे सांगितले जाते. उदा. श्रवणं कीर्तनं विष्णोः इत्यादी. या नवविधा भक्तीच्या सहाय्याने चित् शक्तीचा साक्षात्कार संपादन करता येतो. म्हणून नऊ दिवसात करावयाची जी विशिष्ट उपासना तिला नवरात्र उपासना म्हणतात.

## १५ ऑक्टोबर

मन हे संकल्पविकल्पात्मक आहे. जेव्हा मनाचे हे संकल्प आणि विकल्प नाममय होतात, तेव्हा मनाला निर्विचार स्थिती प्राप्त होते.

जगात आपल्या भोवती हवा आहे. ती हवा हलू लागली म्हणजे वारे सुटले की झाडांची पाने हलू लागतात हे आपणास कळते आणि मग वारे वाहू लागले असे आपण म्हणतो. परंतू तेवढ्या ज्ञानावरून आपण काही हवामान जाणणारे शास्त्रज्ञ होत नाही.

नवरात्र हा सण आपल्याकडे साजरा केला जातो. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटाची स्थापना केली जाते. यावेळी देवीपुढे घट ठेवला जातो. देवी ही चित्‌शक्ती आहे. देवीपुढे म्हणजे चित्‌शक्तीपुढे घट नुसता ठेवला म्हणजे घटस्थापना झाली असा अर्थ होत नाही. पारमार्थिक दृष्ट्या बोलायचे झाल्यास त्या घटात चित्‌शक्तीची स्थापना व्हावयास हवी. परमार्थ दृष्ट्या हा 'घट' म्हणजे 'देह' आहे. आता चित्‌शक्ती ही सर्वव्यापक असल्यामुळे ती सर्व घटांत शरीरांत आहेच. पण या चित्‌शक्तीचे ज्ञान आपणास नसते. तेव्हा घटातील चित्‌शक्तीचे ज्ञान होणे म्हणजे खरी घटस्थापना आहे.

शरीरातील सहस्रदलस्थानात नाना प्रकारचे नाद आणि विविध रंगीत प्रकाशाचे झोत असतात. तेथे नाद आणि प्रकाश यांची परिसीमा होते.

आपल्या भारत देशात ब्रह्मसाक्षात्कारी/आत्मसाक्षात्कारी असे अनेक संत होऊन गेले, सद्य:काली ही आहेत आणि पुढे भविष्य काळातही होतील. ते जीवन्मुक्त असतात. हा जीवन्मुक्त कसा ओळखवा यासाठी त्याची कितीतरी लक्षणे पूर्वीच्या ग्रंथात दिलेली आहेत. परंतु त्या लक्षणावरून आत्मानुभवी माणूस ओळखणे हे कठीण आहे आणि म्हणून खऱ्या साधूची ओळख पटणे, त्याची माहिती होणे, आपण त्याचेकडे जाणे आणि त्याने आपणास उपदेशानुग्रह देणे हा सर्व मामला बराचसा कठीणच आहे. पण समजा हे कठीण कार्य आपणास जमले आणि आपण कोणातरी संताला गुरु केले, आपण त्याचा शिष्य झालो. आता आपली म्हणजे शिष्याची या गुरूविषयी काय भावना असावी, काय बुद्धि असावी, कोणती भूमिका असावी हे जाणून घेणेही आवश्यक आहे. कारण शिष्याच्या भूमिकेवरच गुरुकृपा अवलंबून असते आणि गुरुकृपा झाली तरच शिष्याची इष्ट गोष्ट साध्य होऊ शकते. सदगुरुंचे विषयी आपली जशी बुद्धि, भावना, भूमिका, निष्ठा, प्रेम असेल त्याप्रमाणे शिष्याला फळ मिळत असते. हे सर्व लक्षात ठेवून शिष्याने गुरूविषयी आदर दाखवणे आवश्यकच आहे.

## १७ ऑक्टोबर

गुरूचे विषयी शिष्याची जी काही योग्य भावना, भूमिका आहे ती कायम राहिली पाहिजे. तिच्यात कमतरता येता कामा नये. तात्यासाहेब महाराज कोटणीस सांगत असत, 'अनुग्रह घेतल्या दिवसापासून आठ दिवसांपर्यंत जर अनुग्रह घेणेपूर्वी गुरूविषयी शिष्याची जी भावना व भूमिका होती ती कायम राहील, टिकून राहील तर तो मनुष्य मुक्त होईल'. याचा भावार्थ इतकाच की गुरूच्या श्रेष्ठत्वाविषयी शिष्याची भावना बदलता कामा नये.

सदगुरूंचे वर जशी निष्ठा असेल त्याप्रमाणात गुरूने सांगितलेले साधन शिष्याकडून होते आणि ज्या प्रमाणात साधन होते त्या प्रमाणात शिष्याला परमार्थातील अनुभव येतात.

सदगुरूंच्या बद्दल जर व्यक्तिनिष्ठा असेल तर तिला जास्त किंमत आहे. त्यामुळे शिष्याची सर्वच जबाबदारी गुरूवर पडते.

गुरूने सांगितलेले साधन केले तरच अनुभव येतो. साधन न करता, अनुभव येत नाही म्हणून एक गुरु सोडून दुसऱ्या गुरूकडे जाऊ नये.

गुरूचा अनुग्रह झाल्यावर शिष्याने वाटेल तसे न वागता सदाचाराने वागावयास हवे. इतर संत कितीही मोठे असले तरी आपले गुरु हे सर्वश्रेष्ठ आहेत अशी शिष्याची भूमिका हवी. देवापेक्षासुध्दा सदगुरु श्रेष्ठ असा शिष्याचा भाव हवा.

## १८ ऑक्टोबर

चित्‌शक्ती म्हणजे चैतन्यशक्ती. ही चित्‌शक्ती प्रकाशरूप आहे. या चित्‌शक्तीचा प्रकाश पडला की द्वैतभाव नाहीसा होतो आणि चित्‌शक्ती हीच सत्ता आहे आणि सत्ता हीच चित्‌शक्ती, असे ज्ञानप्राप्त होते.

चित्‌शक्तीचा प्रकाश हा बाह्य विश्वातील सूर्य, चंद्र, अग्नी, वीज इत्यादींच्या प्रकाशापेक्षा फार वेगळा आहे. 'हा अंधार आहे आणि हा प्रकाश आहे'. 'हे ज्ञान आहे आणि हे अज्ञान आहे' हे ज्या प्रकाशाने कळते असा तो चित्‌शक्तीचा प्रकाश आहे. हा चित्‌शक्तीचा प्रकाश सतत असतो. या प्रकाशाला सूर्यचंद्राप्रमाणे उदय व अस्त नाहीत. तो सदा उदितच असतो.

'गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा! पापं ता पंच दैन्यं च घ्नंति संतो महाशया:' असे एक सुभाषित आहे. त्याचा अर्थ असा :- गंगा ही पाप नष्ट करते. चंद्र ताप नाहीसा करतो. कल्पवृक्ष दैन्य दूर करतो, साधुसंत मात्र पाप, ताप आणि दैन्य हे नष्ट करतात. आता जर संतसज्जन हे पाप, ताप व दैन्य दूर करीत असतील तर संतांकडेच जाणे हे माणसाला हितकारक नाही काय?

जीवनाची ज्योत आणि आत्मज्योत एक होणे हे आवश्यक आहे. या दोन ज्योतींचे जर ऐक्य झाले तर मग जन्म मरणाची भानगड व कटकट मिटलीच असे समजावे.

मुळात पाणी हे शुद्ध असते. त्याला रंग, रूप, चव आणि आकार नाही. पण त्या पाण्याच्या प्रवाहाला अन्य पदार्थांच्या संगामुळे ते ते गुण चिकटतात. जसे :- ज्या पात्रातून हे पाणी वहाते त्याचा आकार त्याला येतो. तसे जीवाचे होते. जीव मूलतः शुद्ध आहे. पण देहाच्या संगाने - अनुषंगाने - त्याला भलाबुरा संग येतो आणि त्याचे आयुष्य भलेबुरे होते. म्हणन जीव जर देहातीत झाला तरच तो असंग होतो आणि मग त्याला त्याचे मूळचे शुद्ध रूप प्राप्त होते.

सत्त्व, रज, तम हे तीन गुण प्रत्येक प्राणीमात्रात आहेत. त्या तीन गुणांनीच माणसाचे बाह्य जीवन नटलेले आहे. तीन गुणांनी प्रपंचाला चांगलीच शोभा आणलेली आहे. तीन गुणांच्या योगे नाना प्रकारचे अनुभव घेत जीव हा जन्ममरणाचे झोके आणि टोले खात असतो. तसे झोके खाण्यात जीवाला गोडी वाटते, ही आणखीन गंमत आहे.

चंद्रसूर्यात्मक डोळे हे जर चैतन्याचे गतीवर पडतील आणि त्या गतींचे डोळे होऊन अंतर्मुखतेने ते जर जीवन ऊर्ध्वगामी होईल, तरच जीवन - ज्योत आणि आत्म -ज्योत या दोन ज्योतींचे ऐक्य होईल.

स्थूल, सूक्ष्म इत्यादी चार देह आणि परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चार वाचा, यांचा जर निरास झाला, तर साधकाला सोहंज्योतीचा साक्षात्कार होतो.

## २० ऑक्टोबर

ऐष आरामात रहाणारा एक बादशहा होता. 'देव भेटावा' असे एकदा त्याच्या मनात आले. असे कांही दिवस गेले. एकदा रात्री त्याच्या राजवाड्याच्या गच्चीवर काही गदारोळ चालला आहे असे त्याच्या लक्षात आले. त्याची चौकशी करण्यास त्याने नोकरांना गच्चीवर पाठविले. सेवकांना गच्चीवर गेल्यावर दिसले की काही अरब पेटत्या मशाली हातात घेऊन इकडे तिकडे पळत आहेत. 'तुम्ही का पळत आहात' असे विचारण्याचे धैर्य न झाल्याने ते सेवक खाली आले आणि वर काय चालले आहे हे त्यांनी बादशहाला सांगितले. तेव्हा बादशहा स्वत: गच्चीवर गेला आणि त्याने अरबांना प्रश्न केला. 'अहो असे का पळताय तुम्ही?' अरब म्हणाले 'खाविंद, ऐष आराम भोगत कुणाला अल्ला भेटला आहे हे तुम्ही आम्हाला सांगा. आम्हाला तुमच्या इच्छेचे कौतुक वाटले. तेव्हा तुम्हाला देव कसा भेटेल हे जाणून घेण्यास आम्ही आलो आहोत. आमचा एक उंट जमिनीवर हरवला आहे. तो शोधण्यास आम्ही मशाली पेटविल्या आहेत आणि त्या मशालीच्या उजेडात आम्ही तुमच्या राजवाड्याच्या गच्चीवर तो उंट शोधण्यासाठी इकडे तिकडे पळून धडपड करीत आहोत'. तो बादशहा विचारी व शहाणा होता. अरबांना काय सुचवावयाचे आहे हे त्याच्या लक्षात आले. आपणास बोध करण्यास अल्लानेच या अरबांना पाठविले असले पाहिजे, असे त्याला वाटले. मग तो खाली आला आणि ऐषआराम बाजूला सारून अल्लाचे चिंतन करू लागला आणि समाधानी झाला.

## २१ ऑक्टोबर

प्रत्येक माणसाच्या देहात देव आहे. ज्या देहात देव आहे तो पाच महाभूतांनी बनलेला देह नव्हे. ज्या शरीरात देव रहातो, ते शरीर आतून आणि बाहेरून अत्यंत निर्मळ आहे. असा देह म्हणजे महाकारणदेह होय. तो महाकारणदेह आत बाहेर निर्मळ आहे. त्या महाकारण देहातच साधकाला देव दिसतो.

जे परब्रह्मात निमग्न झाले आहेत, जे परब्रह्मस्वरूप झालेले आहेत असे काही संत हे जगाचा संपर्क नको, जगाचा ताप तसेच जगातील माणसांचा ताप नको या बुद्धीने ते पिशाच्चवृत्तीने या जगात वावरतात.

मूळ ब्रह्म ही वस्तु निश्चळ आहे. निश्चळ असे जरी म्हटले तरी तेथे सूक्ष्मतर, सूक्ष्मतम असे चंचळ असतेच. आणि म्हणूनच 'निश्चळाच्या अंगावर चंचळाच्या लहरी उठतात'. निश्चळात उठणाऱ्या या चंचळामुळेच हे चंचळ जग दृश्यमान झाले आहे.

साखर कशी होते, तिची जास्त निर्मिती कशी करता येईल, तिचा साठा कुठे व कसा करावयाचा, ती कशी विकली असता किती नफा होईल इत्यादी गोष्टींवर भले मोठे व्याख्यान देता येईल. पण साखरेची गोडी कशी आहे हे कसे सांगणार? साखरेच्या गोडीचा अनुभव शब्दांनी सांगता येत नाही. त्याप्रमाणे चैतन्याचा अनुभव हा तोंडाने सांगता येत नाही. तो अनुभवानेच अनुभवावा लागतो.

ज्या शिष्याचे पूर्वीचे पुण्य पुष्कळ आणि शुद्ध असते त्यालाच साक्षात्कारी सदगुरूंची गाठ पडते आणि उपदेश मिळतो. जर शिष्य हा अतिशय अधिकारी म्हणजे पात्र असेल तर सदगुरु हे त्याचेसाठी आपण होऊन धावत येतात.

गुरु आणि शिष्य यांचा संबंध इतका निकटचा संबंध दुसरा कोणताही नाही. गुरूने सांगितलेले साधन सातत्याने करून शिष्याने हा संबंध टिकवून धरावयाला हवा. एकादा शिष्य कांहीतरी कारणाने जर गुरूचे ऐकत नसेल तर त्याचे काय होईल ते सांगता येत नाही.

सदगुरू कथित साधना जर शिष्य करीत राहिला तर गुरुंना आनंद वाटतो. शिष्याला साक्षात्कार झाला तर गुरूला धन्यता वाटते.

परमार्थात शिष्याच्या कीर्तीने गुरूला आनंद होतो. आपल्यापेक्षा आपला शिष्य मोठा व्हावा अशी खऱ्या परमार्थी गुरूची अपेक्षा असते.

गुरूंशी वितंडवाद करणे हा मूर्खपणा आहे. गुरूची आज्ञा भंग करणे दोष आहे. तेव्हा कुठून या शिष्याला उपदेशानुग्रह दिला असे वाटण्याचा प्रसंग गुरूवर शिष्याने आणता कामा नये. या उलट तत्त्व जाणून घेण्यास शिष्याने कितीही प्रश्न, शंका, कुशंका काढल्या तरी गुरूला त्याचे काही वाटत नाही. तो आपल्या कुवतीप्रमाणे शिष्याच्या शंकांचे निरसन करतो.

## २३ ऑक्टोबर

एखाद्या शिष्याची गुरूवर अतोनात निष्ठा, श्रद्धा, विश्वास असतो. त्यासाठी दृश्य कारण काहीच दिसत नाही. बहुधा त्यात पूर्वजन्माचे धागेदोरे असतात. अशा निष्ठावान शिष्यावर गुरूची मर्जी असते. त्याचेबद्दल गुरूला आपुलकी वाटते. याचा अर्थ गुरु हे पक्षपात करतात असा करावयाचा नाही. अशा एकनिष्ठ शिष्यावर गुरूची कृपा होते आणि त्या शिष्याचा साधनातील प्रवेश लवकर होतो. गुरूंनी ज्याला आपले म्हटले त्याला पारमार्थिकदृष्ट्या काहीही कमी पडत नाही.

नुसता गुरु मोठा आहे पण शिष्य मात्र कमी पडत आहे. तर ते योग्य नाही. शिष्यही अधिकारी हवा. तरच त्या गुरुशिष्यांना मोठेपणा मिळतो.

शिष्याचा परमार्थ जर अखंडपणे सतत चालत रहावयाचा असेल, तर तेथे सदगुरूचे सामर्थ्य आणि शिष्याचा दृढ निश्चय या दोन्हीही गोष्टी आवश्यक आहेत. सदगुरूचे सामर्थ्य सतत असतेच, पण शिष्याचा निश्चय जर डळमळीत असेल, पक्का नसेल तर शिष्याची परमार्थात प्रगती होत नाही.

येथे एक लक्षात ठेवावे. गुरुकृपेने शिष्याचे साधन कडेपर्यंत जाणे हा अपवाद आहे. या उलट नियम असा आहे की, शिष्याने सतत साधना करुन गुरुकृपा प्राप्त करुन घ्यावयाची असते. शिष्याच्या साधनाच्या प्रयत्नांवर गुरूची कृपा अवलंबून असते.

## २४ ऑक्टोबर

ज्या परमेश्वराने त्रैलोक्य निर्माण केले, ज्याच्यापासून अनंत असे चराचर विश्व उत्पन्न झाले, जो अनंत कोटि ब्रम्हांडांचा नायक आहे असा ईश्वर आपल्याला कळावयास पाहिजे आणि त्याच्याशी संपर्क साधता यावयास हवा. पण त्या दृष्टीने माणसांची काही हालचाल दिसत नाही. दिसते ते असे की देवाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न फार थोडे लोक करतात. त्यातील जो कोणी साधक शीर्षमार्गाने जातो, त्या साधकालाच त्या पुराण पुरुषाची ओळख होते.

या जगात बाह्य परिस्थितीवरुन एकादा माणूस भाग्यवान आहे असे दिसते. पण त्याला शांति, समाधान लाभले आहे असे दिसून येत नाही. जगातील दिणारे सारे भाग्य हा मायिक भास आहे. त्यात खरेपणा नाही.

जगात माणसे नानाप्रकारचे भोग भोगतात. आता भोग हे कितीही भोगले तरी त्या भोगण्याने माणसाची तृप्ती होत नाही. त्याची तगमग तशीच रहाते. पण भोगांतून जर चित्त अलिप्त झाले तर माणसाचे चित्त स्थिर होते. मनाची स्थिरता लाभणे हेच खरे भाग्य आहे. मनाच्या स्थैर्यासारखे अन्य भाग्य नाही.

ज्या चैतन्यामुळे शरीराची जाणीव होते त्या चैतन्याकडे साधकाचे लक्ष लागावयास हवे. आणि तसे चैतन्याकडे ज्याचे लक्ष लागते तो साधक आत वळतो, अंतर्मुख होतो.

## २५ ऑक्टोबर

जो साधक अंतर्मुख होतो त्याला मुख्य काय आहे आणि गौण काय आहे हे कळून येते. तो मग व्यवहार व परमार्थ यांची सांगड घालू शकतो. त्याच्या जीवनात स्थिरता निर्माण होते आणि जो साधक स्थिर झाला आहे त्याला स्थिरपणाने सतत चैतन्याचा आनंद,चैतन्याचा आस्वाद घेता येतो.

"कुठे जाशील भोगा तर तुझ्यापुढे उभा" या म्हणीप्रमाणे माणसापुढे दु:खच उभे राहते. मनुष्य जरी सुखाकडे धावला तरी त्याला सुख न मिळता दु:खच प्राप्त होते. कारण माणसाचे चित्त हे नको त्या गोष्टीत व्यग्र असते. त्यामुळे मिळालेल्या विषयातून सुखाची निष्पत्ती होत नाही. कुठल्याही विषयातून सुख व्हायचे असेल तर चित्त हे एकाग्र व्हावे लागते असे सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास कळून येते.

जीव हा परमात्म्याचा अंश आहे. परमात्मा हा सुखाचा सागर आहे. जीव हा जर परमात्मरूप झाला तर त्याच्या सुखाला तोटा नाही. आणि त्याचे चित्त जर सततचे सुखी रहात असेल तर या संसारात त्याच्यावर कितीही दु:खे कोसळली,तरी त्या दु:खांची मातब्बरी त्याला वाटत नाही.

जीवन जगताना येथे खरे काय आहे हे माणसाने शोधावयास हवे. पण माणूस ते शोधीत नाही. या उलट ज्या गोष्टीची फारशी जरुरी, मातब्बरी नाही अशा गोष्टींच्या शोधात माणूस गढून जातो.

## २६ ऑक्टोबर

जग मिथ्या आहे असे म्हटले जाते. या स्थितीत मिथ्या जगात ब्रह्म शोधण्याचा प्रयत्न हा मिथ्या नाही. जग मिथ्या आहे ही फार शेवटची भूमिका आहे. ती येईपर्यंत जग आपणास खरेच वाटत असते. तेव्हा जोपर्यंत जग खरे वाटत आहे तोपर्यंत प्रयत्न मिथ्या ठरत नाही.

करायचे म्हटल्यास काही गोष्टी करता येतात. अहंकार हा घातक आहे असे संत सांगतात. पण प्रयत्नाने हा अहंकार कमी करता येतो. आपल्या अहंकाराला या जगात काहीही किंमत नाही. याचे अनुभव पूर्वी आलेले असतात आणि आताही येत असतात. तो विचार करून आपला अहंकार कमी करता येणे शक्य आहे.

मनाची एकाग्रता होणे ही गोष्ट अवघड आहे हे खरे. तथापि नासिकाग्रावर दृष्टी ठेवल्यास आणि ती ढळू न दिल्यास मनाची एकाग्रता होण्यास मदत होते. कारण नासिकाग्रावर दृष्टी स्थिर झाली की, मनातील विचार कमी कमी होऊ लागतात आणि मन एकाग्र होऊ लागते.

उपाधिभूत जीवन संथ होण्यास जो उपाय आहे, तो असा :- उपाधिभूत जीवनावर दृष्टी आणि श्रवण आणि मन हे जर एकवटून लागले तर उपाधिभूत जीवन हे हळुहळू संथ होऊ लागते. मग अकुंठित असे आकाशतत्त्व जीवनासह अर्ध्वमुख होऊन ते प्राणगतीसह सहस्रदळस्थानी जाते. तेथे आत्मसाक्षात्कार होतो.

## २७ ऑक्टोबर

आत्मा हा सर्व व्यापक आहे. जगातील प्रत्येक पदार्थात त्याचे अस्तित्व आहे. तरी तो लौकिक व्यवहारात आपणास इंद्रियांनी दिसत नाही. जगातील शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे आपल्या पाच ज्ञानेंद्रियांचे पाच विषय आहेत. शरीर वगैरे आपल्या लौकिक ज्ञानाचे विषय आहेत म्हणून त्यांचे ज्ञान होते.परंतु आत्मा हा त्याप्रकारे ज्ञानाचा विषय होऊ शकत नाही. म्हणून या जगातील व्यवहारात आत्म्याचे ज्ञान होत नाही.

परमार्थात उपाधिभूत जीवन संथ होणे हे आवश्यक आहे. याचे कारण असे :- उपाधिभूत जीवन संथ झाल्याशिवाय चत्वार देहांचा म्हणजे उपाधिभूत जीवनातील पृथ्वी, आप, तेज आणि वायु या चार जड तत्त्वांचा निरास होत नाही. चत्वार देहांचा निरास झाल्याशिवाय जीवन ऊर्ध्वमुख होत नाही आणि जीवन ऊर्ध्वमुख झाल्याशिवाय आत्मसाक्षात्कार होत नाही.

देव आहे का, अशी शंका अनेकांना असते. त्याचे असे आहे :- 'मी आहे, देव नाही', 'मी नाही देव आहे' म्हणजे ज्याला 'मी मी' असा अहंकार आहे त्याला देव नाही असेच वाटते. या उलट हा 'मी' म्हणजे अहंकार ज्याचा जातो त्याला देव आहे हे पटते.

## २८ ऑक्टोबर

जगातला व्यवहार हा देण्याघेण्यावर अवलंबून असतो. उगीचच कुणी अन्य कुणाला काही देत नाही. दान देण्यामध्ये देणाऱ्याचा काहीतरी गुप्त, सुप्त अथवा स्पष्ट असा हेतु असतो. या उलट सदगुरूंचे दान असे नाही. ते खरे उदार आहेत. शिष्याची परमार्थाविषयीची खरी तळमळ त्यांना जाणवली की ते त्याला अनुग्रहाचे दान करतात. तसे करताना शिष्याकडून त्यांची कोणतीही अपेक्षा असत नाही.

कवि लोकांनी असे मानले आहे की, परिस, चिंतामणी, कल्पवृक्ष, कामधेनु इत्यादी इष्ट गोष्ट देणारे आहेत. परिसाने लोखंडाला स्पर्श केला की सोन्याची प्राप्ती होते. चिंतामणी आणि कामधेनु यांच्याजवळ जी इच्छा आपण प्रगट करावी ती पुरी होते. कल्पवृक्ष हा सुद्धा तसेच करतो. पण या सर्वांपेक्षा सदगुरु वेगळा आहे. परिसमणि हा आपले परिसपण लोखंडाला देत नाही. गुरु मात्र पात्र शिष्याला आपल्यासारखेच करून टाकतो. कल्पवृक्ष इत्यादी हे आपण मागू ते देतात पण त्यामुळे याचकाचे हित होईल की अनहित होईल याकडे ते लक्ष पुरवीत नाहीत. या उलट गुरूची गोष्ट आहे. कारण शिष्याला जे हितकारक असेल तेवढेच गुरु शिष्याला देतात. शिष्याचे पारमार्थिक कल्याण व्हावे एवढ्याच हेतूने सदगुरु शिष्याला अनुग्रहाचे दान देतात.

## २१ ऑक्टोबर

जन्म-मरणातून सुटून, सततचे शाश्वत सुख प्राप्त करून घेऊ इच्छिणाऱ्या साधकाला सदगुरू त्या खऱ्या अखंड सुखाच्या प्राप्तीचा मार्ग दाखवितात. मोक्षामध्ये नित्य सुख आहे. ते शिष्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने सदगुरु शिष्याला मोक्षाची वाट दाखवितात. मोक्ष कसा प्राप्त होईल ते मोक्षाचे साधन ते सांगतात. मोक्ष म्हणजे सदिच्चानंद ब्रह्माशी एकरूप झाल्याने मिळणारे सुख आहे.

सच्चिदानंदस्वरूप असणारे ब्रह्म सर्व ठिकाणी आहे. त्याचा साक्षात्कार प्रथम आपण आपल्या शरीरात करून घ्यावा लागतो. तो कसा करून घ्यावयाचा हे गुरु साधकाला सांगतात. शाखा-चंद्र-न्यायाने गुरु अनुग्रह करतात. जे खरे नाम ब्रह्माप्रत नेते किंबहुना ब्रह्मरूप करून टाकते, जे खरे नाम चैतन्य स्वरूप आहे, त्याचे दिग्दर्शन अथवा निर्देश गुरु करतात. मग शिष्याने या नामसाधनाचा अभ्यास करावयाचा आहे. अनुग्रहाचे बदल्यात गुरु काहीही मागत नाहीत. त्यांची अपेक्षा एवढीच असते की शिष्याने नाम - साधन करावे. या अनुग्रहावर शिष्याची निष्ठा, श्रद्धा हवी. अनुग्रहाबद्दल जर शिष्याचे मनात शंका, संशय आले तर त्याचे हातून साधना होणार नाही. म्हणून गुरूच्या अनुग्रहावर विश्वास ठेवून शिष्याने नामाचे साधन हे एकनिष्ठतेने आणि सातत्याने करावयास हवे.

## ३० ऑक्टोबर

अहंकार नष्ट व्हावयास हवा, अहंकार नष्ट झाल्यावर साधक विज्ञानरूप होतो. तो साधक ईश्वररूपच होतो.

राधा ही कोण? राधा म्हणजे तेजाची धारणा.

बिभीषण आणि रावण हे दोघेही रामाच्या चिंतनानेच तरले. दोघातला फरक असा :- बिभीषण हा भक्त होता तर रावण हा शत्रु होता.

कोणत्याही कारणाने का होईना जर आपणास संतांची संगती घडली, तर ती आपणास योग्य मार्गावरच आणेल.

निर्गुण म्हणजे काय? निर्गुण म्हणजे गुणरहित असा अर्थ नसून अनंत गुण असणे म्हणजे निर्गुण आहे.

देवाचे नाम हेच रूप आहे. नाम हीच रूपाची प्रचीति आहे.

व्यवहारात तसेच परमार्थात अहंकार हा घातक आहे. अहंकारामुळे आपणाजवळ असणारी वस्तू निघून जाते. आपला अहंकार आपणासच शिरजोर होतो.

भगवद्‌गीतेने नासिकाग्री दृष्टी ठेवण्यास सांगितले आहे. तसे केल्याने माणसाचे आचार, विचार आणि उच्चार यांत फरक पडतो.

जीवनात माणसाला अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. अशा वेळी नीट विचार केल्याने अनेक कोडी सुटतात.

## ३१ ऑक्टोबर



परिस हे रत्न आपल्या स्पर्शाने लोखंडाचे सोने करते. आता जरी लोहाराचा लोखंडी हातोडा रागारागाने परिसावर आपटला, तरी परिस त्याला सोनेच करतो.

जाणती माणसे आपले काम करीत असताना राग, लोभ इत्यादीकडे पहात नाहीत. ती माणसे आपले कर्तव्य करीतच रहातात.

आपण आपल्या पद्धतीने आपले जीवन व्यतीत करीत असतो. तथापि आपणास केव्हातरी मरून जाऊन हे जग सोडायचे आहे हे विसरता कामा नये. म्हणजे माणसाला मरणाचे स्मरण असावे.

शाप हा वाईट असतो असे आपण सामान्यपणे समजतो. तथापि कधी कधी शापाचा उपयोग हा वराप्रमाणे होतो हे विसरू नये.

माणसाने खरे बोलत जावे. खरे बोलून जरी अपकीर्ती झाली तरी हरकत नाही, पण खोटे बोलून कीर्ती होणे हे नको.

समाजातील थोर लोकांचे अनुकरण करावे असे सांगितले जाते. पण आपण त्यांचे अनुकरण सर्व प्रकारांनी करू नये. तर त्यांचे जे कांही चांगले आहे तेवढ्याचेच अनुकरण आपण करावे.

सुखदु:ख म्हणजे काय? दु:खाचा विसर हेच सुख आहे आणि सुखाचा विसर हेच दु:ख आहे.

## १ नोव्हेंबर

काही साधुसंतांनी तोंडाने नामाचा गजर करावा. नामाचा 'टाहो' फोडावा असे सांगितले आहे. माणसाने तोंडाने नाम उच्चारणे, तोंडाने नाम घेणे हे सुद्धा काही सोपे नाही. प्रयोग करून पहावा. पूर्व पुण्याई असल्याशिवाय नाम हे तोंडात सुद्धा येत नाही. याचे कारण बाह्य दृश्य आणि शरीर यांचे जबरदस्त आकर्षण माणसाला असते. इतके की त्यामुळे नामाकडे तोंड वळवून, तोंडाने नाम घेणे हे सुद्धा बहुतेकांना जमत नाही.

प्रपंचात राहूनच परमार्थ करावयाचा आहे हे जरी खरे असले तरी प्रपंच व परमार्थ यांत फार मोठा फरक आहे, हे आपण लक्षात घ्यावयास हवे. प्रपंचात / संसारात प्रामुख्याने दु:ख जास्त असते. संसार ही दु:खाची पेठ आहे. परमार्थात मात्र अखंडित सुखच सुख आहे. प्रपंचातील व्यवहारात माणूस हा शतावधानी असला तरी चालते. परमार्थात तसे चालत नाही. परमार्थात माणूस हा एकावधानीच पाहिजे. प्रपंचातील व्यवहारामध्ये व्हरायटी आहे. असा 'व्हरायटी शो' परमार्थात नाही. प्रपंचातील प्रत्येक गोष्ट करताना आपणास 'मी' ची जाणीव असते, पण आत्म्याचे स्मरण असत नाही. परमार्थात मात्र आत्म्याचे स्मरण ठेवून सर्व क्रिया होत असलात.

## २ नोव्हेंबर

काही लोक म्हणतात की 'परमार्थ करणे आमच्या प्रारब्धात नाही, देवाचे नाव घेणे हे आमच्या नशीबात नाही. तेव्हा जे आपल्या प्रारब्धात नाही, नशीबात नाही, ते कसे घडणार?' हे म्हणजे निरर्थक आहे, हे म्हणणे म्हणजे पळवाट आहे. व्यवहारात हीच माणसे 'प्रयत्न तोची देव' असे म्हणून प्रयत्न करीत असतात. असे जर आहे तर प्रयत्नाने परमार्थ होऊ शकतो हे या लोकांनी पटवून घ्यावयास हवे. गुरु परमार्थात देहातील चैतन्य दाखवून देतात. त्यावर साधकाने लक्ष ठेवण्याचा प्रयत्न करणे हे आवश्यकच आहे. गुरूंनी सांगितलेल्या साधनाचा आचार आपणच यत्नाने करावयास हवा. परमार्थात जर आपण साधन करण्याचा प्रयत्न केलाच नाही तर त्या साधनाने प्राप्त होणारे साध्य-अखंड सुख - आपल्या पदरात कसे पडेल?

साधनात लक्ष लागू लागले की परमार्थात अनुभव येणे सुरू होते. उदा. - बाहेर अथवा जवळपास कोणतेही वाद्य, संगीत इत्यादी नसताना नाद ऐकू येतो. हा नाद बाह्य कानाने ऐकू येत नाही. साधनात डोळे मिटलेले असताना मात्र प्रकाश दिसतो. शारीरीक रोग, डोक्यावर आघात इत्यादी काहीही झाले नसताना हा प्रकाश दिसत असतो. साधनातील नाम व प्रकाश हे बाह्य कान व डोळे यांचेमार्फत मात्र कळत नाहीत, हे लक्षात ठेवावे.

## ३ नोव्हेंबर

विवेक केला तर खरे काय आहे आणि खोटे काय आहे हे कळते. किंवा खरे आणि खोटे हे ज्याच्या योगाने कळते तोच विवेक असे म्हणावे लागेल.

प्रत्येकाने आपले हित साधावे हे खरे पण आपले हित नक्की कशात आहे? हित म्हणजे परमार्थातील आत्महित. हिताचा हा खरा अर्थ. आई, बाप, मित्र इत्यादींना माहीत असतो असे नाही, त्यामुळे ते आपणास आपल्या आत्महिताबद्दल काय सांगू शकतील?

ज्या साधुसंतांनी आत्महित साधले त्यांनाच आत्महित माहीत असते. म्हणून संतांकडूनच आपण आपले आत्महित जाणून घ्यावयास हवे.

शाळेत गेले की मुलांच्या मनावर काही संस्कार होतात. संतांच्या शाळेत गेले की आपल्या मनावर परमार्थाचे, अध्यात्माचे संस्कार होतात.

आपल्या उपाधिभूत जीवनात साधन जमू लागले की त्यातील चैतन्य हे नाद, बिंदू, कला व ज्योति या रूपाने प्रकर्षाला येते.

आत्मा नव्हे तो अनात्मा. आत्म्यामुळे ज्ञान होते. पण अनात्म्यामुळे आत्मा कळत नाही. आत्मा म्हणजे चैतन्य. अनात्मा म्हणजे देह, दृश्य इत्यादी सर्व चैतन्येतर वस्तुजात. आत्म्याचा शोध ऋषीमुनींनी, संतांनी घेतला आणि त्यांना कळले की आत्म्यानेच आत्मा जाणता येतो, चैतन्यामुळेच चैतन्याची प्रतीति घेता येते.

## ४ नोव्हेंबर



आपल्या देहात चैतन्याचा नाद घुमतोय म्हणून आपणास बाह्य जगातील नाद ऐकू येतात. शरीरात चैतन्याचा प्रकाश आहे म्हणून आपणास बाहेरील प्रकाशांचे ज्ञान होते. देहात चैतन्याचा स्पर्श आहे म्हणूनच आपणास बाहेरील स्पर्शांची जाणीव होते.

काही वेळा असे होते, आपले अडलेले किंवा अवघड काम होऊन जाते. तेव्हा 'देव पावला' असे पुष्कळांना वाटते. क्षुद्र देव प्रसन्न झाल्यावर प्रापंचिक अडचणी दूर होतात; पण त्यांचे दर्शन हे खरे देवदर्शन नव्हे. ज्या परमोच्च देवाची सत्ता क्षुद्र देवतांत विभागली गेली आहे त्याचे दर्शन हे खरे देवदर्शन होय.

जन्मभर उपासना करावी मग देवाचे दर्शन होते का हे पहावे असे सांगणारे लोक या जगात अनेक आहेत.

'सेवा' या शब्दाचा परमार्थातील अर्थ असा आहे. :- 'से' म्हणजे आठवण आणि 'वा' म्हणजे उत्तम. तेव्हा सेवा म्हणजे उत्तम आठवण. उत्तम आठवण कोणती? ईश्वराच्या नामाची आठवण ही उत्तम आठवण आहे. म्हणून सेवा म्हणजे ईश्वराच्या नामाची आठवण.

देवाला आमच्याकडून जे पाहिजे असते ते आमच्या जवळ नाही आणि आम्हाला जे पाहिजे ते देवाजवळ नाही, असे काही तरी होऊन बसले आहे, हे म्हणणे अगदी काहीतरी नाही हे आपण काहीतरी जाणले पाहिजे तर मग काहीतरी आपले हाती गवसेल, यात शंका नाही.

## ५ नोव्हेंबर

फार अन्न खाल्ले तर माणसाला अजीर्ण होते. या उलट नाम मात्र कितीकितीही घेतले तरी त्याचे अजीर्ण होत नाही.

नाम शरीरात आहे. माणसाला स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण असे चार देह आहेत. त्या चारही देहांमध्ये नाम आहे.

अमुक चूक झाली म्हणून अमुक परिणाम झाला हे तर्काने सिद्ध करता येत नाही. पण चूक झाली की तिचे परिणाम भोगावेच लागतात. निंबरगीकर महाराज सांगत की, आपले पायात काटा जरी बोचला तरी ते आपल्या काहीतरी चुकीचे फळ असते असे समजावे.

या जगात फक्त चैतन्य हे एकमेव सत्य आहे. ते चैतन्य मानवी शरीरातही आहे. शरीरात असतानाच जर माणूस शरीराला विसरू शकला तर त्याला चैतन्याचा अनुभव येईल. परमार्थ करणाऱ्याने फक्त चैतन्यावर प्रेम करावयास हवे.

या जगात विविध प्रकारचे पदार्थ आहेत. हे पदार्थ एकतर 'असतात' तरी नाहीतर 'नसतात' तरी. आत्मा मात्र 'आहे' आणि 'नाही' यांच्या पलीकडे आहे.

ब्रह्म हे अद्वैत आहे. अद्वैत हे निश्चळ आहे. सूक्ष्मतर, सूक्ष्मतम चंचळता/चांचल्य हेच निश्चलतेचे वर्म आहे.

## ६ नोव्हेंबर

माणसाने व्यवहारात नेहमी इतरांना न लागेल असे चांगले बोलावे. दुसऱ्याला टाकून बोलणे ही वाचिक हिंसा आहे.

माणसाला आत्मसाक्षात्कार झाला याची खूण काय? आत्मसाक्षात्कार झाली की माणसाची वासना शिल्लक रहात नाही.

संतांना राग लोभ नसतो असे नाही. पण त्या दोहोंचे प्रमाण हे इतके कमी असते की ते नाही म्हणण्याइतके नगण्य असते.

जग खोटे, जगातील व्यवहार खोटा. प्रपंच खोटा, म्हणून परमार्थही खोटा अशी चुकीची समजूत कुणी करून घेऊ नये.

माणसापुढे प्रपंच आणि परमार्थ अशा दोन गोष्टी आहेत. काहीजण प्रपंचाकडे लक्ष देतात तर काही जण परमार्थाकडे लक्ष देतात. खरे म्हरजे परमार्थ करता यावा म्हणजे माणसाने परमार्थ करावा म्हणून प्रपंच आहे. साहजिकच परमार्थ हा मुख्य आणि त्याच्या तुलनेत प्रपंच हा गौण आहे. प्रपंचात फावल्यावेळी परमार्थ असे म्हटले तर प्रपंच महत्त्वाचा होतो. प्रपंचात मुद्दाम सवड काढून परमार्थ करावयास हवा. एकदा का परमार्थ साधला की मग माणसाला प्रपंचाची मातब्बरी वाटत नाही.

माणूस मोठ्या जिद्दीने, आवडीने, प्रयत्नाने प्रपंच करतो. पण अशी जिद्द, प्रयत्न, आवड परमार्थातसुध्दा हवी हे मात्र विसरता कामा नये.

# ७ नोव्हेंबर

सगळ्या संतांनी स्वतः नाम घेतले आणि इतरांना नाम घेण्यास सांगितले. नामाला स्मरणाची जोड मिळाली की 'नामी' ची गाठ पडते.

इडा व पिंगला सुषुम्नाकार झाल्या की नामाचा बोध होतो.

सहस्रदलस्थानामध्ये आत्म्याची प्रचीति येते. तेथे आत्म्याची प्रचीति ज्या स्थानी येते ते स्थान जवाच्या आकाराएवढे आहे.

सज्जनांचा आशीर्वाद कधीच फुकट जाणारा नाही.

जग हे मुळातच विनाशी, नाशवंत आहे. जगातील व्यवहारात कितीही संपत्ति मिळाली तरी ती नश्वरच आहे.

सदाचार म्हणजे काय? परमार्थ दृष्टीने सदाचार म्हणजे जो सत् स्वरूपाची अनुभूति करून देतो तो सदाचार.

जन्म आणि मरण ही दोन्ही टोके एकत्र आली की त्यापरता परमार्थ हा वेगळा असा रहात नाही.

माणसाच्या शरीरात आत्मा आहे. तेव्हा जगातील दृश्य पदार्थ पहात राहिल्यास देहातील आत्मा कसा दिसेल?

जगामध्ये आत्मा आहे. पण तो आपणास दिसत नाही. जो कोणी प्रथम आपल्या देहातील आत्मा पहातो त्यालाच जगातील आत्मा दिसतो.

## ८ नोव्हेंबर

स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण हे चार देह आणि परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाचा या सर्वांचा निरास व्हावयास हवा. तसे झाले तर जीवाला सोहं ज्योतीचा साक्षात्कार होतो.

मोठ्या माणसांनी क्षुद्र माणसांप्रमाणे वागू नये. त्यानी सर्वांना सांभाळून घेऊन त्यांच्याशी मोठ्या प्रेमाने वागावयास हवे.

प्रत्येकाला चांगुलपणा हवा असतो. पण तो सुखासुखी सहज मिळत नाही. स्वत: त्रास भोगल्याशिवाय चांगुलपणा मिळत नाही.

सर्व गुणामध्ये सहनशीलता हा सर्वात मोठा गुण आहे.

सदगुरूंनी सांगितलेल्या साधनात सुख आहे हे खरेच आहे. पण साधनातील सुख हे सहजपणे, प्रयत्न न करता मिळत नाही. ते सुख प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक तो प्रयत्न करावाच लागतो.

नाम हेच परब्रह्म आहे. नाम हे परमात्म्यापासून वेगळे असे नाही. परमात्मा तेजोरूप आहे. नामही तेजोरूपच आहे.

जीव सुख मिळविण्यासाठी झटत असतो. पण सुखासाठीचा त्याचा प्रयत्न चुकीच्या दिशेने होतो. बाह्य जगातील विषयांतून सुख प्राप्त करुन घेण्याचा त्याचा प्रयत्न असतो. हे चूक आहे. सुख आपल्यातच आहे व ते मिळविण्याचा प्रयत्न त्याने करावयास हवा.

## १ नोव्हेंबर

बाह्योच्चाराने उच्चारले जाणारे नाम म्हणजे तोंडात जिभेची हालचाल होऊन उच्चारले जाणारे नाम म्हणजे वैखरी वाणीने नामाचा उच्चार होऊन, त्या नामाची पुनरावृत्ति होते. हाच नामाचा जप.तसेच कोणातरी गुरूने कोणातरी शिष्याला अमुक नाम घेण्यास सांगितले आणि त्याने ते घेतले, असेही आपण म्हणतो. येथे नामाची देवघेव होते. अशा या नामापेक्षा तात्त्विक नाम वेगळे आहे आणि तेच आपणास मोक्षाप्रत नेणारे आहे.

खरे तात्विक नाम असे आहे :- नाम तेचि रूप. परमेश्वरस्वरूप असणारे नाम हेच खरे नाम आहे. हे नाम म्हणजे चैतन्य आणि नाम म्हणजे चैतन्य होय. आता चैतन्याचा उच्चार होत नाही. याचा अर्थ असा की नाम म्हणजे अक्षर नव्हे. अक्षरांनी बनणारा शब्द नव्हे, एखादा मंत्र नव्हे, अथवा शरीराचा आणि मनाचा खेळ नव्हे. साहजिकच तात्त्विक नाम हे देता घेता येणारे नाही. ते उच्चारून दाखविता येणार नाही. त्याचा फक्त निर्देश करता येईल. चैतन्याचा उच्चार करता येत नसल्याने, नामाचा उच्चार करता येत नाही. आणि म्हणूनच तोंडाने उच्चारले जाणारे नाम हे खरे नाम नव्हे असे म्हणावे लागते. चैतन्य / परमेश्वर निरुपाधिक आहे. सहाजिकच चैतन्यरूप नाम हे निरुपाधिक आहे.

## १० नोव्हेंबर



तात्त्विक खरे नाम म्हणजे चैतन्य अथवा चैतन्याचा नाद होय. चैतन्य म्हणजे ब्रह्म. चैतन्याचा नाद म्हणजे नाद-ब्रह्म होय. नाद ब्रह्म हे सर्व विश्वात दुमदुमत राहिलेले आहे. नाम म्हणजे चैतन्य असल्यामुळे चैतन्यात जसे नाम व प्रकाश आहेत, तसेच नामामध्येसुध्दा नाद व प्रकाश आहेत. नाम हेच ईश्वराचे रूप असल्यामुळे हे तत्त्वरूप नाम मुखाने उच्चारता येणार नाही.

नाम म्हणजे चैतन्य. चैतन्याच्या स्वरूपात जे स्फुरण पावत असते तेच खरे नाम आहे. तेच तत्त्वरूप नाम आहे. नाम हे चैतन्याचे नादस्वरूपात आहे. या नामाच्या नादातच बिंदु, कला आणि ज्योती हे प्रकाश असतात. हे तीनही तेजोरूप आहेत. म्हणून खरे नाम हे तेजोरूप अथवा प्रकाशरूप आहे. नाम हेच बिंदु, कला आणि ज्योति या रूपाने प्रकर्ष पावते.

परमात्मा हा चिद्‌वायु या स्वरुपाचा आहे. साहजिकच चैतन्यरूप असणारे नाम हे चिद् - वायु - स्वरूपी आहे. हे तात्त्विक नाम कळणे आणि त्याचा अभ्यास होणे हे आवश्यक आहे. ते होत असताना मग मुखाने कोणतेही नाम घेतले गेले तरी बिघडत नाही. पण केवळ मुखातील नामोच्चाराने तत्त्वरुप नाम मात्र हस्तगत होत नाही. ते गुरूकडूनच जाणून घ्यावे लागते.

## ११ नोव्हेंबर

मीपणाने संसारात आणि परमार्थात त्रास होतो. एक मीपणा जर गेला तर संसारच ब्रह्मस्वरूप होतो.

मनाविरुध्द काही झाले की आपण तक्रार करीत असतो. पण मनाविरुद्ध गोष्टी घडणे हा निसर्ग आहे.

नावेचा उपयोग काय? नदी ओलांडून पैलतीरास जाणणे इतकाच. एकदा पैलतीराला गेल्यावर नावेची जरुरी काय?

सुख सुख असे म्हणता म्हणता माणसापुढे दु:ख उभे रहाते. सर्व सुख, समाधान हे साधनाच्या आचारात आहे.

जोपर्यंत आपण स्वार्थाकरिता काही करीत नाही तोपर्यंत आपणाला पापपुण्याची बाधा होण्याची भीती नाही.

द्वेषाने, रागाने वा अन्य कारणाने दुसऱ्याचे नुकसान करू नये. जो दुसऱ्याचे नुकसान करू पहातो त्याचेच नुकसान होते.

ज्या भ्रमणाने जीव स्वत:च्या स्थानातून भ्रष्ट झाला, त्या भ्रमणाचा निरास करून त्याला मूळस्थानात आणून, त्याचे चैतन्याशी तादात्म्य घडवून मग त्या जीवाला अढळ पदावर बसवावे लागते.

परमार्थाविषयीचा नुसता विचार हा सुद्धा परमार्थातच मोडतो.

## १२ नोव्हेंबर

आपले डोळे हे पुण्याचे तसेच पापाचे उत्पत्तिस्थान असून, ते म्हणजे नरकाचे अथवा स्वर्गाचे द्वार आहेत.

मनाच्या वृत्ती बदलत असतात. वृत्तीचे केंद्रीकरण आवश्यक आहे. वृत्तीच्या केंद्रीकरणाने मोठी शक्ती निर्माण होते.

मनाच्या संकल्पविकल्पात्मक वृत्ती सतत चालू असतात. त्या नष्ट व्हावयास हव्यात. त्यासाठी मनाला बंधन हवे.

व्यवहारात माणसाला नानाप्रकारची नाती असतात आणि ही सर्वच नाती कमी अधिक प्रेमाची असतात.

व्यवहारात माणूस जे इतरांवर प्रेम करतो ते प्राय: सापेक्ष असते. परमार्थातील प्रेम मात्र निरपेक्ष असते.

प्रेम ही एक मोठी गमतीची गोष्ट आहे. सत्ता व अधिकार आणि बंधन व मर्यादा यातील दुवा प्रेम आहे.

जगातील योग्य विषयांचा आणि त्यांच्या भोगांचा वीट येणे यालाच वैराग्य असे नाव दिले जाते.

माणसाला बंधन नको असते हे खरे, पण जर मनुष्याने स्वेच्छेने बंधन पत्करले असेल तर ते त्याला त्रासदायक वाटत नाही.

## १३ नोव्हेंबर

ज्या चैतन्यरूप, परमेश्वरस्वरूप, चिद्वायुस्वरूप नामाच्या अभ्यासाने मोक्षाची प्राप्ती होते ते नाम आहे कोठे? हे नाम बाह्य जगात कोठे शोधावयास जाण्याचे कारण नाही. हे तत्त्वरूप मानवी देहातच उपलब्ध आहे. म्हणून माणूस त्याचा अभ्यास करू शकतो.

नामाचे सत्य तात्त्विक स्वरूप देहात कसे आहे हे सदगुरु दाखवून देतात. हे नाम सदगुरूकडूनच जाणून घ्यावे लागते. वायुरूप नाम गुरु निर्दिष्ट करतात. आपल्या देहात स्फुरण पावणारे तत्त्वरूप नाम हे सदगुरु निर्दिष्ट करुन देतात.

मानवी शरीरात असणारे तत्त्वरूप नाम हे गतिस्वरूप आहे. गती असल्याने तेथे नाद आहे; त्याचा उच्चार होऊ शकत नाही. गतिरूप नामाची प्रचीति देहात येते.

गतिरूप नाम आपल्या श्वासोच्छ्वासात आहे. रामनाम हे गतिरूप आहे. 'राम नामाची गती कोण जाणे रे' या वचनावरून हे स्पष्ट होते की, शरीरात असणारे तत्त्वरुप नाम हे गतियुक्त आहे. हे तत्त्वरूप नाम मानवाच्या श्वासोच्छ्वासात आहे. याचा अर्थ असा की देहात जी श्वसनाची गति अनुस्यूतपणे चाललेली आहे त्या श्वसनाच्या गतीतच गतिरूप नाम अथवा नामाची गती आहे.

## १४ नोव्हेंबर

ज्या श्वासोच्छ्वासात नामाची गति आहे तो श्वासोच्छ्वास जीवनभर चालू असतो. साहजिकच त्यात असणारे नाम हे अखंडत्वाने म्हणजे जीवन आहे तोपर्यंत देहात स्फुरत असते.

आता नाम जरी श्वासोच्छ्वासात आहे तरी श्वासोच्छ्वास म्हणजे नाम नव्हे हे लक्षात असावे. श्वसन वायुरूप आहे. नामही वायुरूप आहे. श्वसनाच्या गतीत नामाची गति आहे पण नाम म्हणजे श्वास नव्हे. श्वासातील नाम जाणून घ्यावे लागते.

नाम हे गतिरूप असल्याने त्याचा ध्वनि होतो. हा नामाचा ध्वनि सहज आहे. शरीरात सातत्याने नामाचा ध्वनि उमटतो आहे. देहात नामाचा नाद अखंडपणे घुमत आहे. म्हणून शरीरात 'रामनाम ध्वनि उमटे' असे एका संतांनी सांगितले आहे.

एकाद्या कारखान्याच्या आत शिरले की तिथला आवाज ऐकू येऊ लागतो. त्याप्रमाणे जगातील बाह्य गोष्टी बाजूला सारून जो कोणी अंतरंगात शिरतो त्याला नामाचा ध्वनि ऐकू येऊ लागतो. शरीरात होणाऱ्या इतर नादांकडे लक्ष न देता नामाच्या ध्वनीकडे लक्ष द्यावे लागते. घड्याळाची टिकटिक चोवीस तास चालू असते. पण तिकडे लक्ष दिले तरच ती ऐकू येते. त्याप्रमाणे नामाच्या ध्वनीकडे लक्ष दिले तर नामाचा ध्वनि ऐकू येऊ लागतो. लक्षपूर्वक नामाचा ध्वनि ऐकत रहाणे हाच नामाचा अभ्यास आहे.

## १५ नोव्हेंबर

जगातील बाह्य पदार्थांमधून सुख मिळविण्याची जी जीवाची धडपड आणि प्रवृत्ती आहे, त्यामुळेच त्याला शरीरात सर्वत्र खेळणाऱ्या चैतन्याची विस्मृती झाली आहे.

विश्व ही चैतन्याची लीला आहे. साहजिकच या जगात मानवी जीवनातील बरे वाईट प्रसंग हे सुद्धा चैतन्याचा खेळच आहेत.

आत्मा हा अद्वैत म्हणजेच द्वैतरहित, भेदभावरहित आहे. साहजिकच आत्मरूप दिसत नाही तोपर्यंत भेदभाव रहाणारच.

जे कोणी भगवंताला चिकटतात त्यांना भान उरत नाही. देवाचे दर्शन झाल्यावर संसाराचा मोह पडत नाही.

जो भक्त निरिच्छ आहे तोच भगवंताला आवडतो.

दृष्टांत म्हणजे दृश्याचा अंत. एकदा का दृश्याचा अंत झाला की साक्षात्कार निश्चितपणे होतोच.

या जगात आपण मोठे व्हावे, आपणास मोठेपणा मिळावा असे माणसांना वाटत असते. अनेकजण आपणाला मोठेपणा मिळविण्यासाठी दुसऱ्याला खाली खेचण्याचा प्रयत्न करीत असतात. असे दुसऱ्याला खाली ओढून आपण मोठे होत नाही. दुसऱ्याला मोठे म्हटल्यावर आपण कनिष्ठ होतो असे जो माणूस मानतो, ते चुकीचे आहे.

## १६ नोव्हेंबर

मन आणि श्वासोच्छ्वास हे एकमेकांवर अवलंबून आहेत. एक संथ झाला की दुसराही आपोआप संथ होतो.

अहंकाराचा निरास झाल्यावर मगच आत्मसाक्षात्कार होतो. साहजिकच ज्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे त्याचे ठिकाणी अहंकार असत नाही.

माणसावर जसे बरे वाईट प्रसंग कोसळत असतात, तसे संतांवरसुध्दा बरेवाईट प्रसंग येतातच.

संतांना सर्व गोष्टी कळत असतात. फक्त ते त्या गोष्टी बोलून दाखवीत नाहीत. ते सर्व काही पहात रहातात.

परमार्थात पाऊल टाकले, परमार्थ सुरू केला की लगेच सुख मिळत नाही. साधनाचे कष्ट केल्याशिवाय सुखाची प्राप्ती होत नाही. पण एकदा का परमार्थातील सुख मिळाले की मग मात्र ते सुख नाहीसे होत नाही.

खरा परमार्थी जीव कसा असतो? प्रारब्धानुसार त्याला जे काही मिळते त्यातच तो समाधानी असतो. तो अधिकाची हाव धरीत नाही.

आपल्यावर गुरूची कृपा व्हावी असे ज्यांना वाटते त्यांनी गुरूंनी सांगितलेले साधन करीत रहावयास हवे तरच गुरुकृपा होते.

## १७ नोव्हेंबर

संतांना आत्म्याचा साक्षात्कार झालेला असतो. त्यांनी परमार्थ पूर्ण केलेला असतो. अशा प्रकारे संत जरी परमार्थी असले तरी जगाच्या व्यवहारात ते व्यवहारी माणसाप्रमाणे वागतात. पण याचा अर्थ ते व्यवहारात गुंतून पडले आहेत असा अर्थ मात्र होत नाही.

संतांच्या/भक्तांच्या जीवनात चमत्कार झालेले दिसतात. येथे हे लक्षात ठेवावे की हे चमत्कार परमेश्वर घडवून आणत असतो.

सर्वसाधारणपणे आपला श्वासोच्छ्वास हा शरीराबाहेर अठरा ते वीस अंगुळे वहात असतो. साधनाचा अभ्यास सुरू झाल्यावर श्वासाची बाहेर जाणारी ही अंगुळे कमी कमी होत जातात. श्वास बारा अंगुळावर आला की साधनाचा खरा अभ्यास सुरू झाला असे समजावे. श्वासोच्छ्वास हा अकरा अंगुळे वाहू लागला की माणसाला आत्म्याची काव्यस्फूर्ती येते आणि त्याचे हातून कवन होऊ लागते. जेव्हा श्वासोच्छ्वास दहा अंगुळे वाहू लागतो, तेव्हा सुगंध सुटतो म्हणजे साधकाचे जवळ अथवा बाहेर कोणताही सुगंधी पदार्थ नसताना साधकाला सुगंध जाणवू लागतो. त्यानंतर त्याला नादाचे विविध अनुभव येऊ लागतात. हळूहळू नादाचाच प्रकाशाचा बिंदू होतो आणि कला व ज्योति या स्वरूपात साधकाला आत्म्याचा अनुभव येतो.

## १८ नोव्हेंबर

तोंडाने नाम घेण्याची जरुरी नाही. नाम मानवी देहात नादरूपाने उमटत आहेच. ते नुसते ऐकायचे आहे. तेच नामस्मरण आहे. आता कुणी जर म्हणेल की नामस्मरण करून अनुभव येत नाही तर त्याचा अर्थ इतकाच आहे की, त्याचे नामस्मरण झालेलेच नाही.

परमात्मा हा निरुपाधिक आहे. साधक - भक्त जेव्हा स्वत: निरुपाधिक होतो तेव्हा त्याला निरुपाधिक परमेश्वर कळून येतो.

जीवनात काही अडचणी आल्या, दु:ख आले, वाईट प्रसंग ओढवले की माणसाला देवाची आठवण येते आणि तो म्हणतो की देव आमच्याकडे पहात नाही. आपण कधीही देवाकडे पहात नाही. मग देव तरी आमच्याकडे कसा पाहील?

संपूर्ण विश्व ''काही नाही'' मधून निर्माण झालेले आहे. म्हणून शेवटी सगळ्याचे पर्यवसान 'काही नाही' मध्ये होते. 'काही नाही' हे गूढ तत्त्व आहे. ते उमगायला साधुबोधाची आवश्यकता आहे.

नामाचे तिकीट आणि श्वसनाचा ऐवज बरोबर देऊन परमेश्वराने प्रत्येक माणसाला जगात पाठवले आहे. संतांनी या दोन्हीचा यथोचित वापर केला आणि ते परमेश्वररूप झाले. या उलट इतरे जन त्याचा उपयोग करीत नाहीत. हे पाहून काळाने तिकीट आणि ऐवज हे दोन्हीही त्यांच्याजवळून चोरून नेले.

## १९ नोव्हेंबर

संत साधु तो की ज्याला ईश्वराचा/ब्रह्माचा/आत्म्याचा साक्षात्कार झाला आहे. आणि म्हणून जो जीवनमुक्त झाला आहे. या जगात हे संत निरनिराळ्या परिस्थितीत आयुष्य व्यतीत करीत असतात. निरनिराळ्या दृष्टिकोनातून त्यांची भिन्न भिन्न लक्षणे पूर्वीच्या काळापासून सांगितलेली आहेत. त्यांतील कांही अशी - काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर यांना धक्का देऊन, त्यांना नीट वळण लावून ते विकार ईश्वराचे संदर्भात व्यवस्थितपणे जो वापरतो तो साधु. संतांनी विकारांना बाजूला सारलेले असते.

संतांचे मन शुद्ध असते. त्यांच्या जवळ अभिलाषा असत नाही.

जो कवित्व करतो, कीर्तन करतो अथवा चमत्कार करतो तो संत नव्हे. तथापि संत कवित्व करतात, कीर्तन करतात, आणि ईश्वर त्यांचेमार्फत चमत्कार घडवून आणत असतो.

संतांचे सर्व लक्ष ईश्वरी साधनात असल्याने त्यांच्या ठिकाणी आशा असत नाही. साहजिकच साधु हे जगातील लौकिक सुखाच्या मागे लागत नाहीत. त्यांना ब्रह्मानंद प्राप्त झाला असल्याने त्यांना लौकिक सुखाची अथवा आनंदाची चाड नसते.

## २० नोव्हेंबर

संत तो की ज्याची वृत्ती संथ झाली आहे. संतांची वृत्ती ही संथ झालेली असल्यामुळे ती समही झालेली असते. त्यांना इहलोकातील भोग प्राप्त होवो, अगर त्याग करण्याची पाळी येवो. त्यांची वृत्ती संथ, सम, निश्चळ असते. म्हणून बाह्य जगातून येणाऱ्या सुखदु:खांचा परिणाम संतावर होत नाही.

शांती, समाधान हे संतांचे ठायी सतत वसत असतात. त्यामुळे आघाताला प्रत्याघात करावा असे त्यांना कधी वाटत नाही.

संतांनी प्रथम आपल्या अंतरंगात आत्मसाक्षात्कार करून घेतलेला असतो. त्याचा परिणाम म्हणून त्यांना सर्वत्र आत्मा/ आत्मरूप दिसत असते. जगात सर्वत्र त्यांना चैतन्यच दिसत असते.

साधुसंतांना आत्मसाक्षात्कार झाला असल्यामुळे त्यांचे ठिकाणी पूर्ण ज्ञान असते. आत्मा विश्वात सगळीकडे सर्वत्र आहे. साहजिकच त्यांना सर्व गोष्टी कळत असतात.

आपल्या प्रारब्धाला अनुसरुन संत हे व्यावहारिक जीवन जगत असतात. ते जिवंत असेपर्यंत त्यांनासुद्धा मोहाचे क्षण येत असतात. त्यातून जो सहीसलामत बाहेर पडतो तोच खरा संत. म्हणून मरणोत्तरच एखाद्याची संत साधु ही पदवी कायम होते.

## २१ नोव्हेंबर

देवाजीची जी इच्छा असते तीच आपली इच्छा झाली म्हणजे देवाच्या इच्छेप्रमाणे जर वागायचे आपण ठरविले तर आपणास दु:ख करण्याचा प्रसंग येणार नाही.

परस्त्रीची अभिलाषा, परनिंदेची आवड आणि परधनाचा लोभ हे तीन अवगुण साधकाने टाळावयास हवेत.

ज्या ज्या गोष्टींचा आपण त्याग करतो, त्या त्या रिझर्व्ह होतात. आणि त्यांच्यापासून एक प्रकारची विशिष्ट शक्ति उत्पन्न होते.

परमेश्वराच्या इच्छेने सुखाचे काही क्षण/प्रसंग प्राप्त झाले तर ते स्वीकारण्यास आपण राजी होतो. तसेच ईश्वरी इच्छेने जर आपणावर दु:खाचे प्रसंग आले तर त्यांनाही मान देऊन ते स्वीकारण्यास आपण राजी झाले पाहिजे.

पुरुषाला परकी असणारी परस्त्री आणि स्त्रीला एखादा परका पर पुरुष असे असणे हा पापाचा समुद्र आहे.

वासना तृप्त करणे म्हणजे वासना वाढविणेच आहे. कारण वासनेच्या तृप्तीने वासना वाढतच जाते. म्हणून वासनेचे शमन व्हावयास हवे. वासनेचे शमन म्हणजे वासनांची तृप्ती असा याचा अर्थ नाही.

या जगात कुठेही आणि कुणावरही विश्वास ठेवावा अशी स्थिती नाही. कारण जग हे चमत्कारीक आहे.

## २२ नोव्हेंबर

पांडवांपैकी धर्मराज युधिष्ठिर हा विशिष्ट वृत्तीने वागत होता. पण तसली वृत्ती ही या जगाच्या नेहमीच्या व्यवहारात निरुपयोगी आहे.

आपल्या सारखीच इतर सर्व माणसे असतात असे मुळीच समजू नये. एखादा पुरुष हा विशिष्ट आचार, उच्चार आणि विचार करतो. तथापि तो जिवंत आहे तोपर्यंत इतरांना त्याची किंमत कळत नाही व उमगत नाही.

आपण दुसऱ्यासाठी काही बरे/चांगले करतो. पण ते बोलून दाखवू नये. कारण बोलले की ते फुकट जाते.

काही माणसे अगदी अघळपघळपणाने वागत असतात. परंतु हा अघळपघळपणा अनेकदा घातक ठरतो.

आपण कोणाशीही तुटून वागू नये. म्हणजे तुटकपणाने वागू नये. तसेच आपण इतरांशी लघळपणाही करू नये.

आपण त्यागाची भाषा करतो. आपल्याला न आवडणाऱ्या गोष्टींचा आपण त्याग करतो. पण हा खरा त्याग नव्हे तर आपला विषय आवडता असला तरी सोडणे हाच खरा त्याग आहे.

बाह्य विषयांतून मिळणारे सुख तत्कालिक नाशवंत असते,. पण त्याचा मोह सुटत नाही. हा मोह सुटल्याशिवाय शाश्वत सुख मिळणार नाही.

## २३ नोव्हेंबर

आपल्या शरीरात आत्मा आहे हे कशावरुन असे अनेकजण विचारतात. कारण तो कोठे दिसत नाही. आत्मा हा नाद-प्रकाश-रूप आहे. शरीरातील नादप्रकाशावरून अदृश्य आत्म्याचे अस्तित्त्व शहाण्या माणसाला कळून येत असते.

मानवी जीवनात सर्वात महत्त्वाचा श्वासोच्छ्वास आहे. श्वास हा विश्वाचा ठसा आहे. श्वासात जे आहे तेच विश्वात आहे आणि श्वासात जे नाही ते विश्वात नाही.

जन्म आणि मरण हे दोन्हीही आपल्या हातात नाहीत म्हणजे त्यांच्यावर आपली सत्ता असत नाही. या दोहांमधल्या जीवनावर मात्र आपली सत्ता आहे असे माणूस मानीत असतो. पण ते बरोबर नाही. जन्म आणि मरण यांच्या मधले जीवन हे सुद्धा आपल्या हातात कुठे आहे?

शरीरात डोळे आहेत. शरीरात जीवात्मा आहे. डोळारूपी खिडकीतून जीवात्मा हा जगातील बाह्य दृश्याकडे पहात असतो. परंतु त्याला जर स्वत:चे खरेखुरे ब्रह्मस्वरूप पहावयाचे असेल तर त्याने उलट फिरून अंतर्मुख होणे हे आवश्यक आहे.

मोक्ष मोक्ष म्हणजे काय? माणसाच्या निर्विकार आणि निर्विचार स्थितीत जो अतूट आनंद असतो तोच मोक्ष होय.

## २४ नोव्हेंबर

आपल्या जीवनात चांगल्या गोष्टी घडाव्यात आणि वाईट गोष्टी घडून नयेत, असे आपणांपैकी प्रत्येकाला वाटत असते. पण आपल्यावर -आपल्या वाटण्यावर -काही अवलंबून नाही. आपल्या मनात असो अगर नसो, आपली इच्छा असो अगर नसो, जे व्हायचे आहे तेच होत असते.

काही संत आपल्याजवळ येणाऱ्या माणसाला शिव्या देतात. पण संतांच्या शिव्या या ओव्या असतात.

साधनाने जीवनाची गती ऊर्ध्वगामी होते. ती ऊर्ध्वगामी झाल्याशिवाय आत्मानुभव येत नाही, हे साधनातील वर्म आहे.

जिव्हेने नाम घेणे आणि नामाच्या जिव्हेतून नाम घेणे यात महदंतर आहे. नामाची जिव्हा म्हणजे जेथे नाम स्फुरण पावत आहे ती जिव्हा होय.

संत हे परमेश्वररूप झालेले असतात. त्यामुळे संतांच्या मनात आले तर त्यांना काहीही अशक्य नाही.

संत हे नामामृत पिऊन तृप्त झालेले असतात. हे नामामृत म्हणजे काय? नामाची आवड हेच नामामृत. या नामामृताच्या योगानेच संत हे कृतकृत्य झालेले असतात.

## २५ नोव्हेंबर

आत्म्याचे दर्शन होते, आत्म्याचा साक्षात्कार होतो म्हणजे नक्की काय होते? आत्मा दिसतो याचा अर्थ नाद, बिंदु, कला व ज्योति या चार प्रकारांनी आत्मा अनुभवास येतो. या नाद, बिंदू, इत्यादी चारांच्या पलीकडे किंवा वेगळा असा आत्मसाक्षात्कार म्हणून काही नाही.

व्यवहारात निरनिराळ्या पदार्थांची प्रचीति भिन्न भिन्न असते. पण ज्याला नाम साधले त्याला कोणत्याही वस्तूवर एकच प्रचीति येते.

समोर चहा आला असता, त्या चहाची 'चहा' न करणे हेच देहभान विसरल्याचे लक्षण आहे.

साधक साधन करीत असतो. त्याला काही अनुभवही येतो. परंतु 'सुंभ जळाला तरी पीळ जळत नाही' या न्यायाने काहीवेळा साधकाच्या मार्गात विरोधी शक्ती येतात आणि त्या त्याला नडवितात.

ज्या साधकाचे संकल्प विकल्प लयाला जातात, त्याला विज्ञान प्राप्त होते. ज्यातून हे सर्व निर्माण झाले आहे तेच होणे म्हणजे विज्ञान. विज्ञानाने आत्म्याखेरीज अन्य काही दिसत नाही.

तत्त्वरुपाने देव सर्वत्र आहे, पण त्याची ओळख पटल्याशिवाय माणसाला समाधान प्राप्त होत नाही.

## २६ नोव्हेंबर

जीवनात माणसाने पुढील गोष्ट लक्षात ठेवावी. आता आपणास जे हवे आहे असे म्हणतो ते पूर्वीच्या जीवनात केव्हातरी नको होते, आणि आत्ता आपणास जे नको आहे असे वाटते ते पूर्वजन्मात केव्हातरी आपणास हवे असे वाटत होते, ही गोष्ट निश्चित आहे.

निसर्गत: इंद्रिये ही बहिर्मुख आहे. ती बाह्य विषयाकडे धावणारच पण परमार्थात ही त्यांची बाहेरची ओढ कमी व्हावयास हवी. त्यासाठी इंद्रियरूपी घोड्यांना विवेक हा लगाम आहे.

भौतिक शास्त्रांनी विश्वातील पदार्थांचे ज्ञान होते. त्या ज्ञानाचा बरावाईट उपयोग जीवनात होऊ शकतो. तसे आत्मज्ञानाचे नाही. आत्मज्ञानामुळे व्यवहारात काही चांगले घडावे अशी इच्छा करणे हे अज्ञान आहे. कारण आत्मज्ञान हे व्यवहाराच्या पलीकडचे आहे.

जग हे त्रिगुणात्मक आहे. सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण कमीजास्त प्रमाणात सर्व पदार्थात असतातच. त्यामुळे या जगात निर्भेळ चांगले अगर निर्भेळ वाईट असे काहीच नाही.

विश्व हा चिद्वायूचा विलास आहे. विश्वातील चिद्वायु हा आनंदरूप आहे तर त्याचा विलास चैतन्यरूप आहे.

## २७ नोव्हेंबर

ब्राह्मोपचाराने घेतले जाणारे नाम म्हणजे जे नाम वैखरी वाणीने, तोंड आणि ओठ यांचा वापर करून उच्चारले जाते ते नाम. वैखरी वाणीने उच्चारले जाणारे नाम हें अपूर्ण आहे. ते काही मर्यादेपर्यंत जीवाला उपयोगी पडते. पण नुसत्या तोंडाने घेतलेल्या नामाने जीवाचा उद्धार होणार नाही.

तोंडाचा वापर करून किंवा हातात माळ घेऊन केल्या जाणाऱ्या नामाच्या जपात बहुधा मन असत नाही.अनेकदा जप करताना व्यावहारिक चौकश्या केल्या जातात. अथवा मनात वेगळेच विचार चालू असतात. या नामाचा काय उपयोग होईल?

तथापि योग्य पद्धतीने जर तोंडाने नामाचा जप होत असेल तर असे होईल :- जप करणाऱ्या माणसाची इतर वायफळ, निरर्थकता बडबड बंद होते. या नामजपाने व्यावहारिक बोलण्याला आणि जीवनाला एक प्रकारचा ब्रेक लागतो. त्या नामाच्या उच्चारणाने मनावर एक प्रकारचा चांगला संस्कार घडतो. त्यामुळे तो जप करणाऱ्या माणसाच्या मनोवृत्तीत आणि विचारात फरक पडू लागतो. इतर काहीतरी मनात येणारे फालतू विचार कमी होण्याला या नामजपाचा उपयोग होतो. या नामाने चित्तातील विकार कमी होऊन चित्तशुध्दी होण्यास मदत होईल. यापलीकडे या नामोच्चाराचा फारसा उपयोग होत नाही.

## २८ नोव्हेंबर

नुसता तोंडाने जप करून परमार्थात येणाऱ्या नाद, बिंदु, कला व ज्योति यांचे अनुभव येणार नाहीत. बाह्योपचाराने उच्चारलेल्या नामाने ईश्वराचा साक्षात्कार झाल्याचे एकतरी उदाहरण सापडेल काय? नाही. खरे तात्त्विक गतिरूप नाम हेच जीव-शिवाचे ऐक्य घडवून आणण्यास उपयुक्त ठरणारे आहे.

मग येथे कुणी विचारील :- वैखरी वाणीने, तोंडाने नाम घ्या, नामाचा टाहो फोडा, असे अनेक संतांनी सांगितले आहे. हे सांगणे चूक आहे काय? नाही, असे या प्रश्नाचे उत्तर आहे. असे सांगण्याचा संतांचा उद्देश असा आहे. माणूस मुळातच बहिर्मुख असल्यामुळे तो परमार्थाकडे न वळणारा असा आहे. त्याने परमार्थाकडे वळावे म्हणून संतांनी 'वाणीने नाम घ्यावे. तसे नाम घेणे सोपे आहे' असे सांगितले आहे. कसेही नाम घ्यावे, कुठेही नाम घ्यावे, असे सांगण्यात संतांचा हेतु असा आहे की, येन केन प्रकाराने माणसाची वृत्ती परमार्थाकडे वळावी. तसे झाल्यास मग त्याला पुढे नामाचे खरे स्वरूप कळेल. अशा प्रकारची संतांची अपेक्षा आहे. वेळेचा अपव्यय टाळावा, मनात वाईट विचार येऊ नयेत, मनावर नामाचे चांगले संस्कार घडावेत आणि मनुष्य योग्य वृत्तीने परमार्थात शिरावा यासाठी, संतांनी नामाचा उच्चार सांगितला आहे.

## २९ नोव्हेंबर

परमार्थात गुरुकृपा ही अत्यंत महत्वाची आहे. गुरुकृपेशिवाय शिष्याचा परमार्थ होणार नाही आणि त्याला आत्मानुभवही येणार नाही.

गुरुकृपा ही सामान्यत: सहजासहजी होत नाही. शिष्याने खडतर साधन केले तरच गुरुकृपा होते. ज्या प्रमाणात शिष्य साधनाचा अभ्यास करतो, त्या प्रमाणात गुरुकृपा होते. एखाद्या शिष्यावर एकदम कृपा झाली असे इतरांना वाटते. पण त्या उदाहरणात त्या शिष्याने मागील जन्मी साधनाभ्यास केलेला असतो. खरे सांगायचे तर गुरुकृपा ही कोणावर, कशी आणि केव्हा होईल ते सांगता येत नाही.

गुरू हे देहातीत असतात. शिष्य जर देहरूपी लाकडी ठोकळ्यांना चिकटून असेल तर त्याला गुरुकृपारूपी विजेचा झटका बसणार नाही.

उपदेश किंवा अनुग्रह होण्यास गुरु किंवा शिष्य हे दोघेही एकत्र येणे हे आवश्यक असते. परंतु गुरुकृपेच्या बाबतीत हा नियम लागू पडत नाही. गुरु हा कोठूनही आपल्या शिष्यावर कृपा करू शकतो. असे समजा की गुरु हा सांगलीत आहे, शिष्य हा लंडनमध्ये आहे अथवा अमेरिकेत आहे. गुरु हा सांगलीत राहून त्या विशिष्ट शिष्यावर कृपा करू शकतो. अशी गुरुकृपा ही अलौकिक आहे. आपल्या कृपेने गुरु हे आपल्या शिष्याला आपल्या सारखा साक्षात्कारी करून टाकतात.

## ३० नोव्हेंबर

गुरुकृपा ही अदभुत आहे. गुरुकृपा झाली रे झाली की शिष्याची अवस्था बदलते, त्याची वृत्ती आपोआप चैतन्याकडे वळते. त्या शिष्याची खेच चैतन्याकडे सुरू होते. परमार्थात चैतन्याचा अनुभव घ्यावयाचा असतो. चैतन्याचा अनुभव घेण्यास चैतन्याचे माध्यम सापडावयास हवे. तसे होण्यास गुरुकृपा आवश्यक आहे.

आत्मा/परमात्मा हा चैतन्यरूप आहे. तो आत्मानुभव / चैतन्यानुभव येण्यासाठी शिष्यावर गुरुकृपा होणे आवश्यक आहे. गुरूच्या कृपेमुळे आत्म्याचा आनंद, आत्म्याचे सुख प्राप्त होते.

उन्मनी अवस्थेत आत्म्याचा साक्षात्कार होतो. ही उन्मनी अवस्था गुरुकृपेशिवाय प्राप्त होत नाही.

गुरूची कृपा झाल्यावर नाम आणि ब्रह्म यांचे खरे स्वरूप साधकाला कळून येते. त्यासाठी नामाची गति आणि प्राणाची गति हे एकरूप होणे आवश्यक आहे. ते ऐक्य साधण्यास गुरुकृपा पाहिजे.

परमार्थात गुरूच्या कृपेशिवाय साधनाची सिद्धि हस्तगत होत नाही. गुरुकृपा शिष्यावर झाल्याशिवाय शिष्याला आत्म्याच्या अनुभवाची अथवा आत्मानंदाची प्राप्ती होत नाही हा त्रिकालाबाधित सिध्दांत आहे.

## १ डिसेंबर

संत सांगतात की नाम घेतल्याने पाप जाते. ते ऐकल्यावर आपण असे करू लागतो :- पाप करायचे आणि मग नाम घ्यावयाचे. अशा प्रकाराने जर आपण नाम घेत असू तर ते नाम घेण्याने पापाचा निरास होत नाही हे लक्षात ठेवावे.

जगाच्या बुडाशी ब्रह्म आहे. जगातील रूपयुक्त पदार्थाला काहीतरी नाम असते. पण ब्रह्मात मात्र नाम आणि रूप एकच आहेत.

समजा आपल्याजवळ अमाप पैसा आहे. त्या पैशाने व्यवहारातील गोष्टी मिळत असतील, पण परमार्थातील नाम हे पैशाने मिळत नाही.

परमेश्वराने प्रत्येक जीवाच्या शरीरात नाम हे देऊन ठेवले आहे. परंतु त्या नामाकडे आपले लक्ष असत नाही. शरीरात रामनाम आहे. त्याच्याशी आपण तादाम्य पावलो तर आपणास सर्व सुख मिळणार आहे. पण ते नाम सहजा-सहजी मिळत नाही. बाह्य दृश्य बाजूला झाल्याशिवाय देहातील चैतन्यरूप नाम कळत नाही. देहरुपी दृश्य बाजूला सारून नामाशी तादाम्य साधावयाचे आहे. हे नाम समजा शब्दांत व्यक्त करायचे ठरविले तर त्याला 'राम' कसे म्हणता येते.

नाम हे सर्व विश्वाचे बीज आहे. ते असे बरे देता घेता येईल? म्हणून 'नाम दिले आणि नाम घेतले' या म्हणण्याला काही अर्थ नाही. नाम ही देण्याघेण्याची वस्तु नाही.

## २ डिसेंबर

नाम कसेही घ्यावे असे जे संतांनी सांगितले आहे तसे इंद्रियासी नेम नसताना नाम घेऊन उपयोग होत नाही असेही संतांनी सांगितलेले आहे. पण त्या उत्तरोक्त बोलण्याकडे आपण दुर्लक्ष करतो. 'इंद्रियाचा संयम नसताना नाम उच्चारून काय उपयोग होणार? जसे :- घागरीच्या तळाला समजा भोक पडले आहे. आता वरून त्या घागरीत पाण्याची संतत धार पडत आहे. परंतु ती घागर भरणार कशी? तसे इंद्रियांना नेम नसताना घेतलेले नाम हे फारसे प्रभावी होत नाही. कसेही नाम घेतले तरी चालते असे जे संतांनी सांगितले आहे, त्याचा उद्देश एवढाच आहे की, परमार्थाकडे लोकांनी वळावे. अर्थात कसे तरी नाम घेणे हे सुद्धा सोपे नाही. ते ही फारच अवघड आहे. नाम हे निष्ठापूर्वक आणि चित्तशुद्धीपूर्वक घ्यावयास लागते.

सामान्य माणूस प्रथम वैखरीने नाम घेतो. तसे केल्याने हळूहळू चित्तवृत्तीतील विकार नाहीसे होतात आणि चित्ताची शुद्धी होते. पण तेवढ्यावर थांबता कामा नये. नामाची खरी कळ गुरूकडून जाणून घ्यावयास हवी.

नाम हे एकमेव सत्य आहे. आपण जिवंत असताना आपल्या देहात नाम असते. या देहाची तीन चिमटे राख झाली तरीसुद्धा नाम असतेच. याचा अर्थ असा की आपण जिवंत असलो तरी नाम असते आणि आपण नसलो तरी नाम असते. नाम हे नित्य आणि सर्वव्यापक आहे.

## ३ डिसेंबर

ज्या माणसाचा परमात्मा हाच विषय झाला तो माणूस जगातील व्यवहारात होणाऱ्या निंदा, स्तुतीकडे लक्ष तरी देईल का?

आत्म्याचा लाभ/प्राप्ती होणे हाच सर्वोत्तम लाभ आहे. जगातील वस्तूंचा लाभ हा त्यापुढे अत्यंत गौण आहे. आत्मप्राप्तीनंतर आत्मसुखाचा लाभ घेऊन आपण आनंदात रहातो आणि तो आनंद सर्वांना देतो. यातच जीवनाची खरी-खुरी सार्थकता आहे.

जगाच्या मागे एकच एक असे मूळतत्त्व आहे ते म्हणजे स्पंद. स्पंदाच्या एका बाजूला ब्रह्म आहे तर दुसऱ्या बाजूला माया आहे. एका बाजूला चैतन्य आहे तर दुसऱ्या बाजूला जड आहे. ते दोघे एकमेकांना सोडून नाहीत. जड आणि चैतन्य हे परस्परांना सोडून नसून ते दोघे एकाच तत्त्वाला अंगभूत आहेत. ते दोन्ही मिळून एकच तत्त्व आहे म्हणून तेथे  द्वैत नसून अद्वैत आहे.

या जगात नानाप्रकारचे पदार्थ दिसतात. परमार्थदृष्ट्या जगात वस्तु एकच आहे. ती सर्व काही व्यापून आहे. ही वस्तू सर्व वस्तूमध्ये आहे. तथापि आपणास वस्तूचे दर्शन होत नाही. वस्तूचे दर्शन झाल्याशिवाय नुसत्या 'वास्तूला' काही किंमत नाही. वस्तूचे दर्शन झाले नाही तर सर्व काही निरर्थक आहे.

परमार्थात आत्मसाक्षात्कार होणे आवश्यक आहे असे मानले जाते. आत्म्याचा निदिध्यास लागल्याशिवाय आत्मसाक्षात्कार होत नाही.

## ४ डिसेंबर

निर्गुण ब्रह्म आणि सगुण ब्रह्म असे शब्दप्रयोग केले जातात. ते दोघे वेगळे आहेत असे म्हटले जाते. कधी कधी निर्गुण खरे आणि सगुण खोटे असेही म्हटले जाते, पण तसे नाही. भूमितीतील बिंदू लाही लांबी, रुंदी, उंची इत्यादींनी रहित असा मानला जातो. असे बिंदू एकापुढे एक ठेवीत गेले की रेषा होते. निर्गुण ब्रह्म हे भूमितीमधील बिंदूप्रमाणे आहे आणि सगुण ब्रह्म हे भूमितीतील रेषेप्रमाणे आहे.

जगाच्या व्यवहारात आपणा मानवांना नानाप्रकारच्या वस्तूंची प्रचीति येत असते. या वस्तु वेगवेगळ्या असतात. साहजिकच त्या वस्तूंची प्रचीति ही सुद्धा भिन्न भिन्न येते. परंतु ज्याला आत्मा कळला आहे, आत्म्याचा साक्षात्कार झाला आहे. त्याला मात्र कोणत्याही वस्तूवर एकच प्रचीति येते.

परमार्थात नामाला फार महत्त्व आहे. हे नाम आहे तरी काय? नाम म्हणजे चैतन्य आहे आणि चैतन्य हेच नाम आहे. ज्याला नाम आणि चैतन्य हे एकच आहेत असा अनुभव येतो त्याच्या मनाचे मनत्व शिल्लक रहात नाही.

नाम हे गोड आहे असे साधुसंत सांगतात. परंतु नाम म्हणजे काही खडीसाखर नव्हे की गुळाचा खडा नव्हे. तोंडात टाकला की गोड लागला. जो साधक नामात आपली गोडी मिसळतो त्यालाच ते नाम गोड लागते.

## ५ डिसेंबर

प्रेम हे ईश्वराचे स्वरुप आहे. प्रेम हे जीवनाचे सूत्र आहे. प्रेम करणे हा गुन्हा नाही. पण ते प्रेम विशुध्द, निर्व्याज आणि पवित्र असावे. प्रेमाकरता प्रेम असावे. या उलट जगातील व्यवहारात प्रेम दिसते. प्रेमामागे काहीना काही कार्यकारण असते. प्रेमाला जर कारण असेल तर कारण संपताच ते प्रेम आटून जाते. ते खरे प्रेम नव्हे.

हल्ली असे झाले आहे. माणूस काम करायला तयार नाही पण त्याला पगारवाढ मात्र सारखी पाहिजे. नेमाने आणि एकनिष्ठेने काम करून पगार मागणारी माणसे आता कमीच झाली आहेत.

बाह्य जगात, संसारात, घरात माणसाला कटकटी असतात. त्यांना कंटाळून माणूस देवाकडे वळतो. कटकटी नसत्या तर कुणालाही देवाची आठवण झाली नसती.

पश्चाताप म्हणजे काय? पश्चात्ताप शब्दाचा खरा अर्थ काय? पश्चात म्हणजे अंतर्यामी, नाम म्हणजे प्रकाश. जर अंतर्यामामध्ये आत्म्याचा प्रकाश पडला तर तेथे पश्चात्ताप झाला असे म्हणावे.

लग्नाचे वऱ्हाड जमले आहे. तेथे सांडगे-पापडांचे तसेच दागिन्यांचे डबेही आहेत. सांडगेपापडाच्या डब्याकडे लक्ष ठेवून दागिन्याच्या डब्याकडे दुर्लक्ष व्हावे, तसे आपले होते. आमचे देहाकडे लक्ष असते, परंतु ज्या चैतन्यामुळे देह हा व्यवहार करीत असतो, त्या चैतन्याकडे मात्र आमचे दुर्लक्ष होते.

## ६ डिसेंबर

प्रत्येक माणसाचे ठिकाणी चिदचिद्ग्रंथि आहे. ही ग्रंथि म्हणजे अपेंडिक्स, लालोत्पादक पिंड इत्यादीसारखी नाही. चित् म्हणजे चैतन्य आणि अचित् म्हणजे शरीर. शरीर व चैतन्य यांची गाठ जेथे पडली तेथे चिदचिद् ग्रंथि आहे. गुरुकृपेने माणसाच्या डोक्यात जर चैतन्याशिवाय दुसरा कोणताच विषय येत नसेल, तरच ही चिदचिद् ग्रंथीची गाठ सुटते.

दृश्य विषय आणि व्यवहार हे आम्ही हृदयाशी कवटाळून धरले आहेत. परंतु ज्या ईश्वराने हृदय दिले त्याला आम्ही कवटाळले आहे काय?

आपण या संसारात, प्रपंचात बद्ध आहोत, पण का? तर त्याचे कारण आमचा हव्यास, आमची जिद्द, आमची हौस. जिद्दीने संसार करणे आम्हाला आवडते. हव्यास, जिद्द, हौस यांनी आम्हाला प्रपंचात बद्ध करून टाकले आहे.

माणूस हा व्यवहारात निगरगट्ट असतो. कोण काय म्हणेल याची पर्वा तो करीत नाही. अट्टाहासाने तो जगातील व्यवहार पार पाडत असतो. व्यवहार हा ठीकठाक होत असतानाच जर जमले तर तो परमार्थाकडे वळणार. अशा या माणसाला काय खरा परमार्थी म्हणायचे?

शौर्य गेले, युध्दभूमी गेली, तलवारीची पाती विळीला येऊन बसली; वैश्वदेव गेले, त्यातील कुंडे ही भांडीवालीच्या राखेला आली. सण गेला बोंब राहीली. कालाय तस्मै नमः।

## ७ डिसेंबर

जागृति अवस्थेत आपण डोळे उघडे ठेवून काहीतरी करीत असतो. जोपर्यंत आपले डोळे उघडे असतात तोपर्यंत जगातील दृश्य पदार्थ प्रचीतीला येतात. साहजिकच त्या प्रचीतीमुळे मनात नाना प्रकारचे संकल्प विकल्प उठत रहातात. दृश्यावरचे लक्ष कमी करणे ही गोष्ट साधनात साधावयाची असते. म्हणून स्वस्थ एके ठिकाणी बसून साधकाने आपले डोळे मिटून घ्यावेत म्हणजे डोळ्यापुढे बाह्य दृश्य वस्तु येणार नाहीत.

साधन करताना आपल्या नाकातून होणारा श्वासोच्छ्वास हाच उपयोगी आहे. साधकाचे लक्ष श्वासोच्छ्वासावर लागणे आवश्यक आहे. श्वासोच्छ्वासावर आपली दृष्टी स्थिरपणाने रहावयास हवी. श्वासोच्छ्वासात म्हणजे शरीरात खेळणारे वारे आहे. हे वारे म्हणजे श्वासोच्छ्वास अनुकूल करुन घेणे म्हणजेच साधन आहे.

आणखी असे :- साधन साधताना मनातले विचार कमी होणे हे अतिशय आवश्यक आहे. पण संकल्प विकल्प म्हणजे विचार करणे हे तर मनाचे स्वरूप आहे. त्यामुळें मनातील विचार हे सहजासहजी आणि ताबडतोब दूर होत नाहीत. या विचारांचा विषय बदलणे जरुर ठरते. तेव्हा या विचारांचा विषय जर आपण नाम, परमात्मा, ईश्वर इत्यादी काही केला तर ते विचार साधनाचे आड येत नाहीत.

# ८ डिसेंबर

झोप लागण्यापूर्वी जी क्रिया घडते ती साधनात व्हावयास हवी, म्हणजे असे :- झोप लागण्यापूर्वी आपल्या मनातील विचार कमी कमी होऊन, मन शांत होत होत झोप लागते. साधनात असेच विचार कमी कमी व्हावयास हवेत.

झोपेत शरीराचे व्यापार थांबलेले असतात. साधनाचे वेळीही तसेच व्हावयास हवे. झोपेत देहाची जाणीव सुटते. साधनातही देहाची जाणीव येता कामा नये. निद्रा म्हणजे विचाररहित स्थिति हीच स्थिति साधनात साधावयाची असते. ही स्थिति निद्रेत अज्ञानाने होते. साधनात ती स्थिति ज्ञानाने होते.

झोप आणि साधन यात फार मोठा फरक आहे. तो लक्षात घ्यावयास हवा. झोपेत जागृति म्हणजे साधन आहे. सुषुप्ति आणि जागृति यांचा सुंदर मिलाप साधनात होतो. वेगळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास :- झोपेमध्ये अज्ञान असते. झोपेत आत्म्याचे स्मरण अथवा नामाचे स्मरण असत नाही. साधनात मात्र आत्म्याची जाणीव, अथवा नामाचे स्मरण असते. तेव्हा झोपेतल्याप्रमाणे देहाची जाणीव साधनात संपते, तथापि साधनात आत्म्याचे स्मरण असते.

अशाप्रकारे दृश्य, देह, विचार इत्यादी सर्व बाजूला सारून, त्यांच्याकडे असणारी ओढ काढून टाकून, सर्व ओढ शरीरातील चैतन्याकडे जोडणे म्हणजे शरीरातील चैतन्याकडे लक्ष देणे आणि ते तसेच ठेवणे म्हणजे साधन आहे.

## १ डिसेंबर

जगातील नेहमीच्या व्यवहारात आपण अनेक पदार्थांवर प्रेम करीत असतो. आई, बाप, बायको, मुलगा, बाह्य जगातील एक वा अनेक वस्तु आपणास आवडत असतात; त्यांचेवर आपले प्रेम असते. पण हे लौकिक प्रेम हे परमेश्वरावरील प्रेमापेक्षा फारच पृथक आहे. लौकिक प्रेम हे सापेक्ष असते म्हणजे ते अन्य काही गोष्टींवर अवलंबून असते. उदा - आपल्या मुलावर आपण प्रेम करतो. कारण मुलगाही आपल्यावर प्रेम करीत असतो. पण तोच मुलगा जर आपला द्वेष करू लागला, आपले वाटोळे करण्यास प्रवृत्त झाला तर त्याच्यावरील आपले प्रेम उडून जाते. प्रेम हे दुतर्फी असते. अनेकदा आपण आपल्या श्रीमंत नातेवाईकांवर प्रेम दाखवितो. त्यांचा आदरसत्कार करतो. त्यावेळी आपल्या मनात असते की, त्या नातेवाईकाने आपणास साहाय्य करावे, आपणास आर्थिक मदत करावी. म्हणजे हे प्रेम कार्यकारणावर अवलंबून असते. ते प्रेम सहेतुक असते. लौकिक प्रेम हे मर्यादित असते; ते सांत असते, ते सतत राहीलच अशी खात्री देता येत नाही. ते प्रेम कधीतरी संपून जाण्याची शक्यता असते. या उलट देवावरील प्रेम म्हणजे भक्ती आहे. भक्ती ही निरपेक्ष आणि निर्हेतुक असते. प्रेमाची पराकाष्ठा म्हणजेच ईश्वरावरील भक्ती आहे.

## १० डिसेंबर

परमेश्वर हा प्रेमस्वरूप आहे. त्या परमेश्वरावर जर आपण प्रेम करू लागलो तर आपण भक्ती करू लागलो असा अर्थ होतो.

ईश्वराची भक्ती ही नाना प्रकारांनी केली जाते. परमेश्वराच्या नामाचा प्रेमाने उच्चार ही भक्ती आहे. देवाचे प्रेमपूर्वक स्मरण करणे ही सुद्धा भक्तीच आहे. ईश्वर हा चैतन्यस्वरूप आहे. तो चैतन्यरूपाने आपल्या शरीरात आहे. आपली वृत्ती या चैतन्याकडे वळविणे ही सुद्धा भक्तीच आहे. शरीरातील चैतन्यरूप वायूकडे आपले आकर्षण ही भक्तीच आहे. देवाचे गुणानुवाद प्रेमाने ऐकणे हीही भक्ती आहे. देवाचे माहात्म्य प्रेमाने गाणे, कथन करणे हीही भक्तीच आहे.

भक्तीचे माहात्म्य फार मोठे आहे. प्रभु रामचंद्र हे शबरी भिल्लीणीच्या उष्ट्या बोरांना भुलले. भक्तीने देव खेचला जातो. भक्तीचे आकर्षण देवाला ओढून नेते. देव भक्ताजवळ रहातो असे सांगतात. ईश्वराची भक्ती करून जीव बुडाला असे होत नाही. ईश्वर भक्ताला तारूनच नेतो.

भक्तीरूपी धन जवळ पाहिजे. ते असले की सुखाला तोटा नाही. भक्ती म्हणजे जीवाला सततचे समाधान प्राप्त करून देणारे रसायन आहे.

## ११ डिसेंबर

रोगाचा प्रतिकार करण्याची शक्ती निसर्गानेच मानवात ठेवली आहे. त्याप्रमाणे सर्व जीवांचा उद्धार व्हावा, त्यांना देवाचे दर्शन व्हावे अशी योजना परमेश्वराने केली आहे. म्हणजे असे की, परमेश्वराच्या दर्शनाचे साधन परमेश्वराने प्रत्येक माणसाजवळ ठेवले आहे. ते कोणते हे मात्र संतांकडून जाणून घ्यावे लागते आणि त्या साधनाचा आचार करावा लागतो. तसा आचार घडला तर त्या साधन करणाऱ्याला देवाचे दर्शन होते. पण हे साधन न करणाऱ्यास किंवा कळूनही तिकडे दुर्लक्ष केल्यास माणसाचा ऱ्हास होतो. हा ऱ्हास दूर करण्यास तसेच जीवाला ईश्वरप्राप्तीचे साधन सांगण्यास संत महात्मे या जगात अवतार घेत असतात. या संत सज्जनांना शरण जाऊन त्यांचेकडून हे साधन माणसाने समजून घ्यावयास हवे.

देवाचे दर्शन होणे ही गोष्ट सुलभपणाने घडणारी नाही. देवाचे दर्शन सुलभ असते तर कोणत्याही लुंग्या सुंग्या माणसाला देवदर्शन झाले असते. देव दिसावा अशी इच्छा असेल तर सदगुरूंचेकडे जाऊन, त्यांच्याकडून साधन समजून घेऊन ते करावे लागते. साधन साधण्यास प्रयत्न हा करावाच लागतो.

कोणतीही गोष्ट साधण्यास एकादी कळ असते. देवाचे दर्शन होण्याची विशिष्ट कळ असते. ती संतांचेकडून जाणून घेऊन, ती वापरावी लागते.

## १२ डिसेंबर

देव आहेच आहे. तो देव सर्वांचा नियंता आहे. त्याच्या इच्छेप्रमाणे सर्व काही घडत असते. हे कळल्यावर परमेश्वराच्या इच्छेला धरूनच माणसाने वागावे हे श्रेयस्कर आहे. परमेश्वराचे इच्छेविरुद्ध वागल्यास तो आपली खोडच मोडेल. देवाशी अटीतटीने वागल्यास आपलेच वाईट होते. सर्व काही ईश्वराचे हातात आहे हे जाणून देवाचा द्वेष, राग करू नये.

एखादी गोष्ट मर्यादित असेल तर तेथे अहंकार येतो. ईश्वर हा अमर्याद आहे, तो सर्वव्यापी आहे. म्हणून त्याचे ठिकाणी अहंकार नाही.

मूलतः देव निर्गुण आहे. तरी तो कारणपरत्वे सगुण होतो. भक्तासाठी, भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी तो सगुणरूपाने त्यांच्यापुढे उभा रहातो.

ताकात लोणी असते पण त्या ताकाचे यथायोग्य पद्धतीने घुसळण केल्याशिवाय लोणी ताकातून बाहेर येत नाही. देहरूपी ताकात देवरूपी लोणी आहे. पण संतांनी सांगितलेल्या साधनरूपी रवीने देहरूपी ताकात व्यवस्थित घुसळण झाल्याशिवाय लोणीरूपी देव दिसत नाही.

जगात आपण जे पहातो ते आपण होत नाही. उदा. - कुत्रा पहाता पहाता आपण कुत्रा होत नाही. पण देव पहाता पहाता आपणच देव होऊन जातो. ईश्वराला पहाणारा ईश्वरच होतो. आणि आपण ईश्वर होऊन जाणे हेच आपल्या जीवनाचे साध्य आहे.

## १३ डिसेंबर

अखंड सुखप्राप्तीचा मार्ग सोडून जीव या जगात काहीतरी वेगळेच करू लागतो. जीवाला जे आई-बाप इत्यादी नातेवाईक प्राप्त झाले आहेत त्यांच्या मतानुसार अगर आपल्या मताप्रमाणे जीवाचे वागणे सुरू होते. अन्न, वस्त्र आणि घर यासाठी आपली धडपड सुरू होते. या धडपडीतच आपण बाह्य विषयांतून सुख मिळविण्याचा प्रयत्न सुरू करतो. पण या धडपडीने आपणास केवळ सुखच मिळते, असे नाही. सुखाबरोबर दुःखाचाही अनुभव आपणास येऊ लागतो. इच्छित वस्तू न मिळणे, मनासारखे काही न होणे अशा कारणांनी माणसाला खेद होतो, दुःख होते. हे दुःख तीन प्रकारचे असते. ते असे :- १) आध्यात्मिक दुःख (किंवा ताप) म्हणजे शरीर आणि मन यांना होणारे दुःख. (२) अधिभौतिक दुःख म्हणजे जगातील प्राणी आणि अचतेन वस्तु यांचेपासून होणारे दुःख. उदा. - शेजाऱ्याने बोलणे अथवा मारणे, डोक्यावर दगड पडणे, इत्यादीमुळे होणारा ताप. (३) आधिदैविक दुःख म्हणजे अवर्षण, अतिवृष्टी, विद्युत्पात, भूतबाधा इत्यादीमुळे होणारा त्रास. हे त्रिविध ताप सर्वांनाच होतात असे नाही. तथापि आध्यात्मिक तापातून - रोगराई, मनाची बोच इत्यादीपासून कुणाचीच सुटका होत नाही. प्रायः सर्व माणसे या ना त्या प्रकारच्या दुःखाने संतप्त झालेली असतात.

## १४ डिसेंबर

या त्रिविध तापांतून सुटण्याची इच्छा कांही लोकांना होते. आणि सततचे सुख कुठे आहे का हे शोधण्याच्या मार्गाला हे लोक लागतात. अशा माणसांना संत, सत्पुरुष परमार्थाचा मार्ग दाखवितात. परमार्थ म्हणजे परमोच्च ईश्वर आणि तो अखंडपणे सुखरूप आहे. परमात्मप्राप्तीने जीव सुखस्वरूप होऊन जाणार आहे. या परमात्म्याच्या प्राप्तीसाठी जे काही केले जाते ते परमार्थ या सदरात मोडते. संतांनी परमात्म्याचा साक्षात्कार करून घेतलेला असतो. आणि ते आनंदरूप झालेले असतात. म्हणून ते खात्रीपूर्वक लोकांना सांगतात की जगातील त्रिविध तापांतून सुटून जाऊन शाश्वत सुख मिळविण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे परमार्थ. माणसाने हा परमार्थ केल्यास तो निरंतरचा सुखी होईल. ते सांगतात की परमार्थ केल्याने परमार्थ म्हणजे परमात्मा प्राप्त होईल. आपण परमात्मरूप होऊन जाऊ आणि मग आपणांस अखंड सुखाचा लाभ होईल.

आता त्रिविध तापातून सुटण्याची इच्छा असणाऱ्या माणसाने जर परमार्थ केला तर त्याला सततचे सुख मिळेल. जगातील सुखदु:खाचे झटके ज्याला बरे वाटतात त्यांचेसाठी परमार्थ नाही. तर दु:खातून सुटून अखंड आनंद मिळवू इच्छिणाऱ्यासाठी परमार्थाचा उपयोग आहे हे उघड आहे.

## १५ डिसेंबर

आत्म्याकडे अनुसंधान रहाणे हे परमार्थात आवश्यक आहे. आत्म्याच्या/ चैतन्याचा अनुभव येण्यास वा साक्षात्कार होण्यास अनुसंधान लागावयास हवे. आत्म्याची अनुभूती येण्यासाठी अनुकंपन, अनुवृत्ति, छंद आणि अनुसंधान असे चार टप्पे अथवा पायऱ्या आहेत.

नाकातून श्वास आत बाहेर होत असतो; नाकातून श्वासांची हालचाल चालू असते, तिला श्वसनाचे अनुकंपन असे म्हणतात. साधनाच्या अभ्यासाने मनातील वृत्तीवर वृत्ती उठण्याची लकब साधणे म्हणजे अनुवृत्ती होय. याचा अर्थ मनाची एकच वृत्ती सतत टिकून रहाणे म्हणजे अनुवृत्ती आहे. श्वासोच्छ्‌वास हा आतबाहेर असा गतिरूप आहे; त्यातच नामाची गति आहे. आत्म्याप्रत नेणारे नाम हे गतिरूप आहे. या गतीशी मनाच्या वृत्तीचा पटीपटीने संघर्ष होणे म्हणजे छंद. वेगळ्या शब्दात, नामाच्या गतीत मनोवृत्ती लय पावणे म्हणजे छंद होय. आणि हा छंद अखंडपणे लागणे अथवा टिकून रहाणे म्हणजे अनुसंधान आहे. वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास :- श्वासाचे अनुकंपन सतत चालू असते; तेथे मनाचे लक्ष अथवा वृत्ती लागली की अनुकंपन साध्य होते. आणि त्यामध्येच मनोवृत्ती तदाकार झाली की, अनुवृत्ति साध्य होते.

## १६ डिसेंबर

मनातील काम, क्रोध इत्यादी सहा विकार दूर होऊन, मनात अन्य कोणतेही विचार येईनासे झाले की छंद लागला असे समजावे. छंद म्हणजे त्याशिवाय अन्य कोणताही संकल्प विकल्प न येणे. त्याशिवाय दुसरे काही न सुचणे, असा छंद लागला की आत्म्याचे अनुसंधान लागते. आत्म्याखेरीज अन्य काहीही नाही, सर्व काही आत्माच आहे, अशी सतत जाणीव रहाणे म्हणजेच आत्म्याचे अनुसंधान लागणे होय.

आतापर्यंत सांगितलेला भाग संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे सांगता येईल - जिवंत माणसात मरेपर्यंत श्वासोच्छ्वास चालू आहे. या श्वासोच्छ्वासात नाम आहे; म्हणून 'नाम श्वासोच्छ्वासी असे! परब्रह्म तेथे वसे' असे समर्थ रामदासस्वामींनी सांगून ठेवलेले आहे. हे नाम म्हणजे चैतन्याचा नाद आहे. चैतन्याचा नाद म्हणजे नाम, हे अत्यंत महत्वाचे सूत्र परमार्थात लक्षात ठेवावयास हवे. तेव्हा नामानुसंधान म्हणजेच नादानुसंधान होय. अशा नादानुसंधानाचा अभ्यास झाला की नाद हाच प्रकाशाच्या बिंदू रूपात प्रगट होतो. आणि तो प्रकाशाचा बिंदू साधकाला स्पष्टपणे दिसू लागतो. पुढे कला व ज्योति या स्वरूपात आत्मसाक्षात्कार होतो. अशाप्रकारे नादानुसंधान अथवा नामानुसंधान म्हणजे आत्मानुसंधान आहे.

## १७ डिसेंबर

जीव हा देहातील इंद्रियांच्या द्वारा बाह्य जगातील पदार्थापासून सुख प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न सतत करीत असतो. तथापि ते सुख, नाशवंत, सतत नसणारे आणि मर्यादित असते.

ज्या बाह्य वस्तूपासून सुख होते असे आपणास वाटते, त्या वस्तू सदोदित आपणाजवळ, आपल्या ताब्यात राहू शकत नसल्याने त्यांचेपासुन मिळणारे सुख सतत राहू शकत नाही. बाह्य पदार्थ हे नश्वर, नाशवंत, मर्यादित असल्याने त्यापासून मिळणारे सुख हेही नश्वर, तात्कालीन आणि सीमित असते.

जीवाला जर अखंड, सततचे सुख, आनंद हवा असेल तर त्याने सुख देणारा असा अविनाशी, सतत टिकून रहाणारा, सुखदायक पदार्थ शोधून घ्यावयास हवा.

खरे सांगायचे झाल्यास अखंड आनंद देणारा पदार्थ जीवाच्या अगदी जवळच आहे. पण जीव त्याला विसरून गेला आहे. बाह्य पदार्थांची भूल पडल्याने त्याला त्या पदार्थाचे विस्मरण झाले आहे. हा पदार्थ म्हणजे सुखरूप असा परमात्मा. हा परमात्मा शाश्वत आहे. तो व्यवहारातील सुखदु:खांच्या पलीकडे आहे. किंबहुना जीव हा स्वत:च अखंड आनंदरूप असणारा परमात्मा आहे.

## १८ डिसेंबर

जीवाला स्वत:च्या खऱ्या स्वरूपाची भूल पडली आहे याचे कारण तो देह व इंद्रिये यांच्या उपाधीत सापडला आहे, आणि त्या उपाधींनाच तो 'मी' जीव म्हणत आहे. देह आणि इंद्रिये यांची उपाधि बाजूला सारून जर जीव अंतर्मुख झाला आणि परमात्म्याकडे वळला तर त्याला सुखाचा गड्डाच मिळणार आहे.

बाह्य पदार्थापासून थोडे सुख मिळते. पण या बाहेरील जड पदार्थांची जाणीव आपणास कशामुळे होते? या प्रश्नाचे उत्तर आहे :- शरीरात असणाऱ्या आत्मचैतन्यामुळे. जगातील पदार्थांची आणि त्यातून मिळणाऱ्या सुखदु:खांची जाणीव ज्या चैतन्यामुळे आपणास होते, त्या चैतन्याची जर जाणीव झाली तर चैतन्याचे सुख मिळणार आहे. चैतन्याच्या जाणीवेत खरेखुरे सुखसमाधान आहे. चैतन्याची जाणीव होण्यासाठी जे काही साधन करावे लागते त्यातही सुख आहे. चैतन्यात लक्ष ठेवल्याने, चैतन्यात केल्या जाणाऱ्या मनाच्या एकाग्रतेमुळे आनंद प्राप्त होत असतो. चैतन्याच्या प्राप्तीच्या साधनातील सुख हे निरपेक्ष, अमर्याद आणि सतत टिकणारे आहे. तेव्हा देह व इंद्रिये यांची उपाधी बाजूला करून चैतन्यप्राप्तीच्या साधनात सुख मिळवीत, आनंदरूप परमात्मा होणे म्हणजेच आनंदरूप, सुखरूप होणे आहे. परमात्मा हा अनंत आणि शाश्वत असल्याने परमात्मरूप होण्याने मिळणारे सुख अनंत आणि शाश्वत आहे.

## १९ डिसेंबर

परमार्थात परमेश्वराचे नाम हेच श्रेष्ठ साधन आहे. ज्या नामात परमेश्वर साठला आहे त्या नामाची बरोबरी जगात कोण बरे करू शकेल?

• या जगात नाम हे पावन आहे. नाम हे मांगल्याची खाण आहे. सर्व तीर्थांमध्ये तीर्थराज म्हणजे नाम आहे.

नाम हे फार शक्तिमान आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारही पुरुषार्थ नामानेच प्राप्त होतात. म्हणून एकनिष्ठपणाने नाम घेणे हे महत्वाचे आहे.

नामस्मरणात राहिल्याने मनाचा विषय बदलतो आणि मनातील विचारही पालटतात. नाम घेतल्याने विचारांचे वादळ शांत होते. न कळणाऱ्या गोष्टी किंवा न उलगडणाऱ्या गोष्टी नामाने कळतात आणि उलगडतात. नामाने उत्साह वाढतो. संसाररूपी सागरातून पलीकडे पार जाण्यास नाम हे मजबूत अशा नौकेप्रमाणे आहे.

नामाने देव आणि भक्त यांची गाठ पडते. नामाने जीवापुढे ईश्वररूप प्रगट होते. नामानेच 'नामी' म्हणजे ईश्वर प्रत्ययाला येतो. नामानेच जीवाला स्वत:चे सत्य स्वरूप कळून येते आणि तो आत्मस्वरूपाकार होऊन जातो.

## २० डिसेंबर



नाम वाटते तितके सोपे नाही. ते दुर्लभ आहे. हजार जन्मांची पुण्याई असेल तरच एक वेळ नाम घ्यावे असे वाटते. बहुत जन्माच्या पुण्याईशिवाय ईश्वराचे नाम हे ओठांवर सुद्धा येत नाही. नामावर खूप बोलता येईल, खूप ऐकता येईल, खूप वाचता येईल आणि खूप लिहिता येईल, पण नाम घेणे हे वाटते तितके सोपे नाही. नाम घेणे कठिण आहे.

ईश्वराच्या नामाचे दोन प्रकार आहेत. १) बाह्योपचाराने अथवा तोंडाने घेतलेले नाम, आणि (२) तत्त्वरूप, गतिरूप नाम. ज्या नामाचा उच्चार मुखाने केला जातो म्हणजे जे नाम बाह्योपचाराने घेतले जाते ते खरे तात्त्वीक गतिरूप नाम नव्हे.

या दोन प्रकारच्या नामाने होणारे परिणामही भिन्न आहेत. खऱ्या परमार्थात खरे तात्त्विक नाम कोणते हे जाणून घेणे हे महत्वाचे आहे. ते नाम गुरूकडून जाणून घेऊन त्या नामाचा अभ्यास साधकाने करावयास हवा. तात्त्विक गतिरूप नामानेच परमार्थाचे अंतिम साध्य प्राप्त करून घेता येते.

नाम हे वरील सांगितलेल्या दोनपैकी कोणत्याही प्रकारचे असो, नाम घेताना एक पथ्य पाळणे अतिशय आवश्यक आहे. हे पथ्य म्हणजे इंद्रियांचा संयम. इंद्रियांना माणसाने सैल सोडले, इंद्रिये स्वैराचार करत असतील आणि माणूस नाम घेत असेल तर त्या नामाने काहीही साध्य होणार नाही. नाम घेताना माणसाचे आपल्या इंद्रियांवर नियंत्रण हवे. इंद्रियसंयम हा नाम घेताना आवश्यक आहे.

## २१ डिसेंबर

जगाच्या व्यवहारात आपण वावरतो. त्यावेळी आपणास आपल्या भिन्न भिन्न इंद्रियांचे द्वारा भिन्न प्रकारचे ज्ञान होत असते. पाच ज्ञानेंद्रियांचे मार्फत शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या विषयांचे ज्ञान आपणास होते. हे सर्व विषय / पदार्थ दृश्य विश्वात असतात. म्हणजे आपले व्यावहारिक ज्ञान हे दृश्य विश्वाचे असते. बाहेरच्या दृश्य विश्वातून कणाकणाने, क्षणाक्षणाने घेतले जाणारे हे ज्ञान आधिभौतिक ज्ञान होय. ते अनुकरणाने आणि अभ्यासाने प्राप्त होणारे आहे. परंतु हे आधिभौतिक ज्ञान-त्यात स्वत:च्या देहाचेही ज्ञान आले. हे मात्र आपले 'स्वत:चे' ज्ञान नव्हे. तसेच मनाने विचार करूनही काही ज्ञान होत असते. पण ते ज्ञानसुद्धा हे 'स्वत:चे' ज्ञान होत नाही. दृश्याचे ज्ञान, मनाने होणारे ज्ञान आणि 'स्वत:चे' ज्ञान हे भिन्न आहेत. परमार्थात 'स्वत:चे' ज्ञान होणे आवश्यक आहे.

येथे मग प्रश्न असा येतो :- आपण 'स्वत: कोण आहोत?' याचे पारमार्थिक उत्तर आहे आपण 'स्वत:' म्हणजे आत्मवस्तु, आत्मा, ब्रह्म आहोत. या आत्म्याचे किंवा आत्म्याचे यथार्थ ज्ञान म्हणजे 'स्वत:चे' ज्ञान म्हणजे आत्मज्ञान होय. आणि 'स्वत:चे' ज्ञान म्हणजे स्वत:च्या अस्तित्वाचे ज्ञान होय. त्यालाच आत्मज्ञान असे म्हणतात. माणूस अंतर्मुख झाला तरच पुढे त्याला आत्मज्ञान होण्याची शक्यता आहे.

## २२ डिसेंबर

माणूस सध्या बहिर्मुख आहे. त्याची इंद्रियेही बाह्य दृश्याकडे धावत आहेत. त्यांचीही धावाधाव थांबून माणूस अंतर्मुख व्हावयास हवा. आत्मा हा जड देहापेक्षा वेगळा आहे. वर्तमानसमयी आपले जास्तीत जास्त लक्ष आपल्या देहावर असते. देह ही आत्म्याची उपाधि आहे. शेवाळ बाजूला केल्याशिवाय ज्याप्रमाणे खालचे पाणी दिसत नाही त्याप्रमाणे देहाची उपाधि बाजूला झाल्याशिवाय आत्म्याचे ज्ञान होत नाही.

गुरूने सांगितलेल्या साधनाने देहाची उपाधि बाजूस होऊन आत्म्याचे ज्ञान होते आत्म्याशिवाय दुसरा पदार्थ दृष्टीला न दिसणे, आत्म्याशिवाय अन्य कशाचीही प्रचीती न येणे म्हणजेच आत्मज्ञान आहे.आहे हे सर्व आत्मा आहे, सर्व काही आत्माच आहे असे ज्ञान होणे म्हणजे आत्म्याचे ज्ञान होणे म्हणजेच स्वत:चे ज्ञान होणे आहे.

आत्म्याच्या ज्ञानाची प्राप्ती ही गुरूच्या कृपेने होते. गुरूने निर्दिष्ट केलेल्या नामाच्या साधनाचा अभ्यास झाला तर गुरूची कृपा होते. याचाच अर्थ असा की आत्मज्ञान प्राप्त होण्यास नामाचे साधन करणे आवश्यक आहे.

नामसाधनाच्या द्वारा आत्मज्ञान झाले की जन्ममरणाच्या परंपरेतून सुटका होते, म्हणजेच मुक्ती मिळते. आत्मज्ञानाने सततचे सुख प्राप्त होते.

## २३ डिसेंबर

जीव हा मुळात परमात्म्याप्रमाणे अखंड आनंदस्वरूप आहे. आणि तो जेव्हा देहाच्या उपाधीत सापडतो तेव्हा त्याचे अखंड असणारे सुख संपते आणि शरीराच्या संगामुळे सुखानंतर दु:ख आणि दु:खानंतर सुख असे सुखदु:खाचे रहाटगाडगे सुरू होते.

जीव या जगात वावरत असतो. या जगात शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असे पाच प्रकारचे विषय आहेत आणि जीव हा विषयांपासून, त्या त्या पदार्थापासून सुख प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करतो. जीव हा इंद्रिय-जन्य सुखाच्या मागे धावतो. येथेच त्याचे चुकते. कारण जसजसे तो सुखाच्या मागे धावतो तसतसे सुख त्याच्यापासून दूरच पळते. ज्याप्रमाणे मृगजळाचे मागे लागले असता पळणाऱ्यापासून पाणी दूरच जाते, तसे सुख दूर जाते. धावणाऱ्याच्या डोळ्यांना मात्र पाणी येते.

जगातील ज्या विषयांपासून सुख मिळविण्याची धडपड जीव करतो, ते विषय हे आकाश, वायु, तेज, पाणी आणि पृथ्वी या पंचमहाभूतांच्या मिश्रणापासून बनलेले आहेत. विश्वातील पाच विषय म्हणजे पाच महाभूतांची सरमिसळ भेळ आहे. त्या भेळेतून जीवाला 'निर्भेळ' सुख कसे मिळणार?

बाह्य शब्द इत्यादी पदार्थ हे परस्वाधीन आहेत. ते कोणत्याही कारणाने जीवाजवळ कायमचे राहू शकत नाहीत आणि ज्या वस्तू सतत आपल्याजवळ राहू शकत नाहीत त्यांचेपासून सततचे कायमचे सुख मिळेल अशी अपेक्षा तरी कशी करता येईल?

## २४ डिसेंबर

जीवाला प्राप्त होणारे शब्द, स्पर्श इत्यादी बाह्य पदार्थ हे मर्यादित आहेत आणि त्यांचा भोग घेण्याची जीवाची शक्तीसुध्दा मर्यादित आहे. त्यामुळे मर्यादित वस्तूपासून मिळणारे सुख मर्यादितच असते. ते अखंड सतत मिळणारे असत नाही. आणखी असे - जगातील अमुक पदार्थ हा सुखदायक आणि तमुक पदार्थ हा दु:खदायक आहे असेही आपण निश्चितपणे म्हणू शकत नाही. भिन्न भिन्न परिस्थितीत भिन्न पदार्थ हे सुखदायक अथवा दु:खदायक ठरतात.

बाह्य वस्तूतून सुखाचा एक क्षण प्राप्त करून घेण्यास जीवाला पुष्कळसा वेळ कष्टात, त्रासात, दु:खात घालवावा लागतो.

बाह्य जगातून जे सुख जीवाला मिळते ते खरे सुख नसून तो केवळ सुखाचा आभास असतो. जीवाला जे सुख वाटते ते संपल्यावर पुन: दु:खच उत्पन्न होते. जीवाला प्राप्त होणाऱ्या सुखाच्या शेवटी त्याच्या पदरी दु:खच पडते. किंबहुना सुख हे शुद्ध सुख नसून जवळ जवळ प्रत्येक सुखाला दु:खाची झालर असते असेच म्हणता येते.

तसेच, बाह्य पदार्थ हे सतत टिकणारे नसून ते नष्ट होणारे, संपणारे असतात. साहजिकच नाशवंत पदार्थापासून मिळणारे सुख हे नाशवंत, तत्कालीन, क्षणिकच असते. या सर्वांचा अर्थ इतकाच की जगातील बाह्य पदार्थापासून जीवाला सततचे न संपणारे सुख मिळत नाही.

# २५ डिसेंबर

आत्मा हा सच्चिदानंद वायु आहे. तो सर्वव्यापक आहे. तो विश्वातही आहे आणि आपल्या देहातसुध्दा आहे. जीव म्हणजे शरीराच्या उपाधीत सापडलेले चैतन्य होय. आत्मचैतन्याचा साक्षात्कार होणे म्हणजे त्याचा अनुभव येणे.

खरे म्हणजे साक्षात्कार हे काही गौडबंगाल नाही. चैतन्य हे सर्वत्र असल्यामुळे साक्षात्कार ही सहज स्थिती आहे. साक्षात्कार सतत असतो. रात्रंदिवस साक्षात्कार असतो. तो अखंड असतो. तो निराळा कसला व्हायचा? अडचण एवढीच की आपण त्या चैतन्याजवळ नसतो. त्यामुळे साक्षात्कार आहे हे आपणास कळून येत नाही.

साक्षात्कार हा व्यवहारातही होत असतो. पण तो साक्षात्कार हे कळत नसल्याने आपण त्याला साक्षात्कार म्हणत नाही. उदाहरणार्थ - आपला श्वासोच्छ्वास हा साक्षात्कारच आहे. आपले जीवन हाही एक साक्षात्कारच आहे. आपण जिवंत आहोत हाही साक्षात्कारच आहे. आपल्या इच्छा, आकांक्षा, विकार, विचार कमी झाले तर तोही साक्षात्कारच आहे.

परमार्थातील साक्षात्कार हा चैतन्याचा प्रकर्ष झाल्यावर प्रत्ययाला येतो. सर्वत्र असणाऱ्या चैतन्याचा देहात प्रकर्ष झाला की परमार्थातील साक्षात्कार झाला. आपल्या दृष्टीने तो महत्वाचा आहे.

## २६ डिसेंबर

नदीचे पाणी सतत वहात असते. पण विशिष्ट प्रक्रियेने त्याचा कारंजा उडू लागला की तो दृश्य होऊन आपणास जाणवतो. परमार्थातील साक्षात्कार तसा आहे. शरीरात चैतन्याचा प्रकर्ष म्हणजे परमार्थातील साक्षात्कार.

संत /सदगुरु हे आपणास आपल्या देहातील चैतन्य निर्दिष्ट करतात. श्वासात चैतन्य आहे. आता श्वासाचे घर्षण झाल्याविना चैतन्याचा प्रकर्ष होत नाही. श्वासांचे घर्षण होण्यास आपली दृष्टी त्या ठिकाणी लागावयास हवी. श्वासाची घासणी (घर्षण) झाली की 'चक्' होऊन 'झक्' होते.

चैतन्यात नाद आणि प्रकाश हे दोन्हीही आहेत. साक्षात्कारात नाद आणि प्रकाश यांचा अनुभव येत असतो. साक्षात्कारातील नाद हा संघाताशिवाय होत असतो. पुढे या नादाचाच प्रकाशाचा बिंदू होतो. या प्रकाशाला तेल, बत्ती, चंद्र-सूर्य, अग्नि-विद्युत अथवा विजेचा प्रवाह लागत नाही. नाद, बिंदू कला आणि ज्योति या चारच प्रकारांनी आत्म्याचा / चैतन्याचा साक्षात्कार होतो.

साधकाला नादाचे आणि प्रकाशाचे अनुभव वेगवेगळ्या प्रकारांनी येऊ शकतात. नाद आणि प्रकाश हेच आत्म्याचे मूलभूत साक्षात्कार आहेत. साधन करताना नाद प्रकाशाचा अनुभव येणे म्हणजे आत्मसाक्षात्कार आहे.

## २७ डिसेंबर

या जगात प्रत्येक माणूस मी मी असे म्हणत असतो आणि जगातील व्यवहारात भाग घेत असतो. हा मी म्हणणारा जीव आहे. हा जीव इंद्रिये, मन, चित्त, बुद्धि यांचे द्वारा कळून येणारा नाही. शरीरात जो श्वासोच्छ्वास चालू आहे त्यावरुन जीवाचे अस्तित्व कळून येते.

जीव हा सूक्ष्म शरीर आणि स्थूल शरीर यांच्या उपाधीत सापडलेला आहे. खरे म्हणजे तो या दोन्ही देहांपेक्षा वेगळा आहे. तथापि स्थूल देह म्हणजे मी असे तो मानू लागला. या देहबुध्दीने तो 'मी हे केले,' 'मी ते केले' असे मानू लागला आणि अहंकाराने जीव स्वत:ला कर्माचा कर्ता मानू लागला. साहजिकच त्याचे हातून बरी वाईट, पुण्य-पाप अशी कर्मे घडू लागली. कर्म ही एक अशी शक्ती आहे की ती काहीतरी फळ निर्माण करते आणि ते कर्त्याने भोगल्यावर ती कर्मशक्ती संपून जाते. जीवाने केलेल्या कांही कर्मांची फळे त्याला तत्काळ मिळतात. उदा. - विस्तवाला बोट लावले की लगेच भाजते. काहींची फळे काही कालांतराने मिळतात. उदा - पेरलेले धान्य काही काळाने उगवते. काही कर्मांची फळे मात्र वर्तमानकालीन जन्म संपल्यावर मिळणारी असल्याने, ती भोगण्यास जीवाला पुनर्जन्म घ्यावा लागतो. अशा प्रकारे अहंकार व आसक्ती बाळगून केलेल्या कर्मांनी जीव हा जन्ममरणाच्या चक्रात सापडतो. जीवाच्या एका देहाचा नाश झाल्यावर मरणोत्तर जीव हा चालू स्थूल देहातून बाहेर पडतो पण त्याची सूक्ष्म देहाची उपाधि मात्र नष्ट होत नाही. मोक्ष मिळाल्यावरच ती नष्ट होणारी असते.

## २८ डिसेंबर

जीव हा वायुरूप आहे. स्थूल देहातून बाहेर पडल्यावर तो बाहेरील जड वायूत अथवा वायुरूप परमात्म्यात मिसळून जात नाही. कारण तो अद्यापि लिंग/स्थूल देहाच्या उपाधीत आहे. एका देहातुन बाहेर पडलेला जीव दुसरे स्थूल शरीर मिळेपर्यंत इकडे तिकडे भटकत रहातो. त्याला लगेच दुसरा देह मिळतो असे नाही. त्याची जी इच्छा असेल ती पूर्ण होण्याची परिस्थिती जेथे असते तेथेच तो पुनः जन्म घेतो. अशा प्रकारे जीवाचे जन्ममरणाचे चक्र चालू रहाते.

देह हे जीवाचे स्वरूप नव्हे. जीव हा मूलतः वायुस्वरूपी सच्चिदानंद परमात्मा आहे. देहाच्या उपाधीत जेव्हा हा वायुरूप परमात्मा सापडतो तेव्हा तो जीव या संज्ञेला पात्र होतो. तो परमात्म्याप्रमाणेच वायुस्वरूपी आहे स्वानंद-साम्राज्य - चक्रवर्ती आहे. परंतु आपले स्वतःचे हे मूळ स्वरूप जीव विसरून गेला आहे. परंतु आपले स्वतःचे मूळ स्वरूप प्राप्त करुन घेण्याचा हक्क त्याला आहे. त्यासाठी त्याने परमार्थ करावयास हवा. म्हणजे वायुरूप परमात्मा होण्यासाठी जीवाला वायुरूप साधन परमार्थात करावे लागते. ते साधन केल्याशिवाय देहाच्या उपाधि दूर होऊन जन्म - मरणाच्या चक्रातून सुटून, तो परमात्मरूप होऊ शकत नाही. हे साधन त्याने सदगुरूकडून जाणून घ्यावे लागते. आणि ते त्याने पूर्ण करावे लागते. परमात्मरूपाची प्राप्ती हाच जीवाचा मोक्ष आहे.

## २९ डिसेंबर

जगात जो व्यवहार चालतो तो मी - तू - पणावर, द्वैतावर आधारलेला असतो. व्यवहारात मी - तू - आम्ही, तुम्ही असे द्वैत बाळगूनच आपला व्यवहार होत असतो. त्यातूनच अनेकदा कलह, स्पर्धा इत्यादी निर्माण होतात. परमार्थात या द्वैताला मी-तू - पणाला अजिबात स्थान नाही. परमार्थात एक ईश्वरच मुख्य असल्याने तेथे द्वैताला स्थान नसून, अद्वैताला महत्त्व असते.

व्यवहार हा विचार अथवा अविचार यांचे द्वारा चालतो. काही अविचारी माणसे तर साधक बाधक विचार न करताच धडाधड व्यवहार उरकतात. या उलट शहाणी, विचारी माणसे बऱ्या वाईटाचा नीट निवाडा करून, विवेक करून व्यवहारात वागतात. परमार्थात मनातले नाना संकल्प, विचार हे उपयोगी पडत नाहीत. परमार्थात विचाररहित मन हे आवश्यक असते. परमार्थात मनाची विचाररहित स्थिती उपयोगी पडते.

व्यवहारात माणसाला बाह्य जगातील दृश्य पदार्थांची ओढ, आवड असते. आपणास पाहिजे आहेत त्या वस्तू मिळवून घेण्याकडे मनुष्य प्रवृत्त होत असतो. बाह्यवस्तूंची ही खेच, ही ओढ आहे ती संपल्याशिवाय परमार्थ होत नाही. बाह्य पदार्थातून मनाची निवृत्ती परमार्थाला पोषक आहे.

## ३० डिसेंबर

व्यवहारात माणूस लोभी असतो. त्याला काहीना काही हवेच असते. माणसाला विषयांचा लोभ वाटतो. बाह्य वस्तूविषयी लोभ बाळगणारा माणूस परमार्थात चालत नाही.

'मला अमुक पाहिजें, मला तमुक नको' असे माणूस व्यवहारात म्हणत असतो. आणि आपणास हव्या असणाऱ्या गोष्टी प्राप्त करुन घेण्यासाठी तो प्रयत्नशील असतो. काहींना तर त्या त्या गोष्टींच्या प्राप्तीचा ध्यासच लागतो. या उलट परमार्थ करणारा मनुष्य हा जे आपणाजवळ आहे त्यातच सुख मानणारा असतो. आहे त्यात समाधान न मानता जर माणूस द्रव्य, इष्ट गोष्ट इत्यादींच्या मागे लागत असेल तर त्याला परमार्थ करायला वेळ तरी कसा मिळणार? याचा अर्थ असा की विषयांची हाव ही परमार्थात उपयोगी नसून विरोधीच आहे.

संसार, प्रपंच, अथवा व्यवहार हा अपूर्ण आहे. कितीही काहीही केले मिळविले तरी व्यवहारात पूर्णतेचे समाधान मिळत नाही. अद्यापी काहीतरी कमी आहे असे वाटतच रहाते.. परमार्थं मात्र पूर्ण आहे. पूर्ण परमात्मा प्राप्त झाल्यावर परमार्थात अपूर्ण काय रहाणार? समुद्र हा जसा पूर्ण आहे, त्याप्रमाणे परमार्थ हा पूर्ण आहे.

## ३१ डिसेंबर

निंबरगीकर महाराज हे जगद्गुरु आहेत. तेच परमेश्वर आहेत. त्यांच्या इच्छेनेच सर्व गोष्टी होतात. त्यांच्या इच्छेने जे जे होते ते ते सर्व चांगलेच होते म्हणून निंबरगीकर महाराजांचे स्मरण असावे. त्यांचे स्मरण करण्यात अद्भुत शक्ती आहे. आपणास त्यांचे अखंड स्मरण राहिले पाहिजे

निंबरगीकर महाराज कनवाळू होते. त्यांनी सर्वांची काळजी घेतली आहे. महाराज कोणाचेही अकल्याण करणार नाहीत. कोणत्याही बऱ्यावाईट प्रसंगी निंबरगीकर महाराज आपल्यापाशी आहेत, हे लक्षात ठेवावे.

निंबरगीकर महाराजांची कृपा असली म्हणजे आपल्या वाटेतील काटेकुटे आपोआपच बाजूला होतात. ज्या साधकावर महाराजांची कृपा आहे त्याला ते इकडे तिकडे जाऊ देत नाहीत. ज्याला महाराजांनी आपल्या हाताशी धरले आहे त्याला ते तारतातच. जे लोक महाराजांच्या छायेत आहेत त्यांना ताप नाही. महाराजांची शीतल छाया सर्वांवर आहे. परंतु जरा जर त्यांचे छायेतून आपण बाजूला गेलो तर त्रिविध तापाचे चटके बसू लागतात. या उलट महाराजांच्याकडे ज्याने आपले सर्वस्व सोपविले आहे तो सर्वातून मोकळा होतो.

अशा या श्रेष्ठ जगद्गुरु निंबरगीकर महाराजांना शतशः प्रणाम.

# श्री दासराम महाराज श्लोकत्रयस्तुती

जयाचा जगी जन्म त्या सत्कुळात ।
जयाचे पिता मात दोन्ही महंत ।
गुरू तोषवीला हनूमंत राजा ।
नमस्कार श्रीदासरामासी माझा ।। १।।

जया वोळला श्री गुरुलिंगराया ।
मिळाली गीता कानडी रामराया ।
असा थोर हा संत प्रल्हाद राजा ।
नमस्कार श्रीदासरामासी माझा ।। २ ।।

जयाची मती कीर्तनी गुंग झाली ।
जयाची कृती साधनी दंग झाली ।
जगाची रती हो सदा देव काजा ।
नमस्कार श्रीदासरामासी माझा ।। ३ ।।

प्रा. डॉ. के. वा. आपटे

[redacted]

# श्री दासराम महाराजांचा
# गायत्री मंत्र

दासरामाय विद्महे । गोविंदसुताय धीमहि ।
तन्नो रामः प्रचोदयात् ॥

प्रा. डॉ. के. वा. आपटे

# श्री निंबरगीकर महाराजांची आरती

आरती नारायणा। धन्य जगज्जीवना।

सगुण ब्रह्ममूर्ती । काय तपोनिधाना ।।ध्रु ।।

सद्गुरु काडसिद्ध । तुकाराम अवतार ।।

साधन संप्रदाय । वाढविला बडिवार ।। १ ।।

गुरुर्लिंगजंगम नावे । जग प्रसिद्ध झाला ।

दासराम शरण येता । अंतरीये बोध केला ।। २ ।।

श्री दासराम महाराज केळकर

# श्री दासराम महाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनि दीनी दया । धन्य धन्य महाराया ।। ध्रु ।।

सद्गुरु हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंगसिद्ध । धरूनी रूप सिद्धानंद ।। १ ।।

सिद्ध साधनाने । स्वये ब्रह्मची झाले ।
भावादरे केशवाने । चरणी मस्तक ठेविले ।। २ ।।

प्रा. डॉ. के. वा. आपटे

# श्रीदासराममहाराजांची ग्रथंसंपदा


१. मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्‌ध चरित्र ........ १९४०

२. श्रीज्ञानदेवतेहत्तिशी, सानंद टीकेसह व तात्पर्यार्थासह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ ........ १९५२

३. श्रीज्ञानदेवमुद्‌प्रकाश साधनमुद्रा टीकेसह आणि ज्ञानेश्वरीसार ........ १९६८

४. वायुलहरी आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्‌ध भावार्थ) ........ १९६९

५. ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्‌ध टीकेसह ..... १९७१

६. ज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह ........ १९७२

७. श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत ........ १९७३

८. श्रीनागाप्पाण्णमहाराज निंबरगीकर चरित्र ........ ---

९. श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह) १९७४

१०. श्रीज्ञानेश्वरस्तोत्र ........ १९७५

११. सिद्‌धस्तुती ........ १९७७

१२. अमृतानुभव – मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह ........ १९७९

१३. तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र ........ १९८३

१४. श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र ........ ---

१५. गुरुपाठ ........ १९८४

१६. सांप्रदायबोध ........ १९८४

१७. श्रीरामपाठामृत ........ १९८४

१८. बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र ........................................ १९८४
१९. श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र ........................................ १९८७
२०. नित्यपाठामृत ........................................ १९८७
२१. संजीवनपाठ ........................................ १९८७
२२. श्रीदासरामवचनामृत ........................................ १९८७
२३. नासदीयसूक्त, भावार्थ संगति ........................................ १९८८
२४. श्रीगोविंददर्शन ........................................ १९८८
२५. सांगली माहात्म्य ऊर्फ गंगाधर चरितामृत ........................................ १९८८
२६. श्रीदासरामगाथा ........................................ १९८८
२७. श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण ........................................ १९८९
२८. श्रीगुरुमहिमा ........................................ १९९१
२९. श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ ........................................ १९९७
३०. श्रीरामदासबोध ........................................ १९९७
३१. श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला ........................................ १९९९
३२. परमार्थसार आणि अन्य ग्रंथ
(उद्धवरावजीमहाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह) ........................................ २००२
३३. परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पहिली व दुसरी ........................................ २००२
३४. आरती संग्रह ........................................ २००२
३५. चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ ........................................ [illegible]
३६. हरिपाठ संकीर्तन ........................................ [illegible]
३७. श्रीदासराम महाराजांचा वचन संग्रह ........................................ [illegible]

